
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
ग्र. क्र. ५८५

REFBK-0021926

५८५/९२ ५९१७

# कन्याकुमारी

बंगालचा उपसागर, हिंदी महासागर आणि अरबी सागर या तीन विशाल सागराच्या संगमावरील पवित्र भारतमातेच्या भूभागाचे दक्षिणेकडील शेवटचे टोक – कन्याकुमारी। येथील प्रख्यात प्राचीन मंदिरात आज हजारो वर्षे पाणिग्रहणासाठी उत्सुक उभी आहे प्रणयवेडी कन्याकुमारी – जिला शिवाने वरले होते



REFBK-0021926

या कन्येचे लावण्य काय वर्णावे ? तिचा चेहेरा मोहक आहे नाकात चमकणाऱ्या हिऱ्याच्या तेजाने चेहेरा उजळून निघाला आहे हातात

वरमाला घेऊन शिवाची प्रतीक्षा करीत अधीरपणे वाट पाहात ती उभी आहे  जगाच्या सुखासाठी स्वत चे सुख बाजूला सारून देवी कायमची कुमारीच राहिली. वाट पाहून थकल्याचा भाव आणि विफल प्रीतीतूनही ओसंडून जाणारी निष्ठा तिच्या सुंदर नेत्रात जणू प्रकटली आहे.

कोनार्कहून कन्याकुमारीकडे निघालो होतो – देवी कन्याकुमारी तुझी व्याकुळता पाहायला! पर्यटक येतात आणि जातात  दिवस उगवतो आणि मावळतो  पण 'मी सदैव कन्याच राहीन' या दृढनिश्चयाने आज वर्षोनुवर्षे तू तीन सागराच्या खळाळणाऱ्या लाटांच्या सान्निध्यात सागरतीरावर उभी आहेस

देवी कन्याकुमारी – तुझी सुंदर पण व्याकूळ भाव चेहेऱ्यावर असलेली मूर्ती पाहिली  आणि तुझी पवित्र आठवण हृदयात खोलवर साठवतच परतीचा प्रवास सुरू केला

✦

# प्रस्तावना

कुठल्याही पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा अधिकार माझा आहे असे मी समजत नाही. लेखकाची अनुभूती, त्याच्या अनुभवाना झालेला जाणिवेचा स्पर्श समजावून घेणे एवढी सोपी गोष्ट नाही त्याचमुळे 'प्रस्तावना' प्रकार मी टाळत आलो आहे, पण एके दिवशी सौ मेधा काळे यांचे 'शालीमारची साद' हे पुस्तक पोष्टाने घरी आले भारताच्या प्रवासवर्णनाचे ते पुस्तक पाहून माझी उत्सुकता जागृत झाली

प्रवास हा माझाही छंद आहे पण ज्या योजनाबद्ध तऱ्हेने सौ काळे यांनी प्रवास केला तसा मी केलेला नाही सार्‍या भारतभर प्रवास करूनही अनेक स्थळे मी अद्यापही पाहिली नाहीत सौ काळेंचे पुस्तक वाचत असताना न कळत माझे मन माझ्या प्रवासातल्या आठवणीत रगून गेले मी पाहिलेली प्रेक्षणीय स्थळे परत डोळ्यासमोर उभी राहिली तो जो आनद मला लाभला त्याचमुळे मी सौ मेधा काळे यांच्या दुसऱ्या पुस्तकाला 'कोनार्क ते कन्याकुमारी' या प्रवासवर्णनाला प्रस्तावना लिहावयाचे मान्य केले

मराठीमध्ये तशी प्रवासवर्णनांची अजून फारशी भर पडलेली नाही. श्री अनत काणेकर, श्री पु ल देशपाडे यांच्या पुस्तकानी प्रवास वर्णनाची शाखा समृद्ध झाली आहे मत्रमुग्ध करणारी प्रेक्षणीय स्थळे व अनुभव अशा विचारवतांना, कवीमनाच्या कलावताना अतर्मुख करतात

काही वेळेला त्यांच्या भावप्रतिभेला आव्हान देतात त्यामुळे ती प्रवास वर्णने नुसती प्रवास कथा न राहता वाचकाच्या मनाला वेगळ्या विचाराच देण देऊन मोकळी होतात. प्रा सौ मेधा काळे यांची प्रवासवर्णने त्याहून भिन्न आहेत स्वतःला शक्यतो विसरून प्रवासाशीच प्रामाणिक राहण्याचा त्यांचा हेतू आहे

'शालीमारची साद' व 'कोनार्क ते कन्याकुमारी' ही दोन्ही पुस्तके वाचत असता एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली भारतभ्रमण सुरु करण्याआधी आपण कुठे जाणार, काय पाहणार याची सर्वतोपरी माहिती या दांपत्याने आधी गोळा केली विचारपूर्वक प्रवासाचा मार्ग आखला दोन लहान मुलांना घेऊन एवढा दूरचा प्रवास करणे एवढे सोपे नाही पण प्रवासाची आवड आणि तो पुरा करण्याचा निश्चय यामुळेच त्यांनी योजलेला प्रवास फारसा बदल न घडता त्यांना पुरा करता आला

आपल्या देशात बहुधा तीन प्रकारचे यात्रिक असतात हौसे, गवसे आणि नवसे दुसरा वर्ग जो आहे तो चारीधाम यात्रेचे पुण्य पदरात पाडून घेणारा, जाईल त्या स्थळी प्रथम धर्मशाळा, नतर तीर्थस्थान आणि देवालय यात गुतणाऱ्या भाविक मडळीचा ! तिसरे—नवस फेडण्यासाठी किंवा घेतलेले काम पुरे करण्यासाठी प्रवासाला जाणारी आणि उरल्या वेळात त्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे पहाणारी मडळी, पहिला वर्ग जो आहे तो मात्र प्रवासाच्या आवडीमध्येच बाहेर पडतो या प्रकारातच काळे दांपत्याचा उल्लेख करावा लागेल या दांपत्याची दृष्टी निर्मळ आहे, त्यामागे चौकस बुद्धी आहे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचा भाग म्हणजे या दांपत्याला रसाळ दृष्टी लाभलेली आहे त्याचमुळे कोनार्कचे भग्न शिल्प असो किंवा भारताच्या एका टोकाला, समुद्रात उभे राहिलेले विवेकानद स्मारक असो ही सर्व स्थळे उघड्या डोळ्यांनी जाणीवपूर्वक या दांपत्याला पाहता आली आकाशाला भिडलेली गोपुरे, शांत वातावरणात उभारलेले भव्य दर्गे, सौंदर्याने नटलेली शिल्पे जेवढ्या श्रद्धेने यांनी पाहिली त्याच श्रद्धेने नवभारताची तीर्थस्थळे म्हणून ओळखली जाणारी भव्य धरणे यांनी डोळ्याखाली घातली.

जेथे जेथे भव्यता होती जेथे जेथे दिव्यत्व दिसले, जेथे सौदर्य साकारल त्या त्या जागी याची पावले थबकली. दोन्ही पुस्तके वाचत असता आपला देश नानाविध धर्म, सस्कृति सौदर्याने कसा नटलेला आहे याची साक्ष कोणाही वाचकाच्या मनाला पटेल. नुसती सौंदर्यस्थळेच नव्हेत पण ती स्थळे इतिहास आणि सस्कृती याना कोणत्या नात्याने जोडली गेली आहेत हेही प्रवासलेखकाना माहीत असायला हवे त्याचा प्रत्यय या पुस्तकात ठायी ठायी येतो स्थळामागच्या आख्यायिका, स्थळाचे तपशील, आवश्यकतेनुसार आलेली माहिती यामुळे हे प्रवासवर्णन अधिक सपन्न बनलेले आहे.

भारताच्या प्रवासाला निघण्याआधी यात्रिकानी ही पुस्तके सग्रही बाळगावीत एवढी याची उपयुक्तता आहे. या उपक्रमाबद्दल काळे दापत्याचे मन:पूर्वक अभिनदन या पुस्तकाच्या वाचनाने एका जरी व्यक्तीला प्रवास करण्याची इच्छा निर्माण झाली तरी सौ मेधा काळे याचे श्रम सार्थकी लागले असे मी समजेन तशी अनेकाना निश्चित स्फूर्ती होईलच

कोवाड,
ता चदगड,
जि. कोल्हापूर

रणजित देसाई

काही वेळेला त्याच्या भावप्रतिभेला आव्हान देतात त्यामुळे ती प्रवास वर्णने नुसती प्रवास कथा न राहता वाचकाच्या मनाला वेगळ्या विचाराच देण देऊन मोकळी होतात प्रा सौ मेधा काळे यांची प्रवासवर्णने त्याहून भिन्न आहेत स्वत'ला शक्यतो विसरून प्रवासाशीच प्रामाणिक राहण्याचा त्याचा हेतू आहे

'शालीमारची साद' व 'कोनार्क ते कन्याकुमारी' ही दोन्ही पुस्तके वाचत असता एक गोष्ट प्रामुख्याने जाणवली भारतभ्रमण सुरु करण्याआधी आपण कुठे जाणार, काय पाहणार याची सर्वतोपरी माहिती या दापत्यान आधी गोळा केली विचारपूर्वक प्रवासाचा मार्ग आखला दोन लहान मुलाना घेऊन एवढा दूरचा प्रवास करणे एवढे सोपे नाही पण प्रवासाची आवड आणि तो पुरा करण्याचा निश्चय यामुळेच त्यानी योजलेला प्रवास फारसा बदल न घडता त्याना पुरा करता आला

आपल्या देशात बहुधा तीन प्रकारचे यात्रिक असतात हौसे, गवसे आणि नवसे दुसरा वर्ग जो आहे तो चारीधाम यात्रेचे पुण्य पदरात पाडून घेणारा, जाईल त्या स्थळी प्रथम धर्मशाळा, नतर तीर्थस्थान आणि देवालय यात गुतणाऱ्या भाविक मडळीचा। तिसरे–नवस फेडण्यासाठी किंवा घेतलेले काम पुरे करण्यासाठी प्रवासाला जाणारी आणि उरल्या वेळात त्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे पहाणारी मडळी, पहिला वर्ग जो आहे तो मात्र प्रवासाच्या आवडीमध्येच बाहेर पडतो या प्रकारातच काळे दांपत्याचा उल्लेख करावा लागेल या दापत्याची दृष्टी निर्मळ आहे, त्यामागे चौकस बुद्धी आहे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचा भाग म्हणजे या दापत्याला रसाळ दृष्टी लाभलेली आहे त्यामुळे कोनार्कचे भग्न शिल्प असो किंवा भारताच्या एका टोकाला, समुद्रात उभे राहिलेले विवेकानद स्मारक असो ही सर्व स्थळे उघड्या डोळ्यानी जाणीवपूर्वक या दापत्याला पाहता आली आकाशाला भिडलेली गोपुरे, शांत वातावरणात उभारलेले भव्य दर्गे, सौंदर्याने नटलेली शिल्पे जेवढ्या श्रद्धेने यानी पाहिली त्याच श्रद्धेने नवभारताची तीर्थस्थळे म्हणून ओळखली जाणारी भव्य धरणे यांनी डोळ्याखाली घातली.

जेथे जेथे भव्यता होती जेथे जेथे दिव्यत्व दिसले, जेथे सौंदर्य साकारले त्या त्या जागी याची पावले थबकली. दोन्ही पुस्तके वाचत असता आपला देश नानाविध धर्म, सस्कृति सौदर्याने कसा नटलेला आहे याची साक्ष कोणाही वाचकाच्या मनाला पटेल. नुसती सौदर्यस्थळेच नव्हेत पण ती स्थळे इतिहास आणि सस्कृती याना कोणत्या नात्याने जोडली गेली आहेत हेही प्रवासलेखकाना माहीत असायला हवे त्याचा प्रत्यय या पुस्तकात ठायी ठायी येतो स्थळामागच्या आख्यायिका, स्थळाचे तपशील, आवश्यकतेनुसार आलेली माहिती यामुळे हे प्रवासवर्णन अधिक सघन बनलेले आहे.

भारताच्या प्रवासाला निघण्याआधी यात्रिकानी ही पुस्तके सग्रही बाळगावीत एवढी याची उपयुक्तता आहे या उपक्रमाबद्दल काळे दापत्याचे मन:पूर्वक अभिनदन या पुस्तकाच्या वाचनाने एका जरी व्यक्तीला प्रवास करण्याची इच्छा निर्माण झाली तरी सौ मेधा काळे याचे श्रम सार्थकी लागले असे मी समजेन तशी अनेकाना निश्चित स्फूर्ती होईलच

कोवाड,<br>
ता चदगड,<br>
जि कोल्हापूर

रणजित देसाई

# कोनार्क ते कन्याकुमारी वाचण्यापूर्वी--

१९७४ मध्ये उत्तर भारताचा सात राज्यांचा सात हजार किलोमीटर अंतराचा ३५ दिवसांचा प्रवास पती, मुले, श्वशुर यांच्या समवेत केला त्यावेळी विविधतेने नटलेला, संपन्न प्राचीन संस्कृती असलेला भारत देश पाहून भारताच्या थोरवीची साक्ष पटली आलेले अनुभव शब्दांकित केल्याशिवाय रहावेना त्यातूनच १९७५ मध्ये शालीमारची साद हे प्रवासवर्णनपर पुस्तक जन्माला आले हे माझे पहिलेच पुस्तक ! पण रसिक वाचक, हौशी पर्यटक पर्यटनक्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ, विविध वृत्तपत्रे, प्रथितयश साहित्यिक, समीक्षक इ० नी पुस्तकाचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले सामान्य वाचकांची केवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर इतर राज्यातूनही पत्रे आली आपली प्रतिक्रिया कळविणारे होते पर्यटक, साहित्यिक विद्यार्थी शिक्षक, नामवंत व्यक्ती आणि त्याचबरोबर पोलीस व्यवसायातील एक पोलीसही ! पुस्तक आवडल्याचे मनमोकळेपणाने कळवून त्यांनी काही सूचनाही केल्या. वाचकांचा अभिप्राय मला जास्त महत्त्वाचा वाटला कारण अभिप्रायपर दोन शब्द लेखकाला कळवावे ही ऊर्मी पुस्तक त्यांच्या पसंतीला उतरले याची साक्ष देत होती बहुतेकांनी पूर्व व दक्षिण भारताचा प्रवास करून ते प्रवासवर्णन प्रसिद्ध करा असं सुचावले सर्व बाजूनी मिळालेल्या प्रोत्साहनाने उत्साह द्विगुणित झाला. १९७६ च्या दिवाळीच्या सुटीत मी, माझे पती श्री यशवंत व उल्का, उदय निघालो 'कोनार्क ते कन्याकुमारी' अशा पूर्व व दक्षिण भारताच्या सफरीवर !

पाटणा, गयेपासून भुवनेश्वर, कोनार्क, जगन्नाथपुरी, तिरुपती, रामेश्वर कन्याकुमारीपर्यंत अनेक ऋषी, मुनी, संत, महात्मे यांच्या वास्तव्याने पुनीत

झालेली, प्राचीन थोर वारसा असलेली भारतभूमी पाहण्याची ओढ लागली होती अज्ञात, अनामिक शिल्पकारानी आपल्या अलौकिक कारागिरीने साकार केलेली विविध मदिरे पाहण्यास उत्सुक झालो होतो त्याचप्रमाणे निसर्गसौदर्याने बहरलेली भारतभूमी पाहण्यास आतुर झालो होतो ३५ दिवसांचा आठ हजार कि मी अतराचा पूर्व व दक्षिण भारताचा प्रवास सपला खरा, पण आलेल्या विविध अनुभवातून, मिळालेल्या माहितीतून सवेदनाशील मन भारावून गेले त्यातून साकार झाले आहे 'कोनार्क ते कन्याकुमारी' हे नवे पुस्तक

हे दुसरे पुस्तक लिहितानाही पहिल्या पुस्तकाप्रमाणेच दृष्टिकोन समोर ठवला आहे दृष्टीसमोर आहे सर्वसामान्य पर्यटक दर्शनीय स्थळाची जुजबी माहिती असणारा, कुठे काय नेमके पहायचे हे माहिती नसल्याने वेळ वाया जाणारा व क्वचित एखादे दर्शनीय स्थान माहिती नसल्याने ते न पाहताच परतणारा अशा पर्यटकाना योग्य मार्गदर्शन व्हावे हाच प्रमुख हेतू ठेवला आहे अर्थात प्रवासवर्णन कटाळवाणे होऊ नये म्हणून प्रवासात ठिकठिकाणी आलेले अनुभवही दिले आहेत

पौराणिक, ऐतिहासिक पार्श्वभूमीसकट स्थलवर्णन चटकदार, रजक करण्याचा प्रयत्न केला आहे ते ते स्थान डोळ्यासमोर चटकन उभे रहावे हीच भूमिका आहे त्या त्या स्थळाचे सौदर्य, वैशिष्ट्य व बारकावे उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे आर्टपेपरवर निवडक छायाचित्रे, तसेच मार्गदर्शनासाठी नकाशाही समाविष्ट केला आहे हेतू हा की नुसत्या चित्र दर्शनाने प्रवासाबद्दल आवड निर्माण व्हावी

यात्रा हा एक धर्म आहे असे म्हटले जाते ते खरेच आहे प्रवासामुळे मन विशाल होते, विचाराची कक्षा रुदावते, अनुभवविश्व समृद्ध होते, तसेच परिस्थितीशी जुळवून घेण्याची वृत्ती जोपासली जाते प्राचीनकाळी ह्यू-एन-त्सग या चिनी प्रवाशाने भारतात यात्रा केली व टिपणे लिहून ठेवली मोगल कालात मनूची या इटालियन प्रवाशाने बारीकसारीक माहिती लिहून ठेवल्याने तत्कालीन सस्कृतीचे दर्शन घडते. सत ज्ञानेश्वर, नामदेव, इ. नी पायी यात्रा केल्या कलकत्त्यात जन्मलेल्या स्वामी विवेकानदांनी तर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पायी प्रवास करून

भारतीय संस्कृतीचे माहात्म्य लोकांना पटवून दिले अशा या खंडप्राय भारत देशाचा केवळ दोन वर्षांत पंधरा हजार कि मी. अंतराचा प्रवास तरुण वयातच घडला हे मी माझे महद्‌भाग्य समजते तथापि घाईगर्दीच्या प्रवासात ठिकठिकाणचे लोकजीवन जवळून न्याहाळता आले नाही याची मात्र खंत वाटते वार्धक्याकडे झुकल्यावर उत्साहाने प्रवास करता येत नाही व मौज लुटता येत नाही हे ठिकठिकाणी भेटलेल्या वृद्ध स्त्री, पुरुषांच्या अनुभवावरून ध्यानात येत होते

माझे पती श्री यशवंत यांनी प्रवास आखण्यापासून ते हे पुस्तक प्रकाशित करण्यापर्यंत दाखविलेला उत्साह, चोखंदळपणा याला सीमा नाही प्रवासातील विविध मंदिरे, वास्तु, प्रासाद इ चे मोजमाप, तांत्रिक माहिती त्यांच्यामुळेच ठिकठिकाणी समाविष्ट करता आली

'शालीमारची साद' प्रमाणेच या पुस्तकाची सुबक छपाई अनंत प्रिंटिंग प्रेसचे श्री वा ज्ञा पावले, प्रेसचे फोरमन श्री शेलार, प्रिंटर श्री राऊत व इतर कामगार यांच्या सहकार्याने अल्पवेळात होऊ शकली आमचे स्नेही श्री अनंत सालकर यांनी मुखपृष्ठासाठी कोनार्कचे सूर्यमंदिर हुबेहुब साकार केले त्यांचीही मी आभारी आहे स्वरूप मुद्रणच्या संचालकांनी कव्हर प्रिंटिंग व आर्टप्लेटस् सुबकपणे छापल्या त्याचप्रमाणे पुण्यातील कागद खरेदीपासून ते पुस्तकाची छपाई, जाहिरात इ. सर्व धावपळीची कामे मागील पुस्तकाप्रमाणे माझे बंधू श्री प्रमोद झोळ (अप्पा) याने अत्यंत तत्परतेने व हौसेने केली याबद्दल आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे महाराष्ट्र टाइम्स, ललित, सकाळ, स्वराज्य, लोकप्रभा, तरुण भारत, विशाल सह्याद्री, दै पुढारी, सत्यवादी इ वृत्तपत्रांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानणे माझे कर्तव्यच आहे

शेवटी पण अतिशय महत्त्वाचे ऋण व्यक्त केल्याशिवाय माझे हे निवेदन पूर्ण होणार नाही प्रख्यात साहित्यिक श्री रणजित देसाई यांनी माझी प्रत्यक्ष ओळख नसतानाही पत्रद्वारे केलेल्या विनंतीचा स्वीकार करून वेळात वेळ काढून या पुस्तकाला प्रस्तावना दिली याबद्दल मी अतिशय कृतज्ञ आहे

रसिक वाचक व हौशी पर्यटक यांच्या पसंतीस हे पुस्तक उतरेल अशी आशा आहे

दि २-१०-१९७७
अहमदनगर

सौ मेधा काळे

हातोडी व छिन्नी घेऊन ज्यांनी अखंड
परिश्रमाने निर्जीव पत्थरातून अजरामर,
अलौकिक शिल्पकृती साकार केल्या
त्या अज्ञात, अनामिक शिल्पकाराच्या
स्मृतीस.....

| | |
|---|---|
| ✦ नगर सोडताना | |
| ✦ बिहारच्या राजधानीत–पाटणा | १७ |
| ✦ गया, बुद्धगया | २३ |
| ✦ राजगीर ऊर्फ राजगृह | २९ |
| ✦ भग्न विद्यालयाचे भव्य दर्शन–नालंदा | ३५ |
| ✦ जलमंदिराचे पावापुरी | ४० |
| ✦ कलकत्ता–एक महानगरी | ४४ |
| ✦ मंदिराच्या नगरीत–भुवनेश्वर | ४७ |
| ✦ कोनार्क–सूर्यदेवतेची अगाध लीला | ६९ |
| ✦ बलराम, कृष्ण, सुभद्रेचे जगन्नाथपुरी | ८० |
| ✦ पुरी ते तिरुपती | ८८ |
| ✦ श्री व्यंकटेश्वर बालाजीचे तिरुपती | ९५ |
| ✦ तामीळ संस्कृतीचे मद्रास | ९९ |
| ✦ पल्लव शिल्पकृतीचा आविष्कार- महाबलीपुरम् | १०८ |
| ✦ कांचीवरम-शिवकांची, विष्णुकांची | ११८ |
| ✦ सरफोजीराजे भोसलेंचे तंजावर | १२४ |
| ✦ तिरुचिरापल्ली, श्रीरंगमक्षेत्र | १३१ |
| ✦ श्री सेतुबंध रामेश्वर | १३९ |
| ✦ मीनाक्षी मदुराई | १४६ |
| ✦ रुपेरी वाळूत माडांच्या वनात–त्रिवेंद्रम् | १५२ |
| ✦ पद्मनाथपुरम्, शुचींद्रम् | १५८ |
| ✦ 'पाहू रे किती वाट ?'–कन्याकुमारी | १६८ |
| ✦ अरबी समुद्राची राणी-कोचीन | १७३ |
| ✦ धुक्यात गुरफटलेली उटी | १८१ |
| ✦ होयसाळ शिल्पकलेचा आविष्कार-बेलूर | १८८ |
| ✦ गीत गाती पत्थर-हळेबीड | १९७ |
| ✦ श्री गोमतेश्वराचे श्रवणबेलगोळा | २०३ |
| ✦ दक्षिणेची शान–राजशाही म्हैसूर | २०८ |
| ✦ बंगलोर–गार्डन सिटी ऑफ इंडिया | २१३ |
| ✦ परतीचा प्रवास | २२६ |
| | २३४ |

# नगर सोडताना

१९७४ साली केलेल्या काश्मीरसह उत्तरभारताच्या प्रवासात भारताच्या महान सांस्कृतिक वारशाची प्रचीती आली होती. पूर्व व दक्षिण भारताचा प्रवासही आखावा असा विचार मनात सारखा घोळत होता तो योग १९७६ च्या दिवाळीत जमून आला

प्रवासाला निघण्यापूर्वी समग्र पर्यटनवाङ्मय, फोल्डर्स नकाशे जमविण्याचा यांचा उद्योग तर वर्षभर चालूच होता पाटण्याचे माहितीपत्रक आले तेव्हाच ठरवले की एक इंच लांबीच्या कुराणाची प्रत तेथील खुदाबक्ष लायब्ररीत पहायची कलकत्त्याचा नकाशा आला तेव्हाच आम्ही तेथील बोटॅनिकल गार्डनमधील १३०० फूट घेर असलेल्या वटवृक्षाच्या सावलीत विसावा घ्यायला उत्सुक झालो रविंद्रनाथ टागोर व स्वामी विवेकानंद या थोर व्यक्तींच्या निवासस्थानास भेट देण्यासही मन आतुर झाले नालंदाची माहितीपत्रके जेव्हा आली तेव्हा हे अंतर्मुख होऊन म्हणू लागले की बख्त्यार खिलजीने नालंदाच्या गगनाला भिडणाऱ्या नऊ मजली वाचनालयास आगीचे भक्ष्य बनवले व एका महान सांस्कृतिक ठेव्याचा नाश केला काय हा धर्मांधपणा !

भुवनेश्वरचा नकाशा आला तेव्हाच मंदिरावरील शिल्पकृतीतील विलोभनीय नारीसौंदर्य पहायला उत्सुक झालो कोनार्कचे माहितीपत्रक आले तेव्हाच मन सूर्यदेवाच्या २४ चक्रांच्या, सप्तअश्वांच्या, रथाचा आकार दिलेल्या विशाल मंदिराजवळ जाऊन पोहोचले मद्रासला गेलो की तेथील

आगळे सर्पोद्यान जसे पहायचे तसेच वाल्लूयार कोट्टम हे तामीळ सतकवीचे नवे भव्य स्मारकही पहायचे असे ठरवले महाबलीपुरमला विशाल शिळेत कोरलेली अर्जुनाची तपस्या कधी पाहू असे झाले होते तंजावरच्या भेटीत सरफोजीराजे भोसले यांच्या वाङ्मयीन आवडीने निर्माण झालेली जगद्‌विख्यात सरस्वतीमहाल लायब्ररी पहायची ठरविले

रामेश्वरच्या प्रख्यात मंदिरातील हजार स्तंभाच्या प्रदक्षिणामार्गाचे आगळे शिल्पसौंदर्य न्याहाळायला मन अधीर झाले होते कन्याकुमारीचे माहितीपत्रक आले तेव्हा नेत्रांसमोर तरळले तपश्चर्या करणाऱ्या सतीचे विशाल सागरातील खडकावर उमटलेले पाऊल व रेखीव विवेकानंद स्मारक! केरळचा नकाशा आला आणि त्रिवेंद्रमच्या आर्टगॅलरीतील राजा रविवर्मा यांची ओरिजिनल चित्रे पहाण्याची उत्सुकता वाटू लागली तसेच कोवालम्‌ बीचच्या रुपेरी वाळूत धुंद होऊन विसावण्याची ओढ लागली. कोचीनच्या बॅकवॉटर्सची लज्जत चाखायचीही ठरवले उटकमंडचे माहितीपत्रक आले तेव्हा आम्ही धुक्यात गुरफटलेल्या उटीची सौंदर्यस्थळे पहाण्याचा मनोमन प्रयत्न केला बेलूर, हळेबीड येथील मंदिरावर कोरलेल्या मादक अप्सरांच्या दर्शनाशिवाय कर्नाटकराज्याची भेट पूर्ण होणार नव्हती श्रवणबेळगोळा येथील ' बाहुबलापेक्षा त्यागबल श्रेष्ठ आहे ' असा संदेश देणारा ५७ फूट उंचीचा भगवान गोमतेश्वराचा पुतळा व त्याचप्रमाणे त्याच्या पायाशी कोरलेला आद्य मराठी शिलालेख पहायला उत्सुक झालो होतो श्रीरंग-पट्टणच्या भेटीत इंग्रजांशी शेवटपर्यंत वाघाप्रमाणे झुंज देणाऱ्या टिपू सुलतानाचे शव किल्ल्यात जेथे सापडले ती जागा पहायचे ठरवले प्रवासाला भेट द्यावयाच्या स्थळांचे माहितीपत्रक आले की त्या त्या गावाला कल्पनेने जाऊन पोहोचत असू

मुंबईच्या ।ध्य रेल्वेच्या कार्यालयाकडे अर्ज करून आम्ही सुचवलेल्या प्रवासमार्गाची मंजुरी सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आली आणि मग प्रवासाला निघण्याची खरीखुरी तयारी सुरू झाली सुदैवाने ह्यांच्या रजेची मंजुरी लवकर आली व तयारीला अधिकच वेग आला मुले-उल्का व उदय -नगरला अथवा पुण्याला आजीकडे रहायला तयार होईनात

त्यांना आम्ही आमीष दाखवले की दिवाळीला घरी लाडू करंजांचा खूप खाऊ मिळेल फटाके उडवायला मिळतील. पण उदय निर्धाराने म्हणायचा मला लाडू, चकल्या, फटाके काहीही नको मला डोंगरावरचा ५७ फूट उंचीचा बाहुबली पहायचा आहे ! उल्काला म्हटले तू घरी राहिलीस तर तुझ्यासाठी छान फ्रॉक, दागिने, खेळणी आणू त्यावर ती म्हणायची मला फ्रॉक नको, खेळणी नकोत मला कन्याकुमारीचा तीन समुद्रांचा संगम बघायचा आहे छोट्या आगगाडीत बसून निलगिरी पर्वतावरील उटीला जायचे आहे शेवटी मुलाच्या हट्टापुढे मान तुकवली व त्याना बरोबर घेण्याचे निश्चित केले

चार ऑक्टोबरला प्रवासास निघण्याचे ठरले सफरीचा बेत एक आठवडा अगोदर नातेवाईक, मित्रमडळींच्या कानावर घातला. कोणी म्हणायचे की पाटण्याला जाऊ नका गंगेला महापूर आला आहे ! पाटणा पाण्यात आहे तेथे जाऊन फजिती कशाला करून घेता ? एकजण म्हणाले की कलकत्ता मुंबईपेक्षा घाण व बकाल आहे एक दोन दिवसात तेथून पळ काढाल. दुसरे एकजण म्हणाले की तिरुपती हा श्रीमंतांचा देव दर्शनासाठी दिवसभर रांगेत उभे रहायची तयारी असेल तर खुशाल जा बुवा ! आणखी एक हितचिंतक म्हणाले की उत्तरेत जशा कबरी तशी दक्षिणेत देवळाची ठराविक रचनेची गोपुरे ! ती पाहून खूपच कंटाळा येतो शिवाय जेवणाचे हाल. भाताशिवाय मिळतच काय तिथे ? कोणी म्हणाले की स्वत:बरोबर मुलांचेही हाल कशाला करून घेता ? एक हितचिंतक अर्थतज्ज्ञ विचारते झाले की काय प्रवास करून व दुसरे पुस्तक लिहून प्रवासखर्च वसूल करायचा विचार दिसतो आहे

याउलट काहीजण मात्र आमच्या आखलेल्या दीर्घ प्रवासाचे कौतुक करून म्हणत की हेच वय आहे पहायचे हिंडायचे. एकदा का शरीर थकले की मनात इच्छा असूनही काय उपयोग ? काहीजणानी मुलांनाही जरुर घेऊन जा त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडेल, ती धीट हुशार होतील असाही उत्साह दिला

कोणी काही म्हणोत आम्हाला उत्सुकता लागली होती विविध गावा-गावातून दिसणारी भारतीय संस्कृती, भारतीय थोर शिल्पकला पहाण्याची ! तसेच भारताच्या सामाजिक जीवनातील स्पंदने ऐकण्याची !

पहाता पहाता प्रवासाचा दिवस उजाडला. मागील उत्तरभारताच्या दीर्घ प्रवासाच्या अनुभवामुळे तयारी कशी झटपट झाली अगदी मोजके सुटसुटीत सामान घेतले दोन सुटकेस, एक होल्डॉल व एक बास्केट लोणच्याची बाटली घ्यायला उल्काने वेळेवर आठवण केली.

महाराष्ट्र एक्स्प्रेसने रात्री दोनला नगर सोडायचे होते. अलाहाबादपर्यंत रिझर्वेशन मिळाल्याने काळजी नव्हती गणेशमूर्तीचे दर्शन घेऊन रिक्षा करून स्टेशनवर आलो गाडी वेळेवर आली सामान चढवून बर्थचा ताबा घेतला गाडीने शिटी दिली व उत्साहाने नगरला निरोप दिला.

बर्थवर पडले तरी मनात विचार चालले होते दीर्घ प्रवासाचे ! मुलाना त्रास होईल का ? गर्दीत, रेटारेटीत सामान हरवेल का ? असे किती तरी विचार मनात गर्दी करीत होते मुले मात्र शांत झोपली होती आम्हा दोघाची चर्चा चालू होती. शेवटी हे म्हणाले, ‘ परमेश्वरावर श्रद्धा ठेव त्याच्या कृपेने सर्व प्रवास व्यवस्थित होईल ” मग मात्र निवांत झोप लागली मात्र झोपतही स्वप्ने पडत होती भेट द्यावयाच्या प्रेक्षणीय स्थळाची !

सकाळी ‘ गरम चाय ’ या आरोळ्यानी जाग आली मनमाड स्टेशन आले होते बेचव चहाने तल्लफ गेली नाही अकरा वाजता भुसावळ स्टेशन आले व आमची [illegible] बाजूच्या प्लटफामला लागला महाराष्ट्र एक्स्प्रेस पुढे नागपूरला गेली दुपारी तीन वाजता वाराणशी एक्स्प्रेस येणार होती व तिला आमची बोगी जोडली जाणार होती बोगी साईडिंगला पड-ल्याने पखे बद झाले भुसावळच्या उकाड्याने भाजून निघालो बरोबर घेत-लेल्या भाजी पुर[illegible]चे जेवण आटोपून वर्तमानपत्राने वारा घेत घेत तीन वाजेपर्यंतचा वेळ [illegible] त्या उकाड्यात कसाबसा काढला तीन वाजता वाराणशी एक्स्प्रेस धडधडत [illegible] भुसावळमधला चार तासाचा उकाड्यातील वेळ अगदी शिक्षेसारखा वाटला बोगी वाराणशी एक्स्प्रेसला

जोडण्यात आली गाडीने साडेतीनला भुसावळ सोडले. सहाच्या सुमारास खाडवा जक्शन आले उल्काची आवडती कचोरी तेथे मिळाल्याने ती खूष झाली चहाही चांगला मिळाला

रात्री नऊला इटारसी स्टेशन आले डब्यात जेवणाची ताटे आली रेल्वे-प्रवासातील ठराविक चवीचे पहिले जेवण आटोपले झोपेची तयारी करून बर्थवर पहुडलो. एक रात्र व एक दिवसाचा प्रवास सपला होता एक रात्र व एक दिवसाचा प्रवास सपायचा होता बर्थवर पडल्यापडल्या झोप लागली

सकाळी सव्वाआठ वाजता अलाहाबादच्या भव्य स्टेशनच्या आवारात गाडी उभी राहिली पाटण्याला जाण्यासाठी गाडी बदलायची होती सामान प्लॅटफॉर्मवर उतरवले अलाहाबादचा भव्य प्लॅटफॉर्म, आवार स्वच्छ होते. त्याचप्रमाणे प्रशस्त वेटिंगरुमही होते स्वच्छतागृहेही खरोखर स्वच्छ होती जानेवारीत भरणाऱ्या कुभमेळ्याची तयारी जोरात सुरु होती त्यावेळी किमान पाचशे स्पेशल रेल्वेगाड्या येणार होत्या व लाखो लोकाचा कुभमेळा भरणार होता स्टेशनच्या स्टॉलवर बिहार–बगालचे नकाशे, पुस्तके खरेदी करण्यासाठी चद्रकात जाऊन आले परतु काहीच न मिळाल्याने ते परत आले चहा नाष्टा आटोपला अलाहाबादच्या भव्य जक्शनमध्ये गाड्याची सारखी ये, जा चालू होती. प्रवाशांची धावपळ, गर्दी पाहून मौज वाटत होती खरी पण या गर्दीत आपले कसे होणार ही चिताही वाटत होती साडेदहाच्या सुमारास पाटण्याकडे जाणारी गाडी आली प्रत्येक डब्यात गर्दी होती जिकू किंवा मरू या आवेशात डब्यात घुसलो कसेबसे सामान चढवले व मोठ्या मुष्किलीने जागाही पटकावली

अलाहाबादच्या गगेच्या मोठ्या पुलावरून गाडी धडधडत जाऊ लागली. तेव्हा प्रवासी खिडकीतून पैसे टाकून गगामाईला भाविकतेने प्रणाम करू लागले आजचे युग वैज्ञानिक असले तरी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या गगा-माईच्या महान सास्कृतिक वारशावर तर आपण जगत आहोत याची साक्ष पटली

दुपारी दोनच्या सुमाराला मोगलसराई हे प्रचड जक्शन आले तेथून हावरा, पाटणा, वाराणशी, दिल्ली इ. सर्व दिशेने गाड्या जातात तेथे गाडी

अर्धा तास थांबल्यावर प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरु झाला

हिरव्यागार भातशेतातून सर्वत्र पाणीचपाणी दिसत होते. महिन्यापूर्वी बिहार राज्यात येऊन गेलेल्या पुराचे पाणी ओसरले होते तरी त्याचा प्रताप दिसत होता

अंधार पडू लागला सध्याकाळी सातच्या सुमारास पाटणा जंक्शनमध्ये गाडी थांबली. नगरपासून पाटण्यापर्यंतचा प्रवासाचा १४०० कि मी अंतराचा ४१ तासाचा पहिला टप्पा संपला होता रिक्षा करून स्टेशनजवळील राजस्थान हॉटेलवर आलो नगर सोडून गंगेच्या किनारी पाटणा शहरात आलो होतो तर !

□

# बिहारच्या राजधानीत–पाटणा

सकाळची कोवळी सूर्यकिरणे खिडकीतून आत आल्यावर जाग आली तेव्हा ध्यानात आले की आपण पाटणा शहरातील लॉजमध्ये आहोत. स्नान व चहा, नाश्टा आटोपून रिक्षा करून पाटणा दर्शनाला निघालो.

स्टेशनजवळचे अरुद खाचखळग्याचे रस्ते पाहून बिहारची राजधानी असलेल्या या शहराबद्दल प्रथमदर्शनी तरी चांगले मत झाले नाही प्रथम आम्ही गांधी मैदानाजवळ पोहोचलो गांधीमैदान हा पाटणा शहराचा आत्मा ! विस्तृत पटांगण असलेल्या गांधीमैदानावरून सर्वत्र बसेस सुटतात रिक्षातळही तेथे आहे

पवित्र विशाल गंगेच्या काठावर वसलेल्या पाटणा शहराचा भूतकाळ पहाण्याची उत्सुकता लागली होती रिक्षा ठरवून प्रथम त्याला पाटण्यापासून सहा कि मी अंतरावरील 'कुम्रहार' या उत्खनन केलेल्या भागाकडे न्यायला सांगितले. पाटण्याचे प्राचीन नाव पाटलीपुत्र ! चंद्रगुप्त मौर्याची तसेच सम्राट अशोकाचीही ती राजधानी होती. पाटलीपुत्र कुसुमपूर अथवा पुष्पपूर – पुष्पांनी बहरलेले शहर या नावानेही ओळखले जाते कुम्रहार येथे उत्खनन करून मिळालेले अवशेष इ स पूर्व चौथ्या व तिसऱ्या शतकातील आहेत चकचकीत पॉलीश असलेल्या सभागृहाची कल्पना येथील अवशेष देत होते उत्खननात सापडलेल्या मातीची भांडी, नाणी (मुद्रा), मूर्ती मणी, दगडी स्तंभांचे अवशेष या वस्तू तेथील संग्रहालयात जतन करून ठेवल्या आहेत त्यावरून या शहराच्या महान सांस्कृतिक भरभराटीची कल्पना येते

संग्रहालयामागे अतिशय सुंदर मैदान असून विविधरंगी फुले, गुलाब यांनी तो बहरलेला आहे. इ. स. पूर्व चौथ्या शतकात मॅगॅस्थिनीस या ग्रीक राजदूताने या शहरास भेट दिली होती. प्राचीन पाटलीपुत्राच्या वैभवाचे वर्णन त्याने लिहून ठेवले आहे.

त्यानंतर पोहोचलो पाटण्याच्या नवीन बांकीपूर भागातील म्युझियममध्ये. या महान शहराचा सांस्कृतिक वारसा जतन करून ठेवणाऱ्या पाटणा म्युझियमची लांबच्या लांब दुमजली इमारत आकर्षक आहे. या वस्तुसंग्रहालयात विविध दालने आहेत. चंद्रगुप्तमौर्यकालीन मूर्तींच्या दालनात विविध मूर्ती आहेत. भगवान बुद्धाच्या विविध मूर्तींप्रमाणेच जैन तीर्थंकर, यक्ष यांच्याही गुळगुळीत दगडांच्या मूर्ती आहेत. 'राहुल सांकृत्यायन' या दालनात तिबेटी पेंटींग्जचे अनेक नमुने आहेत.

बुद्धभिक्षूंचे विविध कपडे, टोप्या इ. जतन करून ठेवले आहेत. 'राजेंद्र-कक्ष' या दालनाच्या प्रवेशद्वाराशी भुवनेश्वराच्या मंदिराची अतिशय सुंदर प्रतिकृती आहे. या दालनात भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद यांना त्यांच्या राष्ट्रपतीपदाच्या कारकीर्दीत मिळालेल्या विविध भेटवस्तु आहेत. भारतातील अनेक वास्तूंचा शिलान्यास त्यांच्या हस्ते झाला. त्या प्रसंगी वापरण्यात आलेली चांदीच्या थापी इ. हत्यारे आकर्षकरीत्या मांडून ठेवली आहेत. डॉ. राजेंद्रप्रसादांना मिळालेली मानपत्रे, ती ज्यातून अर्पण केली त्या मंजुषा, करंडक इ. वस्तु आकर्षक दिसत होत्या. कलाकुसरीने ओतप्रोत भरलेल्या विविध, सुंदर हस्तीदंती प्रतिमा लक्ष वेधून घेत होत्या. भारतमातेचा हस्तीदंती नकाशा मनोवेधक वाटला. विविध विश्वविद्यालयांनी त्यांना अर्पण केलेल्या डॉक्टरेट पदवीच्या दीक्षांतसमयी त्यांनी वापरलेले गाऊनसही दिसले. जपान, रशिया अमेरिका इ. देशांनी त्यांना भेट दिलेल्या सुंदर वस्तू तेथे आहेत.

एका दालनात पेंढा भरलेले प्राणी, पक्षी, नानाविध फुलपाखरे, इजिप्शियन ममी इ. आहेत. ब्राँझरूममध्ये अष्टधातूच्या विविध मूर्ती आहेत. तर मृण्मूर्तीकक्षमध्ये बिहार मधील पाटलीपुत्र, वैशाली, तसेच उत्तरप्रदेशातील मथुरा येथील मातीच्या प्राचीन मूर्ती आहेत. टेराकोटामध्ये कोरलेल्या

मूर्तीही आहेत कुशाण, पाल व शुंग काळातील देखणी शिल्पे पहायला मिळाली. यात चामरधारीणीची सुंदर पॉलिश केलेली मूर्ती दर्शनीय आहे

एका दालनात सुप्रसिद्ध गणिती व ज्योतिषी आर्यभट्ट याचे त्याच्या शिष्याबरोबरचे चित्र आहे आर्यभट्ट हा शास्त्रज्ञ दीड हजार वर्षापूर्वी होऊन गेला. वयाच्या केवळ २३ व्या वर्षी त्याने गणितशास्त्रात अनेक सिद्धांत मांडले त्यानेच प्रथम सिद्ध केले की पृथ्वी गतीमान असून बाकीची नक्षत्रे स्थिर आहेत. चंद्र, सूर्य याच्या ग्रहणाचे शास्त्रीयदृष्टचा विश्लेषण आर्य-भट्टानेच प्रथम केले त्याचा आर्यभट्टीय हा चार खंडातील ग्रंथ प्रख्यात आहे दुसऱ्या एका दालनातील जावा देशातील हनुमान प्रतिमा मजेशीर वाटली हस्तीदंती चिनी मूर्तीही वैशिष्टचपूर्ण वाटल्या

म्युझियम पाहून राजभवनानजीकच्या प्राणीसंग्रहालयाकडे आलो तेथे कलकत्याच्या धर्तीवर प्राणीसंग्रहालय करण्याचे काम चालू होते एकेठिकाणी मोकळेच सोडलेले वाघ पाहून उल्का-उदय प्रथम घाबरले पण वाघ सोड-लेल्या प्रशस्त जागेभोवती खोल खड्डे खणलेले त्याना दाखवल्यावर मग पुढे होऊन ते बघू लागले या प्राणीसंग्रहालयाच्या प्रशस्त आवारात नवीन लाव-लेली अनेक झाडे दिसली प्रत्येक झाडासमोर ज्या आमदाराने ते झाड लावले त्याच्या नावाची पाटी लावली होती त्यावरून माणसाला प्रसिद्धीची किती हौस असते हेच दिसत होते

प्राणीसंग्रहालय पाहून गव्हर्नरहाऊसवरून जुन्या सेक्रेटरीएटकडे आलो तेव्हा तेथील सात जणांच्या पुतळ्याने एकदम लक्ष वेधून घेतले १९४२च्या ११ ऑगस्टला बिहार सचिवालयावर राष्ट्रीय तिरंगा झेंडा लावण्याच्या प्रय-त्नात असलेल्या सात युवकांना इंग्रज सरकारने गोळ्या झाडून मारले स्वातंत्र्यानंतर त्याच्या या हौतात्म्याची नोंद घेऊन सरकारने हे स्मारक उभा रले. सात युवकाच्या या पुतळ्यांच्या चेहेऱ्यावर स्वातंत्र्याची जिद्द दिसली एकाच्या हातात फडफडणारा तिरंगी झेंडा होता.

त्यानंतर आम्ही आलो सुप्रसिद्ध 'खुदाबक्ष ओरिएन्टल पब्लिक लायब्ररी मध्ये. ही लायब्ररी म्हणजे प्राच्य विद्या संशोधनाचा अनमोल खजिनाच ! खुदाबक्षखान याचा जन्म इ स १८४२ मध्ये बिहारला झाला पुस्तक-

व्यासंग व त्यांचा संग्रह करण्याचा वारसा त्यांना आपल्या पिताजींकडून मिळाला व्यवसायाने ते वकील होते त्यांनी यशस्वी वकील म्हणून आपली कारकीर्द गाजवली शेवटची ३ वर्षे निजामाचे मुख्य न्यायाधीश म्हणून त्यानी काम पाहिले इ स १९०८ मध्ये ते मरण पावले.

खुदाबक्षखान यानी आपल्या आयुष्यात जमवलेली विविध दुर्मिळ हस्तलिखिते, फारसी ग्रंथ, फोटो यांचा हा भव्य संग्रह इ. स १८९१ मध्ये त्यांनीच स्थापन केला या लायब्ररीत अरेबिक, पर्शीयन, उर्दू, तुर्कीश, हिंदी, संस्कृत मधील ८००० च्यावर हस्तलिखिते असून इंग्रजी, फ्रेंच इ भाषेतील छापील पुस्तके ४०,००० च्यावर आहेत । सर्वात वैशिष्टयपूर्ण वस्तु म्हणजे एक इंच लांब व पाऊण इंच रुंद असलेली कुराणाची प्रत । ती प्रत पाहून मन आश्चर्याने थक्क होते

काही वैशिष्टयपूर्ण वस्तूंचा संग्रहही या लायब्ररीत आहे. भारतावर स्वारी करणाऱ्या व आपल्या क्रौर्यकर्माबद्दल प्रसिद्ध असलेल्या नादिरशहाची दोन पात्याची तलवार येथे आहे मोगलकाली वापरात असलेली विषपरीक्षा पहाण्याची धातूची एक बशीपण येथे आहे. राजपरिवाराच्या खाद्यपदार्थात विष कालवले आहे किंवा काय याची परीक्षा त्या बशीत होत असे सोळा, सतरा, अठरा व एकोणीसाव्या शतकात नक्षत्रपरीक्षेसाठी वापरात येणारी उपकरणेही तेथे व्यवस्थित ठेवलेली आहेत मोगलकालीन नूरजहान, मुमताजमहल या राण्यांची तसेच अनेक मोगलसम्राटांची चित्रे तेथे आहेत

लॉर्ड कर्झन, म. गांधी व जवाहरलाल नेहरू, शास्त्रज्ञ सी. व्ही रामन, रवींद्रनाथ टागोर यानी या संग्रहालयास भेटी दिल्यानंतर जे अभिप्राय व्यक्त केले त्यांची हस्तलिखिते पण तेथे आहेत

लायब्ररीची भेट आटोपून पाटण्याच्या बाजारपेठेतील बिर्लामंदिराकडे अ. [illegible] दिल्ली [illegible]
आहे मंदिरात लक्ष्मी-नारायणाच्या सुंदर मूर्ती आहेत. इतर धर्मीयांच्याही मूर्ती आहेत या मंदिरास भेट देणारा एक प्रवासी आमच्याशी बोलताना म्हणाला की बिर्लांनी भारतात ठिकंठिकाणी अनेक सुंदर मंदिरे बांधली हे खरे पण बिर्लामंदिर या नावामुळे बिर्ला हा कुणी देव आहे की काय असा

भास निर्माण होतो ते मात्र खटकते. बरोबरच आहे लक्ष्मीनारायणाचे हे मंदिर ओळखले जाते बिर्लामंदिर या नावाने

त्यानंतर गांधी मैदानाजवळच्या 'गोलघर' या वैशिष्ट्यपूर्ण इमारतीजवळ आलो मधमाशांच्या पोळ्यासारख्या शंकूकार आकाराची ही इमारत आहे. या गोलघरात ध्वनी परावर्तीत होतो म्हणून Whispering Gallery या नावानेही ते ओळखले जाते इ स १७८६ मध्ये वॉरन हेस्टिंग्जच्या काळात हे प्रचंड गुदाम बिहारमध्यें वारंवार पडणाऱ्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी म्हणून बांधले गेले या गोलाकार गुदामाच्या बाहेरील १४२ पायऱ्या चढून ९६ फूट उंच आल्यावर पाटणा शहराचे विहंगम दृश्य दिसू लागले. एका बाजूला शहरातील उंच उंच इमारती दिसत होत्या तर दुसऱ्या बाजूला गंगेचे प्रचंड, विशाल पात्र व त्यातील गलबते दिसत होती काशीनंतर पाटण्याला येईपर्यंन्त गंगेला शरयू व शोण या दोन नद्या मिळतात म्हणून तिचे पात्र एवढे विशाल दिसत होते गंगेच्या काठावरील नावा ठिपक्यासारखी दिसत होती गंगेला पूर आल्यावर तिचे पाणी शहरात घुसल्यानंतरचे दृश्य कसे दिसत असेल याची मनोमन कल्पना केली

गांधी मैदानापासून अशोक राजपथ या जुन्या भागातील १२ कि मी लांबीच्या अरुंद रस्त्याने नंतर आम्ही शिखांच्या पवित्र मंदिराजवळ आलो शिखांचा दहावा व शेवटचा गुरू गोविंदसिंह यांचा जन्म इ स १६६४ मध्ये येथे झाला, अमृतसरच्या सुवर्णमंदिराप्रमाणे हे मंदिर सुवर्णाचे नसले तरी चकचकीत आहे महाराजा रणजित सिंहाने १९ व्या शतकात हे संगमरवरी मंदिर बांधले या गुरुद्वाराच्या शिल्पकृतीत मोगल, राजपूत व आधुनिक शैली यांचा संगम झाला आहे शुभ्र, गुलाबसर रंगाचे घुमटधारी असे हे देखणे शिल्प निळ्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होते

आम्ही सर्वांनी पाय स्वच्छ धुतले चंद्रकांत, उल्का, उदयनी डोक्यावर रुमाल घेतले तर मी डोक्यावर पदर घेतला मग मंदिरात प्रवेश केला. मंदिराच्या तळमजल्यावर गुरू गोविंदसिंहाचे जन्मस्थान आहे. जमिनीवर सुन्दर, स्वच्छ गालिचे पसरले असून ग्रंथसाहेबांचे अखंड पठण तेथे चालते गुरूची आई जेथून पाणी भरत असे ती माताजीची विहिरही तेथेच एका

बाजूला आहे. दुसऱ्या मजल्यावर गुरुच्या जीवनावरील काही निवडक प्रसंगांची चित्रे आहेत श्रीकृष्णाप्रमाणे त्याच्या घडा फोडण्याच्या लीला चित्रित केल्या आहेत शेजारच्या खोलीतही अखंड पठणाची व्यवस्था आहे मंदिरात शांत, स्वच्छ व पवित्र वातावरण होते हिंदू मंदिरापेक्षा वेगळेपण लगेच ध्यानात येते

हरमंदिर पाहिल्यावर आम्ही निघालो 'सदाकत आश्रमाकडे' सदाकत आश्रम पाहिल्याशिवाय पाटण्याची भेट पूर्ण होणार नव्हती सदाकत म्हणजे सत्याचरण पाटणा ही बाबू राजेंद्रप्रसादांची कर्मभूमी! त्यांच्या साधेपणाला साजेसे व त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले असे हे छोटे कुटिर आहे ते वापरीत असलेली टोपी, काठी, चरखा, जेवणाचे ताट इ वस्तू तेथे जतन करून ठेवल्या आहेत त्यांना मिळालेल्या 'भारतरत्न' या पदवीचा ताम्रपटही जतन करून ठेवला आहे त्यांच्या पूर्णाकृती तैलचित्राला अभिवादन करून पाटणा शहरची भेट संपवली

पाटणा शहरातून चक्कर मारीत लॉजवर मुक्कामाला आलो

☐

# गया, बुद्धगया

पाटणा–गया पॅसेंजरने पाटणा सकाळी ७ ला सोडले भाताची हिरवी-गार शेते पाण्याने तुडुब भरलेली दिसत होती वाटेत पुनपुन स्टेशन लागले दोन आठवड्यापूर्वीच तेथील बधारा फुटल्याने शेतात मैल न् मैल पुराचे पाणी पसरलेले दिसत होते कित्येक गावे अजूनही पाण्याखाली होती भाताखेरीज दुसरे पीक मात्र दिसले नाही

सकाळी १० च्या सुमारास गया जक्शन आले. रेल्वे रिटायरीग रुम न मिळाल्याने रिक्षातून गावातील लॉजकडे निघालो अरुद रस्ते, उघडी गटारे, रस्त्यावर खाद्यपदार्थ तळणाऱ्या गाड्या, कचऱ्याचे ढीग, घोंघा-वणाऱ्या माशा व मुक्तपणे हिंडणारी जनावरे इ मुळे गया Dirty city of India म्हणून ओळखायला हरकत नाही या गावात म्युनिसिपालीटी आहे की नाही याची शका वाटू लागली बाजारपेठेत धर्मशाळा आहेत पण त्यात त्या अस्वच्छतेचे आगर असल्यामुळे मध्यमप्रतीच्या एका लॉजमध्ये सामान उतरून घेतले बसस्टॅण्ड जवळ असल्याने ते सोयिस्कर होते

दुपारी गयेच्या फल्गु नदीच्या काठावर असलेल्या प्रख्यात विष्णुपद मदि-राला भेट द्यायला रिक्षाने निघालो गयेच्या या अत्यत प्राचीन मदिराचा जीर्णोद्धार पुण्यशील अहिल्याबाई होळकर यांनी १८ व्या शतकात केला पूर्वी जेथे छोटे मदिर होते तेथे हे राखी रगाच्या दगडाचे विशाल मदिर अहिल्याबाईनी जयपूरच्या कारागिरांकडून बाधून घेतले. मदिराच्या खर्चा-

साठी त्याकाळी गया जिल्ह्यातील सुमारे दोनशे गावाचे उत्पन्न लावून दिले होते.

या मंदिराची कळसापर्यंतची उंची १०० फूट आहे यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना येईल मंदिरात ५८ फूट लांबीरुंदीचा चौकोनी मंडप आहे मंदिरातील स्तंभांची व कळसाची शिल्पकृती वाखाणण्यासारखी आहे. मंदिरात अष्टकोनी वेदीवर भगवान विष्णूचे उत्तराभिमुखी चरणचिन्ह उमटले असून त्याची पूजा करतात भगवान विष्णूच्या उजव्या पावलाचा व टाचेचा खळगा दिसतो हेच विष्णूपद ! त्या शिलेभोवती चांदीचा नक्षीदार वीतभर उंचीचा कठडा आहे मंदिराच्या आवारात काहीजण श्राद्धविधी करताना दिसत होते हा विधी येथे का करतात तसेच गया हे नाव कसे पडले, विष्णूचे पदचिन्ह येथे कसे आले यामागे एक पौराणिक कथा आहे,

पौराणिक काळात गया नावाचा एक असुर होऊन गेला त्याने अतिशय कठीण असे तप केल्यावर भगवान विष्णूनी त्याला विचारले की तुझ्या या दीर्घ तपाचा हेतु काय आहे ? त्यावर गयासूर म्हणाला की, सर्व पवित्र तीर्थक्षेत्रापेक्षा माझे शरीर अधिक पवित्र व्हावे अशी माझी इच्छा आहे. त्याच्या या विनतीनुसार भगवान विष्णूनी तथास्तु म्हणून आशीर्वाद दिला. तेव्हापासून तीर्थस्नान, पूजनाऐवजी गयासुराला नुसता स्पर्श केला तरी मुक्ती मिळू लागली त्यामुळे इतर देव सचित झाले व भगवान विष्णूकडे गेले विष्णूने ब्रह्मदेवाला सूचना केली की तुम्ही गयासुराचा देह यज्ञाकरता मागून घ्या त्याप्रमाणे देवानी यज्ञाच्या पवित्र कामासाठी गयासुराकडे त्याचा देह मागितला गयासुराने ही गोष्ट मोठ्या आनंदाने कबूल केली

गयासुराने उत्तरेकडे शीर व दक्षिणेकडे पाय करून व पालथे पडून आपला देह यज्ञासाठी अर्पण केला पण यज्ञवेदनेने त्याचे शरीर हलू लागले, तेव्हा यमाने गयासुराच्या मस्तकावर शीला ठेवली तरी शरीर हलणे थांबेना म्हणून गदाधारी विष्णु स्वतः शिळेवर गदा ठेवून उभे राहिले तेव्हा शीला स्थिर झाली. या अपूर्व त्यागाबद्दल गयासुराला भगवंतानी विचारले की तुला काय पाहिजे ?

यावर गयासूर म्हणाला ' या शिलेवर ब्रह्माविष्णुमहेशांचा निरंतर वास

असावा माझ्या नावाने हे क्षेत्र प्रसिद्ध व्हावे गयाक्षेत्र पाच कोस विस्ताराचे असावे त्यातील एक कोस गयाशीर नावाने प्रसिद्ध व्हावे तसेच स्नान करून या शिलेवर पितरांना उद्देशून जो पिंडदान करील त्याच्या पितरांना मुक्ती मिळावी व त्याला स्वतःला इष्टफलाची प्राप्ती व्हावी.

विष्णूनी गयासुराची ही इच्छा पूर्ण केली तेव्हापासून या क्षेत्राचे नाव गया पडले. शिलेवरील विष्णूच्या पदचिन्हाची पूजा होऊ लागली व श्राद्ध-विधीसाठी हे प्रमुख क्षेत्र बनले

मंदिराचे शिल्पकाम सुंदर असले तरी आत प्रवेश करताच मात्र निराशा झाली. कारण मंदिरात सर्वत्र फार अस्वच्छता होती. गाई गाभाऱ्यापर्यंत मुक्तपणे हिंडत होत्या. त्यांचे शेण, नैवेद्याच्या पत्रावळी, सुकलेली फुले सर्वत्र पसरली होती जैन अथवा बौद्धधर्मीय आपल्या मंदिरात स्वच्छतेला किती जपतात व आपण त्याबाबत किती उदासीन असतो हे पाहून मन विषण्ण झाले

गयेला भेट देण्याचे दुसरे ठिकाण म्हणजे २ कि मी अंतरावरील ब्रह्मयानी टेकडीवरील मूळचा 'अक्षय वट !' या वटवृक्षाखाली हिंदू भाविक आपल्या पित्रांसाठी धार्मिक विधी करतात

## बुद्धगया

गयेनंतर आम्ही उत्सुक झालो होतो भगवान बुद्धाला जेथे साक्षात्कार झाला ती पवित्र भूमी-बुद्धगया-पहायला ! बुद्धगया गयेपासुन केवळ ११ कि. मी. अंतरावर आहे बसने थोड्यावेळातच तेथे पोहोचलो.

२६०० वर्षांपूर्वीची हकीकत ! सत्याच्या शोधार्थ घराबाहेर पडलेला राजपुत्र सिद्धार्थ आपल्या पाच सहकाऱ्यासह राजगृह ( राजगीर ) येथून गयेच्या दिशेने प्रवास करीत होता प्रवासाची वाटचाल बिकट होती पण सिद्धार्थच्या त्यागाला सीमा नव्हती निरंजना नदीच्या घनदाट अरण्यात तो पोहोचला होता त्याने आहार कमी कमी करीत आणला होता शेवटी भाताच्या एका कणापर्यंन्त त्याचा आहार स्थिरावला. ६ वर्षाच्या प्रदीर्घ श्रमतीमुळे त्याचे शरीर इतके कृश झाले की फक्त हाडांचा सांगाडा उरला.

एके दिवशी निरंजनानदीच्या पात्रात स्नान केल्यावर तेथील कन्या सुजाताने दिलेली दुधाची खीर त्याने प्राशन केली त्याच्या कृश शरीरात थोडी धुगधुगी आली. नदीचे पात्र ओलांडून सिद्धार्थ पिंपळवृक्षाजवळ आला. त्या वृक्षाखाली वज्रासनावर पूर्वेला तोंड करून ध्यानस्थ बसला तेथेच त्याला दिव्यदृष्टी प्राप्त झाली, साक्षात्कार झाला व सिद्धार्थ 'बुद्ध' झाला

महाबोधी मंदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर मंदिराच्या आगळ्या शिल्पकृतीने प्रथमदर्शनीच मोहित झालो मंदिराची गगनाला गवसणी घालणारी पावणेदोनशे फूट उंची थक्क करीत होती मंदिराची धाटणी पिरॅमिड-सारखी असून वर तांब्याचा कळस आहे

इ स २५४ पूर्वी सम्राट अशोकने मूळ मंदिर बांधले इ स ६२० मध्ये बंगालच्या राजाने त्याचा नाश केला नंतर मगध देशाच्या राजाने हे मंदिर उभारले जगप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एन्त्संगने सातव्या शतकात या मंदिराला भेट दिली होती त्याने लिहून ठेवले आहे की तेथील मूर्ती सोन्याची होती मंदिराच्या सर्व बाजू नक्षीकामाने ओतप्रोत सजलेल्या होत्या चांदी, सोने, मोती, मौल्यवान हिरेमाणके वापरून मंदिर सुशोभित केले होते

हे मंदिरही मुसलमानाच्या आक्रमणाच्या कचाट्यातून सुटले नाही १३ व्या शतकात बिहारचा मुसलमान सुलतान बख्त्यार खिलजी याने मंदिराची केवळ लूटमारच केली नाही तर मूर्तीसुद्धा विद्रूप केली

१७ व्या शतकात मंदिरासमोर एका हिंदू संन्याशाने शिवलिंगाची स्थापना केली पाच पांडवांचे व अन्नपूर्णा देवीचेही मंदिर उभारले जवळच ब्रह्मदेशाने दिलेल्या दोन मोठ्या घंटा आहेत त्यावर पाली, संस्कृत, बंगाली व बर्मी भाषेत प्रार्थना कोरल्या आहेत.

या मंदिरातील सध्याची बुद्धमूर्ती ब्रह्मदेशच्या राजाने १८७७ मध्ये दिलेली आहे असे म्हटले जाते की साक्षात्कार होण्यापूर्वी महाबोधी वृक्षाला टेकून बुद्ध जसा बसला होता त्याच अवस्थेत पूर्वदिशेला मुख असलेली बुद्धाची ही ध्यानस्थ मूर्ति आहे ही मूर्ती सोन्यासारखी चकाकताना दिसत होती.

मंदिराच्या तळाचा भाग ४८ चौ फूट असून मदिर वर निमुळते होत गेले आहे मदिराच्या वरच्या मजल्यावर जायला दोन्ही बाजूंनी अतर्गत नक्षीदार जिने आहेत वर गेल्यावर चार कोपऱ्यात उपशिखरे दिसतात मदिराचे जवळून दिसणारे शिल्प मोहवीत हो ते

मदिराभोवती अशोककालीन प्राचीन दगडी रेलिंग आहे आवारात २००० वर्षांपूर्वीचे सुंदर शिल्पकाम असलेले अनेक लहान मोठे स्तूप आहेत.

मदिराच्या मागे महाबोधी (पिंपळ) वृक्ष आहे मूळच्या वृक्षाची एक फांदी सम्राट अशोकाची मुलगी सघमित्रा हिने सिलोनमधील अनुराधपुरा या ठिकाणी लावली होती इ स १८८० मध्ये मदिराचे उत्खनन करीत असताना प्राचीन वृक्ष वादळामुळे पडला पण त्याच्या काही मुळ्या जिवत होत्या त्यापैकी एका मुळीची वाढ वृक्षाच्या जागी होऊ दिली दुसरा एक पिंपळवृक्ष मदिराच्या उत्तरेला आहे तो हिंदूचा वृक्ष मानला जातो तेथे पिंडदान केले जाते बोधीवृक्षाजवळच जुने वज्रासन आहे तेथे बुद्धाचे आसन होते वज्रासनाच्या बाजूला हस कोरले आहेत. बोधीवृक्षाजवळ बुद्धाचे चरणचिन्ह कोरले आहे आकाराने ते मोठे वाटते.

हिंदू बुद्धाला भगवान विष्णूचा अवतार मानतात जेथे भगवान बुद्ध ने स्नान केले तेथे बांधलेल्या कुंडात स्नान करून हिंदू पिंडदान करतात

महाबोधी मदिर पाहून बुद्ध गयेतील राहिलेल्या मदिरांकडे निघालो. सर्वांत जवळचा तिबेटी मठ व तिबेटी मदिर १९३८ मध्ये तिबेटी पद्धतीने बांधलेले आहे मदिराच्या खालच्या बाजूला ?० टन वजनाचे उभट गोल धर्मचक्र आहे हे धर्मचक्र फिरवले की पापमुक्ती होते असा समज असल्याने भेट देणाऱ्या प्रवाशांची ते चक्र फिरवण्याची घाई चालली होती वर मुख्य मदिर असून तेथील भिंतीवर बुद्धाच्या आयुष्यातील प्रसगांची ऑईलपेंटने काढलेली भडक रगीत चित्रे आहेत छतावर रगीबेरगी फुले चितारली आहेत बुद्धाची स्मितहास्य करणारी भव्य मूर्ती मनोवेधक आहे बाजूलाही अनेक मूर्ती आहेत दलाई लामांचा फोटो व त्याना मगध विद्यापीठाने दिलेले मानपत्रही तेथे दिसले

थायलडच्या राजाने १९५६ मध्ये २५०० व्या बुद्धजयंती निमित्त २२ लक्ष रु खर्चून उभारलेले मदिरही सुंदर आहे मदिराची उतरती कौलारू

छपरे आकर्षक दिसत होती प्रवेशद्वाराशी दोन बाजूला दोन मूर्ती आहेत. आतमध्ये थायलंडचे पंतप्रधान मार्शल थानम कित्तिकाचार्न व मॅडम यांनी भेट दिलेली बुद्धाची पितळी मूर्ती आहे ही मूर्ती थायलंडमधील बँकॉक येथे १९६६ मध्ये बुद्धपौर्णिमेला बनविण्यात आली १९६७ मध्ये ती विमानाने आणून गयेला उतरवण्यात आली मंदिरात सारनाथ येथील धमेख स्तूप तसेच लुम्बिनी व बुद्धगया यांची चित्रे होती

१९४५ मध्ये उभारलेले चिनी मंदिरही प्रेक्षणीय आहे. आतमध्ये काळ्या दगडातील बुद्धमूर्ती आहेत

सर्वांत शेवटचे जपानी मंदिर तर अप्रतिमच आहे या मंदिराचे छत पॅगोडाच्या आकाराचे आहे अकरा संगमरवरी पायऱ्या ओलांडल्यावर उत्कृष्ट लाकडाची तीन प्रवेशद्वारे लागतात. मंदिराच्या आतील छतावर चौकोनी नक्षीकाम फुले आहेत तर कडेला पक्ष्यांची चित्रे आहेत भिंतीवर बुद्धाच्या जीवनातील निवडक प्रसंगांची चित्रे काढली आहेत. बुद्धाची भव्य मूर्ती सोन्याचे पाणी दिलेली आहे बाजूला सुंदर जपानी दिवे आहेत मेण-बत्ती ठेवण्यासाठी होडीच्या आकाराचे सुंदर घरही आहे नक्षीकाम केलेली सोनेरी झुंबरे उठून दिसत होती चकचकीत मोझेक फ्लोअरिंग आहे एका कोपऱ्यात संस्कृत जपानी, इंग्रजी भाषेत शिलालेख कोरले आहेत १९७३ साली ४० लाख रु खर्चून या मंदिराची उभारणी करण्यात आली माजी राष्ट्रपती गिरी यांनी त्याचे उद्घाटन केले

मंदिरासमोर एक वैशिष्ट्यपूर्ण भली थोरली घंटा आहे ती वाजविण्या-साठी एक लाकडी ओंडका तिच्यासमोर बांधला आहे. तो मागे ओढून हलकेच सोडला की घंटेचा ठणठणाट होतो

मंदिराचा फेरफटका संपला होता सर्व मंदिरातील बुद्धमूर्ती एकच पण त्यांची चेहरेपट्टी मात्र प्रत्येक मंदिरात वेगळी दिसली मंदिरे पाहून म्युझियममध्ये आलो इ स. पू दुसऱ्या शतकापासून सापडलेले अवशेष, मूर्ती तेथे जतन करून ठेवल्या आहेत पाल कालातील ९ व्या ते ११ व्या शतकातील अनेक मूर्ती आहेत

गयेपेक्षा बुद्धगयेचा परिसर शांत व स्वच्छ आहे वातावरण कसे प्रसन्न आहे. देखणी मंदिरे मन मोहवून टाकतात

संध्याकाळ झाली होती. बुद्धगयेची भेट संपली होती महाबोधी मंदिराचे पिरॅमिडसारखे निमुळते, उंच शिखर आकाशाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होते त्याकडे शेवटचा कटाक्ष टाकून गयेला मुक्कामाला जाण्यासाठी रिक्षाने परत निघालो.

□

# राजगीर उर्फ राजगृह

गयेहून ठीक आठ वाजता बस राजगीरच्या दिशेने धावू लागली भाताची हिरवीगार शेते मोहवीत होती जिकडे पहावे तिकडे हिरव्या रंगाची उधळण झालेली दिसत होती खरच प्रवासासाठी ऑक्टोबर, नोव्हेंबरसारखा दुसरा काळ नाही पाऊस थांबलेला असतो व हिवाळा सुरू होणार असतो म्हणून थंडीही फारशी नसते उकाडाही नसतो हवा आल्हाददायक असते शिवाय उन्हाळ्याप्रमाणे गाड्यांना गर्दीही नसते

गयेपासून ६७ कि मी अंतरावरील राजगीर बौद्ध जैन, हिंदू यांचे पवित्र तीर्थस्थान आहे रामायणकाळात ते वसुमती नावाने प्रसिद्ध होते. चारी बाजूच्या डोंगराच्या कुशीत हे गाव वसलेले असल्याने 'गिरीव्रज' या नावानेही ते प्रसिद्ध होते महाभारतकाळात भीम व अर्जुन कृष्णासह येथे आले होते भीम–जरासंध युद्ध येथेच झाले राजगीरचे आणखी एक नाव होते कुशाग्रपूर ! जगप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यू-एन त्संग याच्या प्रवास-वर्णनात व जैन-बौद्ध यांच्या साहित्यात ह्या नावाचा उल्लेख आहे राजगीरचे आणखी एक लोकप्रिय नाव होते 'राजगृह !'

राजगीर जसजसे जवळ येऊ लागले तसतशी हिरवीगार गिरीशिखरे दिसू लागली राजगीरचे पहाड वैभार, विपुल, रत्न, छठा, शैल, उदय, सोना या नावाने ओळखले जातात

दोन तासांचा प्रवास संपवून बस राजगीरच्या कुंडाजवळील स्थानका-जवळ थांबली सायकलरिक्षावाले प्रवाशांभोवती गराडा घालू लागले एक सायकलरिक्षा ठरवली व राजगीरच्या दर्शनीय स्थानांकडे निघालो.

वाटेत रस्त्याच्या कडेला प्रथम दृष्टीला पडले बिंबिसारचे कारागृह ! इ स पूर्व ६ व्या शतकात मगध देशाचा राजा बिंबिसार होता. त्यावेळी राजगीर बुद्धधर्माच्या प्रसाराचे केंद्र होते. बिंबिसार राजाचा अजातशत्रु हा पुत्र ! त्याने आपल्या वृद्ध पित्याला कैद करून मारून टाकले होते. उत्खनन केल्यावर जेथे त्याने पित्याला कैद करून ठेवले होते त्या कारागृहाचे अवशेष मिळाले हे कारागृह २०० फूट चौरस असून भिंती ६ फूट रुंदीच्या होत्या गोल बुरूज असलेल्या भिंती भक्कम होत्या उत्खननात एका दगडी भिंतीत हातकडी मिळाली होती

वाटेत रस्त्याच्या एका बाजूला 'जीवकाम्रवन' लागले. जीवक हा सुप्रसिद्ध राजवैद्य होय त्याने येथे विशाल आम्रवन निर्माण केले होते हा बगीचा त्याने बुद्धाला भेट दिला होता तेथे प्राचीन विहार होते. भगवान बुद्ध येथे वास्तव्य करीत होते अशी धारणा आहे

रिक्षाने गृध्रकूट पहाडाकडे निघालो वाटेत बंगाली प्रवासी मोठ्या प्रमाणावर दिसत होते लहान मुलांपासून ते वृद्धापर्यंत सर्वजण हौसेने प्रवास करीत होते रिक्षा गृध्रकूटच्या पायथ्याशी पोहोचली बुद्धाचे हे प्रिय निवासस्थान होते या निसर्गरम्य पहाडाच्या शिखरावर बुद्धने धर्मविषयक उत्कट विचार प्रगट केले होते सुमारे ११०० फूट उंचीच्या या टेकडीवर जाण्यासाठी एरियल रोपवेची योजना करण्यात आली आहे सुमारे १८ लक्ष रुपये खर्च करून भारतसरकारने या रोपवेची उभारणी केली जपान सरकारनेही अडीच लाख रु च्या चअरलफट भेट दिल्या अकरा लोखंडी मनोऱ्यांवरील ह्या विजेवर चालणाऱ्या रोपवेत बसण्यासाठी ११४ खुर्च्या आहेत. पायथ्याशी बसलेला माणूस सुमारे सात मिनीटांत २२०० फूट लांबीच्या रोपवेत बसून वर शिखरावर येतो [illegible] सुमारे ३०० माणसांचा खाला-वर ने-आण करतो. रोपवेतील खुर्चीवर बसताना मी उत्काला माडीवर घतले तर हृयांनी उदयला ! खुर्ची हळूहळू वर सरकू लागल्या खाली पाहिले तर दगडधोंड्यानी भरलेल्या खोल दऱ्या ! रंगीबेरंगी खुर्च्यांतून एका बाजूने लोक वर चढत होते तर दुसऱ्या बाजूने बसून उतरणारे बायबाय करीत होते वर चढणाऱ्या लोकांच्या चेहेऱ्यावर उत्सुकता होती

तर खाली उतरणाऱ्याच्या चेहेऱ्यावर सुंदर दृश्य पाहिल्याची तृप्ती होती. खरच, चेअरलिफ्टमध्ये बसून पहाडावर जाण्याचा अनुभव रोमांचकारी होता. प्रवासात अशा आगळ्या ' थ्रिल 'ने मजा आली.

शिखरावर पोहोचल्यावर आम्ही उत्सुक झालो होतो विश्वशांती स्तूप पहायला ! गृध्रकूट पर्वताच्या रत्नगिरी या शिखरावर हा स्तूप आहे. जपानमधील नागासाकी आणि हिरोशिमा येथील महाभयानक अणुसंहारामुळे विश्वशांतीची निकड भासू लागली भगवान बुद्धाच्या विश्वशांती-संदेशाच्या प्रसारासाठी हा स्तूप जपानच्या बौद्ध संघाचे प्रमुख मा फुजी-गुरुजी यांच्या कल्पनेनुसार उभारला गेला या टेकडीवर भगवान बुद्ध अजूनही धर्मप्रार्थनेसाठी सकाळी येतो अशी जपानी लोकांची धारणा आहे. डॉ. राधाकृष्णन् यांनी १९६५ मध्ये या पवित्र स्तुपाचा शिलान्यास केला. या गोलाकार स्तुपाच्या चार दिशेला बुद्धच्या चार सोनेरी मूर्ती आहेत एकात भगवान उभे आहेत तर एकात ध्यानस्थ ! एकात कमलपुष्पात उभे आहेत तर एकात निद्रिस्त ! बाजूला जपानी भाषेत सूत्रे कोरली आहेत. या स्तूपाभोवती फेरा मारण्यासाठी दोन गोलाकार मार्ग आहेत व भोवती रेलिंग आहे तळाला पांढऱ्याशुभ्र षट्कोनी टाईल्स आकर्षकरित्या बसवल्या आहेत दुपारच्या भर उन्हातही त्या शीतल वाटत होत्या स्तुपावर सोनेरी कळस आहे या पर्वतावरून सभोवतालचे विहंगम दृश्य दिसत होते भगवान बुद्धाच्या चरणकमलांनी पुनित झालेल्या या भूमीचे दर्शन घेऊन रोपवेच्या चेअरलिफ्टमध्ये बसून पायथ्याशी पोहोचलो.

रिक्षावाला पुढील स्थानाकडे जाताना म्हणत होता, टेकडीवर जाऊन बुद्धाला नमस्कार करण्यापेक्षा येथे शूटींग झालेल्या ' जॉनी मेरा नाम 'मध्ये हेमामालिनी व देवआनंद चेअरलिफ्टमध्ये बसून गेले याचेच प्रवाशांना आकर्षण वाटते बुद्धापेक्षा रोपवेच लोकांच्या लक्षात रहातो हे राजगीरचे दुर्दैव आहे याबद्दल धार्मिकवृत्तीच्या त्या रिक्षावाल्याला खंत वाटत होती.

गृध्रकुटकडून गया-राजगीर या मुख्य रस्त्याच्या फाट्याने थोडे पुढे गेल्यावर एक दगडी भिंत आढळते. तेथे शंखलिपीत लिहिलेले अनेक लेख आढळले. तसेच रथचक्राच्या सारख्या रुंदीच्या खुणाही आढळल्या. इ. स.पूर्व

५ व्या शतकातील शंखलिपीचा अर्थ अजून कोणीही लावू शकले नाही.

त्यानंतरचे दर्शनीय स्थान होते सोनभंडार गुफा ! येथे राजा बिंबिसारचा खजिना असावा असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. दरवाजा असलेल्या ठिकाणी कोरीव काम आहे व आतमध्ये सुमारे ३ मैल लांबीचे भुयार आहे असे म्हणतात राणीने मरण्याच्या वेळी गौतम या जैन साधुला हा खजिना दिला. गौतम साधुने या भुयारात हा खजिना ठेवला व त्याचा दरवाजा पक्का केला दरवाजा कसा उघडायचा यासंबंधी तेथे लेख कोरला आहे तो आहे शंखलिपीत ! आणि ही लिपी कोणीही वाचू शकले नाही ब्रिटिशांच्या काळातही सुरुंगाच्या सहाय्याने या दगडी दरवाजाला खिंडार पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला पण त्यांना यश आले नाही गुहेतील गंधक व रेडि-यम या ज्वालाग्राही पदार्थांमुळे त्यांनी हा नाद सोडून दिला ज्या गौतम-स्वामीने ही लिपी कोरली त्याचे चित्र व्हरांड्यात कोरले आहे एका संस्कृत शिलालेखानुसार या गुहा इ स तिसऱ्या-चौथ्या शतकात जैनसाधुंच्या निवासार्थ निर्माण केल्या गेल्या जैन तीर्थंकरांच्याही काही प्रतिमा कोरल्या आहेत. त्यातील काही प्रतिमा मुसलमान सरदारांनी नष्ट केल्या

'जरासंधका आखारा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्राचीन रण-भूमीकडे जायला एक पाऊलवाट आहे भीम व जरासंध यांचे २८ दिवसांचे महान द्वंद्वयुद्ध येथे झाले होते व जरासंधाचा वध झाला होता

मणियारमठ या ठिकाणी महाभारतकालीन मणिनागमंदिर होते. तेथील पूर्वीच्या जैन मंदिराच्या उत्खननानंतर मातीची भांडी, अनेक मूर्ती, फणा-धारी शिवलिंग, चतुर्भुज विष्णु, एक नाग, ५ नागिणी इ मूर्ती सापडल्या. मणियारमठ येथे पूर्वी बुद्धमठविहार असावा

सर्व राजगीरचा फेरफटका मारून झाला तेव्हा रिक्षावाल्याने राजगीरच्या प्रख्यात उष्ण पाण्याच्या कुंडाजवळ स्नानासाठी आणून सोडले वैभार टेकडीच्या पायथ्याशी सातधारा हे प्रख्यात कुंड आहे. गंधकयुक्त उष्ण पाण्याच्या झऱ्याचा प्रवाह तोट्यासारखा ७ गोमुखातून येतो तेथे उभे राहून नैसर्गिक उष्ण पाण्याच्या शॉवरबाथची मजा चाखली तेथून थोड्या पायऱ्या

उतरून गेल्यावर अर्धिकं उष्ण पाणी असलेल्या कुंडात मनसोक्त स्नान केले. तेथील मूर्तीला पुष्पमाला अर्पण केल्या रेडिओॲक्टिव्ह गुणधर्म असलेल्या या पाण्याने स्नान केल्यास त्वचारोग बरे होतात म्हणून कित्येक लोक राजगीरला पुष्कळ दिवस मुक्काम करतात.

राजगीरच्या उष्ण पाण्याच्या कुंडात स्नानाचा आनंद उपभोगून रस्त्यासमोरील हॉटेलमध्ये दुपारचे जेवण आटोपले तेव्हा दोन वाजले होते. नालंदाकडे जाणाऱ्या बसचा हॉर्न वाजू लागला म्हणून लगबगीने बसकडे निघालो.

□

# भग्न विद्यालयाचे भव्य दर्शन नालंदा

राजगीरहून केवळ तेरा कि मी अंतरावर असलेल्या नालंदाकडे टूरिस्ट डिपार्टमेंटची लक्झरी बस धावू लागली.

नालंदा ! भगवान बुद्ध व वर्धमान महावीर यांच्या वास्तव्याने पुनित झालेली ही भूमी ! भगवान बुद्ध येथे धर्मप्रसारार्थ उपदेश करीत असे तसेच वर्धमान महावीरांची जैन मुनी गोशालाबरोबर मुलाखत येथेच झाली होती भगवान बुद्धाचा प्रमुख शिष्य सारीपुत्र याचा जन्म-मृत्यु येथेच झाला. सम्राट अशोकाने इ स पूर्व तिसऱ्या शतकात तेथे विहार बांधला. पूर्वी तेथे कमलसरोवरे अनेक होती आजही काही आहेत नाल म्हणजे कमल यावरून नालंदा असे नाव पडले असावे चिनी आख्यायिकेनुसार सरोवरात नालंदा नावाचा नाग रहात असे म्हणून नालंदा नाव पडले असावे

बस नालंदा विद्यालयाच्या अवशेषाबाहेरच्या प्रांगणात थांबली एकेकाळी जगामध्ये प्रसिद्धीने झगमगलेल्या या आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाच्या आवारात आपण प्रवेश करीत आहोत या कल्पनेनेच मन रोमांचित झाले. अरुंद मार्गाने आत प्रवेश केल्यावर दिसू लागले नालंदा विश्वविद्यालयाचे विविध अवशेष ! गाईड डोळ्यासमोर नालंदाचा इतिहास उभा करू लागला या जगप्रसिद्ध विश्वविद्यालयाची स्थापना पाचव्या शतकात झाली कुमार गुप्त, समुद्रगुप्त इ सर्व गुप्त राजांनी या विश्वविद्यालयाच्या खर्चासाठी

उत्पन्नावर गावांचे दान करण्यात आले होते. तत्कालीन हजारो बौद्ध भिक्षूंना हर्ष केवळ आदरानेच वागवीत नसे तर स्वतःला त्यांचा चाकर समजत असे. पूर्व भारतात आठव्या ते नवव्या शतकापर्यंत साम्राज्य गाजवणाऱ्या पाल राजांनी तर नालंदाच्या विकासात सर्वस्व ओतले. नालंदा येथील दगडी व ब्रांझ मूर्तींची उत्पत्ती या पालराजांपासून झाली.

या विश्वविद्यालयाचे उत्खनन १९३८ पर्यंत वीस वर्षे चालू होते. सात मैलातील विश्वविद्यालयाचे फक्त एक मैलाचेच उत्खनन केले आहे उत्खननात चार हजार मूर्ती, शिलालेख, खेळणी व जळालेले तांदूळही मिळाले.

नालंदा विश्वविद्यालयात अध्ययनासाठी केवळ हिंदुस्थानातीलच नव्हे तर कोरिया, चीन, जपान, मंगोलिया इ देशातूनही विद्यार्थी आकर्षिले जात असत. पाचव्या शतकात फाहीन या चिनी पंडिताने नालंदाला भेट दिली होती तर सातव्या शतकात ह्यू-एन-त्संग हा चिनी प्रवासी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी तेथे राहिला होता.

तत्कालीन जगात नालंदाचे विश्वविद्यालय सर्वात मोठे होते. दहा हजार विद्यार्थी व पाच विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक इतक्यांची रहाण्याची सोय या प्रचंड विश्वविद्यालयात केली होती विद्यापीठाचे आवार सात मैल इतके प्रशस्त होते. देशविदेशाहून आलेल्या विद्यार्थ्यांची सोय प्रथम अतिथिभवनात केली जाई द्वारपंडित या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्वानांकडे अतिथी भवनाची व्यवस्था असे विद्यापीठात प्रवेश करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांना अनेक आठवडे अतिथिभवनात प्रवेश निश्चित होईपर्यंत रहावे लागे. तोपर्यंत द्वारपंडित त्यांची बौद्धिक क्षमता, सवयी इ. ची काटेकोरपणे, तावून सुलाखून पारख करीत.

उत्खनन केलेला भाग विद्यार्थ्यांची रेखीव निवासस्थाने दर्शवीत होता एक, दोन शय्या असलेल्या व शय्याविरहीत खोल्या दिसल्या नवीन विद्यार्थी आला की तो सहा महिने एकटा एका खोलीत रहात असे. नंतर वर्षभर चर्चा, मार्गदर्शन यासाठी तो मोठ्या विद्यार्थ्यांबरोबर रहात असे परत खोली बदलली जाई. त्यासाठी त्यास विद्याभ्यासासाठी कठोर आचरण करावे लागे झोपण्यासाठी विटांनी बांधलेला चबुतरा होता तसेच पुस्तके ठेवण्यासाठी बाजूला सेल्फ दिसले.

- नंतर विद्यार्थ्यांचे सभागृह दिसले. त्यामध्ये अष्टकोनी विहीर होती कारण विद्यार्थ्यांस दोन वेळा स्नान आवश्यक मानत असत सांडपाणी वाहून जाण्यासाठी बांधलेल्या सरळ गटारी तत्कालीन प्रगतीची साक्ष देत होत्या. काही मठ तेथे असलेल्या जिन्यामुळे दुमजली असावेत. काही मठात विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक माहितीसाठी विटांनी बांधलेल्या भट्टया आढळतात

शिक्षणकाळात कडक शिस्तीचे वातावरण होते अध्ययन घड्याळाबरहुकूम चाले चर्चासत्रस्वरूपात आजच्या सेमिस्टर पद्धतीप्रमाणे अध्ययनाचा काही भाग चालत असे बौद्ध व वैदिक तत्वज्ञानाबरोबरच तर्कशास्त्र, व्याकरण, आरोग्यशास्त्र, रसायन, धातुशास्त्र, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, तत्वज्ञान इ अनेक विषयाचा सांगोपांग अभ्यास होत असे नागार्जुन, आर्यदेव व वसुबंधु हे तत्कालीन गाढे प्रकांडपंडित होते. त्याकाळातील योगशास्त्राचे सर्वात गाढे पंडित शीलभद्र यांनीही विद्यापीठाचे कुलपतीपद भूषविले होते.

या विश्वविद्यालयातील वाचनालय नऊमजली होते. तीन मोठी वाचनालये रत्नसागर, रत्नोदधी व रत्नरंजक नावाने ओळखली जात हजारो हस्तलिखिते संदर्भासाठी उपलब्ध होती.

नालंदाच्या भग्नावशेषातून फेरफटका मारताना विविध चैत्य, विहार, मंदिराचे अवशेष एकेकाळी ज्ञानलालसेने जमलेल्या विद्यार्थ्यांची व निष्णात अध्यापकांची आठवण करून देत होते पहातापाहता गाईडने आम्हाला मुख्यमंदिराच्या अवशेषाजवळ नेले. सम्राट अशोकने प्रथम हा स्तूप बुद्धाचा महान शिष्य सारीपुत्र याच्या स्मरणार्थ त्याच्या चैत्याच्या जागी बांधला. तेथे सारीपुत्राच्या अस्थींचा कलश होता सात राजांनी सातशे वर्षांत या स्तूपाच्या उभारणीस हातभार लावला त्याला सात जिने होते त्यातील काही आजही दिसतात विटांनी बांधलेले जिने भव्यतेची साक्ष देत होते. गाईड जीव ओतून इतिहास जिवंत करीत होता तोच एका प्रवाशाने प्रश्न विचारला. " काहो, जॉनी मेरा नाममध्ये हेमामालिनी येथूनच पळत गेली ना ?" त्याला प्राचीन थोर संस्कृतीपेक्षा आधुनिक सिनेमाचे जास्त आकर्षण वाटत होते तर ! गाईडने नाराजीने एक कटाक्ष टाकून 'होय' असे म्हटले खरच सरकारने अशा या पवित्र ठिकाणी सिनेमांचे शूटिंग करण्यास परवानगी देऊ नये असा विचार मनात आल्यावाचून राहिला नाही.

ह्यूएन्त्संगने या मंदिराच्या ठिकाणी भगवान बुद्धाची ८० फूट उंचीची प्रचंड तांब्याची मूर्ती पाहिल्याचा उल्लेख केला आहे मंदिरावर बुद्धजीवनातील अनेक प्रसंगाच्या मूर्ती कोरल्या आहेत. त्यातील एक उल्लेखनीय म्हणजे आम्रपाली आपले केस बुध्दाच्या चरणी अर्पण करते तो देखावा ! सातव्या व आठव्या मठाशेजारील दुसऱ्या मंदिरावर चवुतऱ्यावरील पंक्तीत सुमारे दोनशेच्यावर रेखीव सुंदर मूर्ती कोरल्या आहेत. त्यात अग्निदेव, कुबेर गजलक्ष्मी, वाद्य वाजवणारे किन्नर, शिवपार्वती इ अनेक मूर्ती आहेत भौमितिक नक्षीदार आकृत्याही आहेत खरच, नालंदाच्या भग्नावशेषातील फेरफटका एखाद्या स्वप्ननगरीसारखा वाटत होता. प्रत्यक्ष भेटीत त्याचे पैलू अधिकाधिक गहिरे वाटत होते

नालंदाला भेट दिल्यावर गुरुदेव रविंद्रनाथ टागोर उद्गारले होते.

*Here we see the art of India*
*Saluting the Scholarship of India.*

सातशे वर्षे जगाच्या नकाशावर आपल्या कीर्तीने तळपणाऱ्या या महान विश्वविद्यालयावर बख्त्यार खिलजी या मुसलमान राजाची वक्रदृष्टी वळली. विहार, मंदिर, मठ, स्तूप उखडले गेले बौद्ध भिक्षूंची कत्तल करून रक्ताचे पाट वाहवले गेले वाचनालयातील पुस्तकांना आग लावली गेली ह्यूएनत्संगने नालंदातील ज्या मंदिराबद्दल लिहून ठेवले होते की येथील इंद्राच्या महालासारख्या महान गगनचुंबी मंदिरावर चढून ढगाचे बदलते रंग, हवेचे बदलते ढंग पहाता येतात त्याच विशाल मंदिराच्या व आजूबाजूच्या परिसरातील आगीच्या ज्वाला ढगाला भिडू लागल्या ! केव्हढे हे नालंदाचे दुर्दैव !

अग्निभक्षातून जे काही दुर्मिळ ग्रंथ बचावले त्यातील मजकूर वाचण्याची इच्छा त्या क्रूरकर्म्याला झाली पण कोणीही पंडित जिवंत न उरल्याने ते ग्रंथ वाचले जाऊ शकले नाहीत.

या महान सांस्कृतिक स्थळाचा निरोप घेताना मन सुमारे हजार वर्षापूर्वीच्या वातावरणात रेंगाळू लागले— जेव्हा हजारो छात्रगण, गाढे प्रकांड पंडित, बौद्धभिक्षू यांनी ही भूमी गजबजली होती नऊमजली वाचनालयातील अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडलेली हजारो दुर्मिळ हस्तलिखिते, ग्रंथ जणू आर्तपणे आक्रोश करीत होती □

# जलमंदिराचे पावापुरी

नालंदानंतर बस निघाली होती भगवान श्रीमहावीर यांच्या पुण्य-भूमीकडे—पावापुरीकडे! पावापुरी हे स्थान बिहार शरीफ या रेल्वे स्टेशनपासून चौदा कि मी. अंतरावर आहे व नालंदापासून केवळ पंच-वीस कि मी. अंतरावर आहे पावापुरीचे अती प्राचीन नाव 'महसेनवन!' पावापुरी हे सिद्धक्षेत्र आहे. वस्तुत. पावा व पुरी ही वेगळी दोन गावे आहेत.

या तीर्थस्थळी भगवान महावीर जेथे बसून उपदेश करीत त्या जैन श्वेतांबर मंदिरात प्रथम दर्शनार्थ गेलो याठिकाणी भगवानाने चार हजारां-वर शिष्यांना दीक्षा दिली. येथेच प्रथम व अंतिम उपदेश केला या कला-त्मक मंदिराचे शिल्प अगदी आगळे आहे संपूर्ण मंदिर पांढऱ्या शुभ्र दुधी संगमरवराचे असून जयपुरी कारागीरांनी घडवले आहे मंदिराच्या संगमरवरी चबुतऱ्याच्या पायऱ्या चढत असताना एकानंतर एक तीन संगम-रवरी मकरतोरणे लागतात. तीन गोलाकार टप्प्याच्या या मंदिरात प्रथम पर्षदा व दुसऱ्यावर संगमरवरी दगडात पशुपक्षी कोरले आहेत. तिसऱ्या व सर्वात वरच्या टप्प्यावर मधोमध अशोकवृक्ष कोरला असून भगवान श्रीमहावीर प्रभूच्या चार दिशेने चार सुंदर मूर्ती विराजमान आहेत. पशुपक्षी सर्व जणू प्रभूची अमृतमय वाणी ऐकत स्वतःला धन्य मानीत आहेत असा तो सुंदर देखावा आहे

मंदिराभोवती सुंदर चकचकीत आवार आहे व स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे आमचा गाईड पान खात होता ते पाहून तेथील पुजारी भयंकर चिडला पान तबाखू खाऊन कोणीही आत प्रवेश करू नये, कसलीही घाण करता कामा नये असा तेथे दंडकच आहे बरोबर आहे पवित्र वास्तूची अशी काळजी घ्यायलाच हवी आगळ्या शिल्पकृतीचे, स्वच्छ असे हे मंदिर पहाताना अशी स्वच्छता हिंदूंच्या देवळातही पाळली जाईल तो सुदिन असे वाटल्यावाचून राहिले नाही शिवाय दानधर्म करा असे म्हणत मागे लागणारे चिकट पुजारीही तेथे नव्हते.

त्यानंतर आम्ही उत्सुक झालो होतो पावापुरीचे प्रख्यात जलमंदिर पहायला तीर्थंकर महावीरांचे निर्वाण ज्या ठिकाणी झाले व प्रभूवर अग्निसंस्कार जेथे झाला तेथे हे नवीन संगमरवरी जलमंदिर सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आले कलकत्त्याच्या पूनमशेठ या धनाढ्य व्यापाऱ्याने दीड लाख रुपये खर्चून ते बांधले मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या वेळी निघालेल्या मूळ मंदिराच्या विटा पुराणशास्त्रज्ञांच्या मते दोन हजार वर्षांपूर्वीच्या होत्या

कमलपुष्पांनी भरलेल्या सरोवरातील या मंदिरात पोहोचण्यासाठी सुमारे सहाशे फूट लांबीच्या तांबड्या पाषाणाचा नाजूक सेतू आहे त्याला नक्षीदार कठडे व सुंदर जाळी आहे संगमरवरी विशाल चबुतऱ्यावर हे कलापूर्ण संगमरवरी पांढरेशुभ्र मंदिर बांधले आहे हे संगमरवरी मंदिर म्हणजे पांढऱ्याशुभ्र कमलपुष्पामध्ये आणखी एक उमललेले मानवनिर्मीत पांढरेशुभ्र कमलच !

मंदिराचे क्षेत्र १०४ यार्ड असून मूळ मंदिर नंदीवर्धन राजाने निर्माण केले. या मंदिरात मूर्ती नाही ते शिखरबद्ध असून वर सोन्याचा कळस आहे मंदिरात भगवान महावीरांचे चरण असून मंदिराच्या डाव्या बाजूला भगवानाचे मुख्य गणधर गौतमस्वामी व उजव्या बाजूला सुधर्मास्वामींचे मंदिर आहे. मंदिराच्या नक्षीदार चबुतऱ्याच्या चार कोपऱ्यात चार संगमरवरी घुमट आहेत मंदिराच्या भिंती नक्षीदार असून दरवाजा चांदीचा आहे. दिपावलीच्या दिवशी चार वाजता मंदिरातील चांदीची छत्री आपो-

आप हलते असे पुजारी सांगत होता मंदिराभोवतालच्या सरोवरात असंख्य मासेही आहेत.

कार्तिक कृष्णाच्या शेवटी स्वाती नक्षत्रात कर्मकलकाचा नाश करून महावीराने अक्षय, अजय, अमर सौख्य मिळविले. म्हणून येथे कार्तिक कृष्ण त्रयोदशी ते कार्तिक शुक्लापर्यन्त मेळावा भरतो येथे निर्वाण झाल्यावर ज्ञानज्योतीचा अभाव झाला असे समजून दिवाळी पर्वउत्सवास सुरुवात होते त्यावेळी निर्वाणलाडू चढविण्यात व भगवान महावीराला श्रद्धांजली वहाण्यास हजारो जैन व इतर धर्मीय लोक येतात

सायंकाळ झाली होती भगवानाच्या चरणांचे दर्शन घेऊन आम्ही परतू लागलो होतो दिव्यांचे सरोवराच्या पाण्यातील प्रतिबिंब सुंदर दिसत होते.

बस राजगीरला सायंकाळी सहाच्या सुमाराला पोहोचली गयेला जाणारी बस तयारच होती दोन तासातच गयेला पोहोचलो.

□

# कलकत्ता-एक महानगरी

बंगाल ! भारताच्या इतिहासात आपल्या कर्तृत्वाने सामाजिक सुधारणा धर्म, शास्त्र, काव्य, नाटय कला, राजकारण, चित्रपट, इ विविध क्षेत्रांत तळपणाऱ्या असंख्य वंगबंधूच्या वास्तव्याची भूमी ! किती जणांची नावे आठवावीत ! थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर, धर्मपंडित रामकृष्ण परमहंसांचे जगविख्यात, तेजस्वी शिष्य स्वामी विवेकानंद, नोबेल-पारितोषिक विजेते गुरुदेव रविंद्रनाथ टागोर, स्वातंत्र्यासाठी आहुती देणारे निधड्या छातीचे सुभाषचंद्र बोस, राजकारणपटु चित्तरंजन दास देशबंधु, कवयित्री सरोजिनी नायडू, महान साहित्यिक शरच्चंद्र चटर्जी, आणि आजचे चित्रपट व्यवसायातील सत्यजित रे !

अशा या बंगालचा मानबिंदू म्हणजे कलकत्ता ! केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील एक महानगरी ! पूर्वेकडील एक प्रचंड शहर ! या शहराचा इतिहास केवळ तीनशे वर्षांच्या आतबाहेरचा आहे दिल्ली व आग्रा यासारखी याला पौराणिक, महाभारतकालीन वा ऐतिहासिक पार्श्वभूमी नाही कलिकता या मूळच्या मच्छीमाराच्या खेडेगावावरून कलकत्ता हे नाव पडले.

इ स १६५५ ची हकीकत ! जॉब कर्नाक हा ब्रिटीशांच्या मालकीच्या ईस्ट इंडिया कंपनीतर्फे व्यापारवृद्धीसाठी बंगालच्या उपसागरातून हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर हुगळीला आला मुर्शिदाबाद ही त्यावेळी बंगालची

राजधानी होती एका तरूण बंगाली स्त्रीची कर्नाकने सती जाण्यापासून सुटका केली तो तिच्याशी विवाहबद्धही झाला त्याच्यावर भारतीय पद्धतीने संस्कार झाले व तो त्याप्रमाणे आचरण करी पुढे तो बंगालचा गव्हर्नर झाला कलकत्त्याच्या प्रसिद्ध वटवृक्षाखाली तो दरबार भरवीत असे. १६६० मध्य त्याने कालीघाट, गोविंदपूर, कलिकता या तीन खेड्याच्या परिसरात ब्रिटीशाचा झेंडा व्यापारासाठी उभारला व्यापाराच्या निमित्ताने आलेले इंग्रज पुढे राजसत्तेचे मालक बनले.

या महानगरीतील भव्य हावरा स्टेशनच्या आवारात दिवस उजाडताच डेहराडून हावरा एक्सप्रेसने प्रवेश केला १५ ऑगस्ट १८५० रोजी ३०० प्रवासी घेऊन हावरा ते हुगळी रेल्वेची सुरुवात झाली होती. त्यावेळी केवळ दोन प्लॅटफॉर्म असलेल्या हावरा स्टेशनला आज चौदा प्लॅटफार्म आहेत. दररोज तीनशे गाड्याची तीन लक्षांवर प्रवाशाना घेऊन अव्याहत वाहतूक चालू असते !

स्टेशनच्या आवारातील गर्दीतून वाट काढता काढता नाकी नऊ आले. स्टेशनजवळील सबवेमधून रस्ता ओलांडल्यावर पाचच मिनिटात नटराज हे अद्ययावत लॉज दिसले लिफटने पाचव्या मजल्यावर येऊन खोली ताब्यात घेतली. तासभरात आवरू[illegible] बाहेर पडलो.

## हावरा ब्रीज

कलकत्ताभेटीची पहिल्या दिवशीची सुरुवात हावरा स्टेशनसमोरील हुगळी नदीवरील अतिप्रचंड हावरा ब्रिजच्या दर्शनाने झाली उंच उंच लोखंडी टॉवर यांचे जणू जाळे पसरले आहे २१०० फूट लांबीच्या एकशेपन्नास फूट उंचीच्या व एक्काहत्तर फू[illegible] पुलाच्या बांधकामांत सत्तावीस हजार टन लोखंड वापरण्यात आले. सहा वर्षं बांधकाम चालल्यानंतर १९४३ मध्ये या पुलावरून वाहतूक चालू झाली त्यावेळी पुलाचा खर्च सव्वातीन कोटी रु झाला एका वेळी आठ गाड्याची वाहतूक होऊ शकेल एवढी या पुलाची रुंदी आहे

हावरा ब्रीज म्हणजे जणू कलकत्त्याची धमनीच आमची टॅक्सी हावरा ब्रिजवरून धावू लागली। हावऱ्याहून निघाल्यावर हुगळी नदीवरील हा पूल

ओलांडला नदीच्या पात्रात कसलाही आधार न देता उभारलेला हा पूल स्थापत्यशास्त्रातील एक आश्चर्यच होय पूल संपला व गजबजलेले रस्ते, ट्रामची वाहतूक, उंच उंच इमारती व मुंग्यासारखी माणसे दृष्टीस पडली टॅक्सीतून दहा मिनीटांतच डलहौसी स्क्वेअरमध्ये आलो कारण तेथे पर्यटन कचेरीत माहितीपत्रके, नकाशे इ. ची चौकशी करायची होती.

## कलकत्याचा आत्मा–डलहौसी स्क्वेअर

डलहौसी स्क्वेअर हा कलकत्त्याचा मध्यवर्ती महत्त्वाचा चौक ! लॉर्ड डलहौसी हा हिंदुस्थानचा १८४८ ते १८५६ पर्यन्त गव्हर्नर होता त्याच्या नावाने हा विस्तृत चौक ओळखला जातो येथे एक विशाल तळे आहे. तेथील अनेक नैसर्गिक झऱ्यातून बाराही महिने पाणी वहात असते. आम्ही कडेला उभे राहून तळयात पडणाऱ्या स्फटिक शुभ्र पाण्याच्या धारा पाहून चकित झालो

डलहौसी स्क्वेअर हा कलकत्त्याच्या इतिहासातील ब्रिटीशाच्या कारकीर्दीचा सर्वात जुना दुवा व विविध घटनाचा साक्षीदार होय इंग्रजांचा पाय कलकत्त्यात रोवणाऱ्या जॉब कर्नाक व त्याच्या सहकाऱ्यांना येथील तळयानेच पाणी पुरविले. त्यावेळी हा भाग 'द ग्रीन' नावाने ओळखला जाई कारण या तळयाच्या भोवती पंचवीस एकर क्षेत्राचे विस्तृत हिरवेगार शेत होते नंतर हा भाग 'दी पार्क' या नावाने ओळखला जाई या तळयाच्या बाजूच्या भिंती तांबडया विटांनी बांधून काढल्या असून पूर्व व पश्चिम बाजूला लांबच्या लांब पायऱ्या आहेत. लालबाग व लालदीगी (Red Tank) नावानेही हा भाग पूर्वी ओळखला जात असे.

आज या तळयाभोवती अनेक भव्य इमारती आहेत. त्यात चौदा मजली नवे सेक्रेटरिएट, टेलिफोनभवन, घुमटधारी जनरल पोस्ट, रिझर्वबँक इत्यादी आहेत. उत्तरपूर्व बाजूला निमुळते शिखर असलेले अँड्रूज चर्च बदलत्या काळातही जुन्या कलकत्त्याची आठवण करून देत होते.

नजीकच कलकत्त्याचे प्रसिद्ध 'सेंट जॉन चर्च' आहे ब्रिटीशांच्या वास्तव्याच्या अनेक स्मृतीशी ते निगडीत आहे. याच चर्चच्या आवारात पहिला इंग्रज अधिकारी जॉब कर्नाक चिरनिद्रा घेत आहे ज्याने कलकत्ता शहराचे

रोपटे लावले व ज्या रोपट्याचे आज जगातील एका प्रचंड शहरात रूपांतर झाले आहे त्या जॉब कर्नाकची आठवण तेथील छोटी स्मृतीशीला करून देत होती मोगल राजावर दिल्लीला उपचार करणारा व त्यांच्याकडून सवलती घेणारा सर्जन विल्यम हॅमिल्टन हाही येथे चिरनिद्रा घेत आहे ७४०० चौरस फुटाच्या या चर्चचा गगनचुंबी टॉवर पावणेदोनशे फूट उंच आहे. चर्चचे पेन्हिंग राखी रंगाच्या दगडाचे असून चर्चमध्ये काही पेंटींग्ज आहेत चर्चमध्ये विवाह नोंदणीचे काही जुने रेकॉर्ड आहे त्यात वॉरन हेस्टिंगजच्या विवाहाचीही नोंद आहे १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात या चर्चला बॉम्बचा तडाखा बसला होता

नजीकच कलकत्त्याचे हायकोर्ट आहे शिल्पशास्त्राच्या गॉथिक पद्धतीने बांधलेल्या या इमारतीचा टॉवर १८० फूट उंच आहे ४२० फूट लांबीच्या या इमारतीच्या स्तंभांची रांग सुंदर, नक्षीदार, आकर्षक आहे हायकोर्टा-शेजारीच पश्चिम बंगालचे असेंब्ली हाऊस आहे सुंदर बगीच्यातील ही इमारत बावीस लाख रु खर्चून १९३१ मध्ये बांधण्यात आली

## राजभवन

राजभवन ही केवळ कलकत्त्यातीलच नव्हे तर भारतातील भारदस्त वास्तु आहे १८०३ साली पूर्ण झालेल्या या इमारतीचे उद्घाटन लॉर्ड वेलस्लीने केले ही इमारत राजवाड्याच्या धर्तीवर बांधली आहे त्याकाळी ती बांधण्यास २० लाख रुपये खर्च आला भारी पर्शियन गालिच्यांनी त्या काळी ही वास्तु सजवली होती श्रीरंगपट्टणच्या टिपू सुलतानाचा वध केल्यावर त्याचे लुटलेले मौल्यवान सिंहासनही तेथे ठेवले होते शंभर वर्षांनंतर लॉर्ड क्लाईव्हने या इमारतीची शताब्दी धूमधडाक्यात साजरी केली होती

राजभवनाचे आवार ६ एकर इतके प्रशस्त आहे गेटमधून त्याच्या उंच उंच पायऱ्या दिसत होत्या आवारात अनेक फुले, उंच उंच वृक्ष, हिरवळी याची रेलचेल दिसत होती. १९१२ मध्ये दिल्लीला राजधानी हलवेपर्यंन्त येथे व्हाईसरॉय रहात असे नंतर बंगालचा गव्हर्नर रहात असे सध्या राज्यपाल रहातात

डलहौसी स्क्वेअरपासून राजभवनाचा फेरफटका पूर्ण झाला तेव्हा आम्ही कलकत्त्याच्या चौरंगी या प्रशस्त व जगप्रसिद्ध रस्त्यावर येऊन पोहोचलो होतो चौरंगी या मूळच्या खेड्याच्या नावावरून अठराव्या शतकात हे नाव पडले एक मैल लांबीचा हा सरळच्यासरळ मार्ग वैशिष्टयपूर्ण शिल्परचनेची मोठमोठी व्यापारी दुकाने, सिनेमागृहे, हॉटेल्स, बँका यानी गजबजलेला आहे. या मोठ्या रस्त्याला काटकोनातून छेदणारे रस्ते आहेत प्रसिद्ध धर्मताला रोड चौरंगीपासून नजीकच आहे

चौरंगीला लागूनच दोन मैल लांब व एक मैल रुंदीचे प्रशस्त मैदान आहे हे मैदान कलकत्तावासीयाचे अभिमानाचे व प्रेमाचे ठिकाण आहे १८ व्या शतकात एकेकाळी जेथे घनदाट जगल होते व गव्हर्नर जनरल जेथे वाघाची शिकार करीत असे तेथेच आज असलेल्या प्रशस्त हिरवळीवर कलकत्त्याचे रहिवासी सायकाळची रम्य वेळ व्यतीत करतात. हौशी बगाली पुरुष, भागात सिंदूर घातलेल्या व केसात फुले माळलेल्या स्त्रिया, रगीबेरगी आइस्क्रिम मजेत चोखणारी भाबडी मुले यानी हे मैदान फुलले होते.

मैदानाच्या पश्चिमेला चौरंगीच्या बाजूला एक अतिशय उच स्तभ लक्ष वेधून घेत होता. भारतातील सर्वात जास्त उचीचा १६५ फूट उचीचा ऑक्टर्लोनी स्तभ इ स १८४१ मध्ये बांधण्यात आला हा स्तंभ ईस्ट इंडिया कपनीतील मिलीटरी अधिकारी जनरल सर डेव्हीड ऑक्टर्लोनी यांच्या स्मरणार्थ बाधण्यात आला आपल्या चाळीस वर्षांच्या मिलीटरी कारकीर्दीत त्याने इ स १८१४–१६ मध्ये नेपाळवर मोहीम केली. महत्वपूर्ण विजय मिळवला मुस्लिमांबद्दल त्याला अधिक प्रेम होते. त्यांच्या या मुस्लिम प्रेमामुळेच या स्मारकावर मुस्लिम शिल्पकृतीचा प्रभाव आहे ह्या स्तभाचे नवे नाव आहे – शहीद मिनार. स्तभाच्या चबुतऱ्यावरील भाग इजिप्शियन पद्धतीचा आहे अशाप्रकारे इजिप्शियन, सीरियन व तुर्कीश शिल्पकृतीचे आगळे मिश्रण या स्तभाच्या शिल्पकृतीत झाले आहे. २१८ पायऱ्या असलेला अतर्गत जिनाही वैशिष्टयपूर्ण आहे.

चौरंगीरोडवर मा. गाधींचा ब्राँझचा ११ फूट उच पुतळा आहे. तेथेच येथील विशाल मैदानाच्या जवळच हुगळी नदीच्या तीरावर १८३५ मध्ये



२८५ प्र पेचार
२१०२ ५

स्थापन झालेले प्रख्यात ईडन गार्डन आहे लॉर्ड ऑकलड या ब्रिटीश गव्हर्नराच्या बहिणीच्या–मिसेस ईडनच्या नावाने ते ओळखले जाते क्रिकेटशौकिनांचे तर ईडन गार्डन हे आकर्षणच आहे येथील अनेक क्रिकेटमॅचेसनी क्रीडारसिकांना आनद मिळवून दिला आहे या ईडन गार्डनमध्ये एक ब्रह्मी लाकडी पॅगोडा बुद्धमदिर आहे रेडिओवरील कॉमेंट्रीत ऐकलेले ईडन गार्डन प्रत्यक्ष पहायला मिळाल्यामुळे फार आनद झाला.

कलकत्त्याचा पहिला दिवस कलकत्त्याचा मध्यविभाग पहाण्यात गेला दुसऱ्या दिवसाची सुरुवात प्रसिध्द इडियन म्युझियमच्या भेटीने सुरू झाली

खास इटालियन पध्दतीच्या शिल्पशास्त्रानुसार चौरंगी रोडवर ३०० फूट लांब व २७० फूट रुंदीची ही इमारत १८७५ मध्ये बांधली बाधकामास चौदा लाख रु खर्च आला या इमारतीच्या आतून सर्व बाजूनी व्हरांडा असून मध्ये मोकळे चौकोनी प्रागण आहे पुरातन विभागात मोहेजोदारो व सिंधु खोऱ्यातील सास्कृतिक अवशेष–मातीची भांडी, मृण्मूर्ती, तांब्याची हत्यारे इ. आहेत. इजिप्तमधील चार हजार वर्षांपूर्वीची ममी (मृत शरीर) आहे तसेच गौतमबुद्धाच्या आयुष्यातील घटना साकार करणाऱ्या मूर्तीही आहेत मध्ययुगीन मूर्तीमध्ये खजुराहो (मध्यप्रदेश) व हळेबीड (कर्नाटक) येथील अलकारांनी विभूषित सुन्दरींच्या मूर्ती आकर्षक आहेत मुस्लिम कक्षात कुराणाची जुनी हस्तलिखीते, जुने फरमान, लाहोरला मिळालेली उमर खय्यामच्या रुबाईची प्रत इ आहे

कलाविभागात तिबेटी पध्दतीची चित्रे आहेत तसेच धातूच्या, हस्तीदती स्फटिकापासून बनवलेल्या अनेक मूर्ती आढळतात एका दालनात नागा, आसाम प्रातातील खासी तर निकोबारबेटातील मगोलवशीय रहिवासी इ विविध जातीच्या सस्कृतीचा परिचय करून दिला आहे. त्यात ह्या जातीजमातींनी केलेल्या वस्तु, त्याच्या वापरातील अवजारे, हत्यारे, त्यांचे कपडे इ चा सग्रह आहे. भूवैज्ञानिक विभागात विविध खनिजाचा सग्रह आहे प्राणीविभागात निरनिराळे पशुपक्षी पेढा भरून ठेवले आहेत. विविध वस्तूचे प्रचड सग्रह असलेले हे म्युझियम मनावर चांगलाच ठसा उमटवून जाते

## इंग्रजांच्या कर्तबगारीचे प्रतीक–व्हिक्टोरिया मेमोरियल

म्युझियमनतर आम्ही भेट दिली व्हिक्टोरिया मेमोरियलला. इ स १९०१ मध्ये ब्रिटनची महाराणी व्हिक्टोरिया मरण पावली त्यावेळचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी तिचे भव्य प्रमाणावर स्मारक उभारण्याचे ठरविले. त्यातून साकार झाले व्हिक्टोरिया मेमोरियल। ताजमहालला आव्हान देणारी ही महान वास्तु राजस्थानमधील पाढरा सगमरवरी दगड आणून व घडवून उभारण्यात आली. लडनमधील सेट पॉलच्या धर्तीवर उभारलेल्या या वास्तुला एक कोटी रुपये खर्च आला या स्मारकाचा शिलान्यास १९०६ मध्ये पचमजॉर्जने केला १९२१ मध्ये सर्व काम पूर्ण झाले. इग्रजी एच या अक्षराच्या आकाराचे हे स्मारक ३३८ फूट लाब व २२८ फूट रुद आहे घुमटावर सोळा फूट उचीचा तीन टन वजनाचा विजयदेवतेचा पुतळा आहे घुमटाच्या चार बाजूला कला, स्थापत्य, न्यायशीलता, दानशीलता याचे प्रतीक असलेल्या मूर्ती आहेत या मूर्ती इटालीमध्ये बनवल्या स्मारकाची जमिनीपासूनची उची १८४ फूट आहे प्रशस्त हिरवळीवरील ६१ एकराच्या भूमीतील हे स्मारक ग्रीक व इटालीयन धर्तीचे आहे त्यात पाश्चात्य व पौर्वात्य वास्तुशिल्पाचा सगम झाला आहे. यात २५ दालने असून ३५०० च्या वर दर्शनीय वस्तूचा सग्रह आहे

उत्तरेकडील प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर दिसतो लॉर्ड कर्झन यांचा ब्राँझचा भव्य पुतळा। प्रवेशकक्षात पचमजॉर्ज, राणी मेरी, सप्तम जॉर्ज, राणी एलिझाबेथ, लॉर्ड माऊटबॅटन इ राजघराण्यातील स्त्रीपुरुषाचे पुतळे आहेत. व्हिक्टोरिया मेमोरियलचे लाकडी मॉडेल स्मारकाची कल्पना देते.

रॉयल गॅलरीत व्हिक्टोरिया राणीच्या जीवनातील निवडक प्रसग कला-पूर्ण शैलीने चित्रीत केले आहेत राणी बालपणी अभ्यासासाठी वापरत असलेली टेबल-खुर्ची जशी तेथे आहेत तसेच ती ज्यावर प्रथम शिकली तो रोझवुडचा पियानोही तेथे आहे. या गॅलरीतील रशियन चित्रकाराचे २३'×१६' चे विशाल तैलचित्र भारतात सर्वात मोठे समजले जाते. या चित्रात प्रिन्स ऑफ वेल्स जयपूर महाराजांबरोबर जयपूर नगरात हत्तीवर

बसून प्रवेश करीत आहे असा भव्य देखावा आहे व्हिक्टोरियाराणीने १४ डिसेंबर १९०० ला पाठवलेले शेवटचे पत्रही दर्शनीय आहे तसेच लेडी कर्झनचा अगरखाही जतन करुन ठेवला आहे

पोर्ट्रेट गॅलरीमध्ये सती जाणाऱ्या हिंदू स्त्रीचे चित्र आहे. द्वारकानाथ टागोर (रविंद्रनाथाचे आजोबा) याचीही चित्रे आहेत. लॉर्ड वेलस्ली, हेस्टिंग्ज, डलहौसी यांचे पुतळेही आहेत टिपू सुलतानची पर्शियन भाषेत लिहिलेली डायरी आहे अकबराचा इतिहास लेखक अबुलफझलने लिहिलेली ऐने अकबरी, गुरुमुख भाषेतील सचित्र भगवद्गीता, दारासिकोहने केलेला उपनिषदाचा अनुवाद तेथे जतन करुन ठेवला आहे राणीकक्षामध्ये घुमटाच्याखाली व्हिक्टोरिया राणीचा राजसिंहासनावर बसलेला भव्य पुतळा आहे. भिंतीवर विविध भाषेत तिने भारतीयांना दिलेले संदेश कोरला आहे. प्रिन्स हॉलमध्ये दगडी, ब्रॉंझचे पुतळे आहेत.

दरबार हॉल सर्वांत सुंदर आहे मोगल व राजपुत शैलीची सुंदर चित्रे, वॉरन हेस्टिंग्जचे रिव्हॉल्वर, हैदर व टिपूच्या तलवारी अशा कितीतरी वस्तू लक्ष वेधून घतात एका दालनात इतिहासप्रसिध्द प्लासीच्या (१७५७) लढाईचे मॉडेल आहे हेस्टिंग्जहॉलमध्ये टिपूच्या मुलांना बळजबरीने पकडल्याचे व टिपूच्या मृत्यूचे अशी दोन चित्रे हृदयस्पर्शी आहेत टिपूची मुले लॉर्ड कॉर्नवॉलीसला ओलीस म्हणून स्वाधीन केल्याचे चित्र पाहून करूणा वाटते श्रीरंगपट्टणचे १८०० सालातील मॉडेलही तेथे आहे

राष्ट्रीय नेत्याच्या चित्राच्या गॅलरीत भारतीय महापुरुषाच्या तैलचित्राचा संग्रह आहे राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, लो टिळक, रविंद्रनाथ टागोर, म. गांधी, स्वामी विवेकानंद, सुभाषचंद्र बोस, पं नेहरू इ नेत्याच्या ५' × ४' च्या सुंदर तैलचित्राचा त्यात समावेश आहे कालिदासाच्या शाकुंतलाचा इंग्रजी अनुवाद येथे दिसतो. १८५७ चा स्वातंत्र्यवीर तात्या टोपे याचा अंगरखा व केसही तेथे आहेत दस्तऐवज दालनात जुन्या महत्वाच्या सनदी, संधीपत्रे इ. आहेत. त्यातील टिपूच्या विरुद्धचे इंग्रज, मराठे, निजाम यांचे १७९० मधील संधीपत्र महत्वपूर्ण आहे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धासंबंधीची महत्वाची कागदपत्रही आहेत

कलकत्त्याच्या व्हिक्टोरिया मेमोरियलच्या भेटीत ब्रिटीश राजवटीचा हिंदुस्थानवर ठसा उमटवणाऱ्या अनेक इंग्रजांच्या कार्यांचा परिचय झाला.

हुगळी नदीच्या तीराला लागूनच कलकत्त्याचा प्रसिद्ध विल्यमचा किल्ला आहे लॉर्ड क्लाईव्हने निवडलेल्या जागी हा किल्ला १७७३ मध्ये बांधण्यात आला या अष्टकोनी किल्ल्याच्या तीन बाजू हुगळी नदीच्या बाजूला आहेत. किल्ल्याचे आवार दोन चौरस मैल आहे. पूर्वी तेथे घनदाट जगल होते. किल्ल्याच्या आवारात चर्च, पोहोण्यासाठी तलाव, फूटबॉलग्राऊंड, परेड ग्राऊंड, इ आहे दारुगोळयाच्या सामुग्रीसह एकेकाळी या किल्ल्यात दहा हजार नागरिक राहू शकत होते

किल्ल्यानतर पोहोचलो बिर्ला प्लॅनिटोरियम जवळ । भारतात ग्रहतारे नक्षत्रमडळ स्थापण्याचा पहिला मान कलकत्त्याला मिळाला व्हिक्टोरिया मेमोरियल नजीकच स्तूपासारख्या दिसणाऱ्या घुमटधारी एकमजली इमारतीत हे प्लॅनिटोरियम आहे बावीस लाख रुपये खर्चून हे प्लॅनिटोरियम उभारले गेले इमारतीचा घुमट ८२ फूट व्यासाचा असून आतमधील वातानुकूलीत हॉलमध्ये एकावेळी पाचशे प्रेक्षक बसू शकतात प्रोजेक्टरसारखी विविध उपकरणे पूर्व जर्मनीकडून खरेदी करण्यात आली आहेत

तिकिट काढून आत प्रवेश केला प्रथम अधार केला जातो आकाशातील विविध तारे, नक्षत्रे याची शास्त्रीय, सोप्या भाषेतील ध्वनिमुद्रीत माहिती प्रोजेक्टरच्या सहाय्याने घुमटाच्या छतावर डोळ्यासमोर प्रत्यक्ष साकार केली जाते असे वाटते की विशाल आकाशाचे आपण अगदी जवळून अवलोकन करीत आहोत असख्य तारे आपल्यासमोर चकाकतात त्या तारकांच्या समूहाची, नक्षत्राची माहिती सोप्या भाषेत दिली जाते अर्ध्या तासाच्या या कार्यक्रमावर उल्का-उदय बेहद्द खूष होते शास्त्रीय प्रायोगिक यथार्थ दर्शन तेथे होते हिंदी व इग्रजी भाषेतून कॉमेंट्री केली जाते. नक्षत्र-शास्त्रसबधीत नकाशे, पुस्तके याची लायब्ररीपण तेथे आहे

यानतर पाहिलेले बिर्ला इडस्ट्रियल अॅण्ड टेक्नॉलॉजिकल म्युझियम हे एक अभिनव म्युझियम आहे येथे शास्त्रीय, तान्त्रिक ज्ञानावर चालणाऱ्या विविध उपकरणांची कार्यपद्धती प्रत्यक्ष अवलोकन करता येते उदा टेलि-

फोनचे कामकाज एक्स्चेंजतर्फे कसे होते याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन होते. टी व्ही ची कार्यपद्धती दर्शविणारे दालन आकर्षक होते टी व्ही वर म्हटलेले गाणे आम्ही लगेच प्रत्यक्ष पाहिले वीजेवर चालणारी विविध उपकरणे तेथील बटणे दाबल्यावर त्याची कार्यपद्धती दाखवीत होती उल्का-उदय तर बटणे दाबून ती ती कार्यपद्धती पहाण्यात अगदी दंग होऊन गेले हे म्युझियम विद्यार्थ्यांच्याच काय पण सर्वसामान्य माणसाच्याही ज्ञानात भर घालते. रोजच्या व्यवहारात आपण नित्य विविध यन्त्रे, उपकरणे पहातो पण त्याची कार्यपद्धती आपल्याला या म्युझियममध्ये कळते

कलकत्त्याचे नवीन आकर्षण म्हणजे जवाहरलाल नेहरू शिशुभवन ! तळमजल्यावर प्रदर्शन हॉल असून पहिल्या मजल्यावर बाहुल्यांची गॅलरी आहे तेथील देशविदेशच्या बाहुल्या मन आकर्षून घेतात. जपानी बाहुल्या विलोभनीय आहेत. स्पेनची निरागस भावमुद्रा असलेली निद्रिस्त बाहुली लक्ष वेधून घेते खरच, बालकांच्या बाहुल्यांचे हे विश्व मनोहारी आहे.

दुसऱ्या मजल्यावरील एका दालनात मुलांची विविध खेळणी आकर्षकरीत्या मांडून ठेवली आहेत दुसऱ्या दालनात महाभारतातील निवडक ६१ प्रसंग बाहुल्यांनी साकार केले आहेत. गणेशोत्सवाच्यावेळी आपण करतो तशी दृश्ये बाहुल्यांच्या सहाय्याने साकार केली आहेत. उल्का-उदयला तर काय पाहू अन् काय नको असे होऊन गेले. देखाव्यावरून तो तो प्रसंग ते ओळखत देखाव्यांच्या बाजूला इंग्रजी व हिंदी भाषेतून त्या त्या प्रसंगांची थोडक्यात कथा लिहिली आहे खरच, लहान मुलांना आगळाच आनंद हे म्युझियम प्राप्त करून देते कलकत्त्याला भेट देणाऱ्यांनी ते पहाण्यास [illegible]

## सर्वधर्मसहिष्णुतेचे प्रतीक-बेलूरमठ

कलकत्त्यातील तिसऱ्या दिवसाची सुरुवात 'बेलूरमठाच्या' भेटीने झाली कलकत्त्यापासून सहा मैल अंतरावर उत्तरेला असलेल्या या बेलूर मठाला भेट देण्यासाठी हावरा स्टेशनहून बसने निघालो

बेलूर येथे रामकृष्ण मठाची स्थापना १८९८ मध्ये रामकृष्ण परमहंसाचे महान शिष्य स्वामी विवेकानंद यांनी केली त्यांच्या मूळ कल्पनेनुसार

रामकृष्णाच्या प्रथम जन्मशताब्दीनिमित्ताने १९३५ मध्ये या नवीन मंदिराची पायाभरणी झाली दोन अमेरिकन भक्तानी मंदिराच्या उभारणीसाठी आर्थिक मदतीचा वर्षाव केला या मंदिराला नऊ लाखावर खर्च झाला

पवित्र गंगा नदीच्या तीरावर हे गुलाबसर रंगाचे दगडी मंदिर रामकृष्ण मिशन आश्रमाच्या आवारात आपल्या आगळ्या शिल्पाने उठून दिसते. चुनारखाणीतील गुलाबसर दगडाने ते बांधले आहे एका बाजूने ते पाहिले तर चर्चचा भास होतो दुसऱ्या बाजूने पाहिल्यावर मशिदीचा तर तिसऱ्या बाजूने मंदिराचा भास होतो बेलूर मठ म्हणजे जणू सर्वधर्मसहिष्णुतेचे, विश्वबंधुत्वाचे प्रतीक आहे मंदिरात रामकृष्ण परमहंसाची संगमरवरी मूर्ती आहे मूर्तीच्या चेहऱ्यावर सात्विकता आहे

भारतात व भारताबाहेर रामकृष्णमिशनच्या ११८ शाखा शिक्षणप्रसार, अनाथालय, वाचनालय चालविणे याप्रकारची सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्ये करतात. दुष्काळ, चक्रीवादळ, महापूर, साथी, दंगली यात झळ पोहोचलेल्याना त्या मदतीचा हात पुढे करतात स्वामी विवेकानंदानी घालून दिलेल्या तत्त्वांच्या आधारे समाजसुधारणेचे महान कार्य त्या करतात

आत्मा हा ईश्वराचा अंश असून ईश्वर निर्गुण, निराकार, सर्वशक्तिमान आणि सर्वव्यापी आहे अशी रामकृष्णांची प्रणाली आहे "तन्नो हंस प्रचोदयात" हे रामकृष्ण मठ व मिशनचे बोधवाक्य आहे ते स्वत स्वामी विवेकानंदानी बनविले लाटा उसळणारे पाणी, उमललेले कमलपुष्प, उगवता सूर्य हंस व गोलाकार कृष्णसर्प असे दृश्य बोधवाक्याच्यावर आहे त्यातून धर्म, ज्ञान भक्ति व योगसाधन इ ईश्वरसाक्षात्काराचे विविधमार्ग असून ज्याने त्याने आपल्या स्वभावधर्मानुसार त्यातील कोणताही आचरावा असे सूचित केले आहे

या मठाच्या आवारात नवीन मंदिर होण्यापूर्वी स्वामीजी जेथे ध्यानस्थ बसत ते जुने मंदिरही आहे स्वामीजी जेथे राहिले व ४ जुलै १९०२ ला समाधिस्थ झाले ती खोली पण पाहिली ते वापरीत असलेल्या वस्तू तेथे जतन करून ठेवल्या आहेत स्वामी ब्रह्मानंदाच्या मंदिरात त्यांची संगमरवरी मूर्ती आहे श्री परमहंसांचे त्यांच्यावर अपार प्रेम होते. ते बेलूर मठाचे

पहिले अध्यक्ष होते १९२२ मध्ये ते वारल्यानतर दोन वर्षांनी हे मदिर बाधले माता शारदादेवी (रामकृष्णाची धर्मपत्नी) याच्या दहनभूमीवरही १९२० मध्ये एक मदिर बाधले आहे स्वामी विवेकानदानी स्वत निवड-लेल्या व जेथे त्यांचे क्रियाकर्म झाले त्या जागेवरही त्याचे मदिर बांधले आहे अलौकिक गुरू व त्याहूनही अलौकिक शिष्य याच्या कर्मभूमीला भेट दिल्याने मन भारावून गेले होते

## भव्य दक्षिणेश्वर मदिर

बेलूरमठाची भेट आटोपून आम्ही दक्षिणेश्वर मदिर पहाण्यासाठी बसने निघालो हुगळी नदीवरील सात कमानींचा प्रचड विवेकानद पूल ओलांडून आम्ही उजव्या तीरावर आलो

राणी रासमणी ही बगालमधील एका जमीनदाराची विधवा पत्नी ! ती बालपणापासूनच अत्यत धार्मिक वृत्तीची होती रामायण-महाभारताचा पगडा बालपणीच तिच्या मनावर बसला होता राजचद्र या जमीनदाराशी तिचा विवाह झाला. तीन मुली व ६८ लाखाची इस्टेट मागे ठेवून राजचद्र मरण पावले धार्मिक वृत्तीच्या धनाढ्य राणी रासमणीला स्वप्नामध्ये अन्न-पूर्णा देवीचे दर्शन झाले. देवीने इच्छा प्रदर्शित केली की गगानदीच्या काठी शिवमदिराची स्थापना तिने करावी त्याप्रमाणे तिने हुगळी नदीच्या उजव्या तीरावर साठ बिघे जमीन साठ हजार रुपयाला घेतली १८४७ मध्ये मदि-राच्या बाधकामास सुरुवात झाली आठ वर्षांनी ते पूर्ण झाले त्यासाठी नऊ लाख रुपये खर्च आला तिने मदिराच्या उद्घाटनाच्या दिवशी अनेक विद्वान पडितांना आमत्रण दिले होते. मदिर ब्राह्मणेतर व्यक्तिने बांधले म्हणून पुजारी मिळेना पण ती अडचण रामकृष्ण परमहसांनी दूर केली त्यादिवशी गोरगरीबांना राणी रासमणीने दानधर्म केला रासमणीने या मंदिरात [illegible] आयुष्याच्या काळातील बराचसा वेळ व्यतीत केला रामकृष्ण परमहस तिला उपदेश करीत

मदिराच्या आवारात प्रवेश केल्यावर प्रथम विष्णूमदिर लागते शेजारी मुख्यमदिरात कालीमातेची काळी मूर्ती आहे ही देवी 'दक्षिणेश्वरी भवतारिणी' या नावाने ओळखली जाते काली म्हणजे शिवाची पत्नी !

दुष्कृत्याचा संहार करणारी ! कालीमातेला चार हात असून डाव्या हातात तलवार व राक्षसाचे मस्तक आहे उजवा हात आशीर्वाद देत आहे तिच्या गळ्याभोवती बत्तीस माणसांच्या मुंडक्याची माळ आहे देवीला भरजरी साडीने, फुलांनी सजवलेले होते १००० चांदीच्या पाकळ्या असलेल्या सुंदर कमलपुष्पात महाकालाची–शिवाची संगमरवरी दगडाची मूर्ती आहे ही मूर्ती आडवी आहे व कालीमातेचा उजवा पाय त्याच्या छातीजवळ आहे. याबद्दल पौराणिक कथा आहे

पुराणकाळात शुंब व निशुंब हे राक्षसांचे सेनापती व देवाचा सेनापती यांचे युद्ध झाले त्यात देवाचा पराभव झाला तेव्हा देवाच्या विनंतीनुसार कालीमातेने राक्षसावर हल्ला करून त्यांचा पराभव केला शुंब व निशुंब यांचा शिरच्छेद झाला त्यावेळी कालीदेवतेने इतके रौद्र रुप धारण केले होते की जो कुणी समोर येईल त्याचा ती शिरच्छेद करू लागली. परत देवाची सभा भगवान विष्णूच्या उपस्थितीत भरली. त्यांनी ठरविले की महाकालाला–शिवाला–पाठवावयाचे शिव लोळत लोळत युद्धस्थानी आला एकेक्षणी कालीदेवीचा पाय शिवाच्या छातीवर पडला पण शिवदर्शनामुळे ती लज्जित झाली मंदिरातील कालीमातेच्या चेहेऱ्यावर सलज्जता व मधूर हास्य आहे.

या मंदिराला नऊ घुमट आहेत मंदिराचे आगळे शिल्प मोहित करते. मंदिरासमोर गायनमंडप असून उत्तरेच्या कोपऱ्यात रामकृष्ण परमहंसाची निवासाची खोली आहे रामकृष्ण येथे राहिले व येथेच मरण पावले स्वामी विवेकानंद यांचाही या मंदिराशी संबध असल्याने हे मंदिर वंगबंधूच्या अत्यादराचे प्रतीक आहे कालीमातेचे दर्शन घेण्यासाठी भाविक वंग बंधु–भगिनींची उडालेली गर्दी पाहून त्याची प्रचीती आली

कालीमंदिरासमोर नदीच्या तीरावर सारख्या आकाराची बारा शिव-मंदिरे आहेत यज्ञेश्वर, जलेश्वर, जगदीश्वर, नादेश्वर, नंदीश्वर, नरेश्वर, ही सहा मंदिरे संपल्यावर हुगळी नदीत स्नानासाठी उतरण्याचा घाट आहे तेथून सात कमानींचा पूल दिसत होता नंतर योगेश्वर, रत्नेश्वर, जटिलेश्वर नकुलेश्वर, नागेश्वर, निर्झरेश्वर ही सहा मंदिरे आहेत ही बारा शिवमंदिरे

बांधण्यामागे कल्पना अशी की योगेश्वर हा खरा शिव व बाकीचे अकरा त्याचे रक्षण करणारे ! दक्षिणेश्वर मंदिर पाहून बाहेर आलो कालीमातेला पुन: एकदा मनोमन प्रणाम केला.

## दोन प्रख्यात जैनमंदिरे

बसने पार्श्वनाथ व आदिनाथ ही जैन मंदिरे पहाण्यास निघालो पार्श्वनाथ जैन मंदिराचे प्रवेशद्वार सांचीसारखे आहे या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी मंदिरात पार्श्वनाथाची संगमरवरी मूर्ती आहे शेठ दयाचंद या धनाढ्य व्यापाऱ्याने व्हिक्टोरिया मेमोरियल बनविणाऱ्या ब्राऊन या इंजिनिअरला चार हजार रु देऊन या मंदिराला नवीन स्वरूप देऊन घेतले पांढरा संगमरवरी दगड राजस्थानातील मकराना येथून आणला. तांबडा दगड मिर्झापूर येथून आणला कुशल राजस्थानी कारागीरांनी हे मंदिर उभारले मंदिराचा दरवाजा पितळी असून मंदिरासमोर सुंदर तलाव आहे

आदिनाथ जैन मंदिर हे राय बद्रीदास बहादूर यांनी १८६७ मध्ये सुंदर बगीच्यात वसवले. दहावा जैन तीर्थंकर श्रीशीतलनाथजी यांचे हे मंदिर आहे तेरा संगमरवरी चकाकणाऱ्या पायऱ्या चढल्यावर भव्य आरसे, रंगी-बेरंगी कांचा यांनी सजवलेल्या, निमुळते शिखर असलेल्या मंदिरात प्रवेश केला आत आनंदस्वामी व गौतमस्वामी यांच्या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी मूर्ती आहेत. पायाजवळ चांदीचे कमळ आहे तर गळ्यात सोन्याची माळ ! कपाळ हिरेजडित आहे मंदिराचे आवार अत्यंत स्वच्छ असून सुंदर पुतळे, कारंजी, वर्तुळाकार वाटिकांनी ते सजले आहे ही मंदिरे पाहून मन प्रसन्न झाले.

## संगमरवराच्या जगतात–मार्बल पॅलेस

मार्बल पॅलेस आपल्याला एका वेगळ्याच जगतात घेऊन जातो राजा राजेंद्र मलिकबहादुर यांनी हा पॅलेस बांधला व त्यात विविध संगमरवरी वस्तूंचा संग्रह करण्यास सुरुवात केली राजा राजेंद्र हे हुगळीच्या पूर्व किनाऱ्यावरील कलकत्त्याच्या तीन मूळच्या खेड्यांपैकी गोविंदपूर येथील मूळचे रहिवासी ! या हिंदू राजाला मोगलराजाने मलीकबहादूर हा किताब दिला त्या श्रीमंत, दानशूर घराण्याचा हा खाजगी संग्रह आहे

प्रशस्त आवारातील हिरवळीत अनेक ब्रॉंझचे व संगमरवरी पुतळे दिसत होते या राजवाड्यात एकूण सात दालने आहेत जगातील सुमारे नव्वद देशविदेशांच्या रंगीबेरंगी संगमरवरांच्या, काचेच्या अनेक मौल्यवान वस्तु तेथे आहेत भिंती, फ्लोअरिंग सर्व संगमरवराने सजवलेले आहे व्हिक्टोरिया राणीचा, कोलंबसाचा संगमरवरी पुतळा, चायनीज धूपदान, दीडशे वर्षांपूर्वीचा पियानो, जुने सोन्याचे घड्याळ इ वस्तु सुंदर आहेत बेल्जियमचे भव्य आरसे आहेत. नृत्यगृहात झोके घेणारी व्हीनस ही अखंड लाकडात कोरलेली एक अतिसुंदर कलाकृती आहे आतील व्हराड्यात परदेशातील अनेक रंगीबेरंगी पक्षी पिंजऱ्यात ठेवलेले आहेत त्यातील अमेरिकन व आफ्रिकन रंगीत पक्षी डौलदार होते

एका दालनात उत्कृष्ट पेंटिंग्जचा संग्रह आहे राजा रविवर्मा यांचे दुष्यंत शकुंतला हे मूळचे पेंटिंग येथे आहे सेंट कॅथरीनचा विवाह हे रुबेन या चित्रकाराचे अत्युत्कृष्ट चित्र आहे या चित्राला १९०५ मध्ये पंधराहजार पौंड एवढ्या किंमतीची मागणी आली होती अर्थात ती नाकारली गेली. आज सत्तर वर्षांनंतरही चित्रातील टवटवीतपणा बिलकूल कमी झालेला नाही सापाबरोबर खेळणारा लहानगा हर्क्युलस हेही एक उत्कृष्ट चित्र आहे एका दालनात राजा राजेंद्रच्या परिवारातील व्यक्तींचे सुन्दर पुतळे आहेत.

संगमरवरी महालातून बाहेर पडलो तेव्हा एका वेगळ्याच विश्वात वावरल्याचा भास झाला अशाप्रकारचे हे भारतातील एकमेव संग्रहालय असावे हा भव्य प्रासाद निर्माण केलेल्या मलीकबहादूरच्या घराण्याच्या दानशूरपणाची प्रचीती राजप्रासादाबाहेर पडताना आली आजही तेथे या घराण्याचे विद्यमान वंशज गोरगरीबाना दररोज जेवण देतात गरीबाची बरीच मोठी रांग तेथे दिसली

डलहौसी स्क्वेअरच्या उत्तरेला गजबजलेल्या अरुंद चितपुर रोडवर नखोडा मशीद दिसली ही मशीद म्हणजे हिंदी व सिरीयन शिल्पकलेचा नमुना आहे कच्छी मेमन या श्रीमंत जमातीने ही भव्य मशीद पन्नास वर्षांपूर्वी पंधरा लाख रु खर्चून बांधली ही मशीद 'बडा मसजिद' या

नावानेच प्रामुख्याने ओळखली जाते आग्न्याच्या 'सिकदरा' या अकबराच्या कबरीच्या धर्तीवर ही मशीद बांधली असून तीत एकावेळी १०,००० लोक प्रार्थना करू शकतील इतके मोठे प्रार्थनागृह आहे मध्ये भव्य घुमट असून कडेला दीडशे फूट उंचीचे दोन भव्य मिनार आहेत तसेच २१ छोट्या छोट्या घुमटाची रांग दिसते आतमध्ये एक विशाल हौद असून सर्वत्र चकचकीत संगमरवरी फरसबंदी आहे. वर दोन्ही बाजूला जायला जिने असून मशीदीचे स्तंभ, कमानी आकर्षक आहेत प्रवेशद्वाराची तांबड्या दगडाची कमानही सुन्दर आहे

कलकत्याची भेट रविंद्रनाथ टागोरांच्या घराला भेट दिल्याशिवाय पूर्ण होणार नव्हती चित्तूर रोडवरील इ स १७८४ त बांधलेली ही वास्तु रविंद्रनाथाचे वडील महर्षि देवेंद्रनाथ टागोर यांच्या नावाने 'महर्षि भवन' या नावाने ओळखली जाते, रविंद्रनाथ येथेच जन्मले येथेच त्यानी अजरामर कविता केल्या व येथेच इ स १९४१ मध्ये ते मरण पावले. त्यांचे अर्धे आयुष्य येथेच व्यतीत झाले १९१३ मध्ये साहित्याचे नोबेल पारितोषिक त्याना मिळाले हा मान कृष्णवर्णीय लोकांना त्याच्यामुळेच प्रथम मिळाला लडनचे सुप्रसिद्ध कवी येटस् यांनी गीतांजलीचा इंग्रजी अनुवाद त्याच वर्षी प्रसिद्ध केला आणि मग सर्व विश्वात रविंद्रनाथांचे नाव प्रसिद्ध झाले 'ठाकुरबाडी म्हणूनही ओळखले जाणारे हे त्यांचे कलकत्त्यातील निवासस्थान म्हणजे १९ व्या शतकातील बंगालच्या काव्य, संगीत, नाट्य, कला, तत्वज्ञान इ सांस्कृतिक जीवनाचे प्रतीक होय या निवासस्थानाजवळ नुकतीच सात लाख रुपये खर्च करुन तांबड्या दगडाने इमारत बांधली आहे 'रविंद्रभारती' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ह्या राष्ट्रीय स्मारकात नृत्य, नाट्य, कला संगीतविषयक दालने आहेत गुरुदेवांच्या वास्तुच्या भेटीने कलकत्त्यातील तिसरा दिवस संपला होता

कलकत्त्याच्या भेटीचा चौथा शेवटचा दिवस! सकाळी बसने हावरा स्टेशनहून बोटॅनिकल गार्डनकडे निघालो.

## विशाल वटवृक्षाच्या छायेत

कलकत्त्यापासून चार किलोमीटर अंतरावरील हा प्रख्यात बगीचा

सिबपूर येथे आहे या बगीच्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीने १९० वर्षापूर्वी केली दोनशे सत्तर एकराच्या विशाल भूमीवर हा बगीचा हुगळी नदीला लागून पश्चिम तीरावर पसरला आहे भारतात आढळणारे विविध वृक्ष, वेली या बगीच्यात आहेत वृक्षवेलींच्या औषधी व व्यावहारीक उपयोगासाठी, शास्त्रीय संशोधनाच्या दूरदृष्टीने या बगीच्याची सुरुवात केली आहे

या बगीच्याच्या कार्यालयाच्या जागी पूर्वी विटाचा जुना किल्ला होता त्यासंबंधी एक मजेदार हकीगत ऐकायला मिळाली नागपूरचा मराठा सेनापती रघूजी भोसले याचा मुलगा जानोजी भोसले याने हा किल्ला काबीज केला होता. मराठ्याच्या त्यावेळच्या चपळ चढाईचा धसका घेऊन इंग्रजानी अधिक सुरक्षिततेच्या दृष्टीने हुगळीच्या पूर्वतीरावर वसाहत केली व 'मराठा डिच' नावाने ओळखला जाणारा खंदक बांधला

तऱ्हेतऱ्हेचे हजारो वृक्ष असलेल्या या बोटॅनिकल गार्डनमधील फेरफटका मोठा आनंददायी अनुभव होता सकाळची वेळ होती गर्दीही फारशी नव्हती फिरत फिरत आम्ही या बगीच्यातील सर्वांचे आकर्षणाचे ठिकाण असलेल्या सुप्रसिद्ध वटवृक्षाजवळ ( Great Banıyan Tree ) आलो. आशिया खंडातील हा सर्वात मोठा वटवृक्ष आहे. या वृक्षाचे आजचे वय २०७ वर्षे आहे असे सांगतात की फार वर्षापूर्वी हा वृक्ष अगदी झुडुपाप्रमाणे होता तेव्हा कोणी एक साधुपुरुष तेथे ध्यानस्थ बसला होता या प्रचंड वटवृक्षाचा घेर १३६७ फूट असून सर्वात उंच शाखा ८८ फूट आहे या वट-वृक्षाला एकंदर पारब्या ११२५ आहेत पूर्वी या झाडाला वाळवी लागली होती तेव्हा झाडाच्या मूळ खोडाचा नाश झाला परंतु खोड परत उगवले मूळ खोड साडेपाच फूट व्यासाचे असून ५१ फूट उंच आहे या वटवृक्षाला अजीरासारखी फळे येतात हे झाड जणू एखादा स्वतंत्र लहान जंगला सारखेच वाटते इतका त्याचा प्रचंड विस्तार आहे वाळवी आणि चक्रीवादळ यांच्या तडाख्यातून वाचलेला हा वटवृक्ष कलकत्त्याची शान आहे प्रवासाला निघण्यापूर्वी कलकत्त्याला तेराशे फूट घेराचा वटवृक्ष आहे सांगितल्यावर विश्वास बसला नव्हता पण प्रत्यक्ष पाहून चकित झालो ! या विशाल

वटवृक्षाच्या छायेत थोडावेळ विसावा घेतला गर्दीपासून दूर असलेल्या या ठिकाणी शांत, सुखद, शीतल वायुलहरीचा आस्वाद घेऊन बोटॅनिकल गार्डनची भेट आटोपली परत हावरा स्टेशनवर बसने आलो दुसऱ्या बसने कलकत्त्याचे प्रसिद्ध प्राणिसंग्रहालय–झू–पहाण्यासाठी दक्षिण कलकत्त्यातील बेलवेडर रोडवर आलो

## शानदार प्राणिसंग्रहालय

शंभर वर्षांपूर्वी प्रिन्स ऑफ वेल्सने कलकत्त्याच्या अलीपूर भागातील या प्राणिसंग्रहालयाचे उद्‌घाटन केले. ४५ एकर इतक्या विस्तृत क्षेत्रात पसरलेल्या बगीच्यात हे अशियातील सर्वात मोठे प्राणिसंग्रहालय आहे तेथे विविध पशु, पक्षी, वन्यप्राणी इ आहेत. विविध प्रकारच्या सापांचे 'सर्पालय' (The Reptile House) एका स्वतंत्र इमारतीत आहे. तेथे विविध प्रकारचे अजगर, सर्प, नाग इ आढळले. तसेच त्या इमारतीतील दोन छोटचा हौदात मगरी आढळल्या


या झूमधील आकर्षणाचे ठिकाण म्हणजे बंगालमध्ये आढळणारे जातिवंत व रेवा प्रांतात आढळणारे वैशिष्टचपूर्ण पांढरे वाघ! त्यांना पहायला वेगळी फी द्यावी लागते वाघ व सिंह यांच्या मिश्रणाने जन्माला आलेले लायगर (Liger) व टिगॉन (Tigon) पाहून चकित झालो! अजस्त्र गेंडे, पाणहत्ती इ. आढळले विविध पक्षी, हरणे इ जनावरे नैसर्गिक अवस्थेत ठेवली आहेत सुंदर फुले, दाट वृक्ष, निसर्गरम्य तळी, गर्द हिरवळ यांच्या परिसरातील प्राणी संग्रहालयाचा हा फेरफटका मुलांना अतिशय आनंददायी वाटला

झूची भेट आटोपून बाहेर पडल्यावर नजीकच कलकत्त्याची सुप्रसिद्ध नॅशनल लायब्ररी दिसली

## नॅशनल लायब्ररी–एके काळचे राजसत्तेचे निवासस्थान

ही इमारत म्हणजे पूर्वी वॉरन हेस्टींग्जचे निवासस्थान होते इ स १८५४ ते १९१२ पर्यंत तेथे बंगालचे इंग्रज गव्हर्नर रहात.


कलकत्त्याच्या मूळच्या पब्लिक लायब्ररीची सुरुवात १८३५ मध्ये झाली नंतर लॉर्ड कर्झनने पब्लिक लायब्ररी व इम्पेरिअल लायब्ररी यांचे एकत्रीकरण



महाबोधी मदिर
बुद्धगया


मदिर, राजगीर
[राजगृह]





विश्वविद्यालयाचे भग्नावशेष, नालंदा

बेलूर मठ, कलकत्ता



करून मोठी लायब्ररी १९०३ मध्ये स्थापन केली स्वातंत्र्यानंतर या लायब्ररीचे १९४८ मध्ये नॅशनल लायब्ररीत रूपांतर केले गेले तत्कालीन शिक्षणमंत्री अबुल कलम आझाद यांनी १९५३ मध्ये नॅशनल लायब्ररी या इमारतीत आणली

आकर्षक प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर खास इटालियन पद्धतीच्या शिल्पकृतीचे डिझाईन वापरून बांधलेली ही भव्य लांबच्या लांब इमारत दिसली इमारतीच्या मध्यभागी लांबच्या लांब पायऱ्या दिसल्या तळाशी लहान मुलांसाठी खास Children Library आहे मुलांना मराठी विभागातील पुस्तके दाखवून तेथील छोट्या खुर्च्यांवर बसवून वर मोठ्या लायब्ररीत आलो १९६१ मध्ये या लायब्ररीतील पुस्तकांची संख्या दहा लाखांवर होती दररोज किमान २०० नवीन पुस्तके येतात तर वृत्तपत्रे व मासिके ८००० ! यातील पुस्तकांच्या रॅक्सची लांबी १५ मैल भरेल ! ही भारतातील सर्वांत मोठी लायब्ररी आहे प्रवेशद्वाराजवळच प्रत्येक भाषेतील लेखकांच्या नावांच्या कार्डांचे ड्रॉवर्स आहेत तसेच प्रत्येक भाषेतील पुस्तकांच्या नावावरून बनवलेल्या कार्डांचेही ड्रॉवर्स आहेत. सहा महिन्यापूर्वी आम्ही 'शालीमारची साद ' हे पुस्तक तेथे पाठविले होते कारण कायद्याप्रमाणे प्रत्येक नवीन पुस्तक तेथे पाठवावे लागते कुतूहल म्हणून पुस्तकाच्या कार्डाचा शोध घेतला पण ते न सापडल्याने चौकशी करता कळले की मराठी असिस्टंट लायब्ररीयनची जागा भरलेली नाही त्यामुळे सध्या ते काम पहाणाऱ्या मिसेस गोबी यांच्याकडे चौकशीसाठी आम्हाला पाठविले त्यांची भाषा दुसरी असल्याने मराठी पुस्तके नोंदवण्याचे त्यांचे काम अगदी हळू हळू चालले होते. पाच मिनिटे उभे राहूनही आमची दखल घेतली गेली नाही तेव्हा मी बांगड्यांचा आवाज केला पण तरी उपयोग झाला नाही ह्यांच्याकडे पाहिल्यावर ह्यांनी हळूच खुणेने बाईंचे कर्णयंत्र दाखवले शेवटी मुद्दाम खोकला आणावा लागला तेव्हा कुठे बाईंनी चष्म्यातून कटाक्ष टाकून विचारले की काय काम आहे ? आमच्या पुस्तकाची चौकशी केल्यावर त्यांनी कित्येक न नोंदविल्या गेलेल्या पुस्तकांच्या ढिगाऱ्याकडे अंगुलीनिर्देश केला. त्या पुस्तकांच्या ढिगाऱ्यात 'शालीमारची साद' दिसल्यावर आनंद झाला.

गोबी बाईंना वाय बाय करण्यासाठी परत त्याच्या समोर आलो तर त्या पुन्हा ध्यानमग्न होऊन सावकाश नोंदी घेत होत्या. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी परत बांगड्या वाजवाव्या लागल्या व खोकावेही लागले

नॅशनल लायब्ररीचा रीडींग हॉल भव्य व प्रेक्षणीय आहे पूर्वीचा हा प्रशस्त दिवाणखाना ! लांबच्या लांब असलेल्या या हॉलमध्ये मधोमध लांबलचक टेबल असून दोन्ही बाजूला खुर्च्यांची रांग आहे विविध भाषिक विद्यार्थी तेथे वाचन करीत होते या हॉलच्या दोन्ही बाजूला विविध भाषेतील थोर संताच्या वाङ्मयाचे वेगवेगळे विभाग होते संत ज्ञानेश्वराचे नाव मराठी विभागाला पाहून अभिमान वाटला एकेकाळी राजसत्तेचे निवासस्थान असलेली ही इमारत ग्रंथांचे निवासस्थान बनली आहे हा एक अभिमानास्पद बदल होय ! मुख्य लायब्ररी पाहून खाली बाल वाचनालयात आलो उल्काने प्रवासातील १५ दिवसाची मराठी वाचनाची तहान राणी लक्ष्मीबाईच्या मराठी चरित्राच्या पुस्तक वाचनाने तर उदयने महाभारतातील गोष्टींच्या वाचनाने भागवली होती नॅशनल लायब्ररीच्या आवारात मूळ इमारत अपुरी पडते म्हणून शेजारी नऊ मजली नवे रीडींग रूम बांधले आहे तिकडे चक्कर मारून नॅशनल लायब्ररीची भेट आटोपली

कलकत्याच्या दक्षिण टोकाला असलेल्या रविंद्र सरोवराचा परिसर मोठा रमणीय आहे सरोवराच्या काठावरील डोलणाऱ्या उच्च उंच वृक्षाची छाया तळ्यात जणू नाचत होती ! अनेक जण नौका नयनाचा आनंद लुटत होते सरोवराच्या पूर्वेला रामकृष्ण मिशनचे सांस्कृतिक केंद्र आहे अडीच एकराच्या भूमीत ७७ लक्ष रुपये खर्चून हे केंद्र उभारले आहे या तीन मजली इमारतीचे शिल्पकाम आकर्षक आहे

रविंद्र सरोवराची भेट आटोपून कलकत्याच्या आद्य देवतेच्या कालीमातेच्या मंदिराला भेट देण्यासाठी कालीघाटला आलो कालीदेवीचे मूळचे मंदिर सध्याच्या मंदिरापासून मैलभर अंतरावर आदिगंगेच्या काठी होते. त्यावेळी गंगेचे पात्र विशाल होते

सध्याचे मंदिर संतोषराय चौधरी या जमिनदाराने इ. स. १८०९ मध्ये बांधले. सत्तर चौरस फूट मापाच्या या मंदिराची उंची नव्वद फूट आहे

छोटया छोटया विटात बांधलेल्या या मंदिराला दोन कनोषी असलेले वैशिष्टयपूर्ण छत आहे मंदिराभोवती उच प्रदक्षिणा मार्ग आहे. काली-देवीची काळया रगाची चतुर्भुज मूर्ती आहे देवीची जीभ पुढे आलेली असून उघडी आहे तिच्या गळ्याभोवती माणसांच्या मुडक्याची माळ आहे. पाया-जवळ शिवाची मूर्ती आहे देवीच्या ५१ शक्तिपीठापैकी हे एक पीठ आहे. त्या मागील पौराणिक कथा अशी आहे दक्षप्रजापतीने यज्ञाला आपला जावई शिव यास न बोलवल्याने झालेल्या अपमानाप्रीत्यर्थ सतीने यज्ञात उडी घेतली ! शिवाला ही वार्ता समजताच सतीचे मृत शरीर खांद्यावर घेऊन विलाप करीत तो पृथ्वीवर नाचू लागला सतीदेवी म्हणजे शक्तीदेवी सर्व भारतात तिचा सचार व्हावा म्हणून भगवान विष्णूनी तिच्या मृत शरीरावर चक्र फेकले त्याबरोबर तिच्या शरीराचे ५१ भाग होऊन ते सर्व भारतात विखुरले गेले. ज्या स्थानी शरीराचा भाग पडला तेथे शक्तीपीठ तयार झाले अशी ही एकूण ५१ शक्तीपीठे तयार झाली सतीच्या उजव्या पायाचा अगठा येथे पडला होता.

मदिराच्या दक्षिणेला बकऱ्याचा बळी देण्यासाठी जागा आहे. तेथे रोज बळी दिला जातो ईस्ट इडिया कपनीच्या काळात देखील काही इग्रज भक्ती-भावनेने या मदिराला देणगी देत दुर्गापूजेला तर काली मातेचा खूपच थाट असतो तिला फुलानी उची वस्त्रानी खूप सजविण्यात येते दुर्गापूजा महोत्सवाची धामधूम औरच असते

कालीमातेची भेट आटोपून परत चौरंगी रोड कडे आलो विविध वस्तूनी खचून भरलेल्या न्यू मार्केटमध्ये चक्कर मारली या मार्केटमध्ये हरतऱ्हेच्या वस्तू शोकेसमध्ये आकर्षकरीत्या माडून ठेवलेल्या दिसत होत्या. दर मात्र उच्चभ्रू लोकांना परवडण्यासारखे वाटले. त्यामुळे खरेदीचा नाद सोडला व नुसती चक्कर मारली

कलकत्याची चार दिवसाची भेट सपत आली होती कलकत्ता ही महानगरी आहे याची साक्ष पटली होती. ८० लाख इथली लोकवस्ती ! माणसांचा प्रवाह रस्त्यावरून मुग्यासारखा वहातच असतो बसेस, मिनी-बसेस, टॅक्सी रस्त्यावरून अखडपणे धावतच असतात इतर ठिकाणी

सायकलरिक्षा चालवणारी माणसे पाहिली होती पण कलकत्त्यात तर हातरिक्षा होत्या घोड्याप्रमाणे माणसाने स्वत'ला जुपायचे व माणसासकट रिक्षा ओढायची वीतभर पोटासाठी मरेपर्यंत घाम गाळणे, अखड कष्ट करणे हेच त्यांच्या नशिबी असते ट्रॅमचे तर सर्व शहरभर जाळेच विणले आहे. टण् टण् आवाज करीत या ट्रॅम सापासारख्या सरपटतच असतात या ट्रॅम कलकत्त्याच्या जुन्या स्मृती जागृत करतात. कलकत्त्यात सर्वात स्वस्त दर ट्रॅमचा, नतर बस, नतर मिनी बस व नंतर टॅक्सीचा असे दर वाढत जातात. जुने कलकत्ता बकाल, दरिद्री वाटते तर नवे कलकत्ता आकाशात उच झेप घेते.

कलकत्ता हॅंडलूम साडीची खरेदी केली. तसेच परत एकदा रसगुल्ले, चमचम, राजभोग व रसमलाई इ बगाली मिठाईवर मुलांबरोबर ताव मारला टॅक्सी ठरवून ड्रायव्हरला हावरा स्टेशनवरील लॉजकडे निघायला सांगितले. बगालीमिश्रित हिंदी भाषेत तो म्हणाला, "तुम्ही आठ दिवसा-पूर्वी दुर्गापूजेला यायला हवे होते आणि कलकत्त्याची शान पहायला हवी होती" बोलता बोलता सायकाळच्या धूसर वेळी टॅक्सी हावरा ब्रिजवरून धावू लागली हुगळी नदीत दूरवर गलबते दिसत होती ब्रिजवर असख्य वाहनांची वेगाने ये जा चालू होती लॉजवर पोहोचलो तेव्हा सायकाळचे सहा वाजून गेले होते.

जेवण आटोपून हावरा स्टेशनवर आलो. तेथील प्रचड धामधूम पाहून प्रचड चक्रात बसल्यावर भोवळ यावी तशी अवस्था झाली रात्री ठीक आठ वाजता या महानगरीचा निरोप घेऊन जगन्नाथ एक्स्प्रेसने भुवनेश्वरच्या दिशेने निघालो कलकत्त्याची चार दिवसांची भेट म्हणजे जणू मतरलेले दिवस ! हृदयपटलावर तिचा कायमचा ठसा उमटला आहे

□

# मंदिरांच्या नगरीत-भुवनेश्वर

पहाटेचे पाच वाजले तेव्हा जगन्नाथ एक्स्प्रेस भुवनेश्वर स्टेशनच्या आवारात शिरली

भुवनेश्वर ही ओरिसाची राजधानी. ओरिसा म्हणजे प्राचीन काळचा कलिंगदेश। ह्याच्या उत्तरेकडील भागाला ओड्रदेश नाव होते. त्यावरून ओडिशा-ओरिसा असे नाव झाले. रेल्वेलाईनमुळे भुवनेश्वर शहराचे दोन भाग पडले आहेत जुनी मंदिरे असलेला भाग भुवनेश्वर टाऊन या नावाने ओळखला जातो तर नव्या राजधानीचा भाग भुवनेश्वर कॅपिटल या नावाने। स्टेशनजवळील नव्या भुवनेश्वरमधील पहिल्याच चौकातील राजमहाल लॉजमध्ये जागा मिळाली. स्नान वगैरे आटोपून भुवनेश्वर भ्रमणाला निघालो.

रेल्वेलाईन ओलांडून जुन्या गावात यायला निघालो तेव्हा रस्तोरस्ती वैशिष्ट्यपूर्ण दगडी मंदिरे दिसू लागली भुवनेश्वरची सातव्या ते तेराव्या शतकापर्यंत बांधली गेलेली ही मंदिरे प्रगत कलिंग शैलीची प्रचीती आणून देतात.

भुवनेश्वरचे सर्वांत मोठे व प्रख्यात मंदिर म्हणजे लिंगराज मंदिर। या मंदिराकडे निघालो तेव्हा प्रथम बिंदुसागर हा सुंदर प्राचीन तलाव दृष्टीला पडला भारतातील ठिकाठिकाणच्या तीर्थांचे पवित्र पाणी या तलावात सोडले आहे असा समज असल्याने यातील पाणी अत्यंत पवित्र मानतात प्रत्यक्ष

देव प्रतीवर्षी येथे स्नानाला येतात असा समज आहे या तलावाच्या बाजूने दगडी भराव केला असून तलाव स्वच्छ आहे. त्याची लांबी १३०० फूट व रुंदी ७०० फूट आहे तलावाच्यामध्ये एक दगडी मदिर आहे या तलावाच्या परिसरात सातव्या ते तेराव्या शतकात बांधली गेलेली ७००० मदिरे होती. आज शभर मदिरे अस्तित्त्वात आहेत यामुळेच भुवनेश्वर भारताचे मदिराचे शहर (Cathedral City of India) म्हणून प्रसिद्ध आहे

बिंदुसागर या पवित्र सरोवराचे दर्शन घेऊन विख्यात लिंगराजमदिराच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचलो लिंगराजमदिर हे भुवनेश्वरचे सर्वात विशाल मदिर ! स्थापत्यकलेचा परमोत्कर्ष ! या मदिराचे आवार साडेचार एकर आहे आवाराची भित ५२० फूट लाब व ४६५ फूट रुद असून मदिराच्या प्रवेशद्वाराभोवती दोन सिंह कोरले आहेत हे मदिर शिव व विष्णु या दोन्हींचे स्थान आहे म्हणून प्रवेशद्वाराच्या स्तभावर विष्णूचे वाहन गरुड व शिवाचे नदी दोन्ही कोरले आहेत मदिरात बेल व तुळशी दोन्ही वहातात या मंदिराची गर्भगृह सभामडप [illegible] अशी चार दालने आहेत

ययातीकेसरी, अनतकेसरी व ललितेंदुकेसरी यानी हे मदिर सातव्या शतकात बांधले. नतर कमलकेसरीने नवव्या शतकात भोगमडपाची व शालिनीकेसरीने अकराव्या शतकात नृत्यगृहाची भर घातली या मदिराची उभारणी दगडावर दगड रचून झाली आहे जुळणीसाठी चुना न वापरता लोखडी पट्टया अथवा गज वापरण्यात आले. काही ठिकाणी ते दृष्टीस पडतात

[illegible] कोपऱ्यावर आठ आसनस्थ दिक्पाल कोरले आहेत. भितीच्या खालच्या भागात व्याल व गजसिंह कोरले आहेत तर वरच्या भागात दिसतात सौंदर्यशाली अप्सराच्या मनोहारी मूर्ती ! कुठे ती पाया-तील काटा काढण्यात मग्न दिसते तर कुठे ती झाडाची फादी धरून प्रतीक्षा करीत उभी असलेली दिसते एकेठिकाणी ती आवडत्या पक्षाला कुरवाळताना दिसते तर दुसऱ्या ठिकाणी ती पायातील पैंजण काढताना दिसते. कुठे ती आरशातील प्रतिमेकडे टक लावून स्वत चे सौंदर्य न्याहाळण्यात गुग दिसते

तर कुठे कपाळावर कुंकुमतिलक लावताना दिसते. प्रियकराला पत्र लिहिण्यात गुग झालेली सुंदरीही येथे दिसते. अशा कितीतरी सुंदर मूर्ती पहाताना देहभान हरपते. एके ठिकाणी निशा-पार्वतीची कमळावर उभी असलेली सुंदर मूर्ती दिसते तिचे दागिने, मुकुट, कपड्याचे डिझाईन अप्रतिमपणे कोरले आहेत

• मंदिराच्या गर्भगृहात आठ फूट व्यासाचे व नऊ फूट इंचीचे प्रचंड स्वयंभू शिवलिंग आहे हे शिवलिंग भूमीतून निर्माण झाले म्हणून भुवनेश्वर हे नाव रूढ झाले. गाभाऱ्याची रचना पंचरथ पद्धतीची आहे

लिंगराज मंदिराची भव्यता आहे त्याच्या उंच शिखरामध्ये। मंदिराची कळसापर्यंची उंची १५० फूट इतकी आहे। शिखरावर भांड्याच्या आकाराचा कळस आहे मंदिरावर पायदळ, घोडदळ, मिरवणुकीचे हत्ती इ. विविध देखावे निरनिराळ्या पंक्तीत कोरले आहेत गणेश, पार्वती, कार्तिकेय यांच्या आकर्षक प्रतिमा बाहेरच्या कोनाड्यात आहेत, मंदिराच्या आत मात्र नक्षीकाम नाही.

लिंगराज मंदिराच्या आवारात लहानमोठी शंभर मंदिरे आहेत त्यातील पार्वती मंदिर उल्लेखनीय आहे जणू लिंगराज मंदिराची छोटी प्रतिकृतीच। मंदिराचा गाभारा व सभामंडपाच्या भिंती उत्कृष्ट शिल्पकृतीने सजल्या आहेत त्यातील नाग-नागिणीच्या मूर्ती उल्लेखनीय आहेत. मंदिरात पार्वतीची काळी मूर्ती आहे बाहेर नंदीची अखंड दगडातील भव्य मूर्ती आहे.

प्रामुख्याने शैवमंदिरे असलेल्या भुवनेश्वरच्या परिसरात अनंत वासुदेव मंदिर हे एकमेव विष्णु मंदिर आहे. बिंदुसरोवराच्या पूर्वकाठावर ते वसले आहे १२७८ मध्ये बांधलेल्या या मंदिराला नक्षीदार चबुतरा आहे मुख्य मंदिरापुढे चार उपमंदिरांची कळसदार व नक्षीकाम असलेली दालने सरळ-रेषेत आहेत त्याची उंची मुख्य मंदिराकडे वाढत जाते. मुख्य मंदिराची उंची साठ फूट आहे आत कृष्ण-बलराम-सुभद्रा यांच्या मूर्ती आहेत मंडपाच्या भिंतीवर खाली दिक्पालांच्या व वर त्यांच्या सहचरिणींच्या मूर्ती आहेत. स्तंभावरील नागनागिणीच्या मूर्ती वेधक आहेत.

आम्ही मंदिरात गेलो तेव्हा मोठमोठ्या माठांमध्ये भात शिजवून त्याचा नैवेद्य देवाला अर्पण करण्याची तयारी चाललेली दिसली हा विधी भोग-मंडपात करत होते अनंत वासुदेव मंदिर पाहून नजीकच असलेल्या वेताळ मंदिराकडे निघालो

वेताळ मंदिर आहे छोटेखानी ! पण त्याचे नाजूक शिल्पसौंदर्य अद्वितीय आहे मंदिराची उंची फक्त ३८ फूट आहे. त्याचा अर्धगोलाकार आकार लक्ष वेधून घेतो. नाजूक शिल्पसौंदर्यांनी सजलेले स्तंभ आकर्षक आहेत मागील बाजूला चतुर्भुज अर्धनारी नटेश्वराची मूर्ती आहे या मंदिरावरील अप्रतिम मूर्ती आहेत आपले वस्त्र ठाकठीक करणारी, फुले घेऊन जाणारी, फांदीला धरून उभी राहिलेली व आरशात बघून कुंकुमतिलक लावणारी या चार नायिकांच्या ! मनातले भाव त्यांच्या चेहऱ्यावर तंतोतंत उमटले आहेत

अष्टभुजा असलेली महिषासुरमर्दिनीची मूर्तीही उल्लेखनीय आहे तिच्या हातात साप, डमरु, ढाल बाण इ आहे चतुर्भुज पार्वतीच्या हातात पाण्याचे भांडे, कमलपुष्पे इ आहेत शिकारीचे दृश्यही कोरले आहे एकाठिकाणी कोरलेली सूर्यदेवतेची मूर्ती अतिशय सुंदर आहे त्याच्या बाजूला बाण मारणाऱ्या उषा व निशा आहेत तर समोर सात अश्वांचा रथ चालविणारा अरूण आहे या मूर्तीच्या वर दशभुजा असलेल्या नटराजाची मूर्ती आहे

लिंगराज, अनंतवासुदेव व वेताळ ही मंदिरे पाहून गौरीकुंडाजवळील मंदिरांचा समूह पहायला निघालो. प्रथम परशरामेश्वर मंदिराजवळ आलो

परशुरामेश्वर हे ओरिसातील प्रारंभिक-सातव्या शतकातील छोटेसे पण नक्षीदार व सुस्थितीतील मंदिर आहे प्रवेशद्वारावर अष्टग्रह कोरलेले आहेत. सभामंडप आयताकार आगगाडीच्या डब्यासारखा असून वर कलते छप्पर आहे. उजेडासाठी चार नक्षीदार गवाक्ष आहेत. ठिकठिकाणी संगीतकार, नृत्यकार कोरले आहेत एके ठिकाणी कोरलेल्या शिकारीच्या दृश्यातील आवेश वाखाणण्यासारखा आहे. मंडपाच्या भिंतीवर कोरीव आकृत्या व नक्षी यांच्या पंक्ती आहे अग्नी, यम, वरूण, गंगा, यमुना, शिवपार्वती, महिषासुरमर्दिनी, अर्धनारीश्वर इ देवदेवता कोरलेल्या आहेत मंदिराच्या गाभाऱ्याच्या भिंतीवर मध्यभागी सुंदर नक्षीदार कोनाडे आहेत मंदिराचा

कळस कमी उचीचा आहे भित व कळस यामध्ये एका आड एक प्रणयी युग्मांच्या आकृत्या व वेलबुट्टीदार आकृत्या आहेत सिंहासनावर बसलेली चतुर्भुज गणेशाची मूर्ती आकर्षक आहे त्याची सोंड डाव्या हातातील लाडूने भरलेल्या वाटीला स्पर्श करते. आसनस्थ कार्तिकेयाच्या पायाजवळील मयूर सर्पाला मारीत आहे असेही दृश्य कोरले आहे हे मदिर पाहून नजिकच्या मुक्तेश्वर मदिराकडे आलो

## पत्थरातील मधुर स्वप्न ! मुक्तेश्वर मदिर

आकाराने लहान पण नाजूक शिल्पकृतीने ओतप्रोत भरलेले मुक्तेश्वर मदिर ओरिसातील स्थापत्य कलेचा मुकुटमणी आहे दहाव्या शतकात बांधलेल्या या मंदिरात प्रवेश करण्यासाठी वैशिष्टचपूर्ण नक्षीदार तोरण आहे मदिराची उची फक्त ३५ फूट आहे

मदिराच्या चौकटीवर केतू हा नववा ग्रह समाविष्ट करून सपूर्ण नवग्रह कोरलेले आहेत भितीवर लढाईवर निघालेली हत्तीवर स्वार झालेली योद्धा स्त्री आढळते तसेच वीणाधारी, खांबाला धरून प्रतीक्षा करीत उभी असलेली स्त्री विलोभनीय वाटते नागनागिणीच्या युग्मांच्या एकमेकांना कवटाळणाऱ्या मूर्ती स्तभावर कोरल्या आहेत त्यावरील खवले चपखलपणे कोरले आहेत दात विचकून हसणाऱ्या कुब्जच्या मूर्ती वैशिष्टचपूर्ण आहेत त्याचप्रमाणे हत्ती, सिंह आकर्षकपणे कोरले आहेत. कुक्कुटासह कार्तिकेय व मूषकासह गणेश कोरला आहे मडपातील जाळीदार गवाक्षाचे नक्षीकाम अप्रतिम आहे तसेच लतावेलीची वेलबुट्टी आकर्षक आहे एका नक्षीच्या पट्टीवर माकडाची चित्रे कोरलेली आहेत एकमेकाला मदत करणारी, सुसरीवर बसलेली, डोक्यातील उवा काढणारी माकडे पाहून शिल्पकाराच्या विनोद बुद्धीची प्रचीती आली.

या मदिराच्या अतर्भागातही कलाकुसर आढळते हे एक वैशिष्टच आहे मडपाच्या छतावर विविध आकृत्याचे सुदर कोरीव नक्षीकाम आहे नृत्याच्या आविर्भावातील गणेश, कार्तिकेय, नर्तक, नर्तिका, गायकही कोरले आहेत वर अत्युच्च ठिकाणी कमळ कोरलेले आहे कळसाला पाच मजले असून इच न् इच कलाकुसरीने व्याप्त आहे. हे मदिर अतर्बाह्यच केवळ नक्षीकामाने

सजले नाही तर त्याची आवाराची भित सुद्धा नक्षीकामाने सजली आहे। मदिराशेजारी कुड आहे खरोखर मुक्तेश्वर मदिर प्रगत कलीग शैलीचा अप्रतिम नमूना होय।

मुक्तेश्वर मदिराच्या समोरील रस्ता ओलाडून गेल्यावर एकाच आवारात गौरी मंदिर, सिद्धेश्वर व केदारेश्वर ही मदिरे आहेत.

गौरी मदिर गुलाबसर रगाच्या दगडाने बांधले आहे स्तभावर नागनागिणीच्या मूर्ता आहेत तर भितावर माहक नायिका आहेत पक्षी बसलेल्या खांबावर रेललेली, पायातील पैजण काढणारी इ नायिकेची विविध रूपे आपल्या नाजूक, लोभस भावमुद्रेने सौंदर्यशाली वाटतात सिद्धेश्वर हे मदिर ओरिसाच्या प्रारभिक शैलीचे आहे मदिराला पचरथ गाभारा आहे. मदिरावर उल्लेखनीय नक्षीकाम नाही कळसाभोवती छोटया मिनाराची पक्ती आहे झडप घालण्याच्या तयारीत मागील पायावर उभे असलेले चार सिह कोरलेले आहेत. गणेशाची गुलाबी रगाची मूर्ती आहे कार्तिकेयाचीही मूर्ता आहे केदारेश्वर मंदिराच्या मडपावरील शिल्पकृती उल्लेखनीय आहे. भितीवर प्रणयी युगुले आढळतात चतुर्भुज कार्तिकेय व गणेशाच्याही मूर्ती आहेत. या मदिराच्या आवारातच केदारगौरी हे जिवत झऱ्याचे पाणी असलेले कुंड आहे तेथील पाणी अत्यत पवित्र व पाचक समजले जाते त्यामुळे तेथे निपुत्रिक स्त्रिया जशा पुत्रप्राप्तीसाठी स्नान करतात तसेच पोटदुखीच्या विकाराने आजारी असलेले लोक हा विकार बरा होण्यास त्यातील पाणी प्राशन करतात, तेथे आम्हाला एक बगाली गृहस्थ भेटला. तो महिनाभर कुडाजवळील लॉजमध्ये रहात होता कारण त्याला पोटदुखीचा विकार होता व या पाण्याने पोटदुखी कमी झाल्याचे त्याने सागितले

यानतर मोठा हमरस्ता ओलांडून मदिरांच्या नगरीतील मदिरांचा शेवटचा समूह पहाण्यासाठी निघालो त्यात पहायची होती भास्करेश्वर, ब्रह्मेश्वर, मेघेश्वर व राजाराणी ही मदिरे।

भास्करेश्वर मदिर हे ओरिसातील जुने मदिर। नऊ फूट उचीचे प्रचड शिवलिंग हे येथील वैशिष्टय! हे शिवलिंग थोडेसे ओबडधोबड आहे पूर्वी येथे बौद्ध स्तूप असावा असा अदाज आहे लिगाची पूजा करण्याच्या सोयी-

साठी वरच्या बाजूला पोटमाळा असून तेथे जाता येते तेथून लिंगाचा वरचा भाग दिसतो

ब्रह्मेश्वर हे मंदिर अकराव्या शतकात बांधले मंदिराच्या खालच्या भागात दिक्पाल, अर्धनारीनटेश्वर, कालभैरव याच्या मूर्ती आहेत. तर वरच्या भागात प्रणयी युग्मे, विषयासक्त नायिका आहेत प्रवेशद्वारावर नवग्रह असून हरणाच्याही रांगा आहेत. मुख्य कळसाभोवती छोटे नक्षीदार कळस आहेत मंडपाच्या शिल्पकृती उल्लेखनीय आहेत त्यात नृत्य, गायन करणाऱ्याच्या पक्ती, पशुपक्षी आढळतात या मंदिराचा अंतर्भागही कलाकुसरीने नटलेला आहे हे एक वैशिष्टच आहे त्यात सैनिकाची मिरवणूक, गुरुपदेश इ मूर्ती छतावर आढळतात सर्वात वर कमळ व नाग कोरले आहेत मंदिरावर कोरलेल्या नृत्य करणाऱ्या सुंदरीचा डौल काय वर्णावा ? ढोलकं, झांजा, बासरी इ वाद्ये वाजवणाऱ्या कमनीय देहांच्या कामिनीची भावमुद्रा अप्रतिम आहे

मेघेश्वर हे मंदिर बाराव्या शतकात बांधले असून त्याची उंची ५१ फूट आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला स्तंभावर गोलाकार छत असून नागनागिणी व नवग्रह कोरले आहेत, तसेच चतुर्भुज कार्तिकेयही मयुरासह आहे मंदिरात त्रिमुखी शिव, गणेश, हनुमान कोरले असून जेव्हा पाऊस पडत नाही तेव्हा येथे अभिषेक केला की पाऊस पडतो असा विश्वास आहे मंदिराच्या एका बाजूचा मोठा कोनाडा रिकामा दिसला चौकशी करता कळले की तेथील पार्वतीची सुंदर मूर्ती कुणीतरी काढून नेली. विक्रीच्या उद्देशाने ही चोरी करण्यात आली हे कळल्यावर भारतीय लोकही भारतीय शिल्पकलेची कशी हानी करीत होते हे कळले पण आता भारतीय पुराण वस्तुसंशोधन खात्याने शिल्पकला असलेल्या पुरातन वास्तु ताब्यात घेतल्या असून त्या खात्याचा सेवकवर्ग अहोरात्र त्यांच्यावर लक्ष ठेवतो मंदिरे स्वच्छ ठेवणे, मंदिराभोवती बगीचा करून तो जतन करणे इ अनेक उल्लेखनीय कामे ते करतात

० हिरव्यागार भातशेतीत असलेले, अकराव्या शतकात बांधलेले राजाराणी मंदिर त्याच्या वैशिष्टचपूर्ण ५९ फूट उंचीच्या शिखरामुळे व मंदिरावरील

शिल्पकृतीमुळे अत्याकर्षक आहे शिखराभोवती अनेक छोटे छोटे मनोरे-कळस आहेत नक्षीदार गोल बसक्या भाड्याच्या आकाराचे शिखर आहे मदिराच्या प्रवेशद्वारी कलायुक्त दोन गोलाकार स्तभ शोभिवत आहेत त्यावर अलिगनबद्ध नागाकृती वैशिष्ट्यपूर्ण कोरल्या आहेत मदिराला पूर्वेकडून चक्कर मारताना प्रथम दिसतो हत्तीवर स्वार इद्र नतर दाढीधारी अग्नी, दडाधारी यम, मगरीवर स्वार वरूण, कुबेर, वायू इ च्या मूर्ती दिसतात मदिराच्या भितीवरील मोहक अप्सरा, शृगारमग्न प्रणयी युग्मे आकर्षक आहेत एके ठिकाणी मुलाला लडिवाळपणे कुरवाळणारी नारी दिसते त्या शिल्पकृतीतून जणू वात्सल्य ओतप्रोत ओसडून चालले आहे ! दुसरी एक अनोखी शिल्पकृती म्हणजे वाद्य वाजविण्यात गुग असलेली सुदरी ! तिची लयबद्धता वाखाणण्यासारखी आहे आवडत्या पक्षाशी हितगुज करणाऱ्या नारीची भावमुद्रा मोहक आहे आणखी एका सुदरीच्या चेहेऱ्यावर मधुर हास्य आहे त्या हास्याची तुलना मोनालिसा या प्रसिद्ध कलाकृतीशी होऊ शकेल खरोखर राजाराणी मदिर म्हणजे नारीसौंदर्याचा खजानाच तेथील शिल्पकृतीत बोलके डोळे, हसरी मुद्रा, प्रमाणबद्ध अवयव पातळ लवचिक सिहकटी, बाकदार शरीर याचे समिश्रण झाले आहे हे मदिर म्हणजे जणू पत्थरातील काव्यच !

भुवनेश्वरच्या मुख्य मदिरांचा फेरफटका पूर्ण झाला होता शरीर थकले होते पण शिल्पसौदर्याने नेत्र सुखावले होते लिगराज मदिर सोडले तर बाकीच्या मदिरात फारशी वर्दळ नव्हती. इथे पैसे टाका तिथे टाका अशी भुणभुण लावणारे पुजारीही नव्हते निसर्गसुदर शात वातावरणात ही मदिरे शेकडो वर्षे उभी आहेत ऊन, पाऊस, वादळ, वारा याचा मारा सहन करीत ही मदिरे उभी आहेत प्रगत कालग स्थापत्य कलेची साक्ष देत ! त्यांचे शिल्पसौदर्य यत्किंचितही कमी झाले नाही ही मदिरे अशा जगतात घेऊन जातात की जेथे नाजूक सौदर्यशाली अप्सरा आपल्या विविध भाव मुद्रानी मोहवून टाकतात आपल्या अलौकिक सौदर्याने दर्शकाना आजही आनदित करणाऱ्या या मदिराच्या अज्ञात शिल्पकाराच्या दैवी कारागिरीपुढे मन वारवार लवून मुजरा करते !

भुवनेश्वरचा दुसरा दिवस आम्ही घालवला तेथील आजूबाजूचा परिसर पहाण्यात । रिक्षाने प्रथम उदयगिरी, खडगिरी या जुळ्या टेकड्यांकडे कूच केले नव्या भुवनेश्वर राजधानीपासून पश्चिमेला सहा किलोमीटर अंतरावरील हिरव्यागार टेकड्यांच्या पायथ्याशी पोहोचलो चेदी राजाच्या आश्रयामुळे पूर्वी ते जैन धर्मीयाचे केंद्र होते. जैन मुनीच्या निवासासाठी येथे लेण्या कोरून घेतल्या

उदयगिरी टेकडी सुमारे १८० फूट उंच असून निरनिराळ्या उंचीवर लेण्या कोरल्या आहेत स्वर्गपुरी, अलकापुरी जयविजय गुफा, सर्पगुफा इ तेरा गुफा आहेत हत्ती गुफा ही इ स पूर्व दुसऱ्या शतकात कोरली आहे तेथील कोरलेला भारदस्त हत्ती लक्ष वेधून घेतो या लेण्यांमध्ये कलिंगचा प्रसिद्ध राजा खरवेलाकालीन शिलालेख आहे त्यात त्याने आपल्या तेरा वर्षाच्या कारकीर्दीत केलेल्या सामाजिक, धार्मिक, लष्करी कार्याचा उल्लेख केला आहे 'रानी गुफा' ही दुमजली गुफा खरवेला राजाने राणीच्या वास्तव्यासाठी बांधली सर्वात वर गणेश गुफा आहे त्यावर छत असून पुढे अंगण आहे तेथील स्तंभावर स्त्रियाच्या आकृत्या, हत्ती इ कोरले आहे

समोरच असलेली खंडगिरी टेकडी १३० फूट उंच आहे कलिंग राजा खरवेला काळातच येथील गुफा कोरल्या आहेत नवमुनी गुफेत १७ मूर्ती कोरल्या आहेत महावीर गुफा, ज्ञान गुफा ही तेथे आहेत टेकडीवर सर्वात वर तांबड्या रंगाचे दिगंबर जैन मंदिर आहे २३ वा तीर्थंकर पारसनाथ याची नग्न उभी मूर्ती आहे महावीराच्याही उभ्या मूर्ती आहेत मंदिराचा चबुतरा संगमरवरी आहे टेकडीवरून आजूबाजूचे हिरवेगार मखमलीसारखे दृश्य मनोहरी वाटत होते विविधभाषीय व प्रांतीय लोक परमेश्वराच्या दारी भेदभाव विसरून टेकडी चढत होते व उतरत होते धर्म जरी अलग असला तर परमेश्वराचे वास्तव्य सर्वत्र असते असे वाटत होते जैन साधू-मुनीच्या वास्तव्याने पुनित झालेल्या भूमीचा निरोप घेऊन परतीचा प्रवास सुरू केला.

नंतर रिक्षाने नंदनकनानकडे निघालो नंदनकनान म्हणजे आनंदोद्यान (Pleasure Garden) भुवनेश्वरच्या उत्तरेला नंदनकनान बारा कि मी.

अंतरावर आहे त्याचे दोन भाग आहेत एक नैसर्गिक प्राणीसंग्रहालय (Sanctuary) व दुसरे बोटॅनिकल गार्डन मध्ये सुंदर तळे आहे शंभर एकर क्षेत्र असलेल्या या क्षेत्रात हजारावर वन्य पशुपक्षी, सर्प, हरीण इ नैसर्गिकरित्या आढळतात निसर्ग सुंदर वातावरणामुळे रमणीयता आगळी भासत होती. सुंदर तळ्यामुळे शोभेत भरच पडली होती तळ्याचा विस्तार १३४ एकर आहे तळ्यात बोटींगची सोय आहे नंदनकनान पाहिल्यावर भुवनेश्वर राजधानीला आलो दुपारचे भोजन आटोपून प्रख्यात धौली टेकडीकडे निघालो भुवनेश्वरच्या दक्षिणेला आठ कि मी अंतरावर दया नदी ओलांडून तेथे पोहोचलो मगध देशाचा प्रसिद्ध मौर्यवंशीय राजा अशोकाच्या काळातील कलिंगवरील स्वारीच्या वेळी झालेले युद्ध या टेकडीच्या परिसरातच झाले इ स पूर्व तिसऱ्या शतकातील हकीकत सम्राट अशोकाने सामर्थ्याने कलिंग देश जिंकला खरा पण लाखो लोकांची त्यात आहुती पडली ! रक्ताचे पाट वाहिले ! अनेक कुटुंबे दुःखाने होरपळून निघाली ! सम्राट अशोकाने हे सर्व पाहिले व त्याला अतोनात दुःख झाले त्याच्या आयुष्याला क्रांतीकारी वळण देणारे हे युद्ध झाले त्याने दिग्विजयाची आकांक्षा सोडून दिली तो धर्म विजयाकडे आकृष्ट झाला शांतीचा संदेश देणाऱ्या गौतम बुद्धाचा तो सच्चा अनुयायी बनला व शांतीच्या प्रसारार्थ अशोकाने स्वतःला वाहून घेतले सम्राट अशोकाचे जेथे हृदयपरिवर्तन झाले ती ही धौली टेकडी ! तेथे एका प्रचंड शिलेवर हत्तीचा पुढील भाग कोरला आहे. या हत्तीचा भारदस्तपणा वाखाणण्यासारखा आहे ओरिसातील हे सर्वात जुने शिल्प त्या हत्तीच्या खाली शिलेवर अशोकाच्या अकरा आज्ञा कोरल्या आहेत भारतातील हा प्राचीन शिलालेख समजला जातो. अधिकाऱ्यांनी निःपक्षपातीपणे कारभार करावा इ सूचना त्यात दिल्या आहेत. त्यातील एका वचनाचा मथितार्थ असा आहे की– 'सर्व नागरीक माझे सुपुत्र आहेत'

धौली टेकडीवर नुकताच जपान बुद्ध संघाने विश्वशांती स्तूप भगवान बुद्धाच्या स्मरणार्थ बांधला जपानमधील विश्वविद्यालयीन विद्यार्थी बौद्ध भिक्षू यांनी या स्तूपाच्या बांधकामात श्रमदान केले. पांढराशुभ्र असा हा स्तूप अमरावती शिल्पाच्या धर्तीवर आहे. तेथे भगवान बुद्धाची मूर्ती आहे

उदयगिरी, खडगिरी, नदनकनान, धौली टेकडी इ ची भेट आटोपल्यावर भुवनेश्वरच्या नव्या राजधानीचे दर्शन घेण्यास निघालो त्याशिवाय भुवनेश्वरची भेट पूर्ण होणार नव्हती कटक येथे असलेली ओरिसाची राजधानी स्वातंत्र्यानतर सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा असलेल्या या मदिराच्या भूमीत आणली गेली. भुवनेश्वर राजधानीचा नवा भाग सुरुवातीला जगलाने व्यापलेला होता जंगले साफ केली गेली, नवे प्रशस्त रस्ते बांधले गेले, शासकीय कारभारासाठी नवे सेक्रेटरीएट बाधले गेले कृषी महाविद्यालय, उत्कल विद्यापीठ, रविंद्र मडप थिएटर, म्युझियम, मार्केट इ शिल्पे उल्लेखनीय आहेत. उत्तरेकडील पजाबची राजधानी चदीगड प्रमाणे ही राजधानी शांत व विरळ लोकवस्तीची आहे एकेकाळी जुन्या कलींग देशाच्या राजधानीचे शहर म्हणून गजबजलेले भुवनेश्वर आता नव्या राजधानीमुळे पुन्हा पूर्वीचे वैभव भोगू लागले आहे नवी सस्कृती जुन्या सांस्कृतिक वारशाजवळ नादू लागली आहे

भुवनेश्वरची दोन दिवसाची भेट पूर्ण झाली होती दुसऱ्या दिवशी सकाळी कोनार्कच्या सूर्य मदिराला भेट द्यायची होती रात्री निद्राधीन होताना भुवनेश्वरच्या विविध मदिरातील सौंदर्यशाली नायिकांच्या लोभस भावमुद्रा वारवार नजरेसमोर येत होत्या !

□

# कोनार्क : सूर्यदेवतेची अगाध लीला

सकाळी साडेआठला कोनार्कच्या दिशेने बस धावू लागली भुवनेश्वर ते कोनार्क ६५ कि मी अतराचा प्रवास कधी सपेल असे वाटत होते. कारण मन जगप्रसिद्ध शिल्पकृती पहाण्यास उत्सुक झाले होते भाताची हिरवीगार शेते, नारळाच्या झाडांच्या रांगांमागून रागा अशा निसर्गरम्य वातावरणातील प्रवास सपवून बस कोनार्कला थांबली दुपारचे बारा वाजले तेव्हा आम्ही वाळूचा रस्ता तुडवीत कोनार्कच्या मदिराच्या प्रचड आवारा-जवळ आलो

अर्क म्हणजे सूर्य. विशिष्ट कोनातून उगवणाऱ्या सूर्याचे ठिकाण म्हणजे कोनार्क ! अशा याठिकाणी असलेले विश्वविख्यात सूर्य मदिर पर्यटकांना आजही आकृष्ट करते या मदिरामागची पौराणिक कथा अशी आहे

श्रीकृष्णाचा साब हा देखणा पुत्र ! दुर्वास ऋषींच्या शापामुळे त्याला कुष्ठरोग झाला. त्यातून मुक्त होण्यासाठी श्रीकृष्णाने त्याला सूर्याची उपासना करण्यास सांगितले कोनार्क येथील चद्रभागा नदीच्या काठावरील जगलात त्याने बारा वर्षे तपश्चर्या केली सूर्यदेव सतुष्ट झाला त्याने त्याला वर मागायला सांगितले त्याने कुष्ठरोगातून मुक्ती मिळण्याची प्रार्थना केली त्याप्रमाणे रोगमुक्त होऊन त्याला तारुण्य प्राप्त झाले त्याने आणखीही वर मागितला की जेव्हा जेव्हा मी सूर्यदेवतेची उपासना करीन तेव्हा सूर्यदेवाने साक्षात् प्रगट होऊन दर्शन द्यावे यावर सूर्यदेव म्हणाले की

चन्द्रभागा नदीत त्याला सूर्यदेवतेची मूर्ती सापडेल ती मूर्ती काढून तिची स्थापना करून त्याने आराधना करावी त्याप्रमाणे साबाला मूर्ती सापडली शतदल पद्मावर उभी असलेली व हातात कमलपुष्प घेतलेली अशी ती सुंदर मूर्ती होती त्याने आनंदाने त्या मूर्तीची स्थापना मंदिरात केली.

त्यानंतर या कोनार्कक्षेत्री चंद्रभागेच्या तीरावर सूर्यमंदिराची उभारणी ओरिसाच्या पुरंदरकेसरी राजाने नवव्या शतकात केली त्यानंतरचे गंगावंशातील राजे तर सूर्यदेवाचे भोक्ते होते सूर्यदेवाची ते नित्य पूजा करीत गंगावंशीय राजांची सत्ता १३ व्या शतकात उत्कर्षाला पोहोचली होती. त्यावेळच्या नरसिंहदेव राजाला समुद्राचा खळखळाट व सूर्योदय नेहमीच मुग्ध करीत असे आज दिसणारे मंदिर त्यानेच मूर्त स्वरुपात आणले

(१) या महान मंदिराच्या उभारणीसाठी १२०० कारागीर बारा वर्षे खपत होते. राज्याचा बारा वर्षांच्या उत्पन्नाचा महत्वाचा भाग या मंदिराच्या कामासाठी खर्च होई एकूण खर्च त्याकाळी चाळीस कोटी रुपये झाला. विशु महाराणा हा या मंदिराचा प्रमुख शिल्पकार। आपल्या पत्नीला व नवजात मुलाला-धर्मपदाला गावी ठेवून येथे अनेक वर्षे खपत होता त्याच्या पत्नीने पतीच्या पश्चात आपल्या लहानग्या मुलाला शिल्पकलेचे शिक्षण दिले हा तरूण शिल्पकार जेव्हा या मंदिराजवळ पोहोचला तेव्हा मंदिराच्या कळसाचे काम अपूर्ण राहिले होते प्रमुख शिल्पकार विशु महाराणा याचा अंदाज चुकला होता कळस बसू शकत नव्हता मंदिराचे काम रेंगाळले होते. १२ वर्षांचा तरूण शिल्पकार धर्मपद वडिलांच्या सुटकेला आला त्याने कौशल्याने कळसाचे काम पूर्ण केले पण वडिलांना दोष लागू नये म्हणून मंदिराच्या शिखरावरून चंद्रभागा नदीत उडी मारून त्याने आत्महत्या केली. खरोखर धर्मपदच्या त्यागाला तोड नाही

मंदिराचे आवार अकरा एकर इतके विस्तृत आहे मंदिराच्या आवाराची भिंत ८७५ फूट लांब ५४० फूट रुंद असून १४ फूट उंच आहे मंदिराला तीन प्रवेशमार्ग आहेत मंदिराची विभागणी तीन भागात करता येईल सर्वात पुढे आहे नटमंदिर ऊर्फ नृत्यशाला। मध्ये आहे आराधनागृह जे जगमोहन नावाने संबोधले जाते सर्वात मागे आहे मुख्य देऊळ अथवा गर्भगृह।

आज या मंदिराचे फक्त आराधनागृह ऊर्फ जगमोहन अस्तित्वात आ. नटमंदिर व मुख्य देऊळ ढासळलेल्या स्थितीत आहे. ओरिसातील इतर मंदिरात आढळणारा स्वतंत्र भोगमंडप या मंदिराला नाही. नटमंदिरच भोगमंडप म्हणून वापरण्यात येत असे.

(गाईड समवेत प्रथम नटमंदिरात प्रवेश केला. नटमंदिर हा भरपूर स्तंभ असलेला बारा फूट उंचीच्या चबूतऱ्यावरील मंडप आहे. आज त्याचे छत नष्ट झालेले असले तरी आजही दिसतात शिल्पकृतीने ओतप्रोत भरलेले स्तंभ ! मंडपाच्या चबूतऱ्यावरही भरपूर नक्षीकाम आहे. मंडपाच्या खालच्या पट्टात हत्तींची रांग कोरली आहे. त्यात सुमारे १५०० हत्ती कोरले असून एक हत्ती दुसऱ्यासारखा नाही हे वैशिष्ट्य आहे. एखाद्या हत्तीवर राजा स्वार आहे तर एखादा हत्ती पिलासह जंगलात रमतगमत चालला आहे. एखाद्याने सोंड वर केली आहे तर एखाद्याने झाडाला सोंडेने विळखा घातला आहे. हत्तींच्या रांगेनंतर सिंहाची व नंतर अश्वाची रांग आहे. हत्ती हे ऐश्वर्य, स्थैर्य याचे, सिंह सामर्थ्याचे तर अश्व गतीमानतेचे प्रतीक आहेत. नटमंदिराच्या स्तंभावर विविध वाद्य वाजवणारे, नृत्य करणारे स्त्रीपुरुष कोरले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर तल्लीनता जणू ओसंडून चालली आहे. एकेकाळी हे नटमंदिर गायक, वादक, देवदासी यांच्या गायन, संगीत, नृत्य यांनी गजबजलेले होते.

नटमंदिरासमोर नंतर दिसते मंदिराचे आराधनागृह अथवा जगमोहन. त्याची उंची एकशे तीस फूट असून त्याचे छत कळते पिरॅमिडसारखे आहे. ते ढासळू नये म्हणून ठिकठिकाणी त्याला आधार देण्यात आले आहेत. या आराधनागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारावर २२ फूट लांब, चार फूट उंचीच्या अखंड शिळेवर नवग्रहांच्या आसनस्थ अत्यंत रेखीव मूर्ती कोरल्या आहेत. या शिळेचे वजन २६०० टन इतके प्रचंड होते. दुर्दैवाने हा नवग्रह पट्टा भिंतीवरून खाली पडला. त्याच्या प्रचंड वजनाने तो हलवणे अशक्य झाला. आतील बाजूने त्याची रुंदी कमी करून हा नवग्रह पट्टा बाहेरच्या दालनात ठेवला आहे. आराधनागृह विविध शिल्पकृतींनी सजले आहे. नारी सौंदर्याचा आविष्कार ठायी ठायी दृष्टीला पडतो. एके ठिकाणी दिसते फुले तोडणारी

चर्मजी स्वतःही उमललेल्या फुलासारखी नाजूक मोहक आहे! बासरी वाजविणाऱ्या नारीच्या चेहऱ्यावर भावलुब्धता अविस्मरणीय आहे, तर वाद्यवृंदासह नृत्याच्या आवेशातील नारी विलोभनीय आहे!

कोनार्कचे हे विशाल मंदिर जणू सूर्याचा रथ अशी कल्पना करून त्याला रथाचा भव्य व उत्तुंग आकार देण्यात आला आहे. या रथाला प्रत्येक बाजूला बारा अशी चोवीस चक्रे आहेत. १२ चक्रे १२ राशींचे परिभ्रमण दर्शवीत तर २४ चक्रे म्हणजे वर्षाचे २४ पंधरवडे. रथ ओढण्यासाठी सात विशाल अश्वमूर्ती होत्या. सात अश्व म्हणजे सप्ताहाचे सात दिवस. या रथाच्या प्रत्येक चक्राचा व्यास नऊ फूट इतका विशाल असून त्याला आठ आऱ्या आहेत. प्रत्येक आरीच्या मध्यभागी गोलाकार वर्तुळात शृंगारमग्न युगुल, देवदेवता इ. मूर्ती कोरल्या आहेत. चक्राची गोलाकार बाजू लता, वेली, पक्षी इ. बारीक नक्षीकामाने ओतप्रोत सजली आहे. या भव्य मंदिराचा सारथी अरूण मंदिराच्या समोर असलेल्या स्तंभावर बसून रथाचे सारथ्य करीत असे. त्यावेळी असा भास व्हायचा की जणू हा रथ सूर्यदेवतेला घेऊन शीघ्रगतीने मार्गक्रमणा करीत आहे!

सूर्य हा मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. सूर्य आहे म्हणून तर जीवन आहे. म्हणूनच कोनार्कच्या महान शिल्पकारांनी मानवी जीवनातील विविध सामाजिक घटनांचे चित्रण या मंदिरावर केले आहे. त्यांच्या जवळ न जाणो अशी कोणती अद्भूत हत्यारे होती की त्यांनी सूक्ष्म छटांचे यथार्थ चित्रण केले आहे. एके ठिकाणी यात्रेकरूंना घेऊन तीर्थयात्रेकडे पळणाऱ्या बैलगाड्या कोरलेल्या दिसतात तर दुसऱ्या ठिकाणी वृक्षाच्या छायेत विश्रांती घेणारे थकलेले वाटसरू कोरलेले दिसतात. गाईडने एका शिल्पकृतीकडे लक्ष वेधले. एक वृद्धा–आजी काठी टेकीत तीर्थयात्रेला निघाली आहे. तिची मुले वाकून तिला प्रणाम करीत निरोप घेत आहेत. तर नातू आजीला बिलगून बसला आहे. आपल्या आजीची ताटातूट होऊ नये असा निरागस भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटला आहे. निर्जीव पत्थरातून साकार केलेला अतिशय संवेदनाशील जिवंत प्रसंग पाहून त्या अज्ञात शिल्पकारापुढे आदराने नतमस्तक झालो! या मंदिरावर विविध प्रकारच्या काल्पनिक

मूर्तीही कोरल्या आहेत गजव्याल, नरव्याल, अलिंगनबद्ध नागनागणींच्या एकमेकाना कवटाळणाऱ्या मैथुनाच्या मूर्ती हीसुद्धा त्यात समावेश आहे नागाच्या पाठीवर कोरलेले खवले हुबेहूब वाटावे यातच शिल्पकाराचे अप्रतिम कौशल्य दिसून येते ! काही ठिकाणी ध्यानस्थ ऋषी, द्राक्षे खाणारे प्राणी, उट, युद्ध दृश्ये इ ही कोरली आहेत कोणार्कच्या कुशल कारागीराच्या नजरेतून दैनंदिन जीवनातील स्त्री-पुरुष संबंधाचे प्रसंग कसे सुटणार? मंदिरावर शृंगारमग्न प्रणयी युगुल ठिकठिकाणी दिसतात शृंगारातील अनेक बारकावे त्यानी सफाईदारपणे कोरल्यामुळे पहाणारा विस्मयचकित होतो अशा अनेक मूर्तींपैकी एक उल्लेखनीय शिल्पकृती म्हणजे एक साधू स्त्रीशी संग करताना कोरला आहे या साधूची दाढी हुबेहूब कोरली आहे त्याच्या दंडावर माळा आहेत स्त्री-संबंधाला आतुर झाल्याचा भाव त्याच्या चेहऱ्यावर ओसडून चालला आहे तसेच स्त्रीची सज्जलता तिचे अर्धोन्मिलित नेत्र अविस्मरणीय आहेत सौन्दर्य अप्सरा-मेनकेला पाहून चित्त विचलित झालेल्या साधूची-विश्वामित्राची ही शिल्पकृती पाहून मोहाच्या वेळी सन्यस्त माणूसही कसा बळी पडतो याचे हे यथार्थ चित्रण वाटते प्रणयाची भावना प्रत्येकाला असते हेच कोनार्कच्या शिल्पकारांना सूचित करावयाचे होते पण तरी कोनार्कचे शिल्पकार साध्या सरळ वृत्तीचे होते त्याच्या मनात अश्लीलतेची भावना नव्हती वैषयिक भावना हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंगच आहे अतृप्त कामवासनेमुळे मोक्षलाभ होत नाही याच जाणीवेतून त्यानी कामप्रधान मूर्ती उघडपणे चित्रित केल्या तरुणांना योग्य शिक्षण देण्याचा त्यांचा हेतू असावा स्त्री पुरुष-मीलन म्हणजे जणू आत्मा व दैवी शक्ती यांचे मीलन ! काहीच्या मते अशा कामप्रधान मूर्तीमुळे मंदिराचा आकाशातून पडणाऱ्या विद्युल्लतेपासून बचाव होतो अशी पूर्वी समजूत होती, म्हणून अशा मूर्ती मंदिरावर कोरल्या

आराधना गृहाच्या नतर दिसते भग्नावशेषातील मुख्य देऊळ अथवा गर्भगृह. या विशाल देवळाची उंची आराधना गृहाच्या दुप्पट म्हणजे २३० फूट उंच होती संबंध ओरिसात त्या काळात इतक्या उंचीचे मंदिर नव्हते मंदिर ढासळल्यानंतर सध्या गाभाऱ्याची उंची ३० फूट आहे

मंदिराच्या बाहेर दक्षिण, पश्चिम, उत्तर या तीन बाजूला सूर्यदेवतेच्या तीन नितांत सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. प्रातःकाळचे पहिले कोवळे सूर्यकिरण मंदिराच्या नृत्यमंडप व आराधनागृहाच्या दरवाज्यातून आत येऊन सिंहासनावर आरूढ असलेल्या दक्षिणेच्या सूर्य मूर्तीच्या मुखावर पडायचे ! ही 'प्रभात सूर्य' प्रतिमा होय मध्यान्हीची सूर्य-किरणे पश्चिमेकडील सूर्य मूर्तीवर पडायची. ही 'मध्यान्हसूर्य' प्रतिमा होय तर सायंकाळची कोवळी किरणे उत्तरेच्या मूर्तीवर पडायची ही 'अस्तचल सूर्य' प्रतिमा' होय ! प्रभात सूर्याच्या चेहऱ्यावर शांत, सौम्य भाव आहे चेहऱ्यावर तारूण्य जणू ओसंडून चालले आहे तर मध्यान्हीच्या सूर्याच्या चेहऱ्यावर कठोर भाव आहे अस्तचलसूर्याच्या चेहऱ्यावर थकवा चित्रित केला आहे. तो वैशिष्टयपूर्ण आहे खरोखर कोनार्कच्या महा शिल्पकारांच्या या कल्पनाशक्तीला तोड नाही ! चेहऱ्या-वरील सूक्ष्म संवेदनाशील भाव त्यांनी निर्जीव पत्थरात साकार करून त्यांना जणू बोलके केले आहे सूर्याच्या या तीन विशेष रूपाचे काय प्रयोजन असावे ? तर सूर्य हा ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या सर्वांचे जणू प्रतीक मानला आहे वेदामध्ये सूर्याचे प्रातःकाळात ब्रम्हा, मध्यान्हकाळात विष्णू व साय-काळात महेश असे वर्णन केले आहे हिरवटसर रंगाच्या मोहक सूर्यमूर्तीच्या चेहऱ्यावर मुकुट आहे गळयात व कमरेवर नाजूक मोत्याची माळ कोरली आहे सुईसारख्या बारीक तीक्ष्ण हत्याराने हे नाजूक काम केले असावे. गळयात जानवे आहे पायात पादुका आहेत ही सूर्यमूर्ती सप्ताश्व असलेल्या रथामध्ये स्वार होऊन चालली आहे अशी कोरली आहे सारथी अरुण मध्ये घोड्यांचा लगाम पकडून बसला आहे. खाली वादक आपापली वाद्ये वाज-वीत आहेत बाजूला दोन रक्षक उभे आहेत जवळ राजा आणि राणी असून सूर्य देवतेच्या पायावर राजा नम्रतेने तलवार अर्पण करीत आहे असे दृश्य कोरले आहे वरच्या बाजूला ब्रह्मा, विष्णू आहेत सर्वात वरच्या बाजूला स्वर्गातील राज्याचे दृश्य आहे. तेथे विद्याधर गण सूर्य देवाचे स्वागत करीत आहेत हातात माला घेऊन स्त्रिया सज्ज आहेत

तेराव्या शतकात बांधलेल्या या अनुपम मंदिराची पडझड सतराव्या शतकात सुरू झाली काहींच्या मते मंदिर असलेली जागा रेताड वाळूची

असल्याने पाया खचला व मंदिर कोसळले ! पूर्वी समुद्राकाठी असलेले हे मंदिर दुरून जहाजासारखे दिसे दर्यावर्दी लोकात ते 'ब्लॅक पॅगोडा' नावाने प्रसिद्ध होते या मंदिराच्या कळसाला मोठा शक्तिशाली चुंबक बसवला होता तो जहाजाना खेचून घेत असे म्हणून नाविक लोकांनी या मंदिराचा कळस तोडला ! समतोलपणा ढासळल्यामुळे हे मंदिर कोसळले असे काहींचे मत आहे काहींच्या मते भूकपामुळे हे मंदिर उध्वस्त झाले तसेच काला-पहाड या मुसलमान सरदाराने इ स १५६८ मध्ये मंदिराचा विध्वंस केला मूर्ती तोडल्या त्यांचे हात पाय तोडून त्या विद्रूप केल्या कमानीच्या दगडावर तोफा डागल्या त्यामुळे मंदिर ढासळले खरे म्हणजे कालापहाड हा मूळचा हिंदू राजा कालीदास गजनी त्याचे नाव त्याचे मुस्लीम स्त्रीवर प्रेम बसले, तिच्याशी त्याने विवाह केला म्हणून त्याला हिंदुधर्म पंडितांनी धर्माबाहेर काढले त्याच्यावर बहिष्कार टाकला कालांतराने त्याचे प्रेम ओसरल्यावर त्याने हिंदू धर्मात येण्याची इच्छा प्रकट केली पण त्यास हिंदू धर्म पडितांनी नकार दिल्यावर तो हिंदू धर्माचा कट्टर शत्रू बनला. कोनार्कचे केवढे हे दुर्दैव ! मूळ हिंदू असलेल्या राजाकडूनच मंदिराचा विध्वंस व्हावा ! मोगल सम्राट जहांगीरच्या सुभेदाराने मंदिरावर १६२८ मध्ये हल्ला केला तेव्हा पुजाऱ्यांनी मूळ मूर्ती सुरक्षितपणे हलविली, तेव्हापासून मंदिरातील पूजा अर्चा बद झाली त्यानतर मूळ मूर्ती पुरीच्या राजाने जगन्नाथपुरी येथील इंद्र मंदिरात स्थापन केली व ओरिसावर १८ व्या शतकात सत्ता गाजविणाऱ्या मराठ्यानी अरूण स्तंभ पुरीच्या मंदिरा-समोर उभारला तेराव्या शतकात उभारलेले हे मंदिर दुर्दैवाने पाच शतकाच्या आतच इ स १८३९ मध्ये उद्ध्वस्त झाले चक्री वादळानेही त्याला हातभार लावला

इ स. १८३७ मध्ये प्रसिद्ध ब्रिटिश पुराणवस्तु सशोधक व तत्रज्ञ फर्ग्युसन याने या मंदिराला जेव्हा भेट दिली तेव्हा त्याला काय दिसले ? मुख्य मंदिराचा कोपरा कलला होता मंदिराच्या आवारात वाळूच्या ढिगा-ऱ्यात अस्ताव्यस्त पसरल्या होत्या तुटलेल्या अश्वमूर्ती, तुटलेली चक्रे, भग्न हत्ती, मूर्ती ! मंदिराचा केवळ एक चतुर्थांश भागच केवळ सुस्थितीत होता

इग्रजांनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीला या मदिराची दुरूस्ती सुरू केली व मदिराचा अधिक नाश होण्याचे थाबवले दिल्लीच्या राष्ट्रीय सग्रहालयात येथील एक अतिशय सुदर सूर्यमूर्ती इ स १९५६ मध्ये ठेवण्यात आली या मूर्तीचा चेहरा हसरा आहे.

मदिराची अद्वितीय शिल्पकृती पहाताना सध्याकाळची वेळ झाली, याचे भान सुद्धा राहिले नाही मदिराच्या प्रागणात फिरताना एकीकडे प्राचीन शिल्पकलेबद्दल मनात आदर दाटत होता तर दुसरीकडे भग्नावशेष पहाताना मन दु खित होत होत होते अस्तचल सूर्य देवतेची मूर्ती सध्यासमयीच्या सूर्य किरणांनी उजळून निघाली होती या सात्त्विक मूर्तीचे तुटलेले हात पाहून मन विषण्ण झाले वाटले या देखण्या सोज्वळ मूर्तीचे हात तोडायला पुढे सरसावणाऱ्याला काहीच, वाटले नसेल का ? त्याचे हात कसे झडले नाहीत ?

कालगती किती विचित्र आहे बरे ? एकेकाळी प्रभात सूर्याच्या प्रार्थनेसाठी प्रात काळी व अस्तचल सूर्याच्या प्रार्थनेसाठी सायकाळी जमलेल्या असंख्य भक्तगणांनी तसेच देवदासीच्या नृत्य सगीताने हे मदिर गजबजलेले असेल त्यावेळी २४ चक्राचा सप्त अश्व असलेला हा मदिररूपी विशाल रथ सूर्य देवतेला घेऊन शीघ्रगतीने अभिमानाने पुढे जात असल्याचा जणू भास निर्माण करीत असेल मध्यान्हीचा सूर्य कधीतरी ढळणारच हे सत्य या सूर्यमदिरालाच लागू पडावे ना ! कारण आज तेथे दिसत होते— आराध्य मूर्ती नसलेले, शिखर कोसळलेले मंदिर ! जणु आत्म्याविना शरीर ! तुटलेल्या मूर्ती, वाळू, रेतीमध्ये अस्ताव्यस्त पडलेले स्तभ आणि भग्नावशेष ! हे सूर्यदेवते! तुला पूजास्थानी कल्पून तुझ्या आराधनेसाठी हे मदिर निर्माण केले गेले पण त्यातूनच जीवन नाशवत आहे हे विदारक सत्य तू जाहीर केलेस ! सूर्यदेवते तुझी लीला अगाध आहे. !

□

# बलराम, कृष्ण, सुभद्रेचे जगन्नाथ पुरी

पुरी एक्स्प्रेसने सकाळी सातला भुवनेश्वर सोडले तासभरातच खुर्दा रोड जंक्शन आले कलकत्ता-मद्रास हा मुख्य लाईनचा मार्ग सोडून गाडी डावीकडील फाट्याने जगन्नाथ पुरीच्या दिशेने निघाली आजूबाजूला भाताची हिरवीगार शेते पसरली होती नारळाची उंच उंच झाडे वाऱ्याने डोलत होती गाडीच्या दोन्ही बाजूना छोटी छोटी तळी दिसत होती. त्यात विविध रंगी कमळे डुलत होती साडे आठच्या सुमारास गाडी पुरी स्टेशनच्या आवारात शिरली.

बंगालच्या उपसागराच्या काठावर वसलेल्या जगन्नाथपुरीला पौराणिक कालापासून महत्त्व आहे पूर्वी ते पुरुषोत्तमक्षेत्र या नावाने ओळखले जाई. बद्रीनाथ, द्वारका, रामेश्वर याप्रमाणेच जगन्नाथपुरी हे चौथे पवित्र धाम ! ते कलीयुगाचे पवित्रधाम आहे, सातव्या शतकात चिनी प्रवासी ह्यू एन्-त्सगने पुरीला भेट दिली होती त्याने लिहून ठेवले आहे की येथील लोक उंच व काळे आहेत. ते व्यापारात नाण्याऐवजी हत्ती, मोती इ परस्परांना देतात

जगन्नाथपुरी रेल्वेस्टेशनच्या आधुनिक इमारतीच्या वरील मजल्यावर रेल्वेच्या निवासाच्या खोल्या ( retiring rooms ) आहेत त्यासाठी मागणी खूप असूनही सुदैवाने आम्हाला रूम मिळाली. सामान ठेवून स्नान

वगैरे आटोपले. रिक्षा करून स्टेशनपासून दोन कि मी अंतरावर असलेल्या जगन्नाथ मंदिराकडे निघालो पुरी हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने त्याचा परिसर विस्तृत आहे तीर्थक्षेत्र व गलिच्छपणा हे जणू समीकरणच असते. पण त्या मानाने पुरीला अस्वच्छता कमी दिसली

पुरीच्या सुप्रसिद्ध जगन्नाथ मंदिराच्या बांधकामाची सुरुवात बाराव्या शतकात चोडगंगादेवराजाने केली अनंगभीमदेव या राजाने बाराव्या शतकाच्याच शेवटी मंदिर पूर्ण केले मंदिरातील मुक्तशाळा पंधराव्या शतकात बांधली

मंदिराजवळ रिक्षा पोहोचताच पंडे लोकांनी घेराव घालून हैराण केले- आम्ही फक्त देवदर्शनासाठी आलो आहोत, कसलाही धार्मिक विधी आम्हाला करायचा नाही असे सांगून पंड्याच्या तावडीतून मोठ्या मुश्की-लीने सुटका करून घेतली तरीपण एक पंड्या चिकाटीने आमच्या मागे लागला तेव्हा तर संतापाने हे जोराने रागावले तेव्हा तो पुटपुटत निघून गेला

मंदिरात प्रवेश केल्यावर पूर्वेकडील 'सिंहद्वार' या प्रवेशद्वारीच ३५ फूट उंचीचा रांखी रंगाचा अखंड अरुणस्तंभ दिसला हा सुंदर नक्षीयुक्त स्तंभ कोनार्कच्या सूर्यमंदिरासमोर होता मराठ्यांची सत्ता ओरिसावर अठराव्या शतकात होती, तेव्हा हा स्तंभ कोनार्कहून आणून येथे उभा केला गेला स्तंभावर सूर्यरथ चालविणाऱ्या अरुणाची मूर्ती कोरली आहे. तसेच सप्त अश्व कोरले आहेत

मंदिराच्या आवाराची दगडी भिंत ६५० फूट लांब, रुंद व वीस फूट उंच इतकी प्रचंड आहे मंदिराचे आवार चार लक्ष चौरस फूट या मापाचे आहे. मंदिराला चार प्रवेश द्वारे असून पूर्वेकडील प्रवेशद्वाराचे नाव आहे सिंहद्वार[1] त्यातून आत प्रवेश केल्यावर बावीस दगडी पायऱ्या चढून मंदिराजवळ पोहोचलो

मंदिराचे चार भाग असून प्रथम भोगमंडप (अर्पणगृह) आहे. तेथे महा-प्रसाद वाटतात त्यानंतर येतो नटमंडप नंतर मुक्तशाळा व शेवटी मोठे

देऊळ । हे सर्व मंडप एकाच रेषेत असून एकातून दुसऱ्यात प्रवेश करता येतो.

मंदिरामध्ये भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले भक्तगण दाटीवाटीने बसलेले होते बालकापासून ते वृद्धापर्यंत शेकडो लोक जगन्नाथाच्या दर्शनाची आतुरतेने प्रतीक्षा करीत होते ज्यांना दर्शन झाले त्या भक्तगणाच्या चेहऱ्यावर यात्रा सफल झाल्याची तृप्ती दिसत होती गर्दीतून वाट काढीत काढीत मंदिरात पोहोचलो तेव्हा जगन्नाथ, बलराम व सुभद्रा या तीन मूर्तींचे दर्शन झाले १६ फूट लांब व पाच फूट उंचीच्या रत्नवेदी या दगडी सिंहासनावर या मूर्ती विराजमान झाल्या आहेत जगन्नाथाची काळी मूर्ती पाच फूट उंच आहे तर बलरामाची पांढरी मूर्ती सहा फूट उंच आहे. सुभद्रेची पिवळी मूर्ती चार फूट उंच आहे या मूर्ती लाकडी आहेत जगन्नाथाचा भालप्रदेश हिरेजडित आहे या तिन्ही मूर्ती ओबडधोबड अपूर्ण, आहेत त्यांचे हातही पूर्ण नसून चेहेराही अपूर्ण आहे या मूर्तींच्या या स्वरूपा मागे एक मनोरंजक पौराणिक कथा आहे

प्राचीन काळी माळवा प्रांतात इंद्रद्युम्न हा राजा होऊन गेला तो विष्णूचा महान भक्त होता त्याला स्वप्नात असा दृष्टांत झाला की भगवान विष्णूचे दर्शन त्याला उत्कल प्रांतात होऊ शकेल म्हणून त्याने ती जागा शोधून काढण्यासाठी विद्यापती या राजघराण्याच्या ब्राह्मण पुजाऱ्याला पाठविले त्याप्रमाणे विद्यापती उत्कल प्रांतात शोध घेत असता त्याला कळले की घनदाट अरण्यातील नीलमाधव या पर्वतावर भगवान विष्णू वास्तव्य करतात व त्यासंबधी माहिती फक्त तेथील जंगलातील आदिवासी टोळीच्या नायकालाच आहे. विद्यापतीने त्या नायकाची मुलगी ललिता हिच्याशी विवाह केला तरी भगवान विष्णूचे गुप्तस्थान त्याला कोणीही दाखवले नाही शेवटी मुलीने विनंती केली म्हणून विद्यापतीला जंगलातील एका टेकडीच्या गुहेत डोळे बांधून नेण्यात आले. नीलमाधवाची निळी दगडी मूर्ती त्याने पाहिल्यावर त्याला परत आणण्यात आले विद्यापतीने जात असताना मार्गावर धान्याचे बी टाकले होते ते कालांतराने उगवले त्यामुळे विद्यापती नीलमाधवाची मूर्ती एकटा वाट न चुकता परत पाहून येऊ शकला

यानंतर विद्यापती माळव्याला आला त्याने हकीकत सांगितल्यावर इंद्रद्युम्नाने उत्कल प्रांतात जाऊन भगवान विष्णूची प्रतिष्ठापना करण्याचे ठरवले पण त्या पवित्र ठिकाणी नीलमाधवच गुप्त झाले त्यामुळे राजा व्यथित झाला मनाच्या दु:खीकष्टी अवस्थेत तो असतानाच त्याला साक्षात्कार झाला की जगन्नाथपुरीच्या समुद्रकाठावर पौर्णिमेच्या दिवशी लाटांमध्ये लाकडाचा ओंडका तरंगताना दिसेल. त्या पवित्र लाकडी ओंडक्यापासून जगन्नाथाची ( विष्णूची ) मूर्ती राजाने घडवावी

भगवान विष्णूची लाकडापासून मूर्ती करण्याचे अवघड काम करण्यास कोणीच सुतार तयार होईना कारण कोणीच भगवानास पाहिले नसल्याने त्याचे रूप घडविण्याचे काम बिकट होते शेवटी भगवानानेच यातून मार्ग काढला स्वत. भगवान वृद्ध सुताराच्या रूपात राजासमोर आले राजाशी चर्चा करून मूर्ती आपण घडवू असा विश्वास त्याने राजाला दिला पण त्याने राजाला अट घातली. गुंडीचा मंदिर या ठिकाणी २१ दिवस एका बंदिस्त खोलीत त्या लाकडाची मूर्ती घडवण्याचे काम तो करील. पण त्या काळात कोणीही त्याच्या कामात अजिबात व्यत्यय आणता कामा नये कोणीही तेथे येता कामा नये. पंधरा दिवस लोटले. राणीला असे वाटले की सुताराने स्वत:ला कोंडून घेतल्यामुळे तो तहान भुकेने मेला तर नसेल ? कारण बाहेर काही आवाजही ऐकू येत नव्हता राणीने राजाच्या मागे लागून त्याला दरवाजा उघडायला लावला आतमध्ये कोणीही नव्हते जगन्नाथ, बलराम, सुभद्रा यांच्या अपुऱ्या तीन मूर्ती मात्र होत्या मूर्तींच्या कमरेवरचा भाग फक्त घडवलेला होता. जगन्नाथ, बलराम यांचे हात अपुरे घडवले होते तर सुभद्रेचे हात घडवलेच नव्हते

ते पाहून राजा घाबरला पण त्याच वेळी आकाशवाणी झाली की राजा काळजी करू नकोस आम्ही याच स्वरुपात रहाण्याची इच्छा करतो राजाने मग या तीन मूर्तींची विधिपूर्वक स्थापना गुंडीचा घर ( बगीचा ) येथे म्हणजे जगन्नाथपुरीच्या मंदिरासमोरील मोठ्या रस्त्याच्या उत्तरेच्या टोकाला केली कालांतराने या तीन मूर्तींची स्थापना मंदिराच्या सध्याच्या जागी केली व मोठे मंदिर बांधले तेथे पूर्वी नीलदरी किंवा नीलटेकडी होती.

ह्या भव्य मंदिराची उंची २१० फूट असून ते ओरिसातील सर्वांत उंच मंदिर समजले जाते. मंदिराच्या शिखरावर विष्णूचक्र व ध्वज आहे मंदिराभोवती अद्वितीय शिल्पकाम आहे. बऱ्याच ठिकाणी मोठ्या आकारातील कामशिल्पे रेखीवपणे कोरली आहेत.

मंदिराच्या भोगमंडपाच्या दाराशी हातात कलश घेतलेल्या दोन तरुणींच्या सुंदर मूर्ती आहेत दाराची चौकट हिरव्या ग्रानाईट दगडाची असून त्यावर नवग्रह कोरले आहेत बाजूला अतिशय नाजूक शिल्पकृती आहे चबुतऱ्याच्या पायपट्टीवर हत्तींची रांग कोरली आहे तसेच नाव व ती वल्हवणारेही अतिशय रेखीवपणे कोरले आहेत. त्यावरून प्राचीन काळातील समुद्र व्यापाराची कल्पना येते बाजूला तांबड्या दगडाचे शिल्पकाम आहे. त्यात दिसते. वीणाधारी मोहक स्त्री ! त्याचप्रमाणे पुराणातील अनेक प्रसंग कोरले आहेत भोगमंडप हा जगातील सर्वांत मोठा जेवणाचा मंडप (Dining Hall) समजला जातो. तेथे एकावेळी दहा हजार लोक भोजन घेऊ शकतात.

कोनार्कच्या मंदिराचा विध्वंस करणाऱ्या कालापहाड या मुसलमान सरदाराची वक्रदृष्टी याही मंदिरावर पडली होती त्याने हे मंदिर केवळ लुटलेच नाहीत, तर शिल्पकृतींचे हातपाय तोडले जगन्नाथाची मूर्ती जाळण्याचा प्रयत्न केला. पण तेथील एका पुजाऱ्याच्या दक्षतेमुळे मूर्ती सुरक्षितपणे हलवली गेली

नरसिंगदेव राजाने ( १६२१–४४) या काळात मंदिराची दुरुस्ती केली त्यासाठी मंदिरावर प्लॅस्टर केले गेले पांढरा रंग देण्यात आला पण त्यामुळे जग अनेक अद्वितीय शिल्पकृतींना मुकले फार थोड्या शिल्पकृती आज शिल्लक आहेत या मंदिराच्या आवारात लहानमोठी तीस मंदिरे आहेत. त्यातील गणेश मंदिर, सूर्यनारायण मंदिर, बिमला मंदिर व लक्ष्मी मंदिर ही महत्त्वाची मंदिरे आहेत सूर्यनारायण मंदिरातील सूर्यमूर्ती ही कोनार्कच्या मंदिरातील मूळ मूर्ती समजली जाते.

मंदिरातून मोठ्या तृप्त मनाने बाहेर पडल्यावर समोरच रघुनंदन लायब्ररीची उंच इमारत दिसली. त्या लायब्ररीच्या वरच्या मजल्यावरून

जगन्नाथाच्या मंदिराच्या भव्यतेची कल्पना येते मंदिरासमोर प्रशस्त रस्ता आहे तो ' बडा दंडा ' (Grand Road) या नावाने ओळखला जातो भारतातील प्राचीन शहरातील हा एकमेव विशाल रस्ता आहे. हा दीड मैलाचा रस्ता गुंडीचा घर येथे संपतो या रस्त्याच्या दुतर्फा लाकडी खेळणी, शंखशिंपल्याची खेळणी, माळा, मूर्ती इ वस्तूंची विविध दुकाने आहेत वस्तूंच्या किंमतीही माफक होत्या

## पुरीची रथयात्रा

प्रत्येक वर्षी जून–जुलै महिन्यात आषाढ शुक्ल द्वितीया ते त्रयोदशी पुरीची सुप्रसिद्ध रथयात्रा होते, हा मोठा उत्सवच असतो. हा रथयात्रेचा सोहळा ' गुंडीची जत्रा ' या नावाने ओळखला जातो. द्वारकेत एकदा सुभद्रेने शहर पाहण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा श्रीकृष्ण बलराम यांनी तिला स्वतंत्र रथात बसवून व तो रथ दोघांच्या रथाच्या मध्ये घेऊन तिला नगरदर्शनाला घेऊन गेले या घटनेच्या स्मरणार्थ ही रथयात्रा निघते रथयात्रेच्या वेळी मंदिरातून तीनही मूर्ती काढून तीन स्वतंत्र रथात ठेवतात जगन्नाथाचा रथ सर्वांत मोठा असतो ४५ फूट उंच, ३५ फूट चौकोनी व ७ फूट उंचीची १६ चाके असलेला असा हा रथ असतो जगन्नाथाचा रथ नंदीघोष, बलरामाचा तलध्वज व सुभद्रेचा देवीदलन या नांवाने ओळखला जातो हे रथ पिवळ्या, काळ्या व हिरव्या रंगाच्या वस्त्रांनी सजवले जातात.

रथयात्रा सुरू करण्याचा मान पुरीच्या गजपती राजाचा असतो पुरीचा हा राजा प्रथम रथासमोरील व भोवतालची जागा स्वतः साफ करतो व मग ही रथयात्रा सुरू होते दीड मैल लांबीच्या रस्त्यावर हा रथ ओढला जातो ज्याचा हात रथाला लागेल त्याचा जन्ममरणाचा फेरा चुकतो अशी समजूत असल्याने रथयात्रेच्या वेळी लाखो भाविकांची एकच झुंबड उडते रथयात्रा पहिल्या दिवशी संध्याकाळपर्यंत गुंडीच्या मंदिराजवळ पोहोचते दुसऱ्या दिवशी भगवानाला रथातून उतरवून मंदिरात ठेवतात मंदिरात नऊ दिवस मूर्ती ठेवून दशमीला रथ परत निघतो गुंडीचा घर हे जगन्नाथाच्या मूर्तीचे मूळ जन्मस्थान ! निदान वर्षातून एकदा तरी आपल्या या मूळ घरी जगन्नाथाने एक आठवडा तरी न विसरता येऊन वास्तव्य करावे ही या रथयात्रेमागे भावना आहे केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील

लोकही रथयात्रा पाहायला उत्सुकतेने हजर असतात आयुष्यात एकदा तरी या रथयात्रेत सहभागी होता येऊन जगन्नाथाच्या रथाला हात लावण्याचे भाग्य लाभावे असा विचार मनात येऊन गेला

रथयात्राप्रमाणच यथील दुसरा प्रख्यात सोहळा म्हणजे नवकलेवर सोहळा हा उत्सव साधारण २५ वर्षांनी येतो यावेळी मंदिरातील मूर्ती बदलल्या जातात कारण त्या लाकडी असल्याने झिजतात केव्हा केव्हा ग्रहमाना-नुसार हा सोहळा बारा वर्षांनी येतो यावेळी लाकडी मूर्ती अशत बदलल्या जातात कारण नवकलेवर उत्सवाभोवती गूढतेचे एक प्रकारचे वलय पसरलेले असते. ज्यावर इतर कोणत्याही वृक्षाची सावली पडलेली नाही, ज्याच्यावर पक्ष्यांचे घरटे नाही असे लिंबाचे झाड मूर्ती घडण्यासाठी निवडले जाते व मूर्ती बनवल्या जातात. त्यानतर ज्याला मूळ मूर्तीचे दर्शन झाले त्या विद्यापतीच्या कुळातील ब्राह्मण पुजाऱ्याचा शोध घेण्यात येतो दतकथेनुसार मूर्ती बदलल्यानतर पुजाऱ्याचा मृत्यु होतो. तरी पुजारी होण्यास भक्त उत्सुक असतात पुजाऱ्याचे डोळे मूर्ती बदलताना बाधले जातात नैवेद्य शिजवला जातो प्रथम पुजारी सतुष्टपणे जेवण करतो त्या नतर देवाला नैवेद्य दाखवतात त्यावेळी जगन्नाथ स्वत दर्शन देतो असे म्हणतात. शेवटचा नवकलेवर सोहळा १९६९ साली झाला

पुरीचे मंदिर पाहिल्यावर पुरीच्या समुद्रकिनाऱ्यावर चक्कर मारली पुरीचा समुद्रकिनारा खरोखरच रमणीय आहे तो जगातील एक सुदर समुद्रकिनारा समजला जातो उच उच झेपावणाऱ्या लाटा समुद्राची आक्र-मकता दर्शवीत होत्या दूरवर डोलणाऱ्या होड्या दिसत होत्या मासे पकडून आलेले कोळीही दिसत होते किनाऱ्याला हॉटेलांची रांगच्या राग पसरली आहे

पुरीची भेट आटोपून किनाऱ्याकिनाऱ्याने स्टेशनवरील विश्रामधामात पोहोचलो. सायकाळ झाली होती सकाळी आठ वाजता रेणुगुठा एक्स्प्रेसने तिरुपतीला जायचे होते रिझर्वेशन मिळाल्याने निर्धास्त होतो. पूर्व भारताची दोन आठवड्याची भेट सपली होती दक्षिणेच्या तीन आठवड्यांच्या प्रवासाची सुरुवात दुसऱ्या दिवशी होणार होती पूर्व भारताच्या स्मृती आठवतच निद्रेच्या आधीन झालो. □

# पुरी ते तिरुपती

सकाळी साडे आठला रेणुगुठा एक्स्प्रेसने पुरी स्टेशन सोडले दोन दिवस व एक रात्रीचा १२०० कि मी अंतराचा दीर्घ प्रवास सुरू झाला रिझर्वेशन मिळाल्याने चिंता नव्हती यात्रेकरूच्या सोयीसाठी ही खास गाडी सहा महिन्यांपूर्वी सुरू झाली असे कळले पूर्वी तिरुपतीला जाण्यासाठी दोन ठिकाणी गाडी बदलावी लागत होती आता सलग प्रवासाची ही गाडी फारच सोईस्कर आहे.

तासभरातच खुर्दारोड जवळ आले गाडीने दिशा बदलली व मद्रा-सच्या दिशेने ती धावू लागली दोन्ही बाजूच्या छोट्या छोट्या तलावातील कमळाची शोभा अवर्णनीय होती पांढरी शुभ्र, गर्दलाल, गुलाबी रंगाची शेकडो कमळे पाण्यावर डुलत होती.

तासाभरातच लांबच्या लांब पसरलेले सरोवर दिसू लागले सरोवरात अधूनमधून छोटे छोटे खडक दिसत होते एका बाजूला डोंगराची रांग तर दुसऱ्या बाजूला अथांग सरोवर ! हे तर होते सुप्रसिद्ध चिल्का सरोवर ! पुढे एके ठिकाणी मोठा बोर्ड दिसला—

Watch the beauty of Chilka lake

सुमारे ७५ कि मी लांबीचे १६ कि. मी रुंदीचे नैसर्गिक खाऱ्यापाण्याचे हे विशाल चिल्का सरोवर म्हणजे भारतातील एक आगळे निसर्ग सौन्दर्य स्थळ होय एका बाजूला समुद्र आणि दुसऱ्या बाजूला हिरवेगार डोंगर यांच्यामध्ये हे सरोवर पसरले आहे

हे निसर्गसुंदर सरोवर चौथ्या शतकापासून बंगालच्या उपसागरात अस्तित्वात आहे सरोवरात कुठे मधूनच पाढऱ्या शुभ्र पक्ष्याचा थवा दिसायचा तर केव्हा उडणाऱ्या लाटांवर सूर्यकिरण चमकू लागल्यावर त्या उजळून निघायच्या. पूर्वी तर या सरोवराच्या परिसरातील जगलात जातिवंत वाघ चित्ते, सांबर, टिपकेदार हरणे सापडायची या सरोवरावरून वहाणारा थंड गार वारा गाडीत बसल्या बसल्या उत्तेजित करीत होता मैलामागून मैल मागे टाकले जात होते पण सरोवर संपत नव्हते हे सुंदर दृश्य संपूच नये असे वाटत होते

दुपारचा एक वाजला तेव्हा बेहरामपूर हे मोठे स्टेशन आले. या बेहरामपूर स्टेशनपासूनच केवळ आठ मैलांवर गोपालपूर हे बंगालच्या उपसागराच्या काठचे नितांत सुंदर रमणीय ठिकाण आहे डब्यामध्ये जेवणाची ताटे आली गरमागरम मसालेदार अंडाकरी, भात व चपाती ! रेल्वे प्रवासातील या चवदार जेवणाची लज्जत आगळीच होती

संध्याकाळचे सहा वाजले. अंधार पडू लागला तेव्हा विझिनगरम् जंक्शन आले. विशाखापट्टम् बंदर येथून नजीकच आहे, रात्रीचे आठ वाजले तेव्हा गाडी वाल्टेरच्या मोठ्या जंक्शनमध्ये शिरली पूर्व भारताच्या प्रवासाचा टप्पा आटोपला होता दक्षिण भारताच्या प्रवासाची सुरुवात होणार होती भरपूर भात, सांबार रसम् असे ताट आले ताट पाहूनच हे म्हणाले की आता तीन आठवडे याचीच सवय करायला हवी

रात्रीचे नऊ वाजले तेव्हा वाल्टेर स्टेशन सोडून गाडी मद्रासच्या दिशेने धावू लागली थकवा वाटत होता पण झोप येईना पडल्या पडल्या पूर्व भारताच्या रम्य आठवणी सुखवीत होत्या तर दुसरीकडे दक्षिण भारताची सौन्दर्यस्थळे पाहायला मन आतुर होत होते रात्री अकराच्या सुमारास गाडी एका प्रचंड पुलावरून धावू लागली अंधारातही नदीच्या विशाल पात्राची कल्पना येत होती. रात्री बर्थवर सर्वजण निद्रेच्या आधीन झालो सकाळी आठ वाजता जाग आली तेव्हा गाडी विजयवाडा जंक्शनच्या प्रचंड आवारात शिरत होती गाडी थांबताच ' कापी कापी ' असा आवाज सर्वत्र येऊ लागला उल्का–उदयला म्हटले ' आता आपण दक्षिणेत आलो बर का !

आता सर्वत्र कॉफीच मिळणार !" गरमगरम इडल्या व वडे यांचा नाष्टा झाला उत्तर भारतात स्टेशनवर येणारा एकप्रकारचा तेलकट उग्र वास कुठेच येत नव्हता गरम कॉफीचे घुटके घेतल्यावर उत्साह वाटला

एक दिवस व एक रात्रीचा प्रवास सपला होता पण अजून सपूर्ण एक दिवस गाडीत काढायचा होता गाडीत बसून आता कटाळा आला होता. उल्का–उदय कधी पत्ते खेळून वेळ काढीत होते तर कधी कलकत्त्यात घेतलेला मराठी चादोबा वाचीत तर कधी खिडकीत बसून मौज पहात लहानगा उदय त्याच्या पपांना डब्याबाहेर उतरू देत नसे ते जरी खाली उतरले तरी त्यांना हाका मारून मारून परत बोलवत असे गाडी सुरू झाली तर पपा खालीच राहातील ही भीती प्रवासात त्याला सदैव वाटे शेजारच्या बिहारी प्रवाशाशी वेळ घालवण्यासाठी अधूनमधून गप्पा मारीत होतो तो पाटण्याहून तिरुपतीला निघाला होता त्याच्याबरोबर बायकामुले, आई वडील, भाऊ-भावजय इत्यादि चौदा पधरा माणसे होती त्याला विचारले की तिरुपतीहून पुढे कुठे जाणार ? त्यावर तो म्हणाला, " रामेश्वर जानेका सोचते है। लेकिन जबतक मनी परमिट करता है वहाँतकही जायेंगे।" लोक दूरवर प्रवासास निघतात, खर्चही करतात पण नियोजनाचा अभाव असतो ह्याचा हा एक नमुनाच होता

दुपार झाली पोटात भुकेने काहूर माजवले दोनला बित्रगुठा स्टेशन आले डब्यात भाताने भरलेल्या थाळ्या आल्या भुकेमुळे साबार–भात चविष्ट वाटत होते तासभरातच नेलोर स्टेशन आले भारताच्या पूर्व किनाऱ्यावर झालेल्या चक्री वादळामुळे शेतांमध्ये पाणीचपाणी पसरुन नुकसान झालेले दिसत होते मोठमोठी झाडे, वीजेचे खाब उखडलेले दिसत होते पावसाची बुरबुरही चालूच होती गुडूर जक्शन आले तेव्हा दुपारचे पाच वाजले होते गुडूरपासून गाडीने दिशा बदलली. मद्रासऐवजी रेणुगुठाच्या दिशेने प्रवास सुरु झाला. आता फक्त ८४ कि मी प्रवास राहिला होता.

सध्याकाळी सात वाजता रेणुगुठा एक्सप्रेसने आम्हाला पुरीहून रेणुगुठाला पोहोचवले होते खरच, ही लांब टप्प्याची गाडी फारच सोईस्कर आहे, प्रवासात रेल्वेच्या चोख कामाचा आम्हाला खूपच प्रत्यय आला. गाड्या

वेळेवर सुटत व पोहोचत होत्या स्वच्छताही फारच ठेवली जाई पण लोकांना घाण करण्याची सवय असल्यावर रेल्वे तरी काय करणार ? स्वच्छ साफ केलेल्या प्लॅटफॉर्मवर किंवा रेल्वेगाडीतही एक तासाने चक्कर मारल्यावर केळीच्या साली, शेंगांची टरफले, विड्या, काड्या, कागदाचे बोळे यानी सर्वत्र अस्वच्छता झालेली दिसते

रेणुगुंठा एक्स्प्रेसने उतरलो तर समोरच तिरुपतीकडे जाणारी मीटरगेज गाडी तयार होती फक्त दहा कि मी प्रवास राहिला होता साडेसात वाजले तेव्हा तिरुपती स्टेशनमध्ये प्रवेश केला. स्टेशननजीकच तिरुपती देवस्थान ट्रस्टच्या सुंदर रूम्स आहेत. भरपूर पाणी, वीज, बाथरूम इ चांगल्या सोई आहेत स्वयंपाकाची भांडीसुद्धा हवी असल्यास मिळतात. सामान लावून जेवण आटोपून मग निद्राधीन झालो.

□

# श्री व्यंकटेश्वर बालाजीचे तिरुपती

प्रकाळ झाल्यावर प्रथम तिरुपती गावाचा फेरफटका मारण्यास सुरुवात केली तिरुपती म्हणजे भूलोकीचे साक्षात् वैकुंठ ! या विष्णुतीर्थाचा महिमा अगाध आहे या गावातील दररोजचा दिवस जणू जत्रेचा असतो.

तिरुपती गावातील प्रख्यात मंदिर म्हणजे गोविंदराजस्वामी मंदिर तिरुपती गाव वेंकटाचल पर्वताच्या पायथ्याशी वसवणाऱ्या वैष्णवपंथीय आचार्य रामानुज यांनीच या मंदिराची स्थापना केली. मंदिराचे गोपुर दाक्षिणात्य पद्धतीचे आकर्षक असून मंदिराचे आवार विस्तीर्ण आहे गोपुर पाहून 'गोपुरांच्या प्रदेशात' आता आपण प्रवास करणार, शेकडो गोपुरे दिसणार याची जाणीव झाली. मंदिरात गोविंदराजाची आडवी शेषशायी विशाल मूर्ती आहे मंदिराच्या आवारात श्रीकृष्ण, श्रीरामानुज इ च्याही मूर्ती आहेत वैशाख महिन्यात नऊ दिवसांचा ब्रह्मोत्सव जोरात साजरा होतो

तिरुपतीतील दुसरे प्रख्यात मंदिर म्हणजे श्री कोदंडस्वामी मंदिर ! हे मंदिर गावाच्या मध्यभागातच वसले आहे मंदिरातील श्रीराममूर्ती वरदायिनी आहे अशी भक्तांची श्रद्धा आहे.

## श्री बालाजी मंदिर तिरुमला

मन अधीर झाले होते. श्रीबालाजीचे दर्शन घ्यायला ! तिरुपतीबालाजी म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध देवस्थान तिरुपती या गावात नाही तर ते व्यंकटाचल पर्वताच्या माथ्यावर असून तिरुमल नावाने ओळखले जाते.

व्यंकटेश्वर बालाजीच्या दर्शनाला जाण्यासाठी तिरुपतीच्या स्टँडवर आलो देवस्थानच्या आवारात बसमधून तिरुमलावर जाण्यासाठी वीस कि मी चा घाट रस्त्याचा प्रवास सुरु झाला सुंदर, आरामशीर बसगाड्या व उत्तमपैकी रस्ते पाहूनच बालाजी हे श्रीमंत देवस्थान आहे याची झलक दिसू लागली. वळणामागून वळणे पार करीत ड्रायव्हर सुंदर कॉंक्रीटरोडने गाडी शिताफीने घाटमाथ्याकडे नेत होता आजूबाजूला हिरवीगार शेते दूरवर पसरली होती. अतिशय रमणीय दृश्य दिसत होते केवळ पाऊण तासातच गाडीने अडीच हजार फूट उंची पार केली वाटेत यात्रा करणारे श्रद्धाशील भाविक श्रीव्यंकटेश्वराचे दर्शन घेण्यासाठी पायीच जाताना दिसत होते अशा पायी डोंगर चढणाऱ्या भाविकांसाठी उत्तमपैकी सोपानपथ बांधला आहे उत्तम फरसबंदी पायऱ्या ठिकठिकाणी बांधल्या आहेत

ठीक दहा वाजता व्यंकटाचल पर्वताच्या माथ्यावरील तिरुमल येथे पोहोचलो हल्लीच्या कलियुगात हा पर्वत व्यंकटाचल या नावाने ओळखला जातो. पण कृतयुगात वृषभाचल, त्रेतायुगात अंजनाचल व द्वापारयुगात तो शेषाचल या नावाने ओळखला जाई शेष नागाच्या आकाराचा असल्याने हा दीड चौरस मैल लांबीचा पर्वत पूर्वी शेषाचल या नावाने ओळखला जाई या पर्वतरूपी नागाच्या शेपटीवर श्रीशैलम, मध्यभागी तिरुमल व मुखावर कालहस्ती ही प्रख्यात क्षेत्रे वसली आहेत यांपैकी श्रीशैलम व कालहस्ती ही क्षेत्रे शंकराची तर तिरुमल हे क्षेत्र श्रीविष्णूचे । भाविकांची अशी श्रद्धा आहे की त्यांचे आराध्य दैवत भगवान श्रीविष्णु हे येथे जणू शेषावरच पहुडले आहेत

व्यंकटाचलावर श्रीविष्णूचे आगमन कसे झाले याची पौराणिक कथा पुढीलप्रमाणे आहे एकदा ऋषीमुनींना जाणून घ्यायचे होते की सर्वश्रेष्ठ देवता कोण आहे भृगुऋषींच्यामार्फत हा प्रश्न सोडवण्याचे त्यांनी ठरवले त्याप्रमाणे भृगुऋषी प्रथम ब्रह्मदेवाकडे गेले त्यावेळी ब्रह्मदेव आपल्या मंदिरात सरस्वतीसह विराजमान झाले होते भृगूंनी त्यांना साष्टांग नमस्कार घालून स्तुतिस्तोत्रे गाइली पण ब्रह्मदेवांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तेव्हा भृगूंनी त्यांना अपूज्य ठरवले मग ते शंकराच्या भेटीसाठी कैलासपर्वतावर

गेले. तेथे शंकर पार्वतीबरोबर रममाण झाले होते त्यांनीही भृगूकडे दुर्लक्ष केले तेव्हा शंकरालाही अपूज्य मानून ते श्रीविष्णूची परीक्षा घेण्यासाठी वैकुंठाला गेले तर तेथे श्रीविष्णु लक्ष्मीसह शेषावर पहुडलेले ! आता मात्र भृगुऋषी क्रोधायमान झाले व स्तुतिस्तोत्रे दूर राहोच पण रागाच्या भरात त्यांनी श्रीविष्णूच्या छातीवर लत्ताप्रहार केला तरी श्रीविष्णु शांत राहिले उलट त्यांनी भृगुऋषींचा पाय हातात घेऊन लत्ताप्रहार केल्याने तो दुखावला तर नाहीना अशी आस्थापूर्वक चौकशी केली व त्याचे पाय चेपण्यास सुरुवात केली त्यांचे पाय धुतले व चरणाचे तीर्थ घेतले श्रीविष्णूची ही नम्रतापूर्वक वागणूक पाहुन भृगुऋषी प्रसन्न झाले त्यांनी श्रीविष्णु हे सर्वोत्तम देव आहेत असा निर्णय दिला पण लक्ष्मीला मात्र आपल्या पतीचा अपमान सहन झाला नाही ती दुःखाने वैकुंठावरून निघून भूलोकी गेली लक्ष्मी गेल्यामुळे व्यथित होऊन श्रीविष्णूनेही वैकुंठाचा त्याग केला ते या व्यंकटाचल पर्वतावर वास्तव्य करू लागले.

व्यंकटाचल पर्वत एकेकाळी मेरुपर्वताचाच भाग होता कोणेएकेकाळी सर्पांचा राजा आदिशेष व वायु याच्यामध्ये तंटा उत्पन्न झाला वायूने मेरुपर्वताची हजारो शिखरे उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला पण आदिशेषाने आपल्या हजारो मस्तकांनी त्याचा बचाव केला शेवटी या झगड्यात मेरुपर्वताचे तीन तुकडे खाली पृथ्वीवर पडले त्यातील एक म्हणजे हा व्यंकटाचल पर्वत !

भगवान श्रीविष्णूचे हे स्थान स्वयंभू आहे वैष्णव पंथीय रामानुजाचार्यांच्या कर्तृत्वामुळे या क्षेत्रास वैष्णवपंथीयांचे पीठ म्हणून महत्त्व प्राप्त झाले यादवराजाच्या काळात तिरुमलाचे दैवत शिव का विष्णु असा झगडा उत्पन्न झाला शैव व वैष्णव पंथीय दोघेही या स्थानावर आपला हक्क सांगत हा झगडा सोडविण्यासाठी परमेश्वरालाच कौल लावण्याचे ठरवले रात्री देवाच्या गाभाऱ्यात विष्णु व शंकर या दोन्ही देवतांची आयुधे ठेवण्यात आली प्रातःकाली मंदिराचे दरवाजे उघडल्यावर देवाने जी आयुधे धारण केली असतील त्यानुसार ती देवता कोणती हे मानावयाचे असे ठरले असे म्हणतात की रामानुज बंद दरवाजासमोर रात्रभर ध्यानस्थ बसले देवाने



ग्रंथालय ... दा. ... प्रवेश

विष्णूची आयुधे धारण करून आपण विष्णूचे अवतार आहोत असे सिद्ध करावे अशी प्रार्थना त्यांनी केली दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिराचे दरवाजे उघडल्यावर पुजाऱ्याना दिसले की देवाच्या हाती शंख, चक्र ही विष्णूचीच आयुधे आहेत तेव्हापासून हे स्थान वैष्णवपंथीयांचे महान श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध पावले रामानुजानी आपल्या हयातीतच देवाच्या पूजेसाठी फुलांची, अभिषेकासाठी पाण्याची, देवाच्या अलंकारांची व पुजाऱ्यांची व्यवस्था नीट लावून दिली त्यानी आखून दिलेलाच पूजेचा, उत्सवाचा क्रम आजही थोडा बदल करून चालू आहे

नवव्या शतकात कांचीपुरमचे पल्लव राजे, दहाव्या शतकात तंजावरचे चोलराजे, मदुराईचे पांड्यराजे व चौदाव्या-पंधराव्या शतकात विजयनगरचे राजे यानी या देवस्थानास अमाप पैसा, जवाहीर, मौल्यवान अलंकार दिले. नागपूरचे मराठा सेनापती रघोजी भोसले यानी या देवस्थानच्या पूजाअर्चेसाठी कायम व्यवस्था तर केलीच, शिवाय श्री व्यंकटेश्वरास एक मौल्यवान रत्नहारही अर्पण केला

मंदिराकडे जाताना प्रथम डाव्या बाजूला एक मोठा हॉल ( मंडप ) दिसला आतमध्ये अनेक भाविक वृद्ध, तरूण, मुले नवस फेडण्यासाठी मुंडन करून घेताना दिसली पुरुषच नव्हे तर वृद्ध, तरूण स्त्रियाही मुंडन करून केस देवाला श्रद्धेने अर्पण करीत होत्या. हे केस परदेशात निर्यात होतात अशी माहिती मिळाली अंगावर नवे कपडे व मुंडन केलेले डोके असे दृश्य दिसत होते, अनेक कुटुंबेच्या कुटुंबे मुंडन केलेली दिसत होती. लहान मुलांचे जावळ काढायलाही बरेच लोक आले होते आमचा उदय आपलेही मुंडन करतील या धास्तीने आतमध्ये यायला अजिबात तयार होईना व आम्हालाही तेथे थांबू देईना.

मंदिराजवळच्या कुंडात भाविक लोक स्नान करीत होते देवदर्शनासाठी सुमारे दोन तीन हजार भाविकांची रांग होती रांगेत उभे न रहाता जर लवकर दर्शन हवे असेल तर २५ रुपयापासून १०० रुपयापर्यंत तिकीट आहे आम्ही मात्र ठिकठिणाहून आलेल्या भाविक लोकाबरोबर रांगेत उभे राहिलो सुरुवातीला प्रशस्त हॉलमध्ये सिमेंटचे बाक आहेत हॉलमध्ये

पिण्याच्या पाण्याची सोय आहे विविध खाद्यपदार्थ, पेये विक्रीला येतात. गर्दीमुळे देवदर्शनाला उशीर लागणार असतो हॉलमध्ये छताखालच्या लोखडी सळयांवरची माकडे लोकाची चांगलीच करमणूक करतात

हॉलनतर मदिराच्या आवाराला वेढा घालणारा प्रदक्षिणा मार्ग आहे त्यातून रांग हळूहळू पुढे सरकत होती प्रदक्षिणा मार्गाच्या भोवती लोखडी जाळी आहे या जाळीच्या बाहेर भोवती अनेक भिकारी उभे होते. लुळे, पांगळे, आंधळे ! त्याच्या हातात काठीला लावलेले भिक्षेचे डबे होते. भाविकांसमोर ते डबे येतील अशा पद्धतीने काठ्या धरून ते रांगेत उभे होते मदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत त्यांची रांग असल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष करणेही अशक्य होते हिंदु मदिरांजवळील भिक्षेकऱ्यांचा उपद्रव दूर होणे जरूर आहे

मदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत आलो तेव्हा भाविकानी गोविंदा गोविंदा असा असा एकदम गजर केला. नाना जातीचे, पथाचे, धर्माचे लोक भेदभाव विसरून देवदर्शनासाठी एकत्र जमले होते. हजारो लोकाना एकत्र आणण्याचे महान सास्कृतिक कार्य देवदेवता नक्कीच करतात.

मदिराच्या प्रवेशद्वाराजवळ १३ व्या शतकात बाधलेले गोपुर आहे मदिराचे क्षेत्र दोन एकर इतके विस्तृत आहे मदिरात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला रगनायकूल हा मोठा मडप प्रथम लागतो हा मडप १०८ फूट लाब व ६० फूट रुद आहे. या मडपात छोटे मदिर आहे. तेथे मुसलमानांच्या आक्रमणाच्यावेळी मूर्ती गुप्तपणे ठेवली होती या मडपाजवळच लहान प्रतिमामडप आहे तेथे पाच फूट उचीचा व्यकटापतिराया या राजाचा ताब्याचा पुतळा आहे तसेच विजयनगरचा राजा अच्युतराव व राणी वरदराजीअम्मा ह्याचे दोन पुतळे आहेत या पुतळ्याचे शिल्प अप्रतिम आहे प्रतिमा मडपाच्या उत्तरेस विजयनगरचा महान सम्राट कृष्णदेवराय याचा कमलासनावर अधिष्ठित पुतळा आहे त्याच्या दोन बाजूना राणी चित्रादेवी व तिरुमलदेवी यांचे सुदर पुतळे आहेत.

नतरचा मडप तिरुमलराय मडप ! १०८ फूट लांब व ४० फूट रुद मडपाच्या स्तंभावर गोपीवस्त्रहरण, हिरण्यकश्यपू वध, कोदडधारी श्रीराम, मुरलीवादन

करणारा श्रीकृष्ण इ अनेक सुदर शिल्पकृती आहेत एका छोटचा सिंहावर अधिष्ठित स्तभावर थाप मारली असता मजुळ ध्वनी निघतो.

या मडपापासून पुढे जात असताना ध्वजस्तभाच्या डाव्या बाजूला आयने महाल लागतो तेथील विहिरीत देवाची फुले, हार इ निर्माल्य टाकण्यात येते नतर ध्वजस्तभ मडपात पोहोचलो तेथे हसावर अधिष्ठित चार भुजाची त्रिमूर्ती एका स्तभावर आहे आणखी एका स्तभावर एका स्त्रीच्या उजव्या हातात पोपट असून दासी तिचे कमरेखाली वस्त्र फेडीत आहे असे दृश्य कोरले आहे गोपीवस्त्रहरणाचा प्रसगही कोरला आहे मिथुनशिल्पेही बरीच आहेत ध्वजस्तभ सागवानी लाकडाचा गोलाकार असून वर ताम्याच्या पत्र्याने मढवलेला आहे. त्यावर गरूड, अजनेय, गोवर्धनधारी श्रीकृष्ण, कालियामर्दन ही दृश्ये कोरली आहेत

नतर लागतो कल्याणमडप । ८० फूट लांबीचा व ३६ फूट रुदीचा हा मडप म्हणजे विजयनगरकालीन शिल्पाचा अत्युत्कृष्ट नमुना । प्रणयाराधन करणारा शिकारी, कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, आपसात भाडणारी दोन माकडे हिरण्यकश्यपूवध इ दृश्ये स्तभावर कोरली आहेत याच मडपात भगवताचा विवाह साजरा झाला अशी भावना आहे येथे विवाह करण्याला मुहुर्ताची आवश्यकता नाही. त्यामुळे अनेक इच्छुक वधू–वर याची विवाह साजरा करण्यासाठी वर्षभर वर्दळ चालू असते अशी मजेदार हकीगत ऐकताना नजरे समोर उतावळे नवरदेव दिसू लागले ।

मदिराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन बाजूला ताम्याच्या जयविजय या द्वारपालाच्या सुदर मुर्ती आहेत गर्भगृहात प्रवेश करताच भाविकानी गोविंदा गोविंदा असा एकच जल्लोष केला तीन तास रागेतून मार्गक्रमणा करता करता किंचित् थकलेले भाविक भगवताच्या साक्षात् दर्शनासाठी सज्ज झाले

भगवताच्या सगुण मनोहररूपाचे दर्शन झाल्यावर कृतकृत्य झालो श्रीव्यकटेशाची देखणी मूर्ती शाळीग्राम शीळेची असून सुमारे दहा फूट उच आहे मूर्ती कमळावर उभी आहे व ती सुहास्यवदनी असून भक्ताविषयी असलेले अपार प्रेम तिच्या चेहेऱ्यावर विलसत होते केशसभार विपुल असून खांद्यां-वर कुरळचा बटा रुळत होत्या कानात कर्णफुले होती मूर्ती चतूर्भुज असून

वरच्या उजव्या हातात सुदर्शनचक्र व डाव्या हातात शख आहेत. पायात साखळ्या होत्या भगवताची मनोहारी, भव्य, उदात्त मूर्ती पाहून नयन तृप्त झाले

मूर्तीच्या नासिकवर पट्टा आहे त्याबाबत पौराणिक कथा अशी आहे. आपल्या पतीचा-भगवान श्रीविष्णूचा-भृगुऋषींनी केलेला अपमान सहन न होऊन लक्ष्मीदेवी रुसून भूलोकी निघून गेली तिचा वियोग सहन न होऊन भगवान श्रीविष्णू आहारपाणी वर्ज्य करून शेषाचल पर्वतावर एका वृक्षाखाली बिळात ध्यानस्थ बसले. ब्रह्मदेव व महेश्वर यांनी भगवानाचा शोध घेऊन लक्ष्मीदेवीला जाऊन सांगितले की, आम्ही दोघे गाय व वासरु याचे रुप धारण करतो. तुम्ही गवळणीचे रुप धारण करा व गायवासरास चद्रगिरीचे राजाला विका त्याप्रमाणे दोघानी गायवासराचे रुप घेतले. देवीने गवळणीचे रुप घेऊन ती दोन्ही राजाला विकली

राजाचा नोकर गायवासराला दररोज चरायला शेषाचल पर्वतावरील जगलात घेऊन जाई त्यावेळी गाय बिळात जाऊन विष्णूला दूध देई व वासराबरोबर परते त्यामुळे गाय घरी दूध देईना एके दिवशी गाय बिळात जाऊन दूध देते हे नोकराने पाहिल्यावर त्याला राग आला तो कुऱ्हाडीने गाईच्या मस्तकावर प्रहार करणार तोच भगवान विष्णु बिळातून बाहेर आले व त्यानी कुऱ्हाडीचा तो प्रहार आपल्या मस्तकावर घेतला त्यावेळी त्याच्या नासिकेतून रक्त निघाले उपचारासाठी तेथे पट्टी बाधण्यात आली ती पट्टी अजूनही मूर्तीच्या चेहऱ्यावर दिसते

श्रीव्यकटेश्वराची मूर्ती नानाप्रकारच्या फुलानी व अलकारांनी सजवली होती- त्याच्या शरीरावर पाचू, हिरे, माणके, व रत्नखचित मुकूट व सुवर्ण-हार होते भगवताच्या तीन इच व्यासाचा पाचू जगात मोठा समजला जातो भगवंताच्या उजव्या बाजूस श्रीलक्ष्मी व डाव्या बाजूस पद्मावती या विराजमान झालेल्या आहेत त्याच्या मूळ मूर्तीखेरीज भोगश्रीनिवास, उत्सवश्रीनिवास, उग्रश्रीनिवास व दरबार श्रीनिवास अशा चार मूर्ती आहेत. तिरुपती बालाजीचे डोळे तेजस्वी असून त्यावर चदनाचा लेप लावला आहे. दर्शनाच्या वेळी पुजारी क्षणभर चांदीचा मुकुट मस्तकावर ठेवून भक्ताला आशीर्वाद देतो

हजारो लोक भगवतांच्या चरणी लीन होताना पाहून मनात विचार आले की आजचे युग आधुनिक, वैज्ञानिक असूनही लोकाची देवावरची श्रद्धा यत्किंचितही कमी झालेली दिसत नाही याचे कारण काय असावे ? मनुष्याचे जीवन आजही विवचना, कटकटी, संकटे यानी भरले आहे अजूनही जीवनाचा मार्ग काटेरीच असतो मृत्यू येईपर्यंत माणसाचे जीवन दैवाधीन, दुःखाने भरलेलेच आहे अशावेळी परमेश्वराचाच आधार वाटतो जीवन अशाश्वत असल्याने शाश्वत अशा दैवी शक्तीना तो मानणारच

मुख्य देवळाच्या सभामडपात एक मोठी हुडी ठेवली आहे. तिच्यात भक्तगण स्वेच्छेने दान टाकतात मंदिरात देवापुढे पैसे टाका असा पढरपूर काशी येथील पुजाऱ्याप्रमाणे लकडा नसल्याने समाधान वाटते भाविक लोकात अशी समजूत आहे की हुडीत जेवढे दान आपण टाकू त्याच्या दुप्पट पैसे आपल्याला मिळतात, त्यामुळे हुडीत नाणी, नोटा, सुवर्णालंकार, चेक, घड्याळेसुद्धा टाकली जातात चिल्लर चाळण्यासाठी चाळण्या आहेत या प्रचंड धनाचा उपयोग देवस्थान ट्रस्टद्वारे विद्यापीठ, दवाखाना, शाळा, कॉलेज चालविणे इ. विविध लोकोपयोगी कामांकडे होत असतो

भगवतांची मूर्ती असलेल्या गाभाऱ्यावरील गोपुरास 'आनंद निलय विमान' म्हणतात, हे गोपुर १३ व्या शतकात बाधले असून ते ३८ फूट उचीचे आहे या गोपुरास अडीच लाख रुपये किमतीच्या ताब्याच्या पत्र्याने मढविले आहे या गोपुरास व कळसास सोन्याचा मुलामा दिला आहे त्यासाठी बारा लाख रुपयांचा बारा हजार तोळे सुवर्णाचा वापर करण्यात आला आहे गोपुरावर विष्णु, कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, गरुड, हनुमान इ. च्या मूर्ती असून सर्वात वर सिंहाच्या सुदर मूर्ती आहेत

तिरुमलाची यात्रा पूर्ण झाली होती भगवान श्री व्यंकटेशबालाजीच्या दर्शनाने अनेक दिवसाची इच्छा पूर्ण झाली होती आकाशगगा, शकराचे कपालीश्वर मदिर, कपिलतीर्थ, शैव पथीयांचे कालहस्ती इ दर्शनीय स्थळाचा फेरफटका वेळेअभावी सोडून दिला.

घाट ओलांडून बस दुपारी दोन वाजता तिरुपतीला पोहोचली. गावात भीमा हॉटेल हे प्रख्यात हॉटेल असून दाक्षिणात्य पद्धतीच्या जेवणाप्रमाणेच

बॉम्बे मीलही तेथे मिळते. डायनिंग हॉल वातानुकूलित असून स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे सर्व्हिसही चांगली आहे. जेवणानंतर तिरुपतीच्या बाजारात चक्कर मारली. विविध दुकानांनी सजलेली बाजारपेठ आकर्षक वाटली

सायंकाळचे पाच वाजले. तिरुपती स्टेशनमध्ये बालाजी एक्स्प्रेस तयारच होती. मद्रासला जाण्यासाठी अतिशय सोयिस्कर अशी ही गाडी आहे. या नव्या व वेगवान गाडीत सुदैवाने ऐसपैस जागा मिळाली. रात्रीचे नऊ वाजले तेव्हा मद्रास सेंट्रल या ब्रॉडगेजच्या प्रचंड स्टेशनच्या आवारात बालाजी एक्स्प्रेस शिरली

हमालाजवळ सामान देऊन पायीच स्टेशननजीकच्या विश्राम लॉजमध्ये पोहोचलो. प्रवासाने मुले कटाळली होती भुकेनेही पोटात काहूर माजवले होते. जेवण आटोपले. थकल्यामुळे चटकन झोप लागली.

□

# तामीळ संस्कृतीचे मद्रास

मद्रास ! दक्षिण भारतातील प्रमुख आणि भारतातील चौथ्या क्रमांकाचे शहर ! कलकत्त्याप्रमाणेच मद्रास हे इंग्रजांचे अपत्य ! १६३९ मध्ये विजयनगरच्या साम्राज्याखाली असलेली समुद्राकाठची ही अरुंद पट्टी राजा चंद्रगिरीकडून फ्रान्सिस डे याने ईस्ट इंडिया कंपनीसाठी देणगी म्हणून मिळवली मद्रासपटणम् या मूळच्या मच्छीमाराच्या छोट्या खेड्यावरून आजचे मद्रास नाव प्रचलित झाले तामीळ भाषेत पटणम म्हणजे समुद्राकाठचे शहर ! इंग्रजांनी येथे व्यापारासाठी पहिली वखार स्थापली नंतर १६५४ मध्ये मद्रासचा प्रसिद्ध सेंट जॉर्ज किल्ला बांधण्यात आला हळू हळू मद्रासचा विस्तार वाढू लागला आजूबाजूची अनेक खेडी त्यात सामील होऊन आजच्या विशाल मद्रास शहराने नवे रूप धारण केले

मद्रास शहराचा फेरफटका एक दिवसात संपवायचा होता सकाळी टॅक्सी करून नऊ वाजता बाहेर पडलो. मद्रास सेंट्रल या रेल्वे स्टेशनजवळून टॅक्सी वळली. तेव्हा प्रथमदर्शनी सदर्न रेल्वेचे मोठे कार्यालय दिसले पश्चिमेला महानगरपालिकेची मोठी इमारत आहे. नंतर दिसले मद्रासचे शंभर वर्षांपूर्वीचे जुने जनरल हॉस्पिटल !

प्रथम आम्ही गेलो चायनाबाजारमध्ये ! दिवाळीच्या खरेदीसाठी बाजार गर्दीने फुलला होता. माणसाचे लोंढेच्या लोंढे जणू वहात होते त्या गर्दीत सायकल रिक्षा, टॅक्सी इ. वहानांच्या गर्दीचीही भर पडत होती लगतच मद्रास हायकोर्टाची ग्रीक धर्तीची प्रशस्त इमारत आहे तेथे आवारातच

जुने लाईट हाऊस टॉवर आहे १६० फूट उंचीचा हा टॉवर १८९४ मध्ये बंदरांच्या उपयोगासाठी बांधला या उंच मनोऱ्यावरून शहराचे विहंगम दृश्य दिसते

बाजारपेठ संपल्यावर टॅक्सी मद्रास बंदराच्या दिशेने वळली तो दिवस जहाजाच्या आगमनाचा असल्याने बंदर पाहता आले नाही त्यामुळे चुटपूट लागली

टॅक्सी नंतर मद्रासच्या प्रसिद्ध माऊंट रोडवरून धावू लागली थॉमस माऊंट या ख्रिश्चन संताच्या नावावरून हे नाव पडले त्याच्यामुळे हिंदुस्थानात ख्रिश्चन धर्माचा प्रसार पहिल्या शतकात झाला होता मुंबईच्या फोर्ट भागाप्रमाणे मोठमोठ्या बँका, कचेऱ्या इ या रोडवर आहेत

## मद्रासचे भूषण–मरीना बीच

टॅक्सी मद्रासच्या प्रख्यात मरीना बीचच्या दिशेने प्रशस्त सरळ रस्त्याने धावू लागली एका बाजूला उंच उंच राजशाही इमारती होत्या तर दुसऱ्या बाजूला वालुकामय किनारा होता अथांग समुद्राच्या निळसर पाण्यावर लाटा गर्जत होत्या आठ मैल लांबीचा हा मरीना बीच आशिया खंडात तर सर्वांत मोठा आहेच, पण शिवाय जगातही त्याचा दुसरा क्रमांक लागतो. मरीनाबीच म्हणजेच मद्रासचे भूषण !

मरीना बीचची सुरुवात ' अण्णासमाधी ' या स्मारकाने होते मद्रासचे भूतपूर्व लोकप्रिय मुख्यमंत्री अण्णादुराई यांचे हे स्मारक ! तामिळनाडू जनतेत वेगळी अस्मिता निर्माण करणारे अण्णादुराई रामस्वामी नायकरांचे पट्टशिष्य ! वयाच्या ६० व्या वर्षी १९६९ मध्ये ते कॅन्सरमुळे कैलासवासी झाले त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मद्रास विद्यापीठासमोर हे स्मारक उभारले आहे स्मारकाकडे जाण्यासाठी पांढऱ्या रंगाच्या आकर्षक गोलाकार कमानीतून प्रवेश केला स्मारकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या बाजूला तामीळ संतकवींचे दोन पुतळे आहेत त्यानंतर पुढे गेल्यावर काळ्या संगमरवरी चबुतऱ्यावर उंच स्तंभ दिसला तेथे अखंड ज्योत तेवत होती चबुतऱ्यावर खालील वाक्य कोरले आहे,

" Here lies the noble heart which can bear anything "

आजूबाजूची प्रशस्त हिरवळ बगीच्याच्या शांत, प्रसन्न वातावरणात भर घालीत होती वगीच्यात हत्ती, मोर, घोडा, जिराफ, उंट इ. प्राण्यांचे आकर्षक पुतळे आहेत हे स्मारक पाहून पायीच रुपेरी वाळू तुडवीत निळ्या सागराचे सौंदर्य न्याहाळले

मरीना बीचच्या रस्त्यावरच नजीकच चार श्रमिकांचे पुतळे आहेत. म. गांधी, स्वामी विवेकानंद, इ पुतळेही आहेत मद्रासच्या नव्या लाईट हाऊसच्या गगनचुंबी मनोऱ्याचे पूर्ण होत असलेले काम दृष्टीस पडले

एका बाजूच्या टोकाला स्वामी विवेकानंदाचे घर दिसले १८९२ मध्ये स्वामीजींनी तेथे वास्तव्य केले होते पूर्वी आईस हाऊस या नावाने ही इमारत ओळखली जात होती तेथे परदेशातून आयात करण्यात येणारा बर्फ ठेवण्यात येई.

त्यानंतर फोर्ट सेंट जॉर्ज या किल्ल्याच्या आवारात शिरलो हा किल्ला म्हणजे ब्रिटिशांच्या कारकीर्दीचा उदय व अस्त पाहणारा स्थितप्रज्ञ साक्षीदारच! वॉटर्लू लढाईचा प्रसिद्ध हिरो ड्यूक ऑफ वेलिंग्टन (पूर्वीचा कर्नल वेलस्ली) येथेच राहात होता. या किल्ल्याच्या आवारातील फोर्ट म्युझियम ब्रिटीशकालीन इतिहासावर प्रकाश टाकीत होते किल्ल्याच्या आवारातील प्रत्येक पत्थर जणू तत्कालीन इंग्रजाच्या कर्तबगारीचा साक्षीदार आहे आज येथे तामिळनाडु सरकारचे सचिवालय, कार्यालये आहेत एकेकाळी जेथे इंग्रजांचा झेंडा फडकत होता तेथे तिरंगी झेंडा डौलाने फडकत आहे

किल्ल्याच्या आवारात १६८० मध्ये बांधलेले उंच सेंट मेरी प्रॉटेस्टंट चर्च आशियात सर्वात जुने समजले जाते रॉबर्ट क्लाईव्हचा विवाह या चर्चमध्येच साजरा झाला

मरीना बीचवरील आणखी एक प्रख्यात इमारत म्हणजे चेपॉक राजप्रासाद १७६८ मध्ये तो बांधला १८५५ पर्यंत कर्नाटकच्या नवाबांचे ते निवासस्थान होते. यातील मुख्य प्रासादाची दोन दालने असून दक्षिणेकडचे खासमहल व उत्तरेकडचे हुमायूनमहल या नावाने ओळखले जाते तिथल्या दिवाण-खान्यात दरबार भरवला जाई एकेकाळचा हा महाल आज सरकारी कचेऱ्यांनी गजबजलेला आहे. या राजवाड्यामागे मद्रासचे प्रख्यात चेपॉक

क्रिकेटग्राऊंड आहे तेथे एकावेळी अर्ध्या लाखावर क्रीडाप्रेमी बसून मॅचचा आनंद लुटू शकतात

मरीना बीचवरच पोहोण्याचा आलिशान तलाव व मत्स्यालय आहे. मरीनाबीचच्या शेवटी असलेल्या सॅनथोम या ऐतिहासिक चर्चमध्ये पोहोचलो दक्षिण हिंदुस्थानात आलेला सेंट थॉमस हा पहिला मिशनरी। त्याचे दफन येथे केले आहे मार्कोपोलोने तेराव्या शतकात या स्थानास भेट दिली होती सोळाव्या शतकात येथे प्रथम चर्च बांधण्यात आले १८९६ मध्ये पूर्वीच्या जागी निमुळते शिखर असलेले नवे कॅथेड्रल बांधले मद्रास शहराच्या ३०० वर्षांच्या इतिहासापेक्षाही जुना प्राचीन इतिहास या चर्चला आहे

राजाजी हॉल, चिल्ड्रेन थिएटर, आमदार निवास, एल. आय. सी. ची गगनचुंबी इमारत तसेच भव्य सहकारी सुपरमार्केट, इ माऊंट रोडवरील प्रेक्षणीय स्थळे आहेत

त्यानंतर अड्यार नदीवरील पूल ओलांडून टॅक्सी थिऑसॉफिकल सोसायटीच्या आवारासमोर आली स्वर्गीय ॲनी बेझंट यांची ही कर्मभूमी सोसायटीच्या विशाल आवाराच्या बगीच्यातील प्रचंड वटवृक्ष हा पर्यटकांचे आकर्षणकेंद्र आहे. या वटवृक्षाचा विस्तार दोनशे चौरस फूट आहे. सोसायटीच्या लायब्ररीत विविध दुर्मिळ हस्तलिखिते, भूर्जपत्रे इ चा प्रचंड सग्रह आहे नृत्यसंगीताला वाहिलेली ॲकॅडमी या बगीच्याच्या आवारात आहे. थिऑसॉफिकल सोसायटीचा मध्यवर्ती हॉल भव्य आहे बुद्ध, महावीर, झरतुष्ट्र, येशू ख्रिस्त, श्रीकृष्ण यांचे तसेच मादाम ब्लॅव्हेटस्की व ॲनी बेझंट यांचे पुतळे आढळतात मध्यावर सोसायटीचे 'There is no religion greater than Truth' हे वाक्य कोरले आहे

अड्यारनतर आम्ही मईलापूर (Peacock Town) येथे गेलो मइला या तामीळ शब्दाचा अर्थ मोर असा आहे. मइलापूरला भरगच्च ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे पूर्वी पल्लवकाली मइलापूर प्राचीन बंदर होते ते व्यापारासाठी जसे प्रसिद्ध होते तसेच सांस्कृतिक केंद्रही होते दोन हजार वर्षांपूर्वी तामीळ संतकवी तिरुवल्लूवर यांचे येथे वास्तव्य होते

येथील कपालेश्वर हे प्रेक्षणीय मदिर समुद्रकाठापासून अर्ध्या मैलावर आहे. मदिराचे दाक्षिणात्य पद्धतीचे गोपुर १२० फूट उंच आहे शकर, पार्वती, गणेश इ च्या मूर्ती गोपुरावर असून समुद्रमथनाचाही देखावा कोरला आहे मदिरात प्रवेश केल्यावर मोठे प्रांगण लागते हे शिवमदिर असून मुख्य मदिरात शिवलिंग आहे समोर नदी आहे मदिरात दगडी स्तभ आहेत बाहेर ६३ दगडी लहान लहान मूर्ती असून त्याना वस्त्रे नेसवली होती नटराज, दुर्गा, ब्रह्मा, विष्णु इ च्याही मूर्ती मदिरात आहेत या कपालेश्वरमदिराशेजारीच पार्वतीमदिर आहे तसेच नृत्यविनायक, सुदरेश्वर इ चीही मदिरे आहेत पश्चिमेला तळे आहे

पोर्तुगीजानी १५६६ मध्ये या मदिराचा नाश केला नतर हे मदिर सतराव्या शतकात बाधले गेले काही जुने शिलालेख अजून आढळतात. एका झाडाखाली छोट्या मदिरात देवी उमा शिवाच्या मोराच्या (मइला) स्वरूपातील लिगाची पूजा करते असे दृश्य कोरले आहे मदिरात मार्च एप्रिलमध्ये ब्रह्मोत्सव होतो त्यावेळी रथयात्रा निघते तेव्हा १० लाख यात्रेकरू जमतात अशी माहिती मिळाली

साऊथबीचरोडच्या शेवटी मइलापूरपासून तीन मैलावर त्रिपलीकेन येथे विष्णूचे पार्थसारथी मदिर आहे तेथे तामीळ कवी सुब्रह्मण्यमभारती व गणिताचार्य रामानुजम राहात होते पार्थसारथी मदिर आठव्या शतकात पल्लवकाली बाधले गेले विजयनगरच्या राजानी सोळाव्या शतकात त्यात भर घातली मदिरासमोर सुदर तळे आहे

## मद्रासचे आगळे सर्पोद्यान


आमची टॅक्सी आता गुडी रोडवर आली तेथे प्रथम हरणाचे अभयारण्य (Deer Park Sanctuary) पाहिले, तेथे चित्रविचित्र रगाची, ठिपकेदार हरणे अनेक आहेत उल्का-उदय येथ रमून गल


शेजारीच मद्रासचे नवे प्रसिद्ध सर्पोद्यान (Snake Park) आहे. जागतिक वन्य पशुपक्षी फडाच्या आर्थिक मदतीतून हे सर्पोद्यान १९७१ मध्ये गांधी जयतीला उभारण्यात आले या छोट्या पार्कमध्ये तीसपेक्षा अधिक



↑ आगळे सर्पोद्यान, मद्रास.

↓ अण्णादुराई स्मारक-मरीनाबीच, मद्रास.





अर्जुनाची तपस्या, महाबलीपुरम्

पंचपाडवरथ, महाबलीपुरम्



नमुन्यांचे चारशे सर्प आहेत. त्यात उदरासारखे बिळात सापडणारे, Rat snake जसे आहेत तसेच फांद्यावरून उड्या मारणारे bronze back tree snake ही आहेत

या सर्पोद्यानातील साप बंद पिंजऱ्यात ठेवलेले नसून मुद्दाम तयार करण्यात आलेल्या खोलगट भागामध्ये उघड्यावर आहेत खोलगट भागाभोवती साधारण पाच फूट उंचीची गोलाकार भिंत आहे त्यावर झाकण नाही अनेक साप नैसर्गिक अवस्थेत सळसळत, लोंबकळत एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर झेपावताना पहाताना मौज वाटली काहींचा रंग गवतासारखा होता काही ठिकाणी पाण्याची डबकी तयार करण्यात आली आहेत साप मधून मधून गारव्यासाठी पाण्यातही उतरतात पाण्यात सरपटणारे सर्प दृष्टीला पडले १८ फूट लांबीचे अजगर जसे तेथे होते तशाच मगरीही होत्या सर्पतज्ज्ञांच्या मते Cobra, Krait, Russell's viper, saw scaled viper या चारच विषारी जाती आहेत त्यातही krait ही जात सर्वात विषारी असते

तेथील डायरेक्टर आवर्जून उल्लेख करीत होते की 'इरुला' नावाच्या टोळीवाल्यांच्या मदतीमुळे अनेक जातींचे सर्प गोळा होऊ शकले सापाबद्दल अनेक मजेदार हकीकती ऐकायला मिळाल्या उंदीर हे सापाचे आवडते खाद्य, म्हणून साप हा शेतकऱ्याचा खरा मित्र होय. धान्याचा वीस टक्के नाश उंदरांमुळे होतो त्यांच्यापासून होणारा धान्याचा नाश साप थांबवतो. साप एका वेळी सुमारे वीस अंडी देतो त्याचे आयुष्य साधारण वीस वर्षे असते साप डूख धरतो असे म्हणतात पण उलट सापाला माणसाची भीती वाटते सापाला कान नसल्याने त्याला ऐकू येत नाही तो अन्नाशिवाय वर्षभर जगू शकतो पण त्याला जगण्यासाठी पाणी मात्र आवश्यक असते भारतात सर्पांच्या साधारण २३० जाती आढळतात त्यापैकी ७० जातींचे सर्प विषारी आहेत थोडक्यात विषारी सर्पांचे बिनविषारी सर्पांशी प्रमाण १ ४ आहे सर्वच साप विषारी नसतात साप दिसल्यावर त्याला त्याच्या मतानेच जाऊ द्यावे त्याला मारण्याच्या मागे लागू नये सापाच्या विषाचा औषधासाठी वापर केला जातो सापाचे विष काढण्याचे प्रात्यक्षिक तेथे केले

जाते सापाबद्दल शास्त्रशुद्ध अभ्यास, सशोधन करणारे हे सर्पोद्यान पाहून फार आनद झाला

## तीन स्मारके

सर्पोद्यान पाहिल्यावर गुडीरोडवरील एका रागेत असणारी राजाजी, गांधीजी आणि कामराज यांची स्मारके पाहण्यास सुरुवात केली

चक्रवर्ती राजगोपालचारी हे भारताचे स्वातत्र्योत्तर कालातील पहिले गव्हर्नर जनरल ! मद्रासचे थोर सुपुत्र. राजकारणातील श्रेष्ठ मुरब्बी ! चाणक्यनीतीसाठी प्रसिद्ध असलेल्या राजाजीच्या स्मारकाच्या वास्तूची पायाभरणी १९७३ मध्ये भूतपूर्व राष्ट्रपती श्री गिरी यांच्या हस्ते झाली व उद्घाटन १९७५ मध्ये सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यानी केले.

या अष्टकोनी इमारतीत आठ काळ्या रगाचे स्तभ आहेत. जयप्रकाश, म गाधी, विनोबाजी, रामस्वामी नायकर, कामराज, नेहरू, इदिरा गाधी, केनेडी, लालबहादूर शास्त्री याच्याबरोबरच्या प्रसगांची राजाजींची भव्य तैलचित्रे तेथे आहेत त्यातील एक प्रसग ते गव्हर्नर जनरल झाले त्यावेळचा आहे

त्यानतर गांधीमडप या दहा एकराच्या प्रशस्त आवारात असलेल्या गांधी स्मारकात प्रवेश केला प्रवेश द्वारावर गोपुर असून बाजूला दोन काळे दगडी हत्ती आहेत १९५३ मध्ये मद्रासचे भूतपूर्व गव्हर्नर श्रीप्रकाश यांनी या स्मारकाची पायाभरणी केली व १९५६ मध्ये त्याचे उद्घाटन चक्रवर्ती राजगोपालचारी यानी केले या गाधीमडपात एक प्रार्थनागृह असून सर्वधर्मांचे लोक तेथे प्रार्थना करु शकतात तेथील दगडी स्तभावर तळाला कोरीवकाम आहे अर्धवर्तुळाकार पॅसेज दोन्ही बाजूला असून इग्रजी, तामीळ, उर्दू, सस्कृत भाषेत म गाधींची काही वचने कोरली आहेत या मडपासमोरील उच्च अशोकवृक्षाची झाडे रमणीय आहेत.

नजीकच कामराजस्मारक आहे स्व. कामराज हे तामिळनाडूचे खरेखुरे लोकप्रिय नेते ! त्यांच्या साधेपणाला सीमा नव्हती त्यांच्या या स्मारकाचे उद्घाटन १४ फेब्रुवारी १९७६ मध्ये इदिरा गाधींनी केले. स्मारकात मध्ये काळा सगमरवरी चबुतरा असून बाजूला चार गोलाकार पाढरेशुभ्र स्तभ आहेत सभोवती सिमेंट कॉंक्रीटची जाळी आहे

## प्राचीन संतकवीचे आधुनिक स्मारक—

त्यानतर प्राचीन तामीळ सतकवी तिरुवल्लूवर याचे 'वालूवर कोट्टम' हे अगदी आगळेवेगळे स्मारक पाहिले मद्रास शहराचे हे एक नवे आकर्षण आहे मद्रासच्या वैभवात या स्मारकाने भरच घातली आहे हे स्मारक म्हणजे एक प्रचड मदिरच आहे दक्षिण भारताच्या भव्य व कलाकुसरीबद्दल प्रसिद्ध असलेल्या मदिरकलेचे हे जणू प्रतीक आहे सुमारे तीन चौरस कि मी च्या आवारात हे भव्य स्मारक आहे. प्राचीन दगडी शिल्पकाम व आधुनिक काँक्रीटचा वापर यामुळे जुन्या व नव्याचा मधुर सगम या स्मारकात आहे त्याची कल्पना करून हे मदिर बांधले आहे.

प्रवेशद्वारावर द्रविड पद्धतीचे गोपुर असून आत प्रवेश केल्यावर सुदर हिरवळ लागते त्यानतर लागते भव्य सभागृह! या सभागृहात एकही खाब नाही सुमारे ६७ मीटर लांब व ३१ मीटर रुद असे हे भव्य सभागृह मोठे प्रेक्षणीय आहे एकावेळी चार हजार प्रेक्षक तेथे सहज बसू शकतील आतील बाकाच्या आडव्या सात रांगा व उभ्या छत्तीस रागा आहेत. आशियातील हे सर्वात मोठे सभागृह ठरेल. चीनमधील नॅशनल असेंब्ली हॉलपेक्षाही या कोट्टम (मदिर) मधील सभागृह मोठे आहे येथील प्रकाशाची व श्रवणाची व्यवस्थाही अत्याधुनिक पद्धतीची आहे या सभागृहाला प्रशस्त गॅलरी आहे गॅलरीतल्या प्रत्येक खाबावर वचने कोरली आहेत

सभागृहाच्या मागे ३१ फूट उचीचा दगडी रथ आहे सात फूट उचीचे दोन दगडी हत्ती जणू हा रथ ओढतात बाजूला चार मोठी चक्रे आहेत त्यातील दोन चाके मोठी असून दोन लहान आहेत मोठ्या चक्रांचा व्यास सुमारे अकरा फूट आहे अखड दगडातील या चक्राचे वजन प्रत्येकी ४० टन आहे. त्यावर नक्षीकाम करण्याचे काम चालू होते

या रथात वरच्या बाजूला तिरुवल्लूवर या प्रख्यात सतकवीचा सात फूट उचीचा आसनस्थ पुतळा आहे हा सतकवी सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला तो साळी जातीचा होता कुरळ हा त्याचा ग्रथ! तामीळ भाषेचा वेद अशी या ग्रथाची कीर्ती आहे त्या काळातील सघम या विद्वत्-सभेतील पडितानी प्रथम या ग्रथाची चेष्टा केली पण वल्लुवरने तो त्यांना

वाचून दाखविल्यावर मात्र त्यानी त्याला एकमुखाने मान्यता दिली व त्याच्या नावामागे 'तिरु' ही पूज्यतादर्शक उपाधी जोडली तेव्हापासून कुरुळ ग्रथ तिरुकुरळ व वल्लूवर कवीही तिरुवल्लूवर या नावाने ओळखला जाऊ लागला तिरुकुरळ ग्रथातील विचार सर्वंकष आहेत, त्याचा स्वाद देशकालातीत आहे व तामीळ साहित्याचा तो अमृतकलश आहे हा कवी ज्या काळात होऊन गेला त्या काळातील अनेक कवीचे पुतळेही या मदिरात आहेत रथाच्या वरच्या २२० फूट लांबीच्या १४० फूट रुदीच्या व्हरांड्यात या कवीच्या 'तिरुकुरळ' काव्यातील १३३० कविता तीन निरनिराळ्या रगात कोरल्या आहेत रथासमोर चौकोनी तळे असून त्यात रथाचे मनोहारी प्रतिबिब दिसते

ह्या स्मारकाच्या खर्चाचा अदाज ४८ लाखरुपये होता पण प्रत्यक्षात ७५ लाख रुपये खर्च झाले या मदिराचे उद्घाटन मरहूम राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी १९७५ मध्ये केले हे स्मारक पाहून मनात विचार आले की खरच किती वेगळे स्मारक आहे हे! बहुतेक भारतीय भाषामध्ये अनेक थोर सतकवी होऊन गेले पण कुणाचेही एवढे भव्य स्मारक उभारण्यात आलेले नाही

मद्रासचा फेरफटका पूर्ण होत आला होता. शेवटी मद्रासच्या म्युझियम-मध्ये आलो इ स १८५१ मध्ये हे म्युझियम स्थापन करण्यात आले. कला, पुराणवस्तुशिल्प, भूगर्भशास्त्रीय, वनस्पती, प्राणी याविषयक विविध दालने यात आहेत मुलांसाठी Children Gallery आहे तेथे पृथ्वीचा सोप्या भाषेत परिचय करुन दिला आहे पूर्वीचे प्राणी, मानवी अवयव, दळणवळणाची साधने इ चीही माहिती दिली आहे भारतातील विविध बाहुल्यांचा चागला परिचय करुन दिला आहे भरतनाट्य, कथ्यक इ शास्त्रीय नृत्याचीही माहिती दिली आहे

बुद्धदालनात बुद्धाचे सापडलेले शेकडो पुतळे आहेत त्यात दक्षिण हिंदुस्थानातील बुद्धकालीन पुतळे आहेत तसेच अमरावती शिल्पाचे नमुने आहेत जातककथा कोरलेल्या आहेत प्रेक्षणीय ब्रॉंझ गॅलरीत ब्रॉंझचे सुदर पुतळे आहेत नटराजाच्या मूर्ती, शिवमूर्ती सुदर व रेखीव आहेत प्राणी-दालनात शेकडो पशु–पक्षी भुसा भरून ठेवले आहेत.

या म्युझियममध्ये ठिकठिकाणी बोर्ड लावले आहेत की येथील विविध दालनातील रक्षकाना बक्षिसी देऊ नका कोणी मागितली तर तसे कळवा. पण तरीसुद्धा अनेक रक्षक आपणहून थोडीशी माहिती सांगून लाचारपणे हसून हात पुढे करीत बक्षिसीसाठी हे सूतोवाच होते आम्ही बोर्डकडे अंगुलीनिर्देश करताच मात्र त्याचा चेहेरा ओशाळत असे

मद्रासची भेट संपली होती मद्रासी लोक वर्णाने काळे आणि राहणीचे साधे आहेत शर्ट व लुंगीसारखे धोतर हा त्याचा वेष ! संपूर्ण तळहात भरेल अशाप्रकारे भात कालवून खाण्याबद्दल प्रसिद्ध असलेले हे लोक इडल्या सुद्धा तशाच प्रकारे कालवून खाताना दिसत हिंदीचा प्रचार इकडे नाहीच! सफाईदार इंग्रजी अगदी वेटर, पानपट्टीवाले, टॅक्सी ड्रायव्हरही बोलताना दिसतात.

मद्रास एग्मोर या मीटर गेजच्या रेल्वे स्टेशनजवळ दुसऱ्या दिवशीच्या रामेश्वरकडे जाणाऱ्या गाड्याची चौकशी करण्यासाठी पोहोचलो. चौकशी करुन लॉजवर परतलो

□

# पल्लव शिल्पकृतींचा आविष्कार महाबलीपुरम्

मद्रास एग्मोर स्टेशनहून सकाळी आठला निघून तासाभरातच चिंगलपुट स्टेशनवर आलो रिटायरिंग रूमवर सामान ठेवले व स्टेशनसमोरील बसस्टँडवर आलो महाबलीपुरम्‌कडे बसने सकाळी साडेनऊला निघालो वाटेत साडेदहाच्या सुमारास आठ मैलांवरील तिरुक्कलकुड्रम उर्फ पक्षीतीर्थ या ठिकाणी पोहोचलो. पौराणिक काळापासून तेथील टेकडीवर रोज दुपारी साडेअकराला दोन पक्षी येतात, प्रसाद खातात व परत जातात. हा चमत्कार पाहण्यासाठी उत्सुकतेने अकरा वाजता टेकडी चढू लागलो.

## पक्षीतीर्थ

सुमारे पाचशे फूट उंच असलेल्या टेकडीवर जाण्यासाठी उत्तम दगडी पायऱ्या बांधल्या आहेत. पादत्राणे खालीच काढावी लागल्यामुळे अनवाणी पायांनी कडक उन्हात पायऱ्या चढत होतो उन्हामुळे अंगातून घामाच्या धारा वहात होत्या थोड्या पायऱ्या चढून विश्रांती घेऊन परत चढायला सुरुवात केली उल्का-उदय मात्र आमच्या पुढे होते आमच्याबरोबर अनेक लोक होते व पक्ष्याबद्दलची त्यांची चर्चा चालू होती निम्म्या पायऱ्या चढून झाल्या तोच वरून शंभर-दीडशे लोक पायऱ्या उतरताना दिसले आम्हाला पहाताच ते लोक म्हणू लागले की पक्षी तर येऊन गेले आमच्याकडे ते 'बिचारे' अशा दृष्टीने पाहात होते आमचे टेकडीवर जाणे त्यांच्या दृष्टीने

व्यर्थ होते. अनेक लोक डोलीतून खाली उतरत होते शाळेतील मुलामुलींची ट्रीपही आलेली दिसत होती तेवढ्यात उतरता उतरता त्याच्यातला एक तेरा-चौदा वर्षांचा मुलगा पायऱ्या उतरताना घसरून जोरात पडला. त्याच्या कपाळाला खोक पडून भळभळा रक्त वाहू लागले जवळजवळ चाळीस मुलांचा ग्रुप होता तो ! बरोबर शिक्षकही होते त्यांच्या जवळ फर्स्ट-एडचे काहीच सामान नव्हते योगायोगाने चंद्रकांताच्या बॅगमध्ये बँडेज व अँटिसेप्टिक मलम इ. होते ते त्या मुलाला देऊन ड्रेसिंग केले त्यांचे शिक्षक आमचे आभार मानून म्हणाले की आमच्याजवळ फर्स्ट-एडचे सामान आहे पण ते आहे रेल्वेच्या बोगीत ! खरे म्हणजे अशा वस्तू जवळ बाळगायला हव्या शिक्षक वारवार आम्हाला धन्यवाद देत होते. वास्तविक आम्ही खास काहीच केले नव्हते पण हवी ती वस्तू वेळच्या वेळी मिळाली की आनंद होतो.

निम्मे अंतर तर चढून गेलो होतो खाली उतरणारे म्हणत होते पक्षी आज बिफोर टाईम येऊन गेले ! तुमचे बॅड लक ! पण पक्षी नाहीत तर निदान पक्षी येतात ती जागा तरी पाहावी म्हणून तसेच चिकाटीने वर चढलो

टेकडीवर सुंदर शिवमंदिर आहे मंदिराच्या खालच्या बाजूच्या एका उघड्या खडकावर मंदिराचा पुजारी भाताचे भांडे घेऊन व पाट मांडून बसतो एका ताटलीत भात ठेवून तो प्रार्थना करतो व पक्ष्यांच्या आगमनाची वाट पाहतो अकरा ते साडेअकराच्या दरम्यान एक पांढरा व एक पिवळ्या रंगाचा असे दोन घारीच्या आकाराचे पक्षी लांबून उडतउडत येऊन पुजाऱ्याजवळ बसतात. ताटातील भाताचा प्रसाद खातात व उडून जातात, अशी माहिती मिळाली हे दोन शापभ्रष्ट मुनी आहेत असा समज आहे मानससरोवराहून निघून काशीच्या मार्गाने ते उडत येतात व पक्षीतीर्थला भात खाऊन रामेश्वरला जातात अशी माहिती मिळाली ते दररोज नेमक्या वेळला येतात अशी अनेक वर्षांची परंपरा आहे सध्या जो पुजारी आहे त्याच्या अगोदर त्याचे वडील रोज प्रसादाचे भांडे घेऊन बसत असत

हे पक्षी शिकवलेले आहेत की काय याची चिकित्सा करायला वेळ

# पल्लव शिल्पकृतीचा आविष्कार महाबलीपुरम्

मद्रास एग्मोर स्टेशनहून सकाळी आठला निघून तासाभरातच चिंगलपुट स्टेशनवर आलो रिटायरिंग रूमवर सामान ठेवले व स्टेशनसमोरील बसस्टँडवर आलो महाबलीपुरम्‌कडे बसने सकाळी साडेनऊला निघालो. वाटेत साडेदहाच्या सुमारास आठ मैलांवरील तिरुक्कलुकुड्रम उर्फ पक्षीतीर्थ या ठिकाणी पोहोचलो पौराणिक काळापासून तेथील टेकडीवर रोज दुपारी साडेअकराला दोन पक्षी येतात, प्रसाद खातात व परत जातात. हा चमत्कार पाहण्यासाठी उत्सुकतेने अकरा वाजता टेकडी चढू लागलो

## पक्षीतीर्थ

सुमारे पाचशे फूट उंच असलेल्या टेकडीवर जाण्यासाठी उत्तम दगडी पायऱ्या बांधल्या आहेत. पादत्राणे खालीच काढावी लागल्यामुळे अनवाणी पायांनी कडक उन्हात पायऱ्या चढत होतो उन्हामुळे अंगातून घामाच्या धारा वहात होत्या थोड्या पायऱ्या चढून विश्रांती घेऊन परत चढायला सुरुवात केली उल्का-उदय मात्र आमच्या पुढे होते आमच्याबरोबर अनेक लोक होते व पक्ष्याबद्दलची त्यांची चर्चा चालू होती. निम्म्या पायऱ्या चढून झाल्या तोच वरून शंभर-दीडशे लोक पायऱ्या उतरताना दिसले आम्हाला पहाताच ते लोक म्हणू लागले की पक्षी तर येऊन गेले आमच्याकडे ते 'बिचारे' अशा दृष्टीने पाहात होते आमचे टेकडीवर जाणे त्यांच्या दृष्टीने

व्यर्थ होते. अनेक लोक डोलीतून खाली उतरत होते शाळेतील मुलामुलींची ट्रीपही आलेली दिसत होती तेवढ्यात उतरता उतरता त्याच्यातला एक तेरा-चौदा वर्षांचा मुलगा पायऱ्या उतरताना घसरून जोरात पडला. त्याच्या कपाळाला खोक पडून भळभळा रक्त वाहू लागले जवळजवळ चाळीस मुलांचा ग्रुप होता तो ! बरोबर शिक्षकही होते त्यांच्या जवळ फर्स्ट-एडचे काहीच सामान नव्हते. योगायोगाने चंद्रकांतांच्या बॅगमध्ये बँडेज व ॲंटिसेप्टिक मलम इ होते ते त्या मुलाला देऊन ड्रेसिंग केले त्यांचे शिक्षक आमचे आभार मानून म्हणाले की आमच्याजवळ फर्स्ट-एडचे सामान आहे पण ते आहे रेल्वेच्या बोगीत ! खरे म्हणजे अशा वस्तू जवळ बाळगायला हव्या शिक्षक वारंवार आम्हाला धन्यवाद देत होते. वास्तविक आम्ही खास काहीच केले नव्हते पण हवी ती वस्तू वेळच्या वेळी मिळाली की आनंद होतो

निम्मे अंतर तर चढून गेलो होतो खाली उतरणारे म्हणत होते पक्षी आज बिफोर टाईम येऊन गेले ! तुमचे बॅड लक ! पण पक्षी नाहीत तर निदान पक्षी येतात ती जागा तरी पाहावी म्हणून तसेच चिकाटीने वर चढलो

टेकडीवर सुंदर शिवमंदिर आहे मंदिराच्या खालच्या बाजूच्या एका उघड्या खडकावर मंदिराचा पुजारी भाताचे भांडे घेऊन व पाट मांडून बसतो एका ताटलीत भात ठेवून तो प्रार्थना करतो व पक्ष्यांच्या आगमनाची वाट पाहातो अकरा ते साडेअकराच्या दरम्यान एक पांढरा व एक पिवळ्या रंगाचा असे दोन घारीच्या आकाराचे पक्षी लांबून उडतउडत येऊन पुजाऱ्याजवळ बसतात ताटातील भाताचा प्रसाद खातात व उडून जातात, अशी माहिती मिळाली हे दोन शापभ्रष्ट मुनी आहेत असा समज आहे मानससरोवराहून निघून काशीच्या मार्गाने ते उडत येतात व पक्षीतीर्थला भात खाऊन रामेश्वरला जातात अशी माहिती मिळाली ते दररोज नेमक्या वेळेला येतात अशी अनेक वर्षांची परंपरा आहे सध्या जो पुजारी आहे त्याच्या अगोदर त्याचे वडील रोज प्रसादाचे भांडे घेऊन बसत असत

हे पक्षी शिकवलेले आहेत की काय याची चिकित्सा करायला वेळ

नव्हता शेवटी हा भावनेचा प्रश्न असतो एव्हढे मात्र खरे की हा चमत्कार पाहायला रोज दोन-चारशे लोकांची गर्दी असते.

## महाबलीपुरम–पल्लव शिल्पकृतीचा आविष्कार !

तिरुक्कलकुड्रमपासून पुढे सोळा कि मी. प्रवास संपल्यावर महाबलीपुरमला पोहोचलो इतक्या प्रसिद्ध गावाला प्रवाशांना उभे राहण्यास शेडही नसावी व स्टँडही चांगला नसावा हे पाहून वाईट वाटले

महाबलीपुरम्‌चे प्राचीन नाव ममलापुरम् ! मद्रासहून दक्षिणेला ६० कि मी अंतरावर समुद्राच्या किनारी हे गाव वसले आहे पल्लव राजांनी उत्तर तामिळनाडूवर इ स ६०० ते ९०० पर्यंत राजसत्ता गाजवली पल्लवांची राजधानी कांचीपुरम होती व व्यापार महाबलीपुरम्‌च्या बंदरांतून चाले महाबलीपुरम् सात मंदिरांचे शहर (The city of seven pagodas) या नावाने ओळखले जाई पल्लवराजे केवळ निपुण योद्धेच नव्हते तर शिल्पकलेतही रस घेणारे होते सिंहविष्णु या पल्लवराजाने शिल्पकलेचा पाया घातला त्यानंतर त्याच्या मुलाने राजा महेंद्रवर्माने त्यात भर घातली राजा महेंद्रवर्मा हा जसा शूर योद्धा होता तसाच कवीही होता संगीत व चित्रकलेची त्याला आवड होती गुहा कोरून मंदिरे करण्याचे काम त्याच्या काळात सुरू झाले त्यानंतर राजा नरसिंहवर्मन गादीवर आला तो अतिशय शूर योद्धा होता त्याला ममला म्हणजे शूर योद्धा म्हणत त्याच्यावरूनच ममलापुरम नाव पडले महाबलीपुरम् म्हणजे पल्लवराजाच्या काळातील शिल्पकलेचा उत्तुंग आविष्कार ! ठिकठिकाणच्या प्रचंड शिळेवर छिन्नी, हातोडी चालवून पौराणिक व महाभारतातील विविध प्रसंग शिल्पकारांनी साकार केले

प्रथम निघालो 'अर्जुनाची तपस्या' कोरलेली शिळा पाहायला ! ९० फूट लांब व ३० फूट उंचीच्या प्रचंड शिळेवर समारे १५० सुंदर लहान मोठ्या आकृत्या कोरल्या आहेत अर्जुनाच्या घोर तपस्येचा प्रसंग त्यात साकार केला आहे अर्जुन एका पायावर उभा आहे त्याने दोन्ही हात वर करून एकमेकात गुंफले आहेत दाढीधारी, ध्यानग्रस्त अर्जुनाच्या चेहऱ्यावरील कठीण तपस्येचा भाव शिल्पकारांनी हुबेहूब साकार केला आहे. अर्जुनाला आशीर्वाद देणारा शिव जबरदस्त आहे त्याच्या आजूबाजूला पूर्णाकृती हत्ती

सिंह, सर्प, पक्षी, इ. कोरले आहेत मोठ्या हत्तींबरोबर त्याची छोटी पिल्लेही घाईघाईत जाताना दिसतात. उड्या मारणारी हरणेही कोरली आहेत. शेंकडो वर्षे झाली तरी हे शिल्पकाम नुकतेच केल्यासारखे वाटते ते पाहून आश्चर्यचकित झालो.

पंचपांडवमंडप या गुहेत पांच पांडवांची शय्यागृहे कोरली आहेत. पल्लव व पुलकेशी यांच्या युद्धामुळे या गुहेचे काम अपूर्ण राहिले. येथील स्तंभावर सिंहाची रांग कोरली आहे. शेजारी कृष्णमंडप आहे. पावसात गोपी भिजू नयेत म्हणून गोवर्धनगिरी उचलणारा कृष्ण येथे कोरला आहे. पावसात न भिजलेले गोपगोपी हुबेहूब वाटतात. गाईच्या दुधाची धार काढणारा गवळी तसेच गाईचे वासरू कोरण्यातही कलाकाराचे अप्रतिम कौशल्य दिसते. शेजारी एका शिळेवर माकडांचा समूह कोरला आहे. एक नर माकड दुसऱ्या मादी माकडाच्या डोक्यातील उवा काढतानाचे दृश्य वैशिष्टचपूर्ण आहे. त्या माकडिणीचे पिल्लू तिचे दूध पिताना दिसते.

नंतर दिसतो गणेशरथ. एका अखंड दगडात मंदिर कोरले असून त्यात गणेशमूर्ती दिसते. वराहमंडप ही एक वैशिष्टचपूर्ण गुफा. [illegible] बळीराजाच्या केलेल्या गर्वहरणाचा पौराणिक प्रसंग एका बाजूला कोरला आहे. ब्राह्मणाचे रूप घेतलेला विष्णू मोठ्या कष्टाने आपला डावा पाय बळीच्या मस्तकावर ठेवत आहे. हा वामनावताराचा प्रसंग फारच सुंदर कोरला आहे. दुसऱ्या बाजूला विष्णूने वराहाचे रूप घेऊन समुद्रात दडलेल्या पृथ्वीची सुटका केल्याचा प्रसंग कोरला आहे. विष्णूची पत्नी लक्ष्मी हिला स्नान घालणारे दोन हत्तीही कोरले आहेत.

त्यानंतर एका अजस्त्र शिळेवर एक विशाल गोलाकार शिळा तोलली गेलेली दिसते. असे सांगतात की इंग्रजांनी सात हत्ती लावून हा Balanced Rock हलविण्या[illegible] तसूभरही हलला नाही.

सातव्या शतकातील त्रिमूर्ती गुफेत ब्रह्मा, विष्णू, महेश यांची तीन स्वतंत्र मंदिरे आहेत. तसेच दुर्गामंदिरही आहे. सर्व मंदिरे एकाच शिळेत कोरली आहेत. प्रत्येक मंदिरापुढे द्वारपाल आहे. या गुफेसमोर एक मोठे दगडी भांडे आहे. गोपींचे ते लोणी काढण्याचे भांडे समजले जाते. तसेच मोठी गोलाकार

शिला नजीकच आहे ती म्हणजे जणू या दगडी भाडयातून काढलेला कृष्णाच्या लोण्याचा गोळा ! (Krishna's Butter Ball)

महिषासुरमर्दिनी गुफाही प्रेक्षणीय आहे. दगडी स्तंभाच्या रांगांवर शिल्पकृती आहेत शिव, पार्वती तसेच खालच्या बाजूला नंदी कोरला आहे शेषशायी विष्णु एका दगडावर कोरला आहे त्याच्या शेजारी लक्ष्मी असून बाजूला दोन रक्षक आहेत उत्तरेच्या भिंतीवर सिंहावर बसलेली दुर्गा व रेडयाचे मस्तक असलेला राक्षस महिषासुर यांचे युद्धच जिवंत केले आहे तलवारधारी दुर्गेचा आवेश वाखाणण्यासारखा आहे

त्यानंतर मन उत्सुक झाले होते पांच पांडवांचे पांच रथ पहायला ! खडक आतून, बाहेर कोरलेल्या मंदिराला रथ म्हणतात पांच,अखंड दगडात हे पांच रथ आहेत द्रौपदीरथाला छोटया झोपडीचा आकार दिला आहे. समोर सिंह कोरला असून बाजूला द्वारपाल आहेत मागे कमळामध्ये दुर्गा उभी आहे तलवारीने स्वतः चे शीर अर्पण करणारा भक्तही कोरला आहे अर्जुनरथ दुमजली, द्रविड पद्धतीचा कोरला आहे आत मूर्ती नाही विष्णु, गरुड, ऐरावतावर बसलेला इंद्र इ मूर्ती कोरल्या आहेत भीम शक्तिशाली म्हणून त्याचा रथही मोठा आहे एखाद्या बौद्धस्तूपासारखा हा रथ असून चार बाजूच्या खांबावर सिंह कोरले आहेत. धर्मराजरथ तीनमजली आहे त्यात शिवब्रह्म, कार्तिकेय, अर्धनारीश्वर इ मूर्ती आहेत. सहदेव-नकुल यांच्या रथामागे मोठा दगडी हत्ती असून पुढे सिंह आहे.

पांडवांचे पांच व द्रौपदीचा एक रथ पाहून गावातून चक्कर मारली.हस्तकला कुसरींच्या वस्तूंनी भरलेली पाचसहा दुकाने दिसली लाकडाचे विविध आकारांचे हत्ती तर शेकडयांनी होते एका ठिकाणी खूप गर्दी दिसली पाहिले तर दोन परदेशी पर्यटक भराभर खरेदी करीत होते दुकानदाराला खूष होऊन पैशाशिवाय आणखीही भारी वस्तु देत होते हे परदेशी पर्यटक त्या दुकानापुढून निघाले तरी छोटया छोटया वस्तू विकणारी मुले, भिकारी त्यांच्या मागेच लागली ते दोघे हसत होते व या लोकांकडे तुच्छतेने पहात होते, ही गोष्ट फारच खटकली. भारतीय संस्कृती पहायला हे परदेशी पर्यटक मोठया उत्सुकतेने येतात अनेक हिप्पीसुद्धा पैसे साठवून, साधे राहून भारतीय

शिल्पकलेचा, संस्कृतीचा परिचय करुन घेण्यास भारतभर हिंडतात. या लोकापुढे भिकारी, दुकानदार, सुशिक्षित गाईडसुद्धा बक्षिसीच्या आशेने लाचार होतात व पैशासाठी हात पुढे पसरतात हे पाहून वाईट वाटले.

गावात चक्कर मारून महाबलीपुरम्च्या समुद्रकाठच्या विख्यात मंदिराला (Shore Temple) भेट देण्यासाठी निघालो. समुद्राच्या खळखळणाऱ्या लाटांनजीक हे मंदिर कित्येक शतके उभे आहे–पल्लवराजांच्या शिल्प-कलेची जगाला ओळख करून देण्यासाठी ! दक्षिणेतील ग्रानाईट दगडातील हे पहिले मंदिर ! मंदिराच्या विशाल व्हरांड्यात दगडी नंदींची रांगच्या रांग दिसली. मंदिरासमोर आराधना करण्यासाठी जागा आहे समुद्रकाठच्या या मंदिरावर सुमारे दोनशे वर्षांपूर्वी सोन्याचा घुमट होता समुद्रावर सफर करणाऱ्या जहाजांना तो दुरुन तळपताना दिसायचा. आता या मंदिराची बरीच पडझड झाली आहे.

समुद्राच्या खळाळणाऱ्या लाटा, घोघावणारा खारा वारा, सूर्याचे प्रखर ऊन, पाऊस याला तोंड देत धीरोदात्तपणे सागरतीरावर पूर्वी बांधलेल्या सात मंदिरापैकी एकांतवासात उभे असलेले हे मंदिर पल्लवराजांच्या उत्कर्षाला पोहोचलेल्या शिल्पकलेची ग्वाही देत होते

□

# कांचीवरम्-शिवकांची, विष्णुकांची

बस कांचीवरम्च्या दिशेने धावू लागली दीड तासातच ३५ कि. मी. अंतर पार करून कांचीवरम्च्या बसस्थानकावर येऊन पोहोचली

देवीच्या ५१ शक्तिपीठापैकी काची हे एक आहे मृत सतीदेवीचा अस्थिपजर येथे पडला होता पौराणिक काळातील कांचीवरम्चे नाव काचनपूरम् (सोन्याचे शहर)! येथे जन्म व मृत्यु होणे भाग्याचे मानले जाते मोक्षप्राप्तीसाठी काची पवित्र मानले जाते कारण ते सप्तपुरीपैकी एक आहे.

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवतिका
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिका

अयोध्या, मथुरा, माया, काशी, अवतिका जगन्नाथपुरी यापैकी तीन गावे विष्णूची स्थाने व तीन गावे शिवस्थाने मानली जातात कांचीवरम् हे सप्त पुरीतील दक्षिण भारतातील एकुलते एक ठिकाण असून विष्णु व शिव दोहोंचे स्थान असल्याने त्याला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे काचीचे शिवकाची व विष्णुकाची असे दोन भाग आहेत शिवाची १०८ तर विष्णूची १८ मदिरे तेथे आहेत बसस्टँड व रेल्वे स्टेशन शिवकाचीत आहे

ख्रिस्तपूर्व काळात गौतमबुद्धाने या गावाला भेट दिली असा समज आहे. सम्राट अशोकाने या परिसरात अनेक स्तूप उभारले होते. चालुक्य राजा पुलकेशी याने हे शहर पल्लवांकडून जिंकले होते कांचीच्या मदिराचा विकास पल्लव साम्राज्यात तसेच विजयनगर साम्राज्यातही झाला सुप्रसिद्ध

महाकवी कालिदास यानेही कांची हे सुंदर शहर असल्याचे वर्णन लिहून ठेवले आहे. कांचीची काही मंदिरे चोला राजांनी बांधली. चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारातील 'अर्थशास्त्र' कर्ता चाणक्य येथेच जन्मला. जगप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएन्त्संगने सातव्या शतकात कांचीला भेट दिली होती. त्याने कांचीचे वर्णन लिहून ठेवले आहे. श्रीशंकराचार्य व श्रीरामानुज यांनी कांचीचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक स्थान म्हणून महत्त्व वाढवले. वैदिक व संस्कृत अध्ययनाचे ते फार पूर्वीपासून केंद्र आहे.

प्राचीनकाळी कांची सर्वधर्मांचे ठिकाण होते. शिव वैष्णव मंदिरांबरोबरच जैन व बुद्ध मंदिरेही येथे आहेत. सध्या मोठी १८१ मंदिरे येथे असून लहान मंदिरे किती आहेत याची गणतीच नाही. कांचीला 'दक्षिणेची काशी' म्हणतात. काव्यमय भाषेत असे म्हटले जाते की कांचीच्या मंदिरांचे मोठे दगडी स्तंभ कांचीच्या वैभवाच्या गोष्टी सांगतात, संगीताचे सूर आळवतात व गाणी गातात !

बसस्टँडजवळ रिक्षा करून प्रथम अर्धा कि. मी. अंतरावर उत्तरेला असलेल्या 'वामनावतार ऊर्फ उलगलनदा पेरुमल' मंदिराजवळ गेलो. मंदिरासमोर दाक्षिणात्य पद्धतीचे गोपुर असून मंदिर पल्लवराजांनी बांधले आहे. मंदिरात बारा फूट उंचीची काळ्या रंगातील वामनमूर्ती पाहून स्तिमित झालो. वामनाच्या पायाखाली बळीचे मस्तक आहे. याभागची पौराणिक कथा अशी आहे. बळी हा अतिशय शूर व उदार राजा होता. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली. तो आपल्यापेक्षा वरचढ होईल या भीतीने इंद्राने मोठे सैन्य घेऊन त्याच्यावर स्वारी केली. इंद्राचा पराभव झाला. सर्व देव एकत्र जमले. बळी राजाचा नाश करायचा त्यांनी ठरवले. बळीराजाच्या उदारपणाचा त्यांनी फायदा घेण्याचे ठरवले. श्री विष्णूने एका बटूचे रूप घेतले व तो भिक्षा मागण्यासाठी बळीराजाकडे गेला. राजाने त्याची पूजा केली. बटूने आपली इच्छा त्याला सांगितली की फक्त ३ पावले जमीन मला हवी आहे. बळीराजाने ओळखले की हा बटू म्हणजे प्रत्यक्ष देवच आहे. त्याने आनंदाने त्याचे म्हणणे मान्य केले. बटू पाहाता पाहाता मोठा झाला. एका पावलात सर्व पृथ्वी संपली. दुसरे पाऊल स्वर्गावर

ठेवले तिसरे पाऊल कुठे ठेवावयाचे असे बटूने विचारल्यावर राजाने स्वतःचे मस्तक दर्शविले बटूने आपले प्रचंड पाऊल राजाच्या मस्तकावर ठेवताच त्याचा शेवट झाला पण त्याची कीर्ती कायम राहिली.

या पौराणिक प्रसंगानुसार विष्णूच्या प्रचंड पायाखाली राजाचे मस्तक फक्त जमिनीवर दिसते कारण बाकीचा भाग जणू जमिनीत गाडला गेला आहे

वामनावतार मंदिराजवळच कांचीचे प्रख्यात 'कामाक्षी अम्मन मंदिर' आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच विशाल असे रंगीबेरंगी गोपुर आहे त्यावरील शिल्पकृती अप्रतिम आहेत. मंदिराला अनेक प्राकार आहेत. खरोखर दक्षिणेकडची ही मंदिरे केवढी भव्य असतात भव्य आणि स्वच्छ सुद्धा ! मंदिराचे भव्य आवार स्वच्छ ठेवण्यासही कष्ट पडत असतील.

मंदिराच्या पहिल्या प्राकाराच्या मध्यभागी चोवीस स्तंभ असलेला गायत्रीमंडप आहे त्यात चतुर्भुज कामाक्षीची आसनस्थ मूर्ती आहे. तिच्या हातात पोपट आहे एका पायावर तपस्या करीत असलेली लक्ष्मीची मूर्ती पण आहे मोगलांच्या आक्रमणाच्या वेळी मूळ सोन्याची मूर्ती तंजावरला सुरक्षिततेसाठी नेण्यात आली या मूर्तीमागची पौराणिक कथा अशी आहे

एकदा महालक्ष्मीने आपल्या पतीच्या–विष्णूच्या सौंदर्याची चेष्टा केली त्यामुळे चिडून विष्णूने लक्ष्मीचा चेहरा विद्रुप केला तिने सौंदर्यप्राप्तीसाठी याचना केल्यावर विष्णूने सल्ला दिला की पृथ्वीवर जाऊन कामाक्षी मंदिरात तपस्या कर. त्याप्रमाणे तिने या मंदिरात एका पायावर तप केल्यावर कामाक्षीच्या आशीर्वादाने लक्ष्मीचे सौंदर्य पूर्ववत झाले

मंदिरात महिषासुर, सरस्वती, सूर्य, अन्नपूर्णा इ च्या स्वतंत्र मूर्तीही आहेत. शंकराचार्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग चित्रांच्या सहाय्याने साकार केले आहेत. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमी मूर्तीच्या खाली पुरण्यात येत असलेले पवित्र मंत्रचक्र देवीच्या मूर्तीसमोर आहे कामाक्षीदेवीला प्रणाम करून मंदिराचा निरोप घेतला.

## एकांबरेश्वर मंदिर–कांचीचे वैभव

कांचीचे प्रख्यात प्राचीन शिवमंदिर म्हणजे एकांबरेश्वर मंदिर ! २३ एकराच्या विशाल भूमीत हे मंदिर वसले आहे प्रवेशद्वाराजवळच १९२ फूट उंचीचे प्रचंड गोपुर आहे १५०९ मध्ये हे गोपुर विजयनगरच्या कृष्णदेवरायाने बांधले. दक्षिणेतील चार उंच गोपुरांपैकी हे एक गोपुर आहे

या मंदिराच्या उभारणीत पल्लव, चोल व विजयनगरच्या राजांनी हातभार लावला एक आम्र ईश्वर म्हणजे एका आम्रवृक्षाचा स्वामी ! त्यावरुन एकांबरेश्वर नांव पडले हे मंदिर म्हणजे कांचीचा जणू आत्मा !

उमादेवीने एकदा शंकराचे डोळे हाताने बंद केले पण त्यामुळे जगात अंधःकार झाला या पापापासून मुक्ती मिळवण्यासाठी उमादेवीने विष्णूच्या सहाय्याने शिवाची दीर्घ पूजा केली शिवाने तिची परीक्षा पहाण्यासाठी मस्तकातून गंगेचा प्रवाह सोडून प्रलय निर्माण केला उमादेवीने वाळूच्या लिंगाचा पुरापासून बचाव व्हावा म्हणून लिंगाला छातीजवळ घेऊन घट्ट धरून ठेवले शिवाला तिच्या तपस्येची खात्री पटली आणि त्याने तिच्याबरोबर विवाह करण्याचे मान्य केले फाल्गुनी (मार्च) महिन्यात शिवपार्वतीचा विवाह धूमधडाक्यात साजरा करतात. चांदीच्या रथात मिरवणूक काढतात. मंदिरातील पृथ्वीलिंग वाळूपासून तयार झाले असा समज आहे त्याच्या भोवतीच्या प्रदक्षिणामार्गाच्या कडेला १००८ छोटी छोटी लिंगे आहेत

मंदिराच्या मागील बाजूला एक जुना आम्रवृक्ष आहे तो ३५०० वर्षांपूर्वीचा प्राचीन समजला जातो झाडाच्या चार फांद्या म्हणजे जणू चार वेद मानले जातात झाडाला येणारी फळे चार चवींची असतात गोड, तुरट आंबट इ ! झाडाची उंची सुमारे साठ फूट आहे या झाडाभोवती विस्तीर्ण कट्टा बांधला असून झाडाखाली शिव-पार्वती विवाह होत आहे अशी मूर्ती आहे येथेच तपश्चर्या करून पार्वतीने शंकराला प्रसन्न केले व मग त्यांचा विवाह झाला अशी समजूत आहे या झाडाचे आंबे खाल्ल्यास पुत्रप्राप्ती होते अशी समजूत असल्याने बऱ्याच स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी पूजाअर्चा, नवस करताना दिसत होत्या

एकाबरेश्वर मदिराला एकूण पाच प्राकार आहेत एक हजार स्तभाचा विशाल मडप यात आहे सध्या त्यातील ६६५ स्तभ आहेत बाकीचे नष्ट झाले स्तभांवरची शिल्पकृती वाखाणण्यासारखी आहे सुरुवातीला उभे राहिल्यावर स्तभाची लांबच्या लांब राग आकर्षक वाटते मदिराची भव्यता मनात साठवीतच मदिराबाहेर पडलो


एकांबरेश्वर मदिरापासून एक मैलावर बाराशे वर्षांपूर्वीचे जुने 'कैलासनाथ मदिर' आहे, सातव्या शतकात राजसिंह या पल्लव राजाने बांधलेले हे दक्षिणेतील जुने मदिर समजले जाते मदिराच्या मडपात प्रेक्षणीय शिल्पकाम आहे आत आठ फूट उचीचे लिग आहे मदिरात दुर्गा, नरसिंह, शिव, विष्णु इ अनेक सुरेख मूर्ती आहेत.

## विष्णुकांची


कांचीच्या 'वरदराज पेरुमल' या विष्णुमदिराकडे जाण्यासाठी स्टँड-पासून तीन कि मी अतरावरील लहान काचीपुरममध्ये–विष्णुकांचीमध्ये जावे लागते

मदिराच्या प्रवेशद्वारातील द्राविड पद्धतीच्या गोपुरातून आत प्रवेश केला मदिराचे पश्चिमेकडील गोपुर सातमजली व नऊ कळसाचे असून १२५ फूट उच आहे मदिराला पाच प्राकार आहेत

या मदिरामागेही पौराणिक कथा आहे कीर्तीयुगात ब्रह्मदेवाने पाप-मुक्तीसाठी अश्वमेध यज्ञ योजला त्यासाठी कांची हे स्थान निवडले सध्याचे मदिर जेथे आहे ती जागा यज्ञासाठी योजली ब्रह्मदेवाने सरस्वतीला वगळले व ती सावित्री आणि गायत्री यांच्यासह यज्ञाला बसला. त्यामुळे सरस्वतीला अपमान वाटला व ती ब्रह्मदेवावर रागावली तिने वेगावती नदीच्या मार्फत यज्ञभग करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी ब्रह्मदेवाने यज्ञभग होऊ न देण्याबद्दल विष्णूला विनवले भगवान विष्णु स्वत नदीमध्ये आडवे पडले व सरस्वतीकडून यज्ञभग होण्याचे टाळले विष्णूच्या या अवताराला 'यदोथकरी पेरुमल' म्हणतात शेवटी यज्ञकुडात वरदराजा अवतरले व त्यांनी ब्रह्मदेवाला दर्शन दिले रामानुज या वैष्णवपथाच्या सस्थापकाने वरदराज स्वामीच्या स्तुतिपर पुष्कळ गाणी गाइली आहेत



एकाम्बरेश्वर मंदिर, काचीवरम्



दक्षिणेचा मेरू - बृहदेश्वरमंदिर, तंजावर.



अश्वारूढ तिरुमलनायक
मीनाक्षीमंदिर
मदुरा.

मदिरात प्रवेश केल्यावर प्रथम डाव्या बाजूला एक विशाल कुड लागते. भाविकांची स्नान करण्यासाठी गर्दी होती मासेही अगणित होते. या कुडाला 'अनततीर्थम्' या नावाने ओळखले जाते कुडात मध्यभागी चार स्तभांचा मडप आहे आत पाण्यात चादीच्या पेटीत विष्णूची आडवी मूळ मूर्ती आहे चाळीस वर्षातून एकदा ती काढली जाते व भाविकाना तिचे दर्शन घडवले जाते मुसलमानाच्या आक्रमणापासून बचाव करण्यासाठी ही मूर्ती तेथे ठेवण्यात आली होती.

कुडानजीकच शभर दगडी स्तभांचा मडप आहे विजयनगरच्या शिल्प-कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणज हा मडप! ग्रानाईट दगडातील शिल्पकृती अप्रतिम आहेत या मडपास जरी शभर खाबांचा मडप असे सबोधले जाते तरी प्रत्यक्षात ९६ स्तभच आहेत कोपऱ्यातील चार स्तभांचे शिल्प अगदी आगळे आहे शस्त्रधारी, घोड्यावर स्वार झालेला योद्धा त्यात कोरला आहेत. चारही कोपऱ्यात कोरलेल्या दगडी साखळ्या शिल्पकलेचा नवाच आविष्कार घडवतात. मोठ्या अखड दगडात साखळ्या इतक्या चपखल कोरल्या आहेत की दुरून वाटते त्या लोखडाच्याच आहेत. काही स्तभावर रामायण महाभारतातील प्रसग कोरले आहेत तर काही ठिकाणी नृत्याच्या आविर्भावातील सुदरी कोरल्या आहेत एका ठिकाणी बदूकधारी योद्धा कोरला आहे अलौकिक कारागिरीचे प्रतीक असलेला हा मडप पाहून मदिराच्या अतर्भागात आलो.

मदिराच्या गर्भगृहाच्या बाजूला तांब्याचे दोन द्वारपाल आहेत चोवीस पायऱ्या चढून गेल्यावर वरदराजाच्या शाळीग्रामाच्या मूर्तीचे दर्शन होते वरदराजस्वामीची मूर्ती हिरेजडित आहे या देवाचे मौल्यवान अलकार हिरे, माणके, सुवर्ण इ. नऊ लक्ष रुपये किमतीचे आहेत लॉर्ड क्लाईव्हनेही एक रत्न भेट दिले होते निरनिराळ्या राजे-राण्यांनी अलकार भेट दिले आहेत. भारतातील देव माणसापेक्षा खूप श्रीमत असतात हे मत अगदी खरे आहे देवाला जर अभिषेक करायचा असेल तर त्यासाठी ठराविक किमतीचे तिकीट असते देवाची सोन्या-चादीची वाहने असतात ज्याची इच्छा असेल त्याप्रमाणे देवाची मिरवणूक त्यातील एखाद्या वाहनावरून तो काढू शकतो. पण त्यासही ५० रुपयापासून १०० रुपयापर्यंत तिकीट असते

मंदिराच्या बाजूला छतावर एक सोन्याची व दुसरी चांदीची पाल आहे तिच्या अंगावरून हात फिरवला की पालीच्या विषापासून भय रहात नाही अशी समजूत आहे ह्या पालीला हात लावण्यासाठी फी आहे छोटया जिन्याने वर चढून गेल्यावर त्या पालीला हात लावता येतो भाविक लोक त्या पालीवरून चार चार वेळा हात फिरवत होते नमस्कार करीत होते तेथील रक्षक वारवार पुढे सरकण्याची सूचना करीत होता तरी लोक चिकाटीने वारवार पालीवरून हात फिरवीत होते

या पालीमागील पौराणिक कथा अशी आहे की एकेकाळी असुवथ नावांचा राजा होऊन गेला. त्याला दोन पुत्र होते ते एका मुनीकडे शिक्षणासाठी जात होते एके दिवशी मुनींनी त्या दोघाना पूजेसाठी नदीवरून पाणी आणायला सांगितले पाणी घेऊन परतत असता एका झाडाखाली ते खेळत बसले मुलेच ती ! वेळेचे भान त्याना राहिले नाही दरम्यान एक पाल त्या पाण्यात पडली पण त्या मुलाना ते कळले नाही तेच पाणी त्यानी मुनीना नेऊन दिले मुले वेळेवर तर आली नाहीतच शिवाय पाण्यात मेलेली पाल त्यामुळे मुनी क्रोधाविष्ट झाले त्यानी मुलाना तुम्ही पाल व्हाल असा शाप दिला मुले फार घाबरली व त्यांनी उपाय विचारला. मुनी म्हणाले की अमततीर्थात स्नान करून वरदराज स्वामीची प्रार्थना करा त्याप्रमाणे केल्यावर देव प्रसन्न झाले व दोघे शापमुक्त झाले

कांचीतील मुख्य मंदिरे पाहून गावात फेरफटका मारला कांचीवरम् प्रसिद्ध आहे साड्यासाठी ! जरीच्या, सिल्कच्या सुती अशा कितीतरी तऱ्हेतऱ्हेच्या साड्या पाहून डोळे तृप्त होत होते

कांचीवरमची भेट आटोपून चिंगलपटला रात्री आठ वाजता आलो. जेवण आटोपल्यावर रिटायरिंग रुममधील सामान प्लॅटफॉर्मवर आणले रात्री दहाच्या सुमारास मद्रास रामेश्वर एक्स्प्रेस आली. सुदैवाने बर्थ मिळाले. तंजावरच्या दिशेने प्रवास सुरू झाला.

□

# सरफोजी राजे भोसलेंचे तंजावर

मद्रास रामेश्वर एक्स्प्रेस तंजावरला पोहोचली रेल्वेच्या रिटायरिंग रूममध्ये चांगली सोय झाली. स्नान, नाष्टा इ. आटोपून सकाळी आठच्या सुमारास मोठ्या उत्साहाने तंजावरचा फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलो

तंजावरची परंपरा फार प्राचीन आहे. पराशरमुनी येथे तपश्चर्या करीत. या तपश्चर्येत तंजन नावाचा असुर विघ्न आणीत असे म्हणून मुनीच्या सांगण्यावरून विष्णूने तंजनास ठार मारले पण त्याने मरताना वर मागितला की या स्थलाला त्याचे नाव मिळावे त्याच्या इच्छेनुसार हे स्थळ तंजापूर-तंजावर म्हणून ओळखले जाऊ लागले

कावेरी नदीच्या त्रिभुज प्रदेशातील तंजावर हे प्रसिद्ध ऐतिहासिक शहर आहे कर्तबगार चोला राजांची दहाव्या ते चौदाव्या शतकात ही राजधानी होती तसेच शिवाजी महाराजाचा सावत्र भाऊ व्यंकोजी याने येथे राज्य केले मराठ्याची राजसत्ता येथे दोन शतके होती.

तंजावरचा प्रसिद्ध राजवाडा पहाण्यास प्रथम जायचे होते सायकल-रिक्षा ठरवली. या चकचकीत सायकलरिक्षात मुलाना बसण्यासाठी समोर स्वतंत्र, सीट असल्याने मुले खूष झाली स्वच्छ, प्रशस्त रस्ते व विरळ लोकसंख्या ! यामुळे प्रथमदर्शनी तरी तंजावरबद्दल, चांगले मत झाले रिक्षावाला अदबीने बोलत होता दक्षिणेकडे स्त्रियाना माँ, अम्मा म्हणून आदराने संबोधले जाते. बसेसमध्येही स्त्रियांसाठी खास राखीव

जागा असतात दक्षिणेकडे ठिकठिकाणी सायकलरिक्षा दिसतात हजारो लोक त्यावर पोट भरतात तजावरइतक्या चकचकीत सायकलरिक्षा मात्र कुठे दिसल्या नाहीत

राजवाडा स्टेशनपासून दोन कि मी अतरावर आहे राजवाड्याचा विस्तार प्रचड आहे आत प्रवेश केला तेव्हा प्रथम दिसला एकेकाळी दरबार हॉल म्हणून वापरला जाणारा दिवाणखाना ! एकेकाळी वैभवाने झगझगणाऱ्या या दरबार हॉलला आता अगदी अवकळा आली आहे सर्वत्र माती व धूळ पसरली होती भितीवर पूर्वीची भडक रगातली विविध चित्रे दिसत होती त्यात सरफोजी राजे भोसलेचे चित्र दिसत होते त्याचप्रमाणे श्रीशिवाजीमहाराज याचेही चित्र होते

राजवाड्याच्या आवारात सात मजली दर्शनमनोरा आहे तसेच नजीकच भरतनाटयम् हॉल आहे या हॉलमध्ये राजदरबाराच्या करमणुकीसाठी नृत्य-गायनाचे कार्यक्रम होत असत हा हॉल मात्र भरभक्कम असून सुस्थितीत आढळला ध्वनीतत्रशास्त्राचा शास्त्रशुद्ध वापर हा हॉल बांधताना केला गेला आहे

शेजारीच आर्ट गॅलरी आहे एका दालनात विविध दगडी पुतळे आहेत त्यात चार मुखाचा ब्रह्म, आसनस्थ अग्निदेव, नृत्य करणारा गजानन, कार्तिकेय, पार्वती, गजसहार करणारा शिव, अर्धनारीनटेश्वर इ मूर्ती आहेत एके ठिकाणी एक मूर्तींचा समूह अतिशय प्रेक्षणीय आहे अर्धवर्तुळाकार उभ्या असलेल्या या मूर्तीत प्रथम सात मूर्ती सुदर व रेखीव स्त्रियांच्या आहेत यातील पाच मूर्ती स्वतत्र असून दोन एकाच दगडात कोरलेल्या व निकट उभ्या असलेल्या आहेत मध्ये भिक्षेकऱ्याच्या वेषातील शिवमूर्ती आहे दुसऱ्या बाजूला शिवाच्या सेवकाच्या पाच मूर्ती आहेत. ह्या मूर्ती बाराव्या शतकातील आहेत मूर्तींच्या चेहेऱ्यावरील भाव नितांतसुदर आहेत.

एका दालनात ८० फूट लांबीच्या प्रचड व्हेल माशाचा सागाडा आहे. दुसऱ्या मजल्यावर विविध मदिराची मॉडेल्स, चित्रे इ आहेत. आर्ट गॅलरीवरून सपूर्ण तजावर शहर दिसते

आर्टगॅलरीतील एक अत्यत प्रेक्षणीय दालन म्हणजे नायक दरबार हॉल ! हा १६०० साली बाधला त्याच्या छतावर पेंटीग्ज असून हॉलमध्ये ब्रॉझच्या

सुमारे १२५ मूर्ती आहेत ११ व्या शतकातील नटराजाच्या विविध आकर्षक भावमुद्रेतल्या दहा ते बारा मूर्ती आहेत. नटराजाच्या मूर्तीतील लयबद्धता जोश, तोल वाखाणण्यासारखा आहे. नटराजाचा डावा पाय वर उचललेला आहे. विष्णू, लक्ष्मी, राम, सीता याच्याही मूर्ती आहेत मध्यभागी सरफोजी-राजे भोसले याचा उभा, हात जोडलेला सगमरवरी पुतळा आहे पाढऱ्याशुभ्र टाईल्स असलेल्या पाच टप्प्यावर मोठा दगडी चबुतरा आहे त्यावर मूर्ती कोरल्या आहेत. चार सिंहही कोरले आहेत या चबुतऱ्यावर हा सुदर पुतळा उभारलेला आहे समोरच्या भितीवर रामराज्याभिषेकाचा सोहळा चित्रित केला आहे

राजवाड्यातील सरस्वती महाल लायब्ररी म्हणजे केवळ तजावरचेच नव्हे तर सर्व देशाचे भूषण आहे छत्रपती शिवाजीमहाराजाचा सावत्र भाऊ व्यकोजी याचा दुसरा सरफोजी ऊर्फ शरभेंद्रराजे भोसले हा पुत्र। हा राजा केवळ राजनीतिज्ञच नव्हता तर नाटककार, विद्याप्रेमी, विद्वान व धर्मप्रेमीही होता. त्याने भारतभर तीर्थयात्रा केल्या, १०८ देवस्थानाची पूजा केली तो वृत्तांत 'शरभेंद्रतीर्थावली' नामक ग्रंथात लिहिला आहे या राजाला इग्रजी, फ्रेंच इ भाषा येत

भव्य दिवाणखान्यातल्या ह्या लायब्ररीत प्राचीन ४०,००० ग्रथ आहेत भूर्जपत्रावरील व ताडपत्रावरील तामीळ, तेलगू, सस्कृत भाषेतील हस्त-लिखिते हजारो आहेत हाताने बनवलेल्या कागदावर काही जुनी हस्तलिखिते आहेत. कला, शास्त्र, वाङ्मय, औषधे, वनस्पतीशास्त्र, शिल्पशास्त्र इ विविध विषयांवरील लिखाण तेथे आहे मोडी भाषेतील १५०० दुर्मिळ ग्रथ आहेत इग्रजी, ग्रीक तसेच लॅटिन भाषेतील पुस्तके आहेत चित्रमय ऋग्वेद आहे. सचित्र रामायणाच्या पोथ्या आहेत गजशास्त्रम्, अश्वशास्त्रम्, ही पुस्तके आहेत सपूर्ण ज्ञानेश्वरीच्या चौदा पोथ्या आहेत बालवाटी हे जुने सस्कृत हस्तलिखित येथे उपलब्ध आहे. बेलसमिधा हा आयुर्वेदावरील जगप्रसिद्ध ग्रथ आहे सर्व जगात इतका मोठा हस्तलिखिताचा सग्रह नाही एके ठिकाणी लिहून ठेवले आहे की, 'सरस्वतीमहाल जिवत असेपर्यंत कोणाला मरण आहे ?' खरोखर सरस्वतीमहाल हे सरफोजीराजे भोसलेंचे अजरामर स्मारक होय

## दक्षिणेचा मेरु–बृहदेश्वर मंदिर

तंजावरचे बृहदेश्वर मंदिर हे दक्षिणेतील एक विशाल मंदिर समजले जाते हे मंदिर तंजावरचा प्रसिद्ध सम्राट राजराजाचोला याने इ स १००३ ते १००७ मध्ये बांधले राजराजाचोला हा शिवभक्त होता वयाच्या केवळ २५ व्या वर्षी त्याने हे बांधकाम सुरू केले मंदिराचे मूळचे नाव ' राजराजेश्वर मंदिर ' असे आहे या मंदिराचा जीर्णोद्धार सरफोजीराजे भोसले यानी केला

मंदिराभोवती प्रचंड दगडी भिंत असून समोवती खंदक आहे त्यावर कोरले आहेत २०३२ लहानलहान नंदी ! आजच्या काळात एक नंदीची मूर्ती कोरणे अवघड तेथे हजार वर्षांपूर्वी इतके नंदी कोरणे म्हणजे महदाश्चर्यंच ! दाक्षिणात्य पद्धतीचे फक्त ९० फूट उंचीचे गोपुर ओलांडल्यावर ८५० फूट लांबीचे व ४५० फूट रुंदीचे विशाल प्रांगण लागते सर्व प्रांगणात दगडी फरसबंदी केलेली आहे दक्षिणेत सर्वत्र मंदिराची गोपुरे कळसापेक्षा उंच आढळतात बृहदेश्वर मंदिर त्याला अपवाद आहे या मंदिराच्या उत्तुंग कळसाच्या मानाने गोपुर लहान आहे

प्रथम दिसला नंदीमंडप ! त्यात वीस फूट लांबीचा व बारा फूट उंचीचा विशाल नंदी पाहून आश्चर्यचकित झालो हा नंदी २० टन वजनाचा आहे काळ्या अखंड पाषाणातून नंदी कोरलेला आहे बसलेल्या स्थितीतला हा नंदी अतिशय रेखीव आहे त्यात जिवंतपणा ओतप्रोत भरलेला आहे सर्व अवयव प्रमाणबद्ध आहेत भारतात या नंदीचा विशालतेबद्दल दुसरा नंबर आहे पहिला प्रचंड नंदी कर्नाटक राज्यातील अनंतपूर येथील मंदिरात आहे नंदीमंडपाच्या स्तंभावर नायकराजांच्या रेखीव मूर्ती कोरल्या आहेत. नंदीमंडपावर नक्षीदार छत असून मंडपाला सोळा स्तंभ आहेत विशाल प्रदक्षिणामार्ग आहे

नंदीमंडप ओलांडल्यावर दगडी पायऱ्या चढून मुख्य मंदिरात प्रवेश केला. या पायऱ्या भोसले राजानी बांधल्या आहेत तेथील लहान् मंडपात गणेश, भैरव, दुर्गा व शनी यांच्या चार मूर्ती कोपऱ्यात आहेत मुख्यमंदिराचा चबुतरा १५० फुटाचा चौकोनी आहे आतील चबुतरा शभर फूट चौकोनी आहे

मदिरासमोरील द्वारपाल १८ फूट उचीचे आहेत मदिराच्या गर्भातील शिवलिंग पाच फूट उचीचे विशाल असून त्याचा घेर तेवीस फूट आहे गाभाऱ्याच्या आतील भितीवर अजठासारखी भित्तीचित्रे आहेत तसेच अनेक मूर्ती ठिकठिकाणी कोरल्या आहेत मुख्य मदिराच्या मागे आग्नेय कोपऱ्यात विनायक, नैऋत्य कोपऱ्यात कार्तिकेय म्हणजेच सुब्रह्मण्यम याचे मदिर आहे. कार्तिकेय मदिरावर भरगच्च शिल्पकृती आहे प्रागणाच्या वायव्य कोपऱ्यात पार्वतीमदिर आहे.

या मदिराचे महान वैशिष्टय त्याच्या शिखराच्या अद्भुत रचनेत आहे या मदिराचे निमुळते पिरॅमिडसारखे दिसणारे शिखर प्राचीन अलौकिक शिल्पकलेच्या कौशल्याने स्तिमित करते शिखराची उची २१६ फूट इतकी प्रचड आहे या शिखराला 'दक्षिणेचा मेरु' म्हणतात शिखरावर विष्णु, विनायक, मार्कंडेय, अर्धनारीनटेश्वर, महिषासुरमर्दिनी इ देवतांच्या मूर्ती आहेत शिखराच्या खालील पक्तीत चोळ, नाईक, मराठे इ राज्यकर्ते कोरले आहेत या शिखराच्या तळाचा आकार चौकोनी असून वर उत्तरोत्तर आकाराने लहान होत गेलेले शकूसारखे शिखर तेरा मजली आहे प्रत्येक मजला काटकोनात उभा आहे वरील शिखराची रुदी खालच्या रुदीच्या एक तृतीयाश आहे तेराव्या मजल्याच्या माथ्यावर सपूर्ण चौरस शिळा आहे त्यावर तेरा फूट उच कळस आहे ८० टन वजनाच्या अखड शिळेचा हा कळस एक मोठे आश्चर्यच आहे हा प्रचड दगड आणून तो मदिराच्या शिखरावर कसा बसवला असेल हे मोठे गूढच आहे असे म्हणतात की तीन कि मी लाबीचा उतरता खास रस्ता बाधला होता त्याचा तरफेसारखा उपयोग करून हा प्रचड वजनाचा दगड शिखरावर बसवला होता इजिप्त. देशात पिरॅमिड बाधणीच्या वेळी हे तत्र प्रचलित होते

या मदिराच्या दक्षिणेकडील ओवऱ्याच्या भितीवर १८०३ मधील एक प्रदीर्घ शिलालेख आहे हा शिलालेख देवनागरी लिपीत असून तजावरचे राजे सरफोजीराजे भोसले यांनी तो खोदवला आहे त्यात तजावरच्या भोसले राजवशाचा सपूर्ण इतिहास मराठीत कोरला आहे या शिलालेखाचे तामीळ भाषातर व इंग्रजी साराश सरस्वतीमहालात उपलब्ध आहे तो ११० छापील पानाचा आहे. यावरून या शिलालेखाची प्रदीर्घता दिसून येते

मंदिराच्या आवारात डाव्या बाजूला पुराणवस्तु संशोधनाचे म्युझियम असून त्यात मंदिराचे विविध फोटो आहेत मूर्तिसंग्रह आहे म्युझियम पाहून बाहेर निघालो

हजार वर्षे झाली तरी हे मंदिर सुस्थितीत आहे मंदिराच्या भव्यतेला तर तोड नाही दक्षिणेचा हा मेरु आपल्या अभिजात शिल्पकृतीची शान दाखवीत मोठ्या दिमाखाने उभा आहे

तंजावरच्या अर्ध्या दिवसाच्या वास्तव्यात सरफोजी राजे भोसलेंच्या साहित्य प्रेमाने चकित झालो तसेच चोला राजांच्या कर्तबगारीचे प्रतीक असलेल्या बृहदेश्वराच्या दर्शनाने तृप्त झालो.

## दक्षिणेची काशी–कुंभकोणम

दुपारी वेळ मोकळा असल्याने तंजावरपासून ३८ कि मी अंतरावरील कुंभकोणमला भेट देण्यासाठी बसस्टॅन्डवरून दुपारी दोनला निघालो. तासाभरातच कुंभकोणमला पोहोचलो

कुंभकोणम हे भारतातील प्राचीन महत्त्वाचे तीर्थक्षेत्र । येथे आद्य श्रीशंकराचार्य यांनी स्थापन केलेले कामकोटी पीठ आहे त्यामुळे संस्कृत विद्येची जोपासना होते कावेरी नदीच्या तीरावरील या शहरात लहान मोठी दोनशच्यावर मंदिरे आहेत रिक्षा ठरवून महत्त्वाच्या मंदिरांच्या दर्शनाला निघालो

प्रथम कुंभेश्वर मंदिरात पोहोचलो. या मंदिराचा प्रवेशमार्ग लांबलचक सुमारे ९०० फूट लांबीचा असून दुतर्फा दुकाने आहेत मंदिराचे गोपुर उंच असून मंदिरासमोर उंच ध्वजस्तंभ आहे दक्षिणेकडील बहुतेक मंदिरांच्या रचनेत साम्य आढळते फक्त लांबीरुंदी, बांधकाम यात फरक असतो गोपुर, प्रशस्त आवार, अनेक प्राकार, मुख्य देऊळ अगदी आतमध्ये त्यासमोर ध्वजस्तंभ, मंदिराच्या गाभाऱ्यात अंधार व त्यामुळे कर्पूर आरतीने मूर्ती दर्शनाची प्रथा, देवाची सोन्या चांदीची वाहने, कुंड इ वैशिष्ट्ये आढळतात. या मंदिराचे आवारही प्रशस्त असून मंदिरासमोर नंदी आहे गर्भगृहाच्या बाजूला द्वारपाल आहेत हे द्वारपाल रेखीव आहेत इतके की, त्यांच्या पोटरीचा उंचवटाही स्पष्ट दिसतो गर्भगृहात शिवाने केलेले महालिंग आहे

या मंदिरामागेही पौराणिक आख्यायिका आहे द्वापर युगातील महा-प्रलयाच्यावेळी शिवाने अमृतकुंभ येथे बाजूला ठेवला होता म्हणून कुंभकोणम् नाव पडले योद्ध्याच्या अवतारात शिवानेच तो कुंभ तोडला. काही अमृत पाण्यामध्ये मिसळून महामहतळे तयार झाले काही अमृतबिंदू बाजूच्या वाळूवर उडाले. ते वालुकाकण शिवाने एकत्र केले व त्याचे शिवलिंग बनवून त्याची तळ्याजवळ स्थापना केली तोच कुंभेश्वर महादेव! या नगराची अधिष्ठात्री देवता !

मंदिराच्या छतावर पेंटिंग आहे मंदिराच्या सभागृहाच्या स्तंभावर ५३ मूर्ती कोरल्या आहेत. त्यात नटराज, कार्तिकस्वामी, पार्वती इ च्या मूर्ती रेखीव आहेत.

यानंतरच्या 'शारंगपाणी मंदिराचे' गोपुर भव्य, रंगीबेरंगी, तेरा मजली व १४७ फूट उंच आहे मंदिर रथासारखे आहे बाजूला दगडी अश्व, हत्ती असून दोन रथचक्रे आहेत या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे द्वारपाल बाजूला नसून समोरासमोर उभे आहेत मंदिरातील शेषशायी भगवान विष्णूची चतुर्भुज मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. मूर्तीच्या अंगावर मौल्यवान अलंकार आहेत लक्ष्मीदेवी व पृथ्वीमाता या मूर्तीही सुंदर आहेत.

तळ्याच्याकाठी असलेले काशीविश्वनाथ मंदिर काशीच्या विश्वेश्वर मंदिराइतकेच पवित्र मानले जाते. या मंदिरात गंगा, यमुना, नर्मदा, सरस्वती, गोदावरी, कावेरी, तुंगभद्रा, कृष्णा, शरयू इ. नद्यांच्या देवता मूर्ती आहेत

नागेश्वर शिव मंदिरातील शिवाची प्रभावळ प्रेक्षणीय आहे तर चक्रपाणी मंदिरात अष्टभुज चक्रपाणीची मूर्ती आहे रामस्वामी मंदिरातील स्तंभा-वरील मूर्तीकला प्रेक्षणीय आहे एका स्तंभावर तीन बाजूला तीन स्त्रिया कोरल्या आहेत यातील वीणाधारी स्त्री फारच प्रेक्षणीय आहे मंदिराच्या बाजूच्या व मागच्या भिंतीवर चित्रे आहेत आत राम, लक्ष्मण, सीता, शत्रुघ्न, भरत यांच्या मूर्ती आहेत यात द्वारपाल हनुमान आहे.

कुंभकोणमहून तंजावरकडे परतताना वाटेत तीन मैलांवरील दारासुरम या गावात आगळ्या शिल्पकृतीने नटलेले नटराज मंदिर पाहाण्यास उतरलो.

दारासुरम येथील हे मंदिर थोडे आडबाजूला असले तरी शिल्पकलेच्या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. रेखीव घोडे, हत्ती कोरले असून ते जणू मंदिराचा रथ ओढत आहेत रथचक्रेही कोरली आहेत मूर्तीकाम असलेल्या स्तभांचा मडपही आहे मंदिराच्या आवारातील पुराणवस्तु सग्रहालयात निरनिराळ्या मूर्ती, मंदिरांची चित्रे आहेत.

मंदिराबाहेर नदीच्या मागे बळपीठ असून त्यावर चढायला पायऱ्या आहेत तेथील दगडातून विविध सुरेल आवाज निघतात

कुंभकोणम, दारासुरमची भेट आटोपून रात्री आठला तंजावरला परतलो.

◻

# तिरुचिरापल्ली, श्रीरंगम् क्षेत्र

तंजावरहून सकाळी नऊला रेल्वे तिरुचिरापल्ली ऊर्फ त्रीचिच्या दिशेने धावू लागली ५६ कि मी अंतराचा प्रवास दोन तासात संपवून गाडी त्रिचीच्या प्रचंड रेल्वे स्टेशनवर आली त्रिचीला ब्रॉडगेज व मीटरगेज हे दोन्हीही रेल्वेमार्ग असल्याने ते मोठे जंक्शन आहे स्टेशनच्या मुख्य प्लॅटफॉर्मकडे यायला ओव्हर ब्रिजऐवजी भुयारी मार्ग आहे हे एक वैशिट्यच म्हणावे लागेल

दुसऱ्या मजल्यावरील रेल्वे रिटायरिंग रूम मिळाल्याने लवकर आवरून बाहेर पडणे सुलभ झाले समोरच बसस्टँड होता अतिशय प्रशस्त व स्वच्छ अशा या बसस्टँडवर चकचकीत बसगाड्याची ये-जा चालली होती. दक्षिणेकडे बस प्रवासाचा नेहमीच सुखकर अनुभव आम्हाला आला. लक्झरी बसेस वेळेवर सुटत व वेळेवर येत येथेही ताबडतोब बस मिळाली बसने रॉकटेम्पलकडे निघालो तेव्हा आठवत होता त्रिचीचा इतिहास !

त्रिचनापल्लीचे जुने नाव तिरुशिरपल्ली ! तीन शिरे असलेल्या त्रिशिरासुर नावाच्या शिवभक्त राक्षसाने (हा रावणाचा पुतण्या होता) या ठिकाणी पल्ली म्हणजे प्रार्थना केली म्हणून तिरुशिरपल्ली हे नाव पडले. नंतर तिरुचिरापल्ली-त्रिचनापल्ली हे नाव रूढ झाले पण ' त्रिची ' या छोट्या नावानेच हे शहर ओळखले जाते कावेरी नदीच्या उजव्या तीरावर वसलेले हे शहर प्राचीनकाळी चोल राजाच्या राजधानीचे ठिकाण होते. अठराव्या शतकात फ्रेंच व इंग्रज यांनी येथील एकमेकांचे शत्रू असलेल्या स्थानिक राजांना हाताशी धरून कर्नाटकचे प्रसिद्ध युद्ध केले होते

बस शहराच्या मध्यवर्ती भागात पोहोचली तेथे उतरून एका कमानीतून आत प्रवेश केला. तेव्हा एक विशाल कुंड दिसले या कुंडाचे नाव 'तेप्पकुलम'. या कुंडाशेजारीच पावणे तीनशे फूट उंचीचा एक खडक दिसला त्रिचीचा हा प्रचंड खडक कसा निर्माण झाला यासबंधी पौराणिक कथा अशी आहे

वायु आणि आदिशेष यांच्यामध्ये सामर्थ्यवान कोण याबाबत झगडा झाला आदिशेषाने आपल्या शेपटीने महामेरू या विशाल पर्वताला विळखा घातला व वायुला आव्हान दिले की तुझी शक्ती दाखव वायूने जोराचे वादळ निर्माण केले व मेरुपर्वताची हजारो शिखरे उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला आदिशेषाने आपल्या हजारो मस्तकांनी त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. या झगड्यात मेरुपर्वताचे तीन तुकडे पृथ्वीवर पडले. त्यातील एक म्हणजे व्यंकटाचल पर्वत दुसरा म्हणजे त्रिचीचा हा खडक । हा तांबूस रंगाचा खडक जणू नंदीसारखा दिसतो या उंच खडकावर हे मंदिर बांधण्यात आले व त्रिची दक्षिणेचे कैलास म्हणून ओळखले जाऊ लागले तामीळ व संस्कृत भाषेतील सुप्रसिद्ध संतकवी थयुमन्नवार हा दक्षिण भारतातील नायक राजाच्या अर्थ मंत्र्याचा मुलगा दररोज या खडकाजवळ पूजा प्रार्थना करीत असे

ह्या खडकावर असलेले शिव, पार्वती व गणेश मंदिर पाहायचे होतें खडक चढायला सुरुवात केली खाली हत्ती मोठ्या ऐटीत झुलत होता खडकाच्या पायथ्याशी गणेशाचे लहानसे मंदिर आहे मूळ साध्या मूर्तीवर चांदीचे अवयव बसवले आहेत पुढे खडक चढायला ४३४ पायऱ्या आहेत विशेष म्हणजे सर्व पायऱ्यांवर छत आहे त्यामुळे पक्षीतीर्थ चढताना जसा उन्हाचा त्रास झाला तसा त्रास जाणवला नाही या पायऱ्या चढून वर गेल्यावर सुरवातीला पार्वती मंदिर आहे ते 'सुगंधकुंतला' नावाने प्रसिद्ध आहे

पार्वतीमंदिरानंतर येते शिवमंदिर । शंकराला येथे थायुमानवार ऊर्फ मातृभूतेश्वर म्हणून ओळखले जाते या नावामागेही पौराणिक आख्यायिका आहे धनगुप्त या श्रीमंत व्यापाऱ्याची रत्नावती नावाची सुस्वरुप तरुण

पत्नी होती  ती शिवभक्त होती  तिच्या प्रसूतीच्या वेळी ती आपल्या आईची वाट पाहात होती. पण कावेरी नदीला पूर आल्याने इच्छा असूनही ती वेळेवर येऊ शकली नाही  त्यावेळी शकराने आईचे रूप धारण करून प्रसूतीच्यावेळी तिला सर्व मदत केली  कावेरीचा पूर ओसरल्यावर जेव्हा रत्नावतीची आई आली तेव्हा शिवानेच आईचे रुप घेऊन रत्नावतीची सुटका केली हा प्रकार कळल्यावर सर्वजण स्तिमित झाले

शिवमदिरातील चित्रमडपात वरील प्रसग ग्रानाईट  दगडाच्या स्तभावर कोरला आहे तसेच भित्तीचित्रातही  चित्रित केला आहे  तेथील छतावर शकराचे उभे  भव्य चित्र आहे  भितीवर चहूबाजूनी देवताची चित्रे असून खांबावर मूर्ती कोरल्या आहेत. मदिरात शकराचे स्वयभू शिवलिग आहे

दुसऱ्या टप्प्याच्या पायऱ्या ओलांडल्यावर सर्वात उचावरील गणेश मदिराकडे जाताना दोन  गुफा लागल्या  ह्या गुफा सहाव्या शतकात पल्लवकाली महेंद्रवर्मनने कोरुन घेतल्या  आतील खाबावर कमळे कोरली आहेत

आणखी २५–३० पायऱ्या चढून वर गेलो  या पायऱ्यावर छत नाही अगदी उचावरील गणेश मदिर पाहून पूर्वी वाहतुकीची सोय नसताना एवढ्या उचावर ही सुदर मदिरे कशी बाधली असतील हा विचार वारवार मनात येत होता  प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा  अशीच ही कारागिरी आहे  गणेशमदिरावरून नागमोडी वळणाकार पवित्र कावेरी नदी दिसत होती  त्रिचीचे विहगम  दृश्य दिसत होते  आजूबाजूचा कित्येक मैलांचा दूरवरचा प्रदेश प्रेक्षणीय दिसत होता  हिरवीगार भातशेते नयनांना सुखवीत होती. या मदिराच्या चहूबाजूच्या जाळ्यातून दिसणारे हे सुदर दृश्य कधीच विसरणे शक्य नाही

गणेश मदिराजवळ एक मोठी घटा आहे  ती  चार फूट सहा इच लांबीरुदीची व अडीच  टन वजनाची आहे  ती वाजवण्यास शिडीवरून जावे लागते.

खडकावरील मदिरे पाहून पायऱ्या उतरून खाली आलो तेव्हा असे वाटले की माणसे येतील आणि जातील पण हजारो वर्षांपासून दिमाखात उभा असलेला हा पवित्र खडक मात्र चिरतन राहील

या खडकासमोरील तलावात खडकाचे सुदर प्रतिबिब पडले होते या तलावाच्या एका बाजूला रोमन कॅथॉलिकाचा सेंट जोसेफ चर्च दर्शनीय आहे लाकडी कमानी व नक्षीकाम सुबक आहे बाजूला कमानीत ख्रिस्त जीवनातील सगमरवरी रेखीव पुतळे आहेत येशूचा क्रूसावरील कारुण्यमय पुतळा आहे तलावाच्या दुसऱ्या बाजूला कमानीची इमारत आहे तेथे क्लाईव्हने १७५२ मध्ये काही काळ वास्तव्य केले होते

त्रिचीची भेट आटोपून श्रीरगम् क्षेत्रचे प्रसिद्ध मदिर पहाण्यास निघालो

## श्रीरंगम् क्षेत्र

त्रिचनापल्लीहून श्रीरगमक्षेत्राला जाण्यासाठी उत्तरेला पाच कि. मी अतराचा प्रवास करून, कावेरी नदी पार करून तिच्या डाव्या तीरावरील श्रीरंगमक्षेत्री आलो.

श्रीरगमचे श्रीरगनाथाचे मदिर कावेरी नदीच्या दोन प्रवाहानी तयार झालेल्या बेटात वसले आहे. भारतातील १०८ वैष्णवक्षेत्रांपैकी हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. भूलोकीचे ते वैकुठधाम समजले जाते हे मदिर २००० वर्षापूर्वीचे प्राचीन असून त्याच्या भव्यतेला तोड नाही भारताच्या उज्ज्वल सास्कृतिक वारशाचे ते प्रतीक आहे

प्रत्येक मदिरामागे काही ना काही कथा असतेच त्याप्रमाणे या मदिरालाही कथा आहे लकेत विजय प्राप्त झाल्यावर प्रभु श्रीरामचद्राचा राज्याभिषेक अयोध्येत झाला। राज्यारोहणानतर प्रभु श्रीरामचद्राने सर्वांना त्यांच्या इच्छेप्रमाणे भेटी दिल्या त्यावेळी रावणाचा भाऊ बिभीषण याने केलेल्या सेवेने प्रभावित होऊन श्रीरामचद्राने आपल्या कुलाची आराध्य देवता असलेली भगवान श्रीरगाची मूर्ती त्याला दान दिली बिभीषण लकेकडे परत निघाला असताना कावेरी नदीच्या काठी मुक्कामाला थांबला बिभीषणाने पुढे प्रवास सुरू केल खरा पण श्रीरगाची मूर्ती पुढे बिलकूल सरकेना त्यामुळे बिभीषण चिताक्रात झाला त्याचे सांत्वन करताना भगवान म्हणाले “ दुःखी होऊ नकोस कावेरी नदीचे हे जे मध्यद्वीप आहे ते पवित्र ठिकाण आहे माझी इच्छा येथेच राहावे अशी आहे तू लकेला पुढे जा मी दक्षिणाभिमुख

राहून कायम तुझ्या राज्याचे निरीक्षण करीन " श्रीरंगनाथजीच्या इच्छेप्रमाणे बिभीषणाने तेथे मूर्ती स्थापन केली

तामिळनाडूच्या चोल राजांची श्रीरंगनाथ ही आराध्य देवता आहे १४ ते १७ व्या शतकात चोलराजानी भरपूर आर्थिक सहाय्य करून हे मंदिर पुन. बांधले. कावेरी नदीच्या पुरामध्ये हे क्षेत्र वाळूच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. चोल नरेशानी प्रयत्न करून गाडले गेलेले हे मंदिर साफ करून घेतले. निरनिराळ्या चोल राजांनी मंदिराची वारंवार दुरुस्ती करून उंच गोपुर, मोठमोठे मंडप इ बांधले तसेच सुवर्णध्वजस्तंभ उभारला भगवानाची सोन्याचांदीची वाहने बनवून घेतली विजयनगरच्या सम्राटांनीही अमूल्य रत्ने, सोने, चांदीचे अनेक दागिने, भांडी देणगीदाखल दिली

श्रीरंगमच्या या मंदिराचा विस्तार तीन मैल इतका प्रचंड आहे किल्ल्यासारख्या दगडी प्रवेशद्वारातून आत प्रवेश केला पाव लाख वस्तीचे श्रीरंगम् शहर या मंदिराच्या क्षेत्रातच वसले आहे भारतात इतके विशाल मंदिर कुठलेही नाही

मंदिराच्या आवारात सहा प्राकार आहेत छोटीमोठी २१ गोपुरे आहेत सर्वात मोठे 'श्वेतगोपुरम्' २७० फूट उंच आहे देवळाचे शिखर सोन्याच्या पत्र्याने मढवलेले आहे त्याची किंमत दहा लक्ष असावी द्राविड शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने ठिकठिकाणी आढळतात

मंदिराच्या पहिल्या तीन प्रदक्षिणाच्या मार्गात ब्राह्मण, आचार्यगण यांचे महाल व मठ आहेत. चौथ्या प्रदक्षिणेत १००० खांबांचा मंडप आहे त्यावर विशेष नक्षीकाम नाही श्रीरामानुजाचार्यांचे मंदिर, श्रीलक्ष्मीचेही मंदिर आहे पाचव्या प्रदक्षिणेत 'गरुडमंडप' आहे तेथे श्रीगरुडभगवानाची भव्य विशाल मूर्ती आहे मूर्तीचे हात जोडलेले असून गरुड ध्यानस्थ बसलेला आहे. स्तंभावरही हात जोडलेले पुतळे आहेत

शेजारीच अश्वमंडप आहे तेथील स्तंभावर मागच्या दोन पायावर उभ्या असलेल्या अश्वावर स्वार झालेल्या, हातातील तलवारीने शिकार करणाऱ्या

स्वाराच्या आकृत्या कोरल्या आहेत या शिल्पकृती म्हणजे मूर्तीमत पराक्रम व गतिमानता ।

सहाव्या प्रदक्षिणेत भगवानाच्या समोर सुवर्णमंडित ध्वजस्तंभ आहे. त्या समोर श्रीहनुमानाची भव्य मूर्ती आहे मंदिराच्या दारातच हत्ती झुलत होता

सातव्या प्रदक्षिणेत भगवान श्रीरंगनाथाचे मंदिर आहे भगवानाची शामवर्णीय, विशाल, द्विभुज, शेषशायी, दहा फूट लांबीची दक्षिणाभिमुख मूर्ती आहे भगवानाच्या मस्तकावर फणाधारी शेष आहे बहुमूल्य रत्ने हिरे यांनी सुशोभित अशी ही भव्य मूर्ती पाहून मन तृप्त झाले. शेजारी सुवर्णाची उत्सवमूर्ती आहे श्रीरंगनाथाचे दागिने लक्षावधी रुपयांचे आहेत. ते पाहाण्याची फी वीस रुपये आहे एक मजेशीर हकीकत तेथे ऐकायला मिळाली १८ व्या शतकात एका युरोपियन सैनिकाने श्रीरंगनाथाचा एक तेजस्वी हिरा चोरला कालांतराने तो देशाबाहेर नेला गेला व रशियाच्या झारराजाच्या मुकुटावर चमकू लागला श्रीरंगाच्या मस्तकावरील हिरा दैवयोगाने झारराजाच्या शिरावर गेला

मंदिराच्या आवारात बिभीषणाने येथे मूर्ती स्थापन केली या गोष्टीचा पुरावा असलेली एक शिल्पकृती आहे. त्यात बिभीषण श्रीरंगाची पूजा करीत आहे असे दृश्य आहे

मंदिराच्या आवारातील छोटेखानी वेणुगोपाल मंदिर होयसाळा धर्तीचे असून आठव्या व नवव्या शतकातील आहे. या मंदिरावरील शिल्पकाम नितांतसुंदर आहे मंदिराच्या भिंतीवर हातावर पोपट असलेली, आरशात बघून तिलक लावणारी अशा कितीतरी सुंदरी कोरल्या आहेत त्यांच्या सलज्ज भावमुद्रा अविस्मरणीय आहेत अंगकाठी रेखीव आहेत

या मंदिराच्या आवारात एक छोटेसे संग्रहालयही आहे त्यात ब्रॉझचे अनेक प्रेक्षणीय पुतळे आहेत उत्कृष्ट हस्तीदंती कलाकृतीही आहेत त्यात तिरुमल नायक राजाची मूर्ती आहे मंदिर पहाताना मनात विचार आला की एवढ्या मोठ्या मंदिराची देखभाल करणे दुरुस्ती करणे किती अवघड काम आहे. मंदिराचे आवार स्वच्छ होते भक्तगणांनी गजबजलेल्या

या मदिराचे आवार स्वच्छ ठेवणेही अवघडच आहे मदिराच्या दुरुस्तीसाठी सुमारे ५० लाख रुपये खर्च येईल असा विश्वस्ताचा अदाज आहे युनेस्को-मार्फत देणगी मिळवण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे युनेस्कोच्या पुराण वास्तुतज्ज्ञानी १९६६ मध्ये या मदिराला भेट देऊन त्याचा अहवाल सादर केला अशीही माहिती मिळाली हे मदिर पाहून मोठ्या समाधानाने जबुकेश्वर हे शिवस्थान पहावयास निघालो

**जबुकेश्वर**

श्रीरगपासून केवळ दोन कि मी अतरावर पूर्वेला तिरुवनकॉईल हे गाव आहे तेथे जबुकेश्वर हे प्राचीन शिवस्थान पाहायला बसने पोहोचलो जबुकेश्वर क्षेत्र शैव सप्रदायाचे आहे हे मदिर चोलराजानी बांधले.

मोठ्या रस्त्याला छेदणाऱ्या रस्त्यावर आतील बाजूला गेल्यावर विशाल रगीबेरगी नऊ मजली गोपुर दिसते गोपुरावरील तिसऱ्या मजल्यावर गोपीवस्त्रहरणाचा प्रसग कोरला आहे मदिराला एकूण पाच प्रकार आहेत मदिराच्या गाभाऱ्याच्या बाजूला ताब्याचे द्वारपाल आहेत

मदिरातील शिवलिंगाच्या पिंडीभोवती पाणी कायम असते ते पपाने बाहेर काढावे लागते त्यामुळे शकराचे ' अप्पुलिंग ' अशी या मदिराची प्रसिद्धी आहे.

जबुकेश्वर मदिराच्या मागे जाभळाचा एक प्राचीन वृक्ष आहे त्या भोवती चबुतरा आहे एका पौराणिक कथेनुसार या मदिराचे व शिवलिंगाचे नाव जबुकेश्वर पडले लगतच जंबुतीर्थ ( सरोवर ) आहे.

दक्षिणेकडील एकाच धर्तीची गोपुरे असलेली मदिरे पहाण्याच्या आता मात्र कटाळा आला होता कारण त्यात नाविन्याचा अभाव होता भव्य भव्य गोपुरे पाहून पुढे पुढे त्याच्या भव्यतेबद्दल काहीच वाटेना ज्याकाळी ही मदिरे भरपूर द्रव्य खर्चून बांधली त्यावेळी त्यांना कल्पनाही नसेल की, काही काळानतर त्यांची देखभाल करणेही अवघड होईल. आज इतकी विशाल मदिरे निर्माण होणे तर शक्य नाहीच पण आहेत त्यांची देखभाल करणेही अवघड आहे सुदैवाने ठिकठिकाणी देवस्थान विश्वस्त असल्याने काही प्रमाणात तरी त्याची देखभाल, दुरुस्ती होते.

जबुकेश्वर मदिर पाहून त्रिचीला मुक्कामाला आलो

☐

# श्री सेतुबंध रामेश्वर

सकाळी सहा वाजता मद्रास रामेश्वर एक्सप्रेसने त्रिचनापल्ली स्टेशन सोडले. त्रिचीहून सोडल्या जाणाऱ्या डब्यातच जागा मिळाल्याने गर्दी नव्हती. मानामदुराईपर्यंतचा प्रवास केव्हा संपला कळले नाही. तेथून एक फाटा मदुरेला जातो. इडली आणि गरम कॉफीचा आस्वाद घेतला. आता रामेश्वरच्या दिशेने प्रवास सुरू झाला.

दुपारचे साडेबारा वाजले तेव्हा गाडी मंडपम स्टेशनमध्ये आली. यावेळी गाडी जणू समुद्रात प्रवास करायला लागली होती. दोन्ही बाजूला अथांग समुद्र व सगळीकडे वाळू पसरलेली! समुद्राच्या काठांवरूनच आमचा प्रवास चालू होता. उल्का-उदय या अद्‌भुत दृश्याने आनंदित होऊन टाळ्या वाजवू लागले. उल्का म्हणाली—

झुक झुक झुक झुक आगीन गाडी.
वाळूकिनारा, अथांग पाणी

हळू हळू गाडी समुद्राच्या खाडीवरील मोठ्या लोखंडी पुलावर चढली. या पुलावरचा पाच मिनिटांचा प्रवास म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव आहे. सर्वत्र दिसत होता समुद्राच्या पाण्याचा निळसर अथांग प्रवाह! त्याच्या निळसरपणाशी व अथांगपणाशी आकाशाचीही जणू स्पर्धा सुरू होती. पाण्यात मधून मधून दिसत होते, उघडे पडलेले खडक! लाटांचे नृत्य! पाण्यावर डुलणाऱ्या बोटी! गाडी डुलत डुलत पूल पार करीत होती. 'कुऽक' अशी शिट्टी देताना येथे निसर्गावर मानवाने मात केली आहे असे जणू ती ओरडून

लागत होती. हा पूल मोठ्या बोटी जायच्या असतील तर मध्यभागी वर उचलला जातो हे ऐकल्यावर आश्चर्यच वाटले. पाण्याची मौज पहाता पहाता पूल संपला व गाडी पामबन स्टेशनमध्ये आली तेथून धनुष्कोडीला फाटा जातो.

ठीक दीड वाजता रामेश्वरच्या स्टेशनात गाडी थांबली. वाळू तुडवीत स्टेशनबाहेर आलो रेल्वे रिटायरिंग रूम मिळवण्यासाठी प्रत्येक प्रवाशाची धडपड चालली होती पण सर्व रूम्स भरलेल्या होत्या. शेवटी टांगा करून रामेश्वर देवस्थान ट्रस्टच्या ऑफिसमध्ये आलो. तेथे नाव नोंदवले व कॉटेजची किल्ली घेऊन परतलो दोन बेडरूम्स, स्वयंपाकगृह, दोन स्नानगृहे, स्वच्छतागृह असे स्वतंत्र, सुंदर कॉटेज पाहून मन प्रसन्न झाले एक दिवसाचा आकार केवळ १२ रुपये होता

सर्व सामान लावून स्नान वगैरे आटोपेपर्यंत दुपारचे दोन वाजले. जठराग्नि अगदी भडकला होता जवळपास दुसरे हॉटेल नसल्याने देवस्थान कँटीनमध्ये गेलो घोंघावणाऱ्या माशा, सर्व जमिनीवर सांडलेली भाताची शिते व उग्र चेहेऱ्याचा वेटर ! प्रथमदर्शनीच बिचकलो जेवण आहे का विचारल्यावर जेवणाची वेळ संपली असे निर्विकार चेहेऱ्याने वेटर म्हणाला दुसरे काही मिळेल का असे चिकाटीने विचारल्यावर भात मिळेल म्हणाला, चला, भात तर भात असे म्हणून आजूबाजूच्या वातावरणाकडे दुर्लक्ष करून तसेच बसलो भाताची थाळी आली त्यावर सांबार ! मुलासाठी दही आहे का विचारले वेटर म्हणाला ' फिनीश ! '

' चटणी ? '

' फिनीश ! '

' एक्स्ट्रॉ भात ? '

' फिनीश ! '

' चहा, कॉफी काही मिळेल का ? ' हे मुद्दाम म्हणाले.

तेव्हा रागीट चेहेऱ्यावर तिरस्काराची छटा आणीत तो इंग्रजीत म्हणाला ' इथे सर्व टाईम टू टाईम मिळते भलत्यावेळी काही मिळणार नाही ' एकीकडे भुकेने व्याकूळ झालो होतो त्यात उद्धट वेटरच्या खेकसण्याची भर ! आमच्या संबंध प्रवासात एवढा रागीट वेटर हाच भेटल्याने पक्का स्मरणात राहिला.

दक्षिणेकडे मंदिरे उघडण्याचा व बंद होण्याच्या ठराविक वेळा असतात. रामेश्वराचे मंदिर चार वाजता उघडणार होते म्हणून लॉजवर एकदीड तास विश्रांती घेऊन मंदिराकडे निघालो तामीळ संगीताचे स्वर कानावर पडत होते

रामायण जेव्हढे प्राचीन तेव्हढेच रामेश्वरही प्राचीन ! रामेश्वर हे एक छोटे द्वीप-बेट आहे त्याचा आकार विष्णूच्या हातातील शंखासारखा आहे ११ मैल लांब व ७ मैल रुंद असलेले हे बेट भारताच्या मुख्यभूमीस रेल्वेपुलाने जोडले गेले आहे चार दिशातील चार पवित्र धामापैकी रामेश्वर हे दक्षिणेकडील पवित्र धाम ।

रामेश्वर याचा अर्थ रामाचा ईश्वर ! हे प्राचीन पवित्रस्थान असे आहे की जेथे प्रभु रामचंद्राने ईश्वराची स्थापना केली अत्याचारी रावणाचा वध करून प्रभु रामचंद्र अयोध्येला परत जात असताना गंधमादन पर्वताजवळील काही तपस्वींनी श्रीरामला ब्रह्महत्येबद्दल दोष दिला रावण ब्राह्मण होता व त्यामुळे ब्रह्महत्येचे पाप रामाला लागले असे त्यांना वाटत होते मुनींनी सुचवले की शिवलिंगाची प्रतिष्ठापना केल्याने ब्रह्महत्येच्या पापापासून त्याची मुक्तता होईल श्रीरामाने कैलासपर्वतावरून शिवलिंग आणायला सांगितले पण हनुमानाला विलंब लागल्याने सीतादेवीने समुद्राच्या वाळूतुन लिंग निर्माण केले श्रीरामाने त्याची विधिपूर्वक पूजा करून पाप मिटवले तेवढ्यात हनुमान लिंग घेऊन आला त्याने वाळूचे बनवलेले लिंग पाहिले व त्याचा क्रोध अनावर झाला- त्याने शेपटीने ते लिंग उपटून टाकण्याचा प्रयत्न केला पण ते उपटले गेले नाही हनुमानाचा राग शांत करण्यासाठी श्रीरामाने त्याने आणलेल्या लिंगाचीहा स्थापना बाजूला केली त्या लिंगाचे नाव विश्वनाथ ! श्रीरामाने आदेश दिला की प्रथम हनुमानाने आणलेल्या शिवलिंगाची पूजाअर्चा केली जावी रामेश्वर येथील शिवलिंग बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे

समुद्रकाठावरच्या रामलिंगश्वराची देखरेख एका झोपडीत एक साधू करीत असे श्रीलंकेचा राजा पराक्रमबाहू एकदा या ठिकाणाहून जात असताना या रामलिंगेश्वरचे दर्शन त्याला झाले झोपडीतील या लिंगासाठी

बाराव्या शतकात छोटे मंदिर बांधले गेले हे मूळचे मंदिर गर्भगृह समजले जाते तेव्हापासून रामाचा नाथ म्हणजे ईश्वर म्हणून रामेश्वर नाव प्रचलित झाले

रामनाथपुरमच्या सेतुपती राजांनी या मंदिराच्या उभारणीत वेळोवेळी महत्त्वाचा हातभार लावला विविध मंदिरे, गोपुरे याची भर त्यामुळे पडली मदुरेचा राजा विश्वनाथ नायक यानेही नंदीमंडप इ मंदिराच्या उभारणीचे काम केले त च अनेक धनिक, धार्मिक व्यक्तींनी भरघोसपणे आर्थिक सहाय्य केले अशाप्रकारे आजच्या स्वरूपातील या मंदिराच्या उभारणीला शतकानुशतके लागली

या विशाल मंदिराची पूर्वपश्चिम लांबी ८६५ फूट व उत्तरदक्षिण लांबी ६५७ फूट आहे पूर्वेकडील गोपुर १२६ फूट उंच तर पश्चिमेकडील ७८ फूट उंच आहे मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच नुकताच १९७४ साली बांधलेला सेतुपतीमंडप आहे हा मंडप रामनाथपुरमच्या राजा सेतुपतीने तीन लाख रु खर्चून बांधला सेतुपती राजाच्या पित्याचा पुतळाही मंडपात आहे मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ एक शिलालेख आहे त्यावर स्वामी विवेकानंदांनी १८९७ साली मंदिराला भेट दिल्यावर प्रभावित होऊन काढलेले गौरवोद्‌गार कोरले आहेत त्यांनी अभिप्राय व्यक्त केला आहे की,

*" I have great pleasure in testifying to the politeness and ready service of the priest and supervisors of this temple "*

मंदिरात प्रवेश केल्यावर ऐटीत झुलणारा गजराज दिसला. मग दिसला नंदीमंडप! ह्या मंडपात बावीस फूट लांब, बारा फूट रुंद व सतरा फूट उंचीचा पांढऱ्या रंगाचा प्रचंड नंदी आहे हा नंदी पाषाणाचा नाही हे विशेष वाळू व चुना याच्या मिश्रणाने तो बनवला आहे. या नंदीची जीभ बाहेर आलेली आहे या नंदीबद्दल अशी एक आख्यायिका आहे की पूर्वी त्याच्याकडे पाहून एक नास्तिक माणूस तुच्छतेने म्हणाला की 'काय हा नंदी घास खाऊ शकेल काय?' त्यावर यानंदीने त्याच्या देखतच घास खाऊन दाखवला. या नंदीच्या डाव्या बाजूला गणेशाची मूर्ती आहे तर उजव्या बाजूला कार्तिकस्वामीची आहे.

मुख्यमंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा चांदीचा आहे. आत रामाने स्थापन केलेले लिंग चांदीच्या चबुतऱ्यावर आहे. वर शेषाचा फणा छत्रासारखा आहे. शेजारी हनुमानाने स्थापलेले लिंग आहे. समोरच्या मंडपाच्या छतावर श्रीराम, सीता व दोन्ही हातात लिंग धारण केलेला हनुमान चित्रित केला आहे. मंदिरासमोर सुवर्णस्तंभ आहे.

मुख्य मंदिराच्या बाहेर गणेश, कार्तिकेय व नवग्रह इ. लहान मंदिरे आहेत. शेजारी पार्वतीमंदिर आहे. या मंदिराच्या कोपऱ्यातील दगडी स्तंभाचे नक्षीकाम सुंदर आहे. प्रत्येक खांबावर तीन सिंह कोरले आहेत. एका कोपऱ्यात नटराजाची तांब्याची आकर्षक मूर्ती आहे.

या मंदिरातील सर्व प्रदक्षिणामार्गाची ४००० फूट लांबी जगात अद्वितीय मानतात. याच्या छतावर रंगीत नक्षीकाम आहे. प्रदक्षिणा मार्गाच्या दोन्ही बाजूला स्तंभाची रांग नजरेत मावत नाही. यात एकूण १२१२ दगडी स्तंभ आहेत. हे स्तंभ अलौकिक शिल्पकृतीने सजले आहेत. इ. स. १७४० ते १७७० मध्ये हे बांधकाम झाले. पूर्वीच्या काळी वाहतुकीची विशेष साधने नसताना दुरून प्रचंड दगडी शिळा आणून त्या प्रमाणबद्ध आकारात घडवून स्तंभ उभे करणे ही किती कठीण गोष्ट होती! खरोखर प्रगत द्रविड शिल्पकलेचा परमोत्कर्ष म्हणजे हे मंदिर! मंदिराचा दरवाजा व छत यासाठी लंकेहून चाळीस फूट लांबीच्या अखंड शिळा आणून वापरल्या आहेत.

मंदिराच्या आत ठिकठिकाणी बावीस छोट्या तीर्थांचे आड आहेत. तेथे प्रत्येक ठिकाणी यात्रिकाला बादलीने पाणी काढून स्नान करावे लागते. देवळातील तीर्थांपैकी कोटितीर्थ व सर्वतीर्थ महत्त्वाची आहेत. रामाने जमिनीत बाणाचे टोक (कोटी) खुपसून जो झरा निर्माण केला त्यावरून कोटितीर्थ हे नाव पडले.

रामेश्वरला येणारे यात्रिक काशीहून आणलेली गंगा रामेश्वरला अर्पण करणे हा महत्त्वाचा धार्मिक विधी मानतात. गंगार्पण करण्यासाठी प्रत्येक तांब्यासाठी ठराविक फी आहे. त्यामुळे बरेच यात्रेकरू आणलेली गंगा एकत्र करून अर्पण करतात व फी वाचवतात.

रामेश्वरजवळ अनेक लहानमोठी दर्शनीय स्थळे आहेत त्यापैकी रामझरोखा हे स्थान मंदिरापासून दोन कि मी अंतरावर आहे जाताना मार्गावर सुग्रीवतीर्थ, अंगदतीर्थ, अमृततीर्थ इ आहेत नंतर हनुमानाची बालरूप सुंदर मूर्ती असलेले हनुमानमंदिर आहे

पुढे एक टेकडी लागते तिचे नाव गंधमादन ! येथील मंदिरात भगवान रामाचे चरणचिन्ह आहे येथूनच हनुमानाने लंकेवर जाण्यासाठी समुद्र पार केला असा समज आहे.

परत येताना वाटेवर युधिष्ठिराने स्थापलेले धर्मतीर्थ आहे पुढे भीमतीर्थ, अर्जुनतीर्थ, नकुलतीर्थ, सहदेव तीर्थ व ब्रह्मतीर्थ आहे

खरच, राम, कृष्ण, पांडव हजारो वर्षापूर्वी होऊन गेले पण त्यांची पदचिन्हे साऱ्या भारतवर्षात उमटली आहेत त्यांनी घडविलेला इतिहास आजही जणू जिवंत आहे रामायण हा तर भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे असे म्हटले जाते ते किती खरे आहे याची प्रचीती प्रवासात येत होती हिमालयावर वास्तव्य करणाऱ्या भगवान शंकरांची थोरवी तर काय वर्णन करावी ? हिमालयापासुन कन्याकुमारीपर्यंत ठायी ठायी त्यांचे अस्तित्व आहे देवता कुणी मानोत वा न मानोत पण विविधपंथाच्या जातीच्या भारतीयामध्ये एकी निर्माण करण्याचे महान सांस्कृतिक कार्य त्या नक्कीच करतात परमेश्वरापुढे प्रत्येक भारतीय नम्र होतो

सायंकाळ झाली होती तेव्हा मंदिरासमोरच्या रस्त्याने पाच मिनिटातच समुद्रकिनाऱ्यावर आलो अथांग समुद्र शांत वाटत होता रामाच्या पवित्र चरणकमलाने पुनीत झालेल्या तीर्थक्षेत्री अस्तंगत होणाऱ्या सूर्याच्या साक्षीने समुद्रस्नानासाठी आम्ही सर्वांनी डुब्या मारल्या समुद्र उथळ होता व वाळू घट्ट होती आजूबाजूला दिसत होते रामायणाच्या महान संस्कृतीचा वारसा जतन करून ठेवणाऱ्या या स्थानाला भेट देऊन कृतकृत्य होणारे प्रवासी ! प्रांत वेगळा, भाषा वेगळी, गावे, जाती, धर्म वेगळे, स्त्री असो वा पुरुष, तरुण असो वा वृद्ध प्रत्येकजण स्नान करण्यात गुंग होता विविधतेत एकात्मतेचा साक्षात्कार झाला. रामेश्वरचे तीर्थक्षेत्र भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक वाटत होते.

☐

मुख्यमंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा चांदीचा आहे. आत रामाने स्थापन केलेले लिंग चांदीच्या चबुतऱ्यावर आहे. वर शेषाचा फणा छतासारखा आहे. शेजारी हनुमानाने स्थापलेले लिंग आहे. समोरच्या मंडपाच्या छतावर श्रीराम, सीता व दोन्ही हातात लिंग धारण केलेला हनुमान चित्रित केला आहे. मंदिरासमोर सुवर्णस्तंभ आहे.

मुख्य मंदिराच्या बाहेर गणेश, कार्तिकेय व नवग्रह इ. लहान मंदिरे आहेत. शेजारी पार्वतीमंदिर आहे. या मंदिराच्या कोपऱ्यातील दगडी स्तंभाचे नक्षीकाम सुंदर आहे. प्रत्येक खांबावर तीन सिंह कोरले आहेत. एका कोपऱ्यात नटराजाची तांब्याची आकर्षक मूर्ती आहे.

या मंदिरातील सर्व प्रदक्षिणामार्गाची ४००० फूट लांबी जगात अद्वितीय मानतात. याच्या छतावर रंगीत नक्षीकाम आहे. प्रदक्षिणा मार्गाच्या दोन्ही बाजूला स्तंभाची रांग नजरेत मावत नाही. यात एकूण १२१२ दगडी स्तंभ आहेत. हे स्तंभ अलौकिक शिल्पकृतीने सजले आहेत. इ. स. १७४० ते १७७० मध्ये हे बांधकाम झाले. पूर्वीच्या काळी वाहतुकीची विशेष साधने नसताना दुरून प्रचंड दगडी शिळा आणून त्या प्रमाणबद्ध आकारात घडवून स्तंभ उभे करणे ही किती कठीण गोष्ट होती ! खरोखर प्रगत द्रविड शिल्पकलेचा परमोत्कर्ष म्हणजे हे मंदिर ! मंदिराचा दरवाजा व छत यासाठी लंकेहून चाळीस फूट लांबीच्या अखंड शिळा आणून वापरल्या आहेत.

मंदिराच्या आत ठिकठिकाणी बावीस छोट्या तीर्थांचे आड आहेत. तेथे प्रत्येक ठिकाणी यात्रिकाला बादलीने पाणी काढून स्नान करावे लागते. देवळातील तीर्थांपैकी कोटितीर्थ व सर्वतीर्थ महत्त्वाची आहेत. रामाने जमिनीत बाणाचे टोक (कोटी) खुपसून जो झरा निर्माण केला त्यावरून कोटितीर्थ हे नाव पडले.

रामेश्वरला येणारे यात्रिक काशीहून आणलेली गंगा रामेश्वरला अर्पण करणे हा महत्त्वाचा धार्मिक विधी मानतात. गंगार्पण करण्यासाठी प्रत्येक तांब्यासाठी ठराविक फी आहे त्यामुळे बरेच यात्रेकरू आणलेली गंगा एकत्र करून अर्पण करतात व फी वाचवतात.

रामेश्वरजवळ अनेक लहानमोठी दर्शनीय स्थळे आहेत. त्यापैकी रामझरोखा हे स्थान मंदिरापासून दोन कि मी अंतरावर आहे जाताना मार्गावर सुग्रीवतीर्थ, अंगदतीर्थ, अमृततीर्थ इ आहेत नंतर हनुमानाची बालरूप सुंदर मूर्ती असलेले हनुमानमंदिर आहे

पुढे एक टेकडी लागते तिचे नाव गंधमादन ! येथील मंदिरात भगवान रामाचे चरणचिन्ह आहे येथूनच हनुमानाने लंकेवर जाण्यासाठी समुद्र पार केला असा समज आहे

परत येताना वाटेवर युधिष्ठिराने स्थापलेले धर्मतीर्थ आहे पुढे भीमतीर्थ, अर्जुनतीर्थ, नकुलतीर्थ, सहदेव तीर्थ व ब्रह्मतीर्थ आहे

खरच, राम, कृष्ण, पांडव हजारो वर्षांपूर्वी होऊन गेले पण त्यांची पदचिन्हे साऱ्या भारतवर्षात उमटली आहेत. त्यांनी घडविलेला इतिहास आजही जणू जिवंत आहे रामायण हा तर भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे असे म्हटले जाते ते किती खरे आहे याची प्रचीती प्रवासात येत होती हिमालयावर वास्तव्य करणाऱ्या भगवान शंकरांची थोरवी तर काय वर्णन करावी ? हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत ठायी ठायी त्यांचे अस्तित्व आहे देवता कुणी मानोत वा न मानोत पण विविधपंथाच्या जातीच्या भारतीयांमध्ये एकी निर्माण करण्याचे महान सांस्कृतिक कार्य त्या नक्कीच करतात. परमेश्वरापुढे प्रत्येक भारतीय नम्र होतो

सायंकाळ झाली होती तेव्हा मंदिरासमोरच्या रस्त्याने पाच मिनिटातच समुद्रकिनाऱ्यावर आलो अथांग समुद्र शांत वाटत होता रामाच्या पवित्र चरणकमलाने पुनीत झालेल्या तीर्थक्षेत्री अस्तंगत होणाऱ्या सूर्याच्या साक्षीने समुद्रस्नानासाठी आम्ही सर्वांनी डुब्या मारल्या समुद्र उथळ होता व वाळू घट्ट होती आजूबाजूला दिसत होते रामायणाच्या महान संस्कृतीचा वारसा जतन करून ठेवणाऱ्या या स्थानाला भेट देऊन कृतकृत्य होणारे प्रवासी ! प्रांत वेगळा, भाषा वेगळी, गावे, जाती, धर्म वेगळे, स्त्री असो वा पुरुष, तरुण असो वा वृद्ध प्रत्येकजण स्नान करण्यात गुंग होता विविधतेत एकात्मतेचा साक्षात्कार झाला रामेश्वरचे तीर्थक्षेत्र भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक वाटत होते

□

# मीनाक्षी मदुराई

पहाटे सहा वाजता रामेश्वर स्टेशनहून निघालेली रामेश्वर मदुराई पॅसेंजर दुपारी स्टेशनच्या आवारात शिरली रेल्वे रिटायरिंग रूम न मिळाल्याने स्टेशनजवळील मदुरा कार्पोरेशनच्या रेस्ट हाऊसमध्ये पोहोचलो सामान वगैरे लावून प्रथम जेवणासाठी जवळच्या हॉटेलमध्ये गेलो

मदुरा म्हणजे तामिळनाडूमधील मद्रासखालोखाल महत्त्वाचे शहर ! तामीळ संस्कृतीचे पुरातन केंद्र ! या शहराचा इतिहास प्राचीन आहे ग्रीस व रोमशी येथून ख्रिस्तपूर्व काळात व्यापार चाले सातव्या शतकात या ठिकाणी शिवमंदिर होते पांड्य राजांनी या शहरावर तिसऱ्या ते दहाव्या शतकापर्यंत राज्य केले बाराव्या शतकातील सुंदर पांड्य राजाच्या काळात बांधकाम सुरू झाले चौदाव्या शतकापर्यंत चोल राजांनी राज्य केले विजय-नगरच्या राजांच्या अमलाखालीही हा प्रदेश होता नऊ मजली गोपुरे १३ व्या व १६ व्या शतकात बांधली गेली १५५९ ते १७८१ हा नायक राजवटीखालील दोनशे वर्षांचा काळ मदुराईच्या उत्कर्षाचा होता विश्वनाथनायक या राजाने १५६० मध्ये मंदिराची नव्याने आखणी केली तिरुमलनायक हा तर प्रख्यात राजा ! त्याने ३७ वर्षे राज्य केले १६२३ ते ५९ या काळात मंदिरातील विविध, सुंदर व आकर्षक कलाकृती पूर्ण केल्या १००० स्तंभाचा मंडप त्या काळात बांधला गेला

अशा प्रकारे मंदिराचे महत्त्वाचे बांधकाम बाराव्या ते अठराव्या शतका-पर्यंत पूर्ण झाले १८७७ मध्ये नवे स्वरूप देण्यात आले प्रख्यात 'कमनथडी' मंडपात नवीन सुंदर पुतळ्यांची भर घातली गेली

सुंदरेश्वर ऊर्फ शिवाचे आगमन मदुरेला कसे झाले यामागे एक पौराणिक कथा आहे मलयद्वाज पांड्य हा राजा गादीवर आल्यानंतर त्याने पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ केला. या यज्ञकुंडातून तीन वर्षांची कन्या निघाली तिला तीन वक्ष होते त्यामुळे राजा घाबरला. पण तेवढ्यात आकाशवाणी झाली. ह्या मुलीला तिच्या पतीचे दर्शन झाल्यावर तिचे तिसरे वक्ष नाहीसे होईल या राजकन्येचे नाव मीनाक्षी। माशासारखे नेत्र असलेली। पुढे राजकन्या मोठी झाल्यावर ती राजपुत्राप्रमाणे वागे पित्याच्या मृत्यूनंतर ती गादीवर बसली व पराक्रमाने तिने शत्रूला नेस्तनाबूत केले. ती कैलास पर्वतावर युद्धानिमित्त गेली असता शिवाची व तिची दृष्टादृष्ट झाली शिवाने तिला पाहिल्यावर तिचे तिसरे वक्ष नाहीसे झाले शिवाने तिला त्यानंतर आठव्या दिवशी मदुराईला येऊन विवाह करण्याचे अभिवचन दिले. मग शिवाने सुंदरेश्वराचे रूप धारण करून मदुरेला येऊन मीनाक्षीशी विवाह केला. प्रत्येक वर्षी चैत्रपोर्णिमेला अजूनही हा विवाह सोहळा साजरा होतो

हे मंदिर ८५० फूट लांबीचे व ८०० फूट रुंदीचे भव्य असून त्याला चार गोपुरे आहेत दक्षिणेकडील सर्वांत उंच गोपुर १६० फूट आहे ते १६ व्या शतकात बांधले गेले.

मंदिरात प्रवेश केल्यावर प्रथम लागतो 'अष्टशक्तीमंडप'। तेथे मीनाक्षी विवाहाची सुंदर मूर्ती आहे. गणेश व सुब्रह्मण्यम याच्याही मूर्ती आहेत. स्तंभावर अष्टदेवताच्या मूर्ती आहेत त्यानंतर येतो 'मीनाक्षीनायकेन मंडप!' त्यातील शिव व पार्वती याच्या शिकारीच्या रूपातील मूर्ती उल्लेखनीय आहेत आग्नेय बाजूला सुवर्णकमल पुष्करिणी ( Golden Lily Tank) आहे इंद्राने पापमुक्तीसाठी येथे स्नान करून शिवाची प्रार्थना केली होती. तळ्याभोवती चारबाजूला रुंद कॉरीडॉर आहे तेथील स्तंभाचे कोरीव काम प्रेक्षणीय आहे तेथे पुराणातील प्रसंग चित्रित केले आहेत.

पुष्करिणीच्या पुढे सभामंडप आहे तेथील स्तंभावर व्याघ्र, हत्ती, योद्धे इ. कोरले आहेत स्तंभाच्या चार ब्रॅकेटसवर चार निरनिराळे प्राणी कोरले आहेत तामीळ कवनेही कोरली आहेत. तामीळ कवीच्या मूर्तीही आहेत. किलीकूट मण्डपात पिंजऱ्यात तऱ्हेतऱ्हेचे पोपट ठेवले आहेत लांबच्या लांब

रांगेत उभ्या असलेल्या स्तंभावर मूर्ती नाजूकपणे कोरल्या आहेत. पंचपांडव, वाली, सुग्रीव, द्रौपदी, नवग्रह यांच्या नयनमनोहारी शिल्पकृती आहेत छतावर उत्कृष्ट रंगीतकाम आहे मिनाक्षी विवाहाचा तसेच राज्य रोहणाचा सोहळा चित्रित केलेली दोन उत्कृष्ट पेंटिंग्ज आहेत

त्यानंतर आलो देवी मीनाक्षीच्या मंदिराजवळ ! मंदिरासमोरच ध्वजस्तंभ असून पितळी द्वारपाल आहेत मंदिरात देवी मीनाक्षीची विलोभनीय मूर्ती आहे. तिने उजव्या हातात पुष्पपात्र उभे धरलेले असून त्यावर शुक बसलेला आहे डावा हात सरळ आहे पुष्पहारांनी वेढलेली देवीची मूर्ती मनोहारी दिसत होती चेहेऱ्यावर सात्त्विकता, प्रसन्नता ओसडून चाललेली दिसते मूर्ती अलंकारविभूषितही आहे.

कंमबथडी मंडप हा या मंदिरातील शिल्पकृतींनी सजलेला मंडप आहे मध्यभागी सुवर्णध्वजस्तंभ, नंदी व बळपीठ आहे शिवाची विविध रूपे आठ नक्षीदार स्तंभावर कोरली आहेत त्याचप्रमाणे कोरलेले विष्णूचे निरनिराळे अवतारही आकर्षक आहेत मंडपात मीनाक्षीदेवीच्या विवाहप्रसंगाची नितांत-सुंदर मूर्ती पाहून देहभान हरपते द्राविड शिल्पकलेचा परमोत्कर्ष म्हणजे ही मूर्ती ! पत्थरात जणू काव्य साकारले आहे असे वाटते मीनाक्षीचा भाऊ अलगर उर्फ विष्णु झारी घेऊन कन्यादानाचे उदक सोडत आहे ते मीनाक्षीच्या हातावरून शंकराच्या हातावर पडते असे दृश्य दाखवले आहे. मध्यभागी मीनाक्षीची अधोवदन मूर्ती आहे तिची सलज्ज भावमुद्रा अविस्मरणीय आहे शंकर उर्फ सुंदरेश्वराच्या चेहेऱ्यावर मार्दवता व मीनाक्षीच्या प्राप्तीमुळे झालेली तृप्ती जणू ओसंडून चालली आहे तर बहिणीला योग्य वराच्या हाती सोपवताना वाटणारी कृतकृत्यता व वात्सल्य शिल्पकाराने विष्णूच्या मूर्तीत साकार केले आहे खरोखर या तीनही मूर्तींची भावमुद्रा अविस्मरणीय आहे

मीनाक्षीमंदिरानंतरचे मंदिर म्हणजे सुंदरेश्वराचे मंदिर ! मंदिराच्या बाजूला बारा फूट उंच पितळी द्वारपाल आहेत आत शिवलिंग आहे समोरच्या बाजूला ' मीनाक्षीकल्याणम् ' म्हणजे मीनाक्षीचे लग्न दाखवले आहे

सुंदरेश्वर मंदिरातून बाहेर पडल्यावर दिसतो १००० खांबाचा मंडप ! हा मंडप पाहावयास ५० पैसे फी आहे हा मंडप म्हणजे शिल्पकलेचा खजिनाच !

नेत्राना मेजवानीच ! या मडपातील सग्रहालयात अनेक सुदर मूर्ती, मदिरांची चित्रे आहेत अर्जुन, नृत्य करणारा गणपती, मोरावर बसलेला पुरुष, हस्तीदती मूर्ती, मोहिनी इ अनेक शिल्पकृती वाखाणण्यासारख्या आहेत आणखी एक उल्लेखनीय शिल्पकृती म्हणजे वीणाधारी स्त्री ! तपकिरी रगाच्या पत्थरात घडवलेल्या या वीणाधारी स्त्रीच्या खाद्यावर पोपट आहे चेहेऱ्यावर स्मितहास्य आहे खाद्यावर मोठा अबाडा रूळतो आहे त्या अबाड्यातले केस न् केस हुबेहूब कोरले आहेत तिच्या नाजूक बोटाची शोभा सुदर अगठ्यामुळे अधिकच वाढली आहे तिच्या शरीरावरील वस्त्राच्या रेषान्‌रेषा दिसतात सुन्दर दागिने, पायातल्या साखळ्या तिच्या सौन्दर्यात भरच टाकतात नृत्याच्या पावित्र्यातील या नारीच्या देहाचा डौल अविस्मरणीयच

हा मडप नायक राजाच्या आर्यनाथ मुदलीयार नावाच्या मन्त्र्याने बाधला ह्या मडपात त्याचा पुतळा आहे मडप २५० फूट चौरस असून त्याला ९८५ स्तभ आहेत कुठल्याही स्तभाजवळ उभे राहिल्यास स्तभांच्या एकमेकाला छेदणाऱ्या रांगा सरळ रेषेत दिसतात सप्तसुराचा ध्वनी देणारे म्युझिकल पिलर्स ( सगीतस्तभ ) हे येथील खास आकर्षण ! मुख्य मोठा खाब व त्याच्या बाजूने पातळ खाब आहेत. लाकडी हातोड्याने मारल्यावर या दगडी लहान रुदीच्या खाबातून सप्तसूर निघतात या हजार खाबांच्या मडपाचे सौन्दर्य, भव्यता, त्यातील शिल्पकृती न्याहाळताना मन अगदी रमून गेले तेथून पाय निघता निघेना

त्यानतर येतो 'कल्याण मडप !' या मडपाचे छत चदनाचे असून त्यावर कोरीव काम आहे कृष्णनायक महाराजाने १५६८ मध्ये हा मडप बाधला सुरुवातीच्या दोन भितीच्या दोन बाजूला कालीमाता व नटराजाची भव्य चित्रे आहेत ही चित्रे बाजूला सरकवली की आत भव्य आरसे आहेत. म्हैसूरच्या महाराजानी ते भेट दिले समोरच्या भितीवर १५६८ मध्ये पेंट केलेले नवग्रहचित्र व सूर्यचक्र आहे. या भितीच्या लगतच स्टेज आहे त्यावरच मीनाक्षी विवाहाचा सोहळा दरवर्षी साजरा होतो टी व्ही वरही हा सोहळा दाखवला जातो

मीनाक्षीमदिरासमोरचा रस्ता ओलाडल्यावर बाहेर 'पृथुमडप' अथवा

वसंत मडप लागतो हा मडप तिरुमल नायकाने सतराव्या शतकात बांधला ३३० फूट लाब व १०५ फूट रुंदीच्या चबुतऱ्यावर हा मडप आहे २५ फूट उचीचे १२४ स्तभ चार रागामध्ये आहेत दगडी स्तभांच्या या मडपात विविध आगळ्या शिल्पकृती आहेत. ऊस खाणारा हत्ती, मीनाक्षी-विवाह, रावण कैलासपर्वत उचलू पहातो इ मूर्ती सुन्दर आहेत मधल्या स्तभाच्या रागेवर नायकराजाच्या चौदा मूर्ती आहेत आम्ही या सुन्दर मडपात चक्कर मारली पण मन विषण्ण झाले कारण मडपात चहूबाजूनी दुकाने आहेत सर्वत्र शिप्यांच्या मशीन्सचा खडखडाट चालू होता सर्व जमिनीवर कपड्याचे तुकडे, केरकचरा पसरला होता. वास्तविक पहाता अत्युच्च शिल्पकृतीनी नटलेला हा मडप नीट जतन करून ठेवायला हवा

आजपर्यंत पुस्तकातून, लोकांच्या बोलण्यातून ज्या मीनाक्षी मन्दिराचे वर्णन वाचले, ऐकले होते ते मीनाक्षीमन्दिर पाहून मोठ्या समाधानाने तिरुमलनायक राजप्रासादाकडे निघालो.

## तिरुमलनायक राजप्रासाद

प्रख्यात तिरुमलनायकराजाने हा प्रासाद १६३६ मध्ये बांधला इटालियन शिल्पकाराच्या सहाय्याने या प्रासादाची त्याने आखणी केली मूळ राजवाडा आताच्यापेक्षा चौपट मोठा होता राजवाड्याचे दोन भाग आहेत स्वर्ग-विलास व रगविलास। महालासमोर मध्यभागी आयताकृती विशाल प्रागण ५० मीटर लांब व ३२ मीटर रुंदीचे आहे बाजूला विशाल दगडी कमानीवर आधारित भव्य स्तभ आहेत या भव्य कमानीच्या वरील टोकाची उची स्तभाच्या तळापासून ६० फूट इतकी प्रचड आहे स्तभाला चुन्याचे गुळगुळीत प्लॅस्टर आहे एका कोपऱ्यात उभे राहिल्यावर कमानीची रागच्यारांग सरळरेषेत उत्कृष्ट दिसते या प्रासादाच्या बाधकामाला फक्त चुना व वाळूचा उपयोग केला आहे दगड व लाकूड वापरले नाहीत हे वैशिष्ट्य आहे

लाबलांब पायऱ्या ओलाडल्यावर स्वर्गविलास मडप दृष्टीला पडतो. हा विशाल मडप ७५ मीटर लांब व ५२ मीटर रुद आहे त्या मडपाच्या बारा स्तभावर आधारित मध्यवर्ती विशाल घुमट प्रेक्षणीय आहे या मडपाचे आगळे शिल्पकाम अविस्मरणीय आहे

एका कोपऱ्यात नाटक शाळेचा हॉल लागतो नक्षीदार कमानी व स्तभ याचा अचूक मिलाफ यात घडला आहे या नाटकशाळेत राजा राणी व पाहुणे याच्यासह नर्तकींचे नृत्य पाहात असे. अशी एक आख्यायिका सागतात की हे दालन तिरुमलनायक शयनगृह म्हणूनही वापरीत असे हुकांना अडकवलेल्या साखळयाना त्याचा पलग टागलेला असे एकदा एका चोराने या दालनात भोक पाडून जडजवाहीर. रत्ने यांची चोरी केली तेव्हा राजाने जाहीर केले की चोराची माहिती जो कोणी कळवेल त्यास जहागिरी बहाल केली जाईल तेव्हा चोरच समक्ष हजर झाला पण राजाने चोराचा जो वारस त्याला जहागिरी बहाल केली व चोराचे मात्र डोके उडवले काय योगायोग पहा ! जिथे एकेकाळी चोरी झाली तो हॉल बरेच दिवस जिल्हा कोर्टाचे ठिकाण म्हणून उपयोगात आणला गेला होता

रगविलास हा राजवाड्याचा छोटेखानी भाग होता आता त्याचे फक्त दहा स्तभ उरले आहेत.

भव्य तिरुमलनायकप्रासाद पाहून वैगाई नदीच्या काठी असलेल्या 'मरिअम्मनेटप्पाकुलम' हे पवित्र तळे पाहण्यास गेलो हे तळे सुमारे १००० चौ फूट चौकोनी आहे तळयाच्या बाजूच्या दगडी पायऱ्या व कुड १६४५ साली तिरुमलनायकाने बांधल्या उत्सवप्रसगी मीनाक्षीची उत्सवमूर्ती जलविहारासाठी येथे आणली जाते

स्टेशनपासून दोन मैलांवर नदीच्या पलीकडे गांधी म्युझियम आहे तेथे पूर्वी राजवाडा होता हे शुभ्ररगाचे दोनमजली गांधी स्मारक आहे गाधीजींच्या जीवनातील निरनिराळया प्रसगांचे फोटो, त्याची वचने, त्यानी वापरलेल्या वस्तू व त्याचे वाड्मय याचा तेथे सग्रह आहे समोर गांधीजीचा पुतळा व रम्य उद्यान आहे हिरवळीमुळे शात, स्वच्छ वातावरणाचा ठसा मनावर उमटतो

एक दिवसाचीमदुरेची भेट संपली होती लॉजकडे परतलो खरे पण नजरेसमोर वारवार येत होते तिरुमलनायकप्रासादाचे भव्य स्तभ, मीनाक्षीची अधोवदन मोहक मूर्ती आणि वीणाधारी स्त्रीची चैतन्यमय शिस्पकृती

☐

# रुपेरी वाळूत, माडांच्या बनात–त्रिवेंद्रम

रात्री आठ वाजता मद्रास क्विलॉन एक्स्प्रेस धडधडत मदुराई रेल्वे-स्टेशनच्या आवारात शिरली स्लीपींग कोचजवळ बर्थसाठी प्रवाशांनी एकच गर्दी केली कंडक्टर सज्जन होता तो म्हणाला की फॅमिलीवाल्यांना बर्थ देण्यात मी अग्रहक्क देईन त्याचे आभार मानावे तेवढे थोडेच होते तीन बर्थ मिळाल्याने रात्रीच्या सुखकर प्रवासाची निश्चिती झाली

रात्रीचे दहा वाजले तेव्हा विरुधनगर जंक्शन आले स्टेशन गेले आणि झोप अनावर झाली. रात्र केव्हा संपली कळलेच नाही पहाटेचे पाच वाजले तेव्हा क्विलॉनच्या नवीन बांधलेल्या स्टेशनच्या आवारात गाडी थांबली होती तेथे उतरून त्रिवेंद्रम पॅसेंजर यायला अवकाश होता म्हणून वेटिंग-रूममध्ये थांबलो सहा वाजता त्रिवेंद्रमकडे जाणारी गाडी आली पूर्वी क्विलॉन-त्रिवेंद्रम मार्ग मीटरगेज होता आता नुकतेच त्याचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्यात आले आहे

गाडीने क्विलॉन सोडले सूर्य जसजसा वर येऊ लागला तसतशी त्रिवेंद्रमकडे जाणाऱ्यांची गर्दी डब्यात वाढू लागली केरळच्या निसर्ग-सौंदर्याची झलकही आता दिसू लागली आजपर्यंत पुस्तकात वाचलेले, ऐकलेले सृष्टिसौंदर्य नेत्रासमोर साकार होत होते उंच उंच नारळाच्या बागा, हिरवीगार भातशेते, पाण्याने ओसंडून वहाणारी सरोवरे, खाड्या,

छोटी छोटी कौलारू घरे, हिरव्यागार वृक्षराजींनी आच्छादलेले डोंगर, नारळानी भरलेल्या होडचा असे मनोहारी दृश्य मन वेडावून टाकत होते

प्रवासात लहान लहान स्टेशनवर गाडी थांबल्यावर नोकरीसाठी जाणाऱ्या स्त्रिया दिसत होत्या शाळेत, कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींचे घोळके दिसत होते आमच्या संपूर्ण प्रवासात केरळइतके सुशिक्षत स्त्रियांचे प्रमाण कुठेच दिसले नाही लांब केस मोकळेच सोडलेल्या, नेत्रात काजळ घातलेल्या शामल वर्णाच्या पण तरतरीत केरळकन्या ठिकठिकाणी दिसत होत्या नारळांच्या बागातून नारळाच्या कवचातील धाग्यापासूनच काथ्या तयार करणाऱ्या स्त्रियाही दिसत होत्या. परकर अथवा लुंगी-पोलके व खांद्यावर टॉवेल असा त्या स्त्रियांचा वेष होता

सकाळचे साडे-नऊ वाजले तेव्हा त्रिवेंद्रम स्टेशनच्या आवारात गाडीने प्रवेश केला त्रिवेंद्रम हे रेल्वेचे दक्षिणेकडचे शेवटचे टोक। कन्याकुमारीपर्यंत रेल्वेलाईन टाकायचे काम सुरू आहे

स्टेशनमधून केरळी लोकांच्या घोळक्यामधून बाहेर पडलो बहुसंख्य केरळी लोकांचा शर्ट व धोतर हाच वेष होता गोल धोतर नेसून ते गुडघ्यापर्यंत घेऊन व दुमडून त्याची पुढच्या बाजूला सैलसर गाठ मारलेली असे ऑफिसर असो वा कॉलेजतरुण त्यांचा वेष हाच ! शिवाय पाच पाच मिनिटांनी धोतर पायापर्यंत सोडून परत वरपर्यंत घेऊन दुमडून त्याची सैलसर गाठ मारण्याचा त्यांचा उद्योगही सुरूच असायचा उदय सारखा पपांना विचारायचा की पपा, त्यापेक्षा हे लोक धोतर अर्धेच करून का नेसत नाहीत ? केरळमध्ये सूटपॅन्ट घालणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे लोक खरेखुरे भारतीय वाटतात

स्टेशनसमोरच सामानाची व्यवस्था लावून इडली डोशावर ताव मारला आजूबाजूचे लोक इडल्या भातासारख्या कुसकरून, कालवून खात होते व तेही सबंध तळहात भरवून ! दक्षिणेकडे संपूर्ण तळहाताने भात कालवून व त्याचे गोळेच्या गोळे पोटात रिचवणारे दिसत होते प्लेटपेक्षा केळीच्या पानांचा वा पत्रावळीचा वापर सर्रास केला जातो उल्का-उदय कित्येकदा जेवण सोडून या लोकांचा जेवण करण्याचा हा अभिनव प्रकार पाहातच राहात

जेवण करण्याचा हा अभिनव प्रकार कसाही असला तरी इडल्या व डोसे मात्र फारच ' टेस्टी ' मिळतात

नाष्टा आटोपला व रिक्षा ठरवून त्रिवेंद्रम दर्शनाला निघालो त्रिवेंद्रमचे पूर्वीचे मूळ नाव तिरु अनंत पुरम् ! अनंत हा विष्णूच्या मस्तकावरील पवित्र शेष ! शेषशायी विष्णू असलेल्या प्रख्यात मंदिरावरून तिरू अनंत पुरम् हे नाव पडले

श्रीमार्तंडवर्मा या त्रावणकोरच्या राजाने त्रिवेंद्रमला राजधानी आणल्यानंतर त्रिवेंद्रमचा विकास झाला केरळमधील कोचीन हे व्यापाराचे तर त्रिवेंद्रम हे मोठे शैक्षणिक केंद्र आहे त्यास ' दक्षिणेचे पुणे ' म्हणायला हरकत नाही.

रिक्षाने प्रथम त्रिवेंद्रमच्या विमानतळाकडे चक्कर मारली त्रिवेंद्रमचा विमानतळ जगातले आश्चर्य मानले जाते कारण हा विमानतळ शहराबाहेर नसून चहूबाजूने शहराने वेढलेला आहे

लगतच त्रिवेंद्रमचे मत्स्यालय आहे तऱ्हेतऱ्हेचे रंगीबेरंगी मासे पाहाताना मुलांना मोठी मौज वाटत होती सौंदर्यशाली सोनेरी मासे डौलदारपणे पाण्यावर तरंगत होते निळे, तांबड्या रंगाचे, तलवारीसारखे मासेही होते तर देवदूतासारखे ( Angle Fish ) मासेही होते. खडकांच्या भेगात सापडणारे मासे होते तसेच झटपट वळणाऱ्या माशांचा समूहही (Fast Moving Fish) होता माशांनी एकदम जोरात टर्न घेतला की उल्का उदय आनंदाने टाळ्या वाजवीत माशांप्रमाणेच कासव, मगरी, खेकडे हे जलचर प्राणीही तेथे आहेत चोच असलेली दोन कासवेही लक्ष वेधून घेत होती

## आकर्षक प्राणीसंग्राहलय

रिक्षाने त्यानंतर आणून सोडले त्रिवेंद्रमच्या प्रख्यात प्राणीसंग्रहालयात ! येथे एकाच आवारात प्राणीसंग्रहालय, आर्टगॅलरी, म्युझियम आहे टेकाडाच्या उताराउताराच्या जमिनीवर विविध हिरव्यागार वृक्षांनी बहरलेल्या बगीच्यात तऱ्हेतऱ्हेचे चित्रविचित्र प्राणी पाहून आनंद झाला सुरुवातीलाच विविध रंगांचे पोपट पाहून आश्चर्य वाटले वानर तर किती तऱ्हेतऱ्हेचे होते ! वानर ठेवलेल्या दालनावर हनुमानाचे चित्र काढण्यात औचित्य



मीनाक्षी - सुंदरेश्वर
विवाह,
मीनाक्षी मंदिर,
मदुरा


▼प्रचंड शिळेवरील
मंदिर
Rock Temple
तिरुचिरापल्ली





तिरुमलनायक
राजप्रासाद
मदुरा

प्रदक्षिणा मार्ग,
रामेश्वर



दाखवले आहे आफ्रिकेतील बिनशेपटीच्या, पिवळ्या रंगाच्या वानराप्रमाणेच जटाधारी काळे उग्र वानरही होते आम्हाला पहाताच दात विचकून ओरडत ते पिंजऱ्याच्या दारापर्यंत आल्यावर उल्का-उदय तर घाबरून लांबच पळाले. Mandrill या वानराचे तोंड रंगीबेरंगी होते तर पृष्ठभाग चक्क गर्द जांभळा ! शरीराने धिप्पाड असा हा वानर चांगलाच लक्ष वेधून घेतो

तऱ्हेतऱ्हेचे वाघसिंह जसे पिंजऱ्यात ठेवले आहेत तसेच काही मोकळ्या आवारातही आहेत अर्थात बाजूला खोल खड्डे आहेत काळ्या रंगाचा चित्ता, धिप्पाड सिंह आकर्षक आहेत त्रिवेंद्रमचे हे प्राणीसंग्रहालय विस्ताराने फार मोठे नाही पण अतिशय रेखीव असून विविध वैशिष्टचपूर्ण प्राण्यांचा संग्रह त्यात आहे हिरव्यागार प्रसन्न नैसर्गिक वातावरणाची जोड त्याला लाभली आहे बोटॅनिकल गार्डन व प्राणीसंग्रहालय एकत्रित आहे

शेजारीच आर्टगॅलरी व आर्ट म्युझियम आहे त्रावणकोरच्या महाराजांनी १९३७ साली इंडोनेशिया भेटीच्या वेळी गोळा केलेल्या विविध वस्तूंचा संग्रह तेथे आहे रशियन चित्रकाराची पेंटिंग्जही तेथे आहेत

जवळच सुन्दर लाल रंगाच्या कौलारू इमारतीत आर्ट म्युझियम आहे ही इमारत शंभर वर्षांची पुरातन आहे तरी तिच्या सौंदर्यात यत्किंचितही न्यून नाही म्युझियममध्ये हस्तीदंतात कोरलेले मोहक राधाकृष्ण आहेत रथाचे मॉडेल आहे पद्मनाभस्वामी मंदिरासाठी तयार केलेले लाकडाचे अष्टकोनी पुष्पक विमानाचे मॉडेलही प्रेक्षणीय आहे ब्रॉंझच्या मूर्तीमध्ये गणेश, शिव, पार्वती, नटराज, इ मूर्ती आढळतात तसेच कृष्ण कालिया यांच्या सुन्दर दगडी मूर्ती आहेत शेषशायी विष्णु, नाभीतून निघालेला ब्रह्मदेव, जटाधारी नारद या मूर्ती आकर्षक आहेत एका दालनात विविध वाद्यांचाही संग्रह केला आहे

नंतर उत्सुकता लागली होती पिक्चर आर्ट गॅलरी पहायची ! एका टुमदार इमारतीत प्रख्यात चित्रकार असितकुमार. हालदार, जोगेंद्रनाथ टागोर व रविंद्रनाथ टागोर यांनी काढलेली सुंदर चित्रे आहेत. रविंद्रनाथ टागोर यांचे The Bird, तसेच कनू देसाई यांचे Poet and Poetry, श्री सुतार यांचे हरिजन निवासात म गांधी, प्रमोदकुमार चटर्जी यांचे

अग्निस्वाहा, दुर्गादेवी तर माधव मेनन यांचे बांबू, पाढरे, तांबडे कमळ व घरी परतणारा कळप ही चित्रे अविस्मरणीय आहेत

मोगलकालीन काही पर्शियन पेंटिंग्जही एका दालनात आहेत. गुरुमुखी लिपीत लिहिलेले सचित्र श्रीकृष्णचरित्र जसे येथे आहे तसेच अकबरकालीन पर्शियन भाषेत भाषातर केलेले सचित्र महाभारतही येथे आहे मोगल बादशहा हुमायूनचा दरबार, हत्तीवर बसलेला औरगजेब इ चित्रे तेथे आहेत दुसऱ्या एका दालनात तिबेटी, चिनी, जपानी चित्रे आहेत. एक दालन मॉडर्न आर्टच्या चित्रांचे आहे परतु आम्हाला अधिक उत्सुकता लागली होती राजा रविवर्मा याच्या ओरिजनल चित्राचे दालन पहाण्याची ! मोठ्या अधीरतेने या दालनात प्रवेश केला.

राजा रविवर्मा या महान चित्रकाराचा जन्म १८४८ मध्ये झाला तर मृत्यु १९०६ मध्ये ! त्रावणकोर दरबारात चित्रे काढण्याच्या निमित्ताने त्याना राजाश्रय मिळाला पुढे राजघराण्यातील राजकुमारीशी त्याची ओळख झाली चित्रामुळेच ! त्या ओळखीची परिणती पुढे विवाहात झाली त्रावणकोर-प्रमाणे बडोदा, म्हैसूर इ. अनेक राजाकडे त्यानी चित्रे काढून दिली राजा रविवर्मांनी काढलेल्या एकाहून एक भव्य चित्राचे दालन म्हणजे नयनाना मेजवानीच ! 'शकुतला' या त्यांच्या चित्रातील तिची निरागस भावमुद्रा पहाताना देहभान हरपते. अमेरिकेतील शिकागो येथील स्पर्धेत बक्षिस मिळालेले 'Poverty' हे चित्रही तेथे आहे 'Lady in Prison' हे चित्रही सुदर आहे विराटाच्या दरबारातील द्रौपदी या चित्रातील भावमुद्रा अविस्मरणीय आहेत मोहिनी, हस-दमयती अशी एकाहून एक सुदर चित्रे आहेत सीतेला पळवून नेणाऱ्या रावणाबरोबर लढणारा जटायू या चित्रातील सीतेची भेदर-लेली मुद्रा अगदी हुबेहूब आहे जसा सीतेचा शोक मनात सवेदनशीलता निर्माण करतो तसेच दमयतीची मीलनोत्सुकता मनात भिडते उदात्त सीता, अगतिक द्रौपदी, निरागस शकुतला त्यानी आपल्या कुचल्यानी सजीव केली आहे त्यात अकृत्रिमता अजिबात आढळत नाही राजा रविवर्मांच्या चित्रा-तील द्रौपदी असो वा सीता वा शकुतला तिचा पेहेराव महाराष्ट्रीयन थाटाचा असतो. त्यानी यासबधी एकदा म्हटले होते की महाराष्ट्रीयन नऊवारी साडी

हा सर्वोत्तम वेष आहे. त्यात स्त्रीचे लावण्य व लज्जा या दोहोंना उठाव मिळतो व तिचे अंगप्रत्यंग खुलते. पौराणिक प्रसंगांबरोबरच त्रावणकोर महाराजा, दादाभाई नवरोजी, राणा प्रताप ही चित्रे उल्लेखनीय आहेत. रविवर्मा यांचे शिक्षक फँक ब्रुक यांनी काढलेले A Lady with Fan हे चित्र अत्युत्कृष्ट आहे ज्या बाजूने हे चित्र पहावे त्या बाजूला त्यातील स्त्रीचे डोळे, चेहरा व पाय वळलेले दिसतात. ही एक अद्‌भुत किमया! राजा रविवर्मा यांनी काढलेली काही पेन्सिल स्केचेसही तेथे आहेत त्या त्या चित्रावर काढण्यास किती वेळ लागला हे लिहिले आहे केव्हा दोन मिनीटे नऊ सेकंद तर केव्हा तीन मिनीटे! एवढ्या अल्पवेळात त्यांचे चित्र काढण्याचे कौशल्य अलौकिकच!

या चित्र गॅलरीत वरील मजल्यावर अजंठा पद्धतीची Mural Paintings (भित्तीचित्रे) आहेत रामायणातील प्रसंगांवर आधारित चित्रे आहेत तसेच सिलोनी पेंटिंग्जचेही नमुने आहेत

चित्र-आर्ट-गॅलरीतून बाहेर पडलो खरे पण भारदस्त रेखांकन, जिवंत भावदर्शन, अभिजात प्रतिभासपन्न शैलीचे प्रत्यक्ष दर्शन देणाऱ्या कलाकृतींनी मन भारावून गेले होते तसेच नेत्रासमोर तरळत होत्या शकुंतला, दमयंती, सीता व द्रौपदी! राजा रविवर्मा काळाच्या पडद्याआड जाऊन ७० वर्षे झाली, पण त्यांच्या कलाकृतींमुळे ते अजरामर आहेत

## प्रख्यात पद्मनाभस्वामी मंदिर

त्रिवेंद्रमच्या प्रसिद्ध पद्मनाभस्वामी मंदिरात (अनंतशयनम्) सायंकाळी पाचच्या सुमारास पोहोचलो भारतातील १०८ वैष्णवतीर्थांपैकी हे एक मंदिर! गावाच्या मध्यवर्ती भागातच असलेल्या या मंदिराकडे जाताना प्रथम सुरेख तलाव दिसला. चारी बाजूंनी बांधलेल्या पायऱ्यांमुळे शोभेत भर पडली होती

मंदिराच्या पायऱ्या चढून वर आलो तर कळले की मंदिरदर्शनार्थ पुरुषांनी धोतर घालणे जरूर आहे. धोतरे भाड्याने मिळतात ती घेण्यास प्रवाशांची एकच गर्दी उडाली होती धोतर घालताना हृयांची उडालेली त्रेधातिरपीट पाहून आम्हाला हसू आवरेना. धोतर तर घालावेच लागले.

शिवाय दर्शन उघड्यानेच घ्यावयाचे असल्याने शर्ट, बनियनही काढावा लागला मंदिरात आम्ही प्रवेश केला खरा पण धोतर सुटणार तर नाही ना हा भयग्रस्त भाव त्याच्या चेहेऱ्यावर दिसत होता.

मंदिराचे गोपुर सात मजली व १०० फूट उंचीचे आहे त्यावर भरगच्च नक्षीकाम आहे भरपूर रुंदीमुळे या गोपुराच्या भव्यतेत भर पडली आहे. भरपूर रुंदी हे या गोपुराचे वैशिष्ट्य !

हे मंदिर बरेच प्राचीन आहे मंदिराच्या जागी पूर्वी अनथकड जंगल होते तेथील एका जोडप्याला भातशेतामध्ये एका सुंदर मुलाच्या रडण्याचा आवाज आला त्या स्त्रीने त्या मुलाला घेऊन स्तनपान देऊन शांत केले व एका झाडाखाली ठेवले तेथे पाच मस्तकाचा नागराज आला व त्याने त्या बाळाला झाडाच्या खोडातील बिळात निवाऱ्यासाठी नेले त्यामुळे प्रभावित होऊन ते जोडपे दुधाची तांदळाची कांजी त्यास देऊ लागले राजाच्या कानावर ही हकीकत जाताच तेथे त्याने मंदिर उभारले अजूनही देवाला तांदळाच्या कांजीचा नैवेद्य दाखवला जातो

मंदिराचे आज दिसत असलेले स्वरूप राजा मार्तंडवर्मा या त्रावणकोरच्या महाराजांनी पावणेतीनशे वर्षांपूर्वी प्राप्त करून दिले मंदिर उभारणीसाठी ४००० कारागीर, ४०० हत्ती २२ वर्षे खपत होते मंदिराचा प्रमुख शिल्पकार चिपू आचारी व त्याच्या कुटुंबियाचे मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या आत डाव्या बाजूला पुतळे आहेत.

त्यानंतर डावीकडे एक विशाल मंडप आहे हा अतिशय प्रेक्षणीय मंडप पाहण्यास नाममात्र १० पैसे फी आहे या मंडपात राजाचा राज्यारोहण समारंभ साजरा होत असे तेथे महाविष्णु, शंकर, गायत्री, लक्ष्मी, श्रीराम, रुक्मिणी, कृष्ण इ च्या अनेक मनोहारी शिल्पकृती आहेत मंडपाच्या चार कोपऱ्यात सप्तसुरांचे चार दगडी संगीतस्तंभ आहेत विशेष म्हणजे चारी स्तंभाचे सूर वेगवेगळे आहेत या मंडपाच्या छतावर दगडी घंटा कोरली आहे मंडपाच्या चबुतऱ्यावर भरगच्च नक्षीकाम केलेले आहे मंडपात चार फूट उंचीचा अखंड शिळेचा स्नानाचा टब आहे

मंदिराचा समोरचा प्रमुख प्रवेशमार्ग राजासाठी असल्याने उत्तरेकडून

प्रवेश करावा लागतो मुख्यद्वाराजवळ एका बाजूला हनुमान व दुसऱ्या बाजूला गरुड आहे हनुमानाचे अग कायम लोण्याने माखलेले असते

उत्तरेकडील द्वारातून प्रवेश केल्यावर मदिराचा गाभारा दिसला त्यासमोरील पायऱ्या चढून उभे राहिल्यावर पद्मनाभ स्वामीची–विष्णूची मूर्ती अनतशयन म्हणजे शेषावर पहुडलेली १५ फूट लाबीची आहे मुखकमल प्रसन्न आहे मूर्तीच्या नाभीतून कमळ निघालेले असून त्यावर ब्रह्मदेव आहेत• व चरणाच्या बाजूला ऋषीच्या लहान लहान आकृती आहेत दर्शनासाठी तीन दरवाजे असून अनुक्रमे मस्तकदर्शन, नाभिदर्शन व चरणदर्शन घ्यावे लागते ' श्रवण, मनन, निदिध्यासन या तीन पायऱ्यानीच भगवताचे दर्शन सुसाध्य होते ' या श्रुति वचनाचे स्मरण करून देण्यासाठीच तीन दरवाज्या तून दर्शनाची व्यवस्था असावी ही मूर्ती वाळू व चुना याच्या मिश्रणाने बनवली असून तिला अभिषेक करीत नाहीत उत्सवमर्तीला अभिषेक करतात

गर्भगृहामागे 'कृष्णपरमात्मामडप' आहे. आतमध्ये पद्मनाभसिंहमूर्ती आहे बाहेरील मडपात लाकडी छतावर नवग्रह कोरले आहेत मडपाचे स्तभ दगडी असून ब्रॅकेटस् लाकडी आहेत.

मदिराभोवती असलेला ३६६ दगडी स्तभाचा खुला प्रदक्षिणामार्ग हे या मदिराचे वैशिष्टच आहे रामेश्वरच्या मदिरात प्रदक्षिणामार्ग बदिस्त आहे तर येथे बाजूनी तो मोकळा आहे त्यामुळे भरपूर प्रकाश व उजेड येतो या प्रदक्षिणामार्गाच्या प्रत्येक स्तभावर पणती घेतलेल्या स्त्रीची सुबक मूर्ती आहे पूर्वीच्या काळी रात्री तेथे दिवे तेवत असत काही स्तभावर स्त्री-पुरुष सबधांच्या उत्तान मूर्ती कोरल्या आहेत या विशाल मदिराच्या विस्तीर्ण प्रदक्षिणामार्गातून प्रदक्षिणा सपली तेव्हा मन मदिराच्या दर्शनाने प्रभावित झाले होते

## जगप्रसिद्ध कोवालम बीच

त्रिवेंद्रमची भेट जगप्रसिद्ध कोवालम बीचला भेट दिल्याशिवाय पूर्ण होणार नव्हती त्रिवेंद्रमपासून तेरा कि मी अतराचा अर्ध्या तासाचा प्रवासाचा मार्ग दोन्ही बाजूनी गजबजलेल्या वस्तीतून जातो मध्येच दुकाने

दिसत तर मध्येच घरे ! नारळाची, ताडगोळाची, सुपारीची, झाडेही अधून-मधून डोकावत होती ड्रायव्हर वळणाकार रस्त्यावरून शिताफीने गाडी नेत होता उजव्या बाजूला एक वळण आले आणि निळ्या अथांग सागराचे दर्शन झाले

रूपेरी वाळूत, माडाच्या बनात पोहोचल्यावर मुलांच्या उत्साहाला उधाण आले बस थांबल्यावर मोठे टूरिस्ट हॉटेल दिसले तसेच योगाभ्यासाचे शास्त्रीय मार्गदर्शन करणाऱ्या केंद्राची पाटी दिसली वाळू तुडवीत किनाऱ्यावर पोहोचलो अनेक परकीय स्त्री-पुरुष वाळूत टॉवेल अंथरून सूर्यप्रकाश अंगावर घेत होते वाळूच्या किनाऱ्यावर रंगीबेरंगी छत्र्याही उभ्या केलेल्या दिसत होत्या समुद्रकिनाऱ्यावर प्रवाशांसाठी बांधलेली काही आकर्षक कुटिरेही दिसत होती भरती ओहोटीत लाटांचा जणू लपंडाव सुरू होता समुद्रातील मोठ्या खडकावर बसून उडणाऱ्या लाटांच्या पार्श्वभूमीवर फोटो काढण्यात काही लोक गुंग होते

किनाऱ्याकडे जाताना झालेल्या त्या मऊ, ओल्या रेशमी वाळूचा मुलायम स्पर्श अजून मला आठवतो पळतपळत वाळू तुडवत जाऊन उल्का-उदयनी बांधलेल्या कोप्या दिसत होत्या त्या ओल्या वाळूत त्यांच्या छोट्या छोट्या पाऊलखुणा उमटल्या होत्या त्या पहाता पहाता मी एकदम एका वेगळ्याच जगतात पोहोचले ! त्या वाळूच्या कोप्यांमधून जणू माझे बालपण हळूच डोकावले 'वेचीत वाळूत शखशिंपले रम्य बाल्य ते जेथे खेळले' अशा ठाणे जिल्ह्यातील नितांतसुंदर बोर्डी गावचा तो समुद्रकिनारा, लहानपणी वाळूच्या कोप्या बांधताना भावडाशी केलेला रुसवाफुगवा, केलेल्या मारामाऱ्याही नजरेसमोर तरळल्या आट्यापाट्याचा खेळ, समुद्राच्या लाटांनी काढलेली शखशिंपल्याची रांगोळी, सुरूची बने, उंच उंच नारळवृक्षाची शोभा यात निरागस बालपण किती झरकन गेले ! समुद्रात अस्त पावणारा सूर्य, त्यावेळी होणारे त्याचे विविध आकार, त्यावेळी ढगावर होणारी रंगाची उधळण रोज पाहूनही समाधान होत नव्हते समुद्रापलीकडे सूर्य जातो कुठे आणि परत तो वर येतो कसा? तो पुन वर येईल ना? ह्या प्रश्नाने मी अण्णांना हैराण करायची सगळे कसे चित्रपटासारखे नजरेसमोर तरळत होते.

तेवढ्यात उल्का–उदयच्या गुद्दागुद्दीने मी भानावर आले माझ्या बालपणाची जणू पुनरावृत्ती होत होती किल्ला मोडल्यामुळे त्यांच्यात भांडण झाले होते. भांडणाचा विषय बदलण्यासाठी समुद्रात अस्तगत होणारे लालबुंद सूर्यबिंब त्यांनी मुलांना दाखवले. तोच उदय म्हणाला, "पपा हा सूर्य आता कुठे जाईल ? तो पुन वर कसा येईल ? आणि उद्या पुनः वर नक्की येईल ना ? साता समुद्रापलीकडे जाऊन हा सूर्य दडणार तर नाही ना आई ?"

लहानपणी मलाही भेडसावणाऱ्या प्रश्नाला "हो तर सूर्य नक्कीच पुन येणार" असे उत्तर देऊन कोवालम बीचचा निरोप घेतला खरा पण कोवालम बीचच्या लाटांच्या तरंगातून पुनर्भेटीच्या ओढीचे गीत जणू ऐकू येत होते.

□

# पद्मनाभपुरम, शुचींद्र

सकाळी नऊ वाजता त्रिवेंद्रम स्टेशनसमोरील बसस्टॉपवरून बस कन्याकुमारीच्या दिशेने निघाली रस्त्याच्या दुतर्फा गजबजलेली वस्ती संपत नव्हती मैलांमागून मैल मागे पडले, पण घराची रांग अखंडच होती दोन गावामध्ये मोकळी जमीन नव्हतीच नारळ-सुपारीच्या बागांच्या रांगा आणि घराच्या रांगा शेवटपर्यंत पाठलाग करीत होत्या अधूनमधून पाण्याने तुडुंब भरलेले तलाव दृष्टीस पडत होते रम्य वनश्रीचा आस्वाद घेत घेत प्रवास चालला होता

कन्याकुमारीला जाताना वाटेत पद्मनाभपुरम येथील त्रावणकोर महाराजांचा राजप्रासाद पाहायचा असल्याने त्रिवेंद्रमपासून ५३ कि मी अंतरावरील Thuckalay गावात उतरलो तेव्हा सकाळचे ११ वाजले होते. तेथून पद्मनाभपूर पॅलेस दोन कि मी अंतरावर आहे. बस लगेच मिळाली केरळमध्ये बसचा प्रवास फारच सुखकर आहे सुंदर रस्ते व आरामशीर बसेस यामुळे प्रवास त्रासदायक होत नाही बसेस मिळतातही भराभर ! एवढी एकच गोष्ट खटकते की क्यू सिस्टीम फारशी कुठे आढळत नाही. आम्ही बसने पंधरा मिनिटातच राजवाड्याच्या आवारासमोर आलो

१८ व्या शतकात त्रिवेंद्रमला राजधानी स्थलांतरित करीपर्यंत पद्मनाभपुरम येथे त्रावणकोर राज्याची राजधानी होती. तेथील राजवाडा सुमारे ४२५ वर्षांपूर्वी बांधण्यात आला

राजवाडयात प्रवेश केल्यावर प्रथमदर्शनीच राजा वापरीत असलेले लाकडी सिंहासन दिसले त्यावर चिनी पद्धतीचे उत्कृष्ट कोरीवकाम आहे. राजेलोक खास उन्हाळयात वापरीत असलेला ग्रानाईट दगडाचा पलगही जतन करून ठेवला आहे लक्ष्मी व हत्ती कोरलेली ब्राँझची टांगती समई पण आकर्षक आहे

लाकडी अरुद जिना चढून वरच्या मजल्यावर आल्यावर कॅबिनेट चेंबर दिसली त्या चेंबरचे लाकडी छत आकर्षक आहे तसेच फ्लोअरिंग चकचकीत आहे गाईड सागत होता की चुना, खोबरेलतेल, अड्याचा पाढरा भाग, कार्बन इ वापरून ते तयार केले. ७८ फूट लाबीचा डायनिंग हॉलही भव्य आहे एकेकाळी १००० ब्राह्मण तेथे भोजन घेऊ शकत काळचा रगाचे तीन फूट उचीचे १५ चिनी जार तेथे आहेत पूर्वी लोणचे ठेवण्यासाठी त्याचा उपयोग केला जाई

ध्यान करण्यासाठी ' ध्यानमडप ' आहे फणसाच्या झाडाच्या लाकडापासून बनविलेल्या त्याच्या अखड स्तभावर सुदर नक्षीकाम आहे छतावर कमल-पुष्पाचे नक्षीकाम आहे

आवारात पन्नास किलो वजनाचा दगड आहे सैनिकभरतीच्या वेळी तो डोक्यावर ठेवून सैनिकाची परीक्षा घेतली जाई एके ठिकाणी भुयारी मार्गा-कडे जाण्यासाठी गुप्त दार दिसले शत्रूपासून बचाव करण्यास त्याचा उपयोग होई राजाच्या शयनगृहातील पलग ६४ प्रकारची औषधी लाकडे वापरून तयार केलेला आहे त्यावर निद्रा घेणाऱ्या राजाला रोगपीडा होऊ नये हा त्यामागे हेतू होता शयनगृहाच्या लाकडी छतावर-चिनी पद्धतीचे सुदर नक्षीकाम आहे

तिसऱ्या मजल्यावर प्रार्थना हॉल आहे, तेथील पेंटिंग सुदर आहेत २२५ वर्षांपूर्वी झाडांच्या पानांचा रस वापरून खास सुदर रग तयार केले जात. त्या रगांनी पौराणिक, धार्मिक प्रसगाची विविध रगीबेरगी चित्रे भितीवर काढली आहेत त्यात कृष्ण, शिव, अर्धनारीनटेश्वर इ. आहेत. आजही ही चित्रे टवटवीत वाटतात तेथे असलेल्या समया तेवत होत्या. गाईड सागत होता की २२५ वर्षांपासून त्या अखड तेवत आहेत तेथे राजाची तलवारही जतन करून ठेवली आहे

लेडीज चेंबरमध्ये पोर्तुगीजानी दिलेले मोठे आरसे दिसले तसेच दोन झोपाळेही आहेत. कृष्णलीलाची चित्रे तेथे आहेत. राजमातेच्या पलगावर सुबक हस्तीदती नक्षीकाम आहे राजमातेचे निवासस्थान असलेला हा राजवाड्याचा भाग सर्वात जुना म्हणजे चौदाव्या शतकातील आहे

आर्मरी हॉलमध्ये (शस्त्रागार विभाग) सुमारे पाच शतकापूर्वीचे जुने भाले आहेत उच पायऱ्यांच्या लाकडी जिन्यावरून उतरल्यावर 'डान्सिग हॉल' येतो हा हॉल शिल्पशास्त्राचा उत्कृष्ट नमुना आहे यात ग्रानाईट दगडाचे स्तभ आहेत दक्षिणेतील नायक राजाच्या शिल्पकृतीप्रमाणे या हॉलचे बाधकाम आहे. सुदर स्त्रियाचे हातात समया घेतलेले रेखीव पुतळे स्तभावर आहेत जेव्हा नृत्य होई त्यावेळी त्याच्या हातातील समया तेवत असत. राण्याना नृत्य पाहण्यासाठी बाजूच्या बाल्कनीत खास झरोके ठेवलेले दिसले

डान्स हॉलसमोर सरस्वतीची पचधातूची मूर्ती आहे. लक्ष्मी, रतीदेवी, मन्मथ, सारथी, हनुमान, उर्वशी, रभा, मेनका, वीणाधारी सुदरी अशा कितीतरी मोहक मूर्ती तेथे आहेत. या अप्सराच्या सहवासात ब्रह्मचारी हनुमान पाहून मौज वाटली

हा राजवाडा म्हैसूर-बगलोर येथील राजवाड्याप्रमाणे भव्य व कलापूर्ण नाही, पण वैशिष्ट्यपूर्ण मात्र खचितच आहे.

## द्राविडी शिल्पकलेचा आविष्कार : शुचींद्रम्

पद्मनाभपुरम पॅलेस पाहून परत बसस्टँडवर आलो थोड्याच वेळात कन्याकुमारीकडे जाणारी बस मिळाली. वाटेत नागरकॉईल हे मोठे शहर लागले ते तामिळनाडू राज्यात येते, शहराचा विस्तार प्रचड असून बाजारपेठ फारच मोठी आहे बसस्टॅण्डचे आवारही प्रशस्त व स्वच्छ आहे

नागरकॉईलपासून दहा कि मी अतरावर शुचींद्र गाव आले. तेथील सुप्रसिद्ध मदिर पहावयाचे असल्याने तेथे उतरलो या छोटेखानी गावाला भव्य शिवमदिरामुळे महत्त्व आले आहे

इद्राने गौतमऋषीची पत्नी अहिल्या हिला भ्रष्ट केले गौतमऋषींनी सतापून इद्राला शाप दिला इद्र काकुळतीला आला. ऋषींनी मग उःशाप

दिला की प्रखर तपश्चर्येने तू परमेश्वराला प्रसन्न करून घेशील तर शापमुक्त होशील. त्याप्रमाणे इंद्राने याठिकाणी तप केले व त्याला त्रिमूर्ती परमेश्वराचा साक्षात्कार झाला त्यानंतर इंद्राने तेथे त्रिमूर्ती परमेश्वराची स्थापना केली अपवित्र झालेला इंद्र येथे शुची म्हणजे पवित्र झाला म्हणून शुचींद्र नाव पडले

येथील मंदिर खूप प्राचीन आहे मंदिराचे काम बाराव्या शतकात सुरू झाले पांड्य, चेर, चोल या राजांनी १४ ते १९ व्या शतकापर्यंत मंदिरात भर घातली चहूबाजूनी भाताच्या शेतानी वेढलेल्या व नारळाच्या झाडानी बहरलेल्या या छोटेखानी गावातील मंदिराचे गोपुर दूरवरूनच लक्ष वेधून घेते हे गोपुर १३४ फूट उंचीचे भव्य आहे रामायण महाभारतातील प्रसंग त्यावर कोरले आहेत गावात मोठी पुष्करिणी आहे त्यात मध्ये मंडप आहे

चोवीस फूट उंचीच्या, भरपूर नक्षीकाम असलेल्या दरवाजातून आत प्रवेश केल्यावर नाटकशाळा (नृत्यमंडप) लागते त्याचे स्तंभ भारदस्त असून छताच्या पश्चिम कोपऱ्यात पार्वती, सरस्वती, लक्ष्मी इ मूर्ती कोरल्या आहेत 'वसंत-मंडप' म्हणजे तर कलेचा उत्कृष्ट आविष्कार! छतावर नवग्रह आहेत १२ राशी व २७ नक्षत्रांच्या सुबक आकृती कोरल्या आहेत. एके ठिकाणी राम–लक्ष्मण–सीता यांच्या मूर्ती आहेत पंचपांडवाचे मंदिरही आहे लोणी घेतलेल्या कृष्णाची मूर्ती विलोभनीय आहे एके ठिकाणी आपले सर्व द्रव्य मंदिराला देणाऱ्या देवदासीचे पुतळे आहेत

'अलंकार-मंडपात' चार संगीत-स्तंभ आहेत दोन मोठ्या स्तंभावर ३३ लहान रुंदीचे निमुळते स्तंभ आहेत तर दोन स्तंभावर २५ आहेत त्याच्यावर आघात केल्यावर भिन्न स्वर निघतात. एका खांबावरील अखंड दगडातून केलेला एकमेकात कड्या अडकलेला दगडी साखळदंड शिल्पशास्त्राचा आश्चर्यकारक नमुना आहे

मंदिरात हनुमानाची १८ फूट उंचीची भव्य आकर्षक मूर्ती आहे चेहऱ्यावर कर्तव्यतत्परतेचा भाव आहे महाकाली मंडपात पांढऱ्या रंगाचा बारा फूट उंचीचा नंदी आहे गरुड मंडपात तिरुमल नायकाचा पुतळा अप्रतिम आहे. नाकाच्या, कानाच्या छिद्रातून तार आत जाते शिल्पकामाचा हा सूक्ष्म

बारकावा स्तिमित करतो. एके ठिकाणी त्रावणकोरचा राजा मार्तंडवर्मा याचा पुतळा आहे

'चेमप्रकारम मंडप' हा शिल्पशास्त्रतंत्राचा उत्कृष्ट खजिनाच! भरगच्च नक्षीचे चार रांगातील ३२ दगडी स्तंभ प्रेक्षणीय आहेत. शिव व विष्णु यांच्यासंबंधीचे पौराणिक प्रसंग कोरले आहेत गाभाऱ्यात सव्वा फूट उंचीचे 'स्थाणुमलयलिंग' आहे त्यावर सोनेरी कवच आहे गाभारा दीपज्योतींनी प्रज्वलित झालेला होता उत्तरेला नटराजमूर्ती आहे दक्षिणेला सात फूट उंचीची विष्णुमूर्ती आहे मूर्तीवर चांदीचे कवच आहे

मंदिरात एकूण तीस देवस्थाने आहेत. हे मंदिर शैव व वैष्णव दोन्हीं-च्याही आदराचे ठिकाण आहे. ब्रह्मा आणि विष्णूची वेगवेगळी मंदिरे येथे आहेत

येथे अत्रिऋषींची पत्नी अनुसूया हिची सत्त्वपरीक्षा घेण्यासाठी ब्रह्मा, विष्णु, महेश अतिथिरूपाने आले व तिच्या सतीत्वापुढे नम्र होऊन त्यांना बालरूप धारण करावे लागले असा समज आहे म्हणजे हे स्थान दत्तात्रेयाचे म्हणावे लागेल पण येथील मूर्ती तीन शिरे व सहा हात अशी नसून तिला एकच मस्तक आहे मुख्यमूर्ती त्रिमूर्ती परमेश्वराची आहे

चित्रसभा हे इंद्राचे मंदिर आहे. परंतु मंदिरात मूर्ती नसून आरसा आहे इंद्राला येथे शुचित्व मिळाले, तो पापमुक्त झाला म्हणून येथे मूर्ती नाही. येथील मंदिरात इंद्र दररोज मध्यरात्री प्रार्थनेला येतो असा भाविकांचा समज आहे

मंदिराच्या दक्षिणेकडील भव्य प्रदक्षिणामार्गातील एका रांगातील स्तंभ रामेश्वरच्या मंदिराची आठवण करून देत होते.

द्राविडी शिल्पकलेचा उच्चतम आविष्कार असलेल्या शुचींद्राचा निरोप घेऊन कन्याकुमारीकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो

□

# ' पाहू रे किती वाट ? '-कन्याकुमारी

शुचींद्रम मंदिरापासून पंधरा कि मी अंतराचा प्रवास संपवून दुपारी दोनला बस कन्याकुमारीच्या स्टँडवर थांबली

कन्याकुमारी हे पवित्र भारतमातेचे दक्षिणेकडील शेवटचे टोक ! हजारो वर्षांपूर्वी या देशात भरत नावाचा राजा होऊन गेला त्याला आठ पुत्र व एक कन्या होती तिचे नाव कुमारी होते भरताने सर्व राज्य आपल्या पुत्राना वाटल्यावर दक्षिण टोकाचा भाग कन्येच्या-कुमारीच्या वाट्याला आला तेव्हापासून या प्रदेशाचे नाव कुमरीनाडू (नाडू म्हणजे प्रदेश) पडले

पौराणिक आख्यायिकेनुसार परशुरामाने पापमुक्तीसाठी ब्राह्मणाना भूमी दान देण्याचे ठरवले गोव्याजवळ समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी आपले हत्यार परशु जोराने दक्षिणेकडे फेकला परशु जेथे पडला तो हा दक्षिणेकडील तिन्ही बाजूनी समुद्राने वेढलेला शेवटचा भूभाग !

कन्याकुमारीची भेट प्रथम स्वामी विवेकानंदांच्या स्मारकाच्या दर्शनाने सुरू होणार होती. भारताच्या मुख्य भूमीपासून विवेकानंदाचे स्मारक असलेला हा खडक अलग आहे भूभागापासून समुद्रात दोन कि मी अंतरावर असलेला हा खडक समुद्रपातळीपासून ५५ फूट उंचीवर आहे खडकाजवळ लाँचने जावे लागते. त्यासाठी समुद्रकिनाऱ्यावरील कार्यालयातून लाँचचे तिकीट घेऊन लाँचमध्ये बसलो प्रवासी बसल्यावर लाँच सुरू झाली खडकापर्यंतचा दहा मिनिटांचा हा प्रवास म्हणजे एक चित्तथरारक अनुभव होता. उसळणाऱ्या लाटांमुळे लाँच हेलकावे घेत होती. पाण्याचे तुषार प्रवाशाना

सुखवीत होते. दुरवरून दिसणारे स्मारक जसजसे जवळ येऊ लागले तसतशी उत्कंठा वाढू लागली.

इ स. १८९२ ची हकीकत ! स्वामी विवेकानंद हिमालयापासून पुण्य-क्षेत्राचे दर्शन घेत घेत या पुण्यभूमीवर पोहोचले. समुद्रकाठापासून विलग झालेल्या या शिळेवर ध्यानस्थ बसून त्यांना आराधना करायची होती. होडीवाल्याला देण्यासाठी सन्यासी विवेकानंदाजवळ पैसे नव्हते. तेव्हा हा मोठ्या लाटा उसळणारा खोल समुद्र ते पोहून गेले या आठवणीने विवेकानंदाबद्दलच्या आदराने उर भरून आला

आमची लाँच दहा मिनिटांत तीन एकर क्षेत्र असलेल्या या विशाल खडकाजवळ पोहोचली सर्व प्रवासी लगबगीने उतरले प्रथम 'श्रीपादमंडप' मध्ये प्रवेश केला. देवी पार्वतीने कन्येच्या स्वरूपात शिवप्राप्तीसाठी या शिळेवर एका पायावर उभे राहून तपस्या केली होती तिचे चरणचिन्ह येथे उमटले आहे त्यामुळे ही शिला श्रीपाद-पारै या नावाने ओळखली जाते. पारै या तामीळ शब्दाचा अर्थ शिळा असा आहे अगदी प्राचीनकाळी समुद्र-किनारा या शिळेपर्यंत होता व देवी कन्याकुमारीचे मूळचे मंदिर तेथे होते.

या श्रीपादपारैवर ५४ फूट मापाचा चौकोनी 'श्रीपादमंडप' बांधला आहे. ग्रानाईट दगडाने घडवलेला हा मंडप आधुनिक द्राविडी शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे मंडपाच्या चार दरवाजावर सुंदर नक्षीकाम आहे मंडपाच्या चार बाजूंना चार संगमरवरी खिडक्या आहेत नक्षीयुक्त स्तंभ आकर्षक आहेत देवी पार्वतीच्या उमटलेल्या तपकिरी रंगाच्या चरणचिन्हाभोवती काच लावली आहे भक्तिभावाने त्या चरणकमलाचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा संपवली भारताच्या उत्तरेला हिमालयावर भगवान शंकराचे वास्तव्य तर दक्षिणेच्या या टोकावर देवी पार्वतीचे चरणचिन्ह ! विविध जाती, पंथ धर्म असलेला भारतदेश या पति-पत्नींनी जणू एका सूत्रात बांधला आहे

श्रीपादपारैसमोर शिळेच्या सर्वांत उंच भागावर 'विवेकानंद मंडप' आहे. मंडपापर्यंत चढण्यासाठी सुमारे तीस पायऱ्या आहेत. पायऱ्यांच्या तळाजवळ बाजूला दोन काळ्या रंगाचे अखंड शीळेचे रेखीव हत्ती जणू दर्शकांच्या स्वागताला सज्ज आहेत पायऱ्या संपल्यावर सुंदर पोर्च आहे. पोर्चचे

हिरवटसर रगाचे सगमरवरी स्तंभ आकर्षक आहेत तसेच छतावरही उत्कृष्ट नक्षीकाम आहे नतर मडपाचे महाद्वार लागते. त्यावरील अप्रतिम नक्षीकाम अजठाशिल्पकृतीची आठवण करून देत होते. विवेकानद मडप १३० फूट लाब व ४० फूट रुद आहे

स्वामी विवेकानदानी १८९२ साली डिसेंबर महिन्याच्या शेवटी तीन दिवस अहोरात्र बसून जेथे ध्यानधारणा केली तेथे त्यांचा ब्रॉझचा पुतळा उभारला आहे. विवेकानदांनी पार्वतीच्या पदचिन्हाकडे दृष्टी ठेवून ध्यानधारणा केली म्हणून पुतळ्याचे नेत्रही पदचिन्हाकडे आहेत पुतळा अशा उचीवर बसवला आहे की श्रीपादमडप त्याच्या डोळ्याच्या रेषेत २१८ फूट अतरावर आहे आठ फूट उचीचा साडेतीन टन वजनाचा हा ब्रॉझचा पुतळा मुबईचे शिल्पकार श्री सोनावडेकर यानी तयार केला हा पुतळा जयपूरच्या तपकिरी रगाच्या दगडाच्या साडेचार फूट उचीच्या चबुतऱ्यावर उभा आहे. पुतळ्यामध्येही स्वामीजीचा बाणेदारपणा, तेजस्वीपणा ओतप्रोत भरला आहे.

पुतळ्याच्या बाजूला १४ टन वजनाचे काळ्या रगाचे दगडी स्तभ असून नाजूक फुले, वेलबुट्ट्या यानी ते सजले आहेत. मडपात ताबूस गुलाबी रगाची चकचकीत फरशी आहे मडपाच्या खिडक्या कार्ला येथील शिल्पकृतीच्या धर्तीप्रमाणे आहेत या मडपाच्या समोरील बाजूला एका कोपऱ्यात रामकृष्ण परमहसांचे व दुसऱ्या बाजूला माता शारदादेवीचे चित्र आहे

विवेकानद मडपाचे शिखर ६५ फूट उचीचे आहे त्याचे शिल्पकाम बगालमधील रामकृष्णांच्या बेलूरमठाच्या धर्तीप्रमाणे आहे मदिराच्या चबुतऱ्याच्या पायपट्टीवर हत्तींची राग कोरली आहे मदिराच्या मागील बाजूला छोटा ध्यानमडप आहे दररोज सकाळ सध्याकाळ तेथे भजन होते. तेथे ॐ हे अक्षर मोठ्या आकारात लिहिले आहे

विवेकानद स्मारक हे स्वातत्र्योत्तर काळातील एक महान धार्मिक स्मारक आहे १९६२ साली स्वामीजींच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने हे शिला-स्मारक उभारण्याचे ठरविण्यात आले त्याप्रमाणे १९६४ मध्ये कामाला सुरुवात होऊन १९७० मध्ये या स्मारकाचे उद्घाटन भूतपूर्व राष्ट्रपती श्री गिरी याच्या हस्ते झाले. स्मारकाचे प्रमुख शिल्पतज्ज्ञ तामिळनाडूचे

श्री. एस के आचारी होते त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४०० कारागिरानी काम केले.

या स्मारकाचे वैशिष्टय म्हणजे राज्यसरकार व केंद्रसरकार यानी तीस लाख रुपयाच्या देणग्या तर दिल्याच, पण सर्व भारतातील तीस लाखाहून अधिक नागरिकानी सुमारे नव्वद लाख रुपयांची उत्स्फूर्त देणगी दिली. स्वामीजीबद्दल सर्व भारतवासीयाच्या मनात वसत असलेल्या पूज्य भावनेमुळेच देणग्याचा ओघ वळला

स्मारक असलेल्या शिलेच्या मागील बाजूस उभे राहिल्यावर दिसत होत्या बगालचा उपसागर, हिंदी महासागर व अरबी सागर या सागराच्या त्रिवेणी-सगमास उधळणाऱ्या धवल लाटा ! गर्जणारा सागर जणू विवेकानदाचे गुणगान करीत होता या अलौकिक स्मारकाच्या उभारणीला इतकी अत्युत्कृष्ट नैसर्गिक पार्श्वभूमी दुसरीकडे कुठेही लाभली नसती

## कन्याकुमारी मदिर

विवेकानद स्मारक पाहिल्यावर कन्याकुमारी मदिराच्या दर्शनार्थ निघालो रस्त्यात दुतर्फा विविध वस्तूची आकर्षक दुकाने दिसत होती नारळापासून केलेल्या विविध वस्तू, शखाच्या माळा, वॉलमॅट, चटया, वेताच्या पिशव्या, लाकडी हत्ती कितीतरी तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू प्रवाशाचे मन आकर्षून घेत होत्या समुद्रातील विविधरगी वाळूचे नमुने प्लॅस्टिकच्या कागदात भरून ते विकणारी मुलेही बरीच होती. कन्याकुमारीचे वैशिष्टय म्हणजे तेथे भिकारी आढळले नाहीत. त्यामुळे जास्तच प्रसन्न वाटत होते

कन्याकुमारीच्या मदिरात आल्यावर तेथील प्रथेप्रमाणे त्यांना धोतर नेसावे लागले पण पूर्वानुभवामुळे आता ते सहजपणे धोतर नेसू शकले

हे मंदिर खूप प्राचीन आहे. मूळ मदिराची स्थापना पौराणिक काळी परशुरामाने केली. त्यानतर ज्या ज्या राजांनी या प्रदेशावर राज्य केले त्यानी या मदिराची वाढ केली बलराम व अर्जुन यांनी या मदिराचे दर्शन घेतले होते असा महाभारतात उल्लेख आहे इतके हे मदिर प्राचीन आहे. पाडय राजानीही या मदिराची वाढ केली व येथील देवी त्याची कुलदेवता होती.



अप्रतिम भावमुद्रा
कथकली
केरळ

जगप्रसिद्ध
कोवालम बीच,
त्रिवेंद्रम





छोटी रेलगाडी ( Toy Train ) उटकमंड

बोटॅनिकल गार्डन, उटकमंड



कन्याकुमारीसबधी पौराणिक कथा आठवली बाणासुर या राक्षसराजाने कठीण तप करून परमेश्वराकडून अमरत्वाचा वर मिळवला होता त्याच्या अत्याचाराला कटाळलेल्या पृथ्वीदेवीच्या विनतीनुसार विष्णूने सुचवले की पराशक्तीदेवी-कुमारीच केवळ बाणासुराचा वध करू शकेल कारण बाणासुराला फक्त पुरुषांपासूनच अमरत्व होते त्यासाठी देवांनी मोठा यज्ञ केला यज्ञसमाप्तीच्यावेळी देवी स्वत यज्ञकुडात प्रकट झाली व दक्षिण समुद्रतीरी घोर तपश्चर्या करू लागली कालातराने ती उपवर झाली तिच्या लावण्यावर शकर मुग्ध झाले तिच्या विवाहाची तयारी सुरू झाली. त्यावेळी नारदाला वाटले की बाणासुराचा वध या कन्येच्याच हातून होणार आहे पण जर विवाह करून कुमारी ससारी बनली तर बाणासुराचा वध होणे अशक्य ! तेव्हा नारदाने हा विवाह होऊ न देण्याचा निश्चय केला.

विवाहमुहूर्त मध्यरात्रीचा होता भगवान शकर कन्याकुमारीच्या दिशेने निघाले शकर शुचींद्र येथे आले तेव्हा नारदाने कोबड्याचे रूप घेतले व तो मोठ्याने आरवला शकरांना वाटले मध्यरात्र टळली पहाट झाली. विवाहाचा शुभमुहूर्त टळला तेव्हा ते निराशेने शुचींद्र येथेच स्वस्थ बसले आजही स्थाणुलिगाच्या रूपात ते तेथे आहेत बिचारी प्रणयवेडी कन्याकुमारी पाणिग्रहणासाठी उत्सुक होऊन वरमाला हातात घेऊन प्रतीक्षा करीत होती तिने निश्चयच केला की मी सदैव कन्याच राहीन वर्षामागून वर्षे लोटली तरी आजही मदिरात वरमाला घेऊन ती उभीच आहे. ती निरतर कुमारीच राहिली. लग्नासाठी जी सामुग्री जमा केली होती त्याची रगी-बेरगी वाळू बनली आजही कन्याकुमारीच्या समुद्रावरील वाळू विविधरंगी आढळते

पुढे कुमारीच्या सौंदर्यावर भाळून बाणासुराने तिला मागणी घातली त्यावर कुमारीने सांगितले की जर तू मला युद्धात जिंकलेस तर मी तुला वरेन. बाणासुराला फक्त पुरुषांपासूनच अमरत्व होते. पण तो स्त्रीशक्तीला तुच्छ लेखत असल्याने त्याने कुमारीबरोबर युद्ध केले. त्यात त्याचा वध झाला व पृथ्वी त्याच्या अत्याचारापासून मुक्त झाली.

कन्याकुमारीच्या मदिराच्या चार बाजूला उच दगडी भितीचे आवार

आहे पूर्वेकडील दरवाजा नेहमी बद असतो त्यामुळे उत्तरेकडील दरवाजातून आत प्रवेश करावा लागतो गाभाऱ्यात देवीची नितातसुदर मूर्ती आहे मूर्ती पूर्वाभिमुखी आहे तिचा चेहरा अतिशय निरागस व मोहक आहे तिचे नेत्र विशाल असून उजव्या हातात पुष्पमाला आहे नाकातील चमकणाऱ्या तेजस्वी हिऱ्याने देवीचा चेहेरा उजळून निघालेला होता चेहेऱ्यावर जणू 'पाहू रे किती वाट ?' असा भाव आहे ही मूर्ती अलकारविभूषित आहे आमच्या दीर्घ प्रवासात इतकी सुदर मूर्ती कोठेही आढळली नाही. भारावलेल्या मनाने पवित्र कन्याकुमारीच्या मूर्तीला वारवार नमस्कार करून मदिराबाहेर पडलो खरे पण तिच्या नेत्रातून ओसडून जाणारा भावस्पर्शीपणा विसरणे अशक्य आहे

## सर्व धर्मसहिष्णुतेचे प्रतीक–गांधीमंडप

कन्याकुमारी मंदिर पाहून 'गांधीमडप' कडे आलो म गाधींच्या अस्थींचा कलश कन्याकुमारी येथील समुद्रात विसर्जित करण्यापूर्वी १२ फेब्रुवारी १९४८ रोजी जेथे ठेवण्यात आला होता तेथे हा मडप बांधला आहे. तीन लाख रुपये खर्चून हा तीन मजली मडप १९५६ साली पूर्ण करण्यात आला

ओरिसा शिल्पकलाशैलीने बाधलेल्या या मडपाचे शिल्प अगदी आगळे आहे मडपाचे शिखर ख्रिश्चन धर्तीच्या चर्चप्रमाणे आहे, तर घुमट मुस्लीम पद्धतीच्या मशिदीप्रमाणे आहे तसेच प्रवेशाचा दर्शनी भाग हिंदूच्या मदिराप्रमाणे आहे गांधीजींच्या सर्वधर्मसहिष्णुतेचे हे मदिर जणू प्रतीक आहे आतमध्ये शांत, पवित्र वातावरण होते

प्रवेशद्वाराजवळ आकर्षक कमान असून वर चरख्याचे चित्र कोरले आहे. आतमध्ये जेथे अस्थी ठेवल्या होत्या तेथे काळ्या रगाचा चकचकीत चबुतरा आहे खाली गुळगुळीत फरशी आहे वर अर्धगोलाकार छत आहे त्यात एक छिद्र एका विशिष्ट कोनात ठेवले आहे त्यातून प्रतिवर्षी दोन ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजता सूर्यकिरण चबुतऱ्यावर पडतात व तो प्रकाशमान होतो तत्रज्ञाच्या प्रगत ज्ञानाचीच ही किमया !

म गांधीनी १५ जानेवारी १९३७ मध्ये कन्याकुमारीच्या भेटीच्या वेळी खालील उद्गार काढले होते

*' I am writing this at Cape in front of the sea where three waters meet and furnish a site unequalled in the world This place is eminently suited for contemplation I wish I were to stay here forever Like the Goddess Kanyakumari the waters around are virgin "*

हे उद्गार किती यथार्थ आहेत याची साक्ष गांधीमडपाच्या दुसऱ्या मजल्यावरून विशाल सागराकडे पहाताना पटते.

ज्याठिकाणी तीन सागरांचा सगम होतो त्या किनाऱ्यावर १६ स्तभाचा एक मडप आहे कन्याकुमारी येथे समुद्रस्नान पवित्र मानले जाते फोटोग्राफरच्या आग्रहास्तव विवेकानद स्मारक व १६ स्तभाच्या पार्श्वभूमीवर फोटो काढला

किनाऱ्यावरची वाळू तुडवून सर्वजण पाण्यात उतरलो भारताच्या ह्या शेवटच्या टोकावर शेकडो लोक भगवान सूर्यदेवाचा अस्तपहाण्यास जमले होते अरबी महासागर आणि हिंदी महासागर याच्या लाटांचा जणू शिवाशिवीचा खेळ सुरू होता मधूनच उच उडणाऱ्या लाटा खडकावर आपटून धवल फेसाने त्याला न्हाऊ घालीत होत्या. झुळझुळ वहाणारा वारा सुखवीत होता भरतीच्या लाटा आणि उडणारे उच तुषार यांची मजा चाखत मुलेही शिवाशिवी खेळू लागली लाटा जणू किनाऱ्याला मिठी मारायला उत्सुक होत्या. आपल्यामागे आपला विशाल भारत देश उभा आहे ही जाणीव रोमांचित करीत होती

अखेर तो क्षण आला. सूर्याचे लालबुद बिब समुद्र–आकाश याच्या मीलनरेषेवर टेकले पूर्वेकडील बगालच्या उपसागरातील क्षितिजातून सकाळी उजळलेले सूर्यबिब पश्चिमेच्या अरबी समुद्रात अस्तगत होऊ लागले. आकाशातही लाल रगाची उधळण झाली होती पहाता पहाता सूर्यराज त्या विशाल सागरात अस्त पावले तेव्हा समुद्राच्या पाण्यावर लाल रक्तिमा पसरला सागराच्या अखड गुजनाच्या पार्श्वभूमीवर मावळतीची ती रगाची

अपूर्व उधळण देहभान हरपून टाकीत होती तेजस्वी व्यक्तीचा अस्तही तेजस्वीच असतो हे तर सूर्यराज सांगत नव्हता ना ?

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या न्यायाने सूर्यदेवाचे कार्य अविरत चालूच आहे बाल्य, तारुण्य, वार्धक्य आणि अस्त म्हणजे जीवन असा संदेश तो देत होता कोनार्कच्या भेटीत याच सूर्यदेवाने मन भारून टाकले होते. आणि आता अस्तगत झालेल्या त्याच्याच साक्षीने कन्याकुमारी-पासून परतीचा प्रवास सुरु केला

□

# अरबी समुद्राची राणी–कोचीन

सकाळी साडेअकरा वाजता त्रिवेंद्रम–मद्रास एक्स्प्रेसने त्रिवेंद्रम स्टेशन सोडले कोचीन भेटीची ओढ लागली होती रम्य वनश्रीत प्रवास उत्साहाने चालू होता नारळाची उंच उंच झाडे, सुपारीच्या बागा, छोटी छोटी कौलारु घरे, ठिकठिकाणी पाण्याने भरलेल्या खाडया व त्यात डुलणाऱ्या होडया असे सुंदर दृश्य कधीच संपू नये असे वाटत होते

दुपारचा दीड वाजला तेव्हा ७० कि मी अंतर पार करून गाडी क्विलॉन जंक्शनमध्ये आली क्विलॉन हे केवळ औद्योगिकच नव्हे तर केरळ-मधील पूर्वीपासूनचे व्यापाराचे केंद्र आहे काथ्या–उत्पादनाचे जसे ते मोठे केंद्र आहे तसेच गरेदार काजूचेही ! डब्यातच जेवणाची ताटे आली जेवण आटोपून स्टेशनवर काजूची पॅकेटस् खरेदी केली

दुपारचे दोन वाजले तेव्हा गाडीने शिटी दिली. पलीकडे उभ्या असलेल्या क्विलॉन–मद्रास एक्स्प्रेसनेही शिटी दिली. आमची गाडी ब्रॉडगेज लाईनवर तर ती मीटरगेजवर ! दोन्ही गाडया एकाच वेळी सुटल्या दोघींची जणू शर्यत लागली प्रथम ती गाडी पुढे गेली तेवढयात वेग वाढल्याने आमची गाडी पुन' पुढे निघाली दोन्ही गाडयाच्या डब्यातील माणसे दरवाजे, खिडक्या यातून एकमेकाना उत्स्फूर्तपणे रुमाल दाखवीत होती ज्याची गाडी पुढे जायची त्याच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटायची तेवढयात मीटरगेजवरील त्या गाडीने मोठे वळण घेऊन दिशा बदलली पाच मिनिटाचा प्रवास बरोबर करून आता निरोप घ्यायचा प्रसंग आला. प्रांत वेगळा, भाषा

वेगळी असलेले प्रवासी दोन्ही गाड्यात होते ओळख नव्हती म्हणून काय झाले ? घडीभराची सोबत केलेले हे प्रवासी ऋणानुबंध असल्यासारखे एकमेकाना रुमाल हलवून निरोप देत होते फक्त मार्ग वेगळा होता

क्विलॉनला डब्यात गर्दी वाढली होती मात्र हवा इतकी सुदर होती की आळस बिलकूल वाटत नव्हता निसर्गसौंदर्याने बहरलेल्या प्रदेशाचे आकंठ पान करून नेत्र सुखावले होते दुपारचे साडेचार वाजले तेव्हा त्रिवेंद्रमपासून दीडशे कि मी अतरावर प्रसिद्ध कोट्टयम स्टेशन आले हे गाव जुन्या मोठ्या चर्चेससाठी प्रसिद्ध आहे

सायकाळी सहा वाजता एर्नाकुलम स्टेशनच्या आवारात गाडीने प्रवेश केला कोचीन हे एर्नाकुलमचे जुळे भावड ! स्टेशनसमोर कोचीन कार्पोरेशनचे सुदर रेस्टहाऊस आहे तळमजल्यावर दुकाने आहेत पहिल्या मजल्यावर ऑफिसेस व दुसऱ्या मजल्यावर रेस्टहाऊसच्या प्रशस्त हॉलसारख्या रूम्स ! उत्कृष्ट डनलोपिलोच्या बेड्स, मोठे स्वच्छ बाथरूम शिवाय समोर बाल्कनी ! अत्यत अल्प दरात सोयिस्कर, स्वच्छ असे रेस्ट हाऊस मिळाल्याने आनद झाला

कोचीनला फार जुनी परपरा आहे कोचीन राज्याची ती १४ व्या शतकापासून राजधानी होती १५ व्या शतकात चिनी प्रवासी महुवानने व इटालियन प्रवासी निकोलायने कोचीनला भेट दिली होती १६ व्या शतकात कोचीनमध्ये पोर्तुगीज लोकाची वसाहत होती १६६२ मध्ये ते डच साम्राज्याखाली आले त्यानतर मार्तंडवर्मा राजाने डचाना हाकलून लावून कोचीनचा ताबा मिळवला १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ते इग्रजांच्या ताब्यात गेले स्वातत्र्यानतर त्रावणकोर आणि कोचीन ही राज्ये विलीन करून केरळप्राताची मुहूर्तमेढ रोवली गेली त्रिवेंद्रम जरी केरळची राजधानी असली तरी केरळचे व्यापारी केंद्र कोचीनच आहे तसेच केरळचे हायकोर्टही येथेच आहे कोचीन हे भारतातील चौथ्या नबरचे नैसर्गिक बदर आहे

सकाळी आठ वाजता समुद्रकाठावरील हॉटेल सी लॉर्डकडे (Sea Lord) रिक्षाने निघालो तेथून कोचीन दर्शनाला सकाळी नऊ वाजता निघणारी फेरीबोट पकडायची होती

ठीक नऊ वाजता बोटीने समुद्रात फेरफटका मारण्यास सुरवात केली छोटेखानी बोटीत आरामशीर सीट्स होत्या तसेच छतावरही खुर्च्या मांडलेल्या होत्या उल्का-उदयच्या आग्रहास्तव सर्वजण वर बसलो तेव्हा विशाल सागरात कोचीन बंदराचे विहंगम दृश्य दिसू लागले

प्रथम बोट 'विलिंग्डन आयलंडच्या' दिशेने निघाली. ७८० एकर क्षेत्र असलेले हे बेट मानवनिर्मित आहे कोचीन बंदराची खोली वाढवताना खोदून उकरलेल्या माती, गाळ, वाळू इ चा भराव टाकून हे विशाल बेट १९४१ मध्ये तयार केले व त्यास तत्कालीन इंग्रज गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांचे नाव दिले या बेटावर कोचीन बंदराचे कार्यालय, पोर्ट ऑफिस, कस्टम ऑफिस, टूरिस्ट ऑफिस इ तर आहेतच शिवाय नाविक केंद्रही आहे कोचीनचा विमानतळ, कोचीनचे प्रमुख रेल्वेस्टेशनही येथेच आहे रेल्वे व रस्ता अशा दुहेरी पुलाने कोचीन एर्नाकुलमबरोबर जोडलेले आहे

विलिंग्डन आयलंडचा फेरफटका मारून बोट मॅट्टनचेरी भागाकडे आली थोडा रस्ता पार करून प्रथम डच पॅलेस पाहायला गेलो हा ऐतिहासिक राजवाडा मूळ पोर्तुगीजांनी बांधला व कोचीनच्या महाराजांना प्रेमाचे प्रतीक म्हणून १५५५ मध्ये देणगी दाखल दिला १६६३ मध्ये डच लोकांनी या राजवाड्यात मुलभूत दुरुस्ती करून त्याला नवे स्वरूप प्राप्त करून दिले म्हणून तो डच पॅलेस या नावाने ओळखला जातो हा राजवाडा तीन मजली आहे मध्यवर्ती हॉल राज्यारोहण दरबाराचा हॉल आहे.

शयनगृहात पुराण, रामायण, महाभारत, यातील प्रसंगांची रंगीबेरंगी चित्रे भिंतीवर काढलेली आहेत त्यातील मुरली वाजवणारा कृष्ण, शिव, पार्वती इ. चित्रे सुंदर आहेत रोझवुडचे छतही आकर्षक आहे हस्तीदंती नक्षीकाम केलेली राणीची पालखी, राजाचे कपडे, अंबारी, झोपाळा इ वस्तू दर्शनीय आहेत स्त्रियांच्या शयनगृहाच्या भिंतीवरही उमामहेश, कृष्णलीला, शिवपार्वती इ चित्रे काढली आहेत

राजवाडा भव्य मात्र नव्हता आमच्या बोटीतील एका कन्नड सहप्रवाशाने तर हा राजवाडा पाहून डोक्यावर हातच मारला तो आम्हाला म्हणाला, " म्हैसूरचे राजवाडे तुम्ही पाहिलेत का ? " आम्ही ते राजवाडे पहाणार

आहोत हे कळल्यावर तो म्हणाला, "अहो हा काय राजवाडा आहे की काय ? खरे राजवाडे बघावे म्हैसूरचे ! केवढे भव्य आणि सुंदर !" त्याच्या म्हणण्यात जरी तथ्य असले तरी या राजवाड्यातील लाकडातील कलाकुसर व पेंटिंग्ज वैशिष्टयपूर्ण आहेत हे नक्कीच ।

डच पॅलेसच्याखाली महालक्ष्मीचे देऊळ असून आतील मूर्ती सोन्याची आहे नमस्कार करून बाहेर पडलो

शेजारीच ज्यू लोकाचे 'प्रार्थनागृह' ज्युईश सिनेगॉग आहे १५६८ मध्ये बांधलेल्या या दोन मजली प्रार्थनागृहावर घटा आहे भारतातील ज्यू लोकांचे हे सर्वात जुने चर्च आहे.

चर्चमध्ये चीनमधून आयात केलेल्या नक्षीदार रगीबेरगी आकर्षक टाईल्स बसविलेल्या आहेत ह्या टाईल्स हाताने रगविलेल्या आहेत अशी माहिती मिळाली नाजूक डिझाईनच्या या टाईलसना तोड नाही चर्चमध्ये मोठमोठी झुबरे आहेत तर चारी बाजूना स्त्रियाना बसण्यासाठी गॅलरी आहे धर्मगुरु जेथून उपदेश करतात त्या जागेभोवती पितळी कठडा आहे ज्यू लोकाची विविध हस्तलिखिते गुडाळून ठेवली आहेत हिब्रू भाषेत लिहिलेली ज्यू धर्मग्रथाची (old tastement) प्रतही तेथे आहे भास्कर रविवर्मा या राजाने तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला लेखही जतन करून ठेवला आहे. कोचीनच्या भेटीतील ज्यू सिनेगॉगच्या भेटीमुळे ज्यू सस्कृतीची थोडीफार ओळख झाली

डच पॅलेस व ज्यू चर्च पाहिल्यावर बोट फोर्ट कोचीनच्या दिशेने जाऊ लागली बोट धक्क्याला लागल्यावर रस्ता ओलाडून गेलो तेथे कोचीनचे प्रख्यात सेंट फ्रान्सिस चर्च आहे हे दगडी प्रॉटेस्टट चर्च पोर्तुगीजांनी १५६८ साली बांधले. हे चर्च युरोपियनानी भारतात बाधलेले सर्वात जुने चर्च समजले जाते या चर्चमध्ये वारा घेण्यासाठी दोरीने बांधलेले सहा टांगते लाबच्या लाब पखे पाहून मौज वाटली दोरी ओढून उल्का-उदयने प्रात्यक्षिक करून पाहिले डच व पोर्तुगीज भाषेतील शिलालेखही तेथे आहेत वास्को-ड-गामाला १५२४ मध्ये प्रथम येथेच दफन करण्यात आले होते तेथे पितळी रेलिंग आहे चर्चमध्ये डच नागरिकाचे जन्माचे व लग्नाचे जुने रेकॉर्ड आहे

चर्च पाहून किनाऱ्यावर आलो तेव्हा निळसर रंगाच्या 'प्रचड चिनी फिशिग नेट' ने लक्ष वेधून घेतले. नायलॉनच्या धाग्यापासून तयार केलेल्या या उंचच्या उंच जाळयांना एक लाकडी तरफ लावली असून त्याला वजन अडकवले आहे त्या सहाय्याने फिशीग नेट खाली पाण्यात सोडता येते व मासे जाळयात आल्यावर जाळे वर घेता येते खास चिनी तन्त्राने एकावेळी भरपूर मासे पकडता येतात तेथील कोळयांना विनंती केल्यावर या नेटचा प्रत्यक्ष कार्यपद्धती बघता आली खरोखर चायनीज फिशीग नेट हे कोचीनचे खास आकर्षण आहे

बोटीत परत येऊन बसलो आणि कोचीनच्या प्रख्यात बॅक वॉटर्सच्या दृश्याने अवाक् झालो दूरवर अथाग अरबी समुद्र पसरला होता तर त्याचा काही भाग भूभागात अनाहूतपणे शिरला होता काठावरील नारळाची उच झाडे सौंदर्यात भरच घालीत होती. बॅक वॉटर्समधून नौकेतून केलेली सफर हा एक आनददायक अनुभव होता 'ओनम' या सणाच्या वेळी बॅक वॉटर्स-मध्ये Snake boat races ची लज्जत औरच असते अशी माहिती मिळाली फुले, वेण्यांनी सजलेल्या स्त्रिया, नवे कपडे परिधान केलेली मुले, पुरुष हसत, गात बोटींच्या स्पर्धेत भाग घेतात

फोर्ट कोचीनची भेट आटोपून 'गुडू आयलड' या पाच एकर क्षेत्र असलेल्या छोटेखानी बेटावर पोहोचलो तेथील सहकारी तत्त्वावर चालवण्यात येणाऱ्या काथ्याच्या फॅक्टरीचे काम पाहण्यास उत्साहाने आत प्रवेश केला वरकरणी टाकाऊ दिसणाऱ्या व फेकून दिल्या जाणाऱ्या नारळाच्या शेंड्यां-पासून सुबक गालिचे, पायपुसणी तयार केली जातात नारळाच्या शेंड्या साफसूफ करून त्याचे धागे यत्राच्या सहाय्याने विणून व त्यास रग देऊन विविध डिझाईनच्या वस्तू तयार केल्या जातात

बेटावर नारळाची झाडे होती तहान लागली म्हणून शहाळयाची चौकशी केली तेव्हा दीड रुपयाला एक शहाळे म्हटल्यावर पिकते तेथे विकत नाही याचा प्रत्यय आला नारळाने भरलेल्या केरळप्रदेशात नारळ महाग असावा हे आश्चर्यच !

गुडू आयलडनतर प्रसिद्ध 'बोलघाटी आयलडवर' आलो हे एक अरुद लाबच्या लांब बेट आहे १७४४ मध्ये डचांनी तेथे मूळ राजवाडा बाधला

नंतर ते ब्रिटिश रेसिडेंटच्या वास्तव्याचे ठिकाण होते तेथे काही ऐतिहासिक तैलचित्रे आहेत. आता या राजवाड्याचे सरकारी मालकीच्या मोठ्या टूरिस्ट हॉटेलमध्ये रूपांतर केले आहे

बोलघाटी पॅलेस हे कोचीन दर्शनाचे शेवटचे ठिकाण होते कॉफीचा आस्वाद घेऊन बोटीवर परतलो दुपारचा एक वाजला तेव्हा बोट हॉटेल सीलॉर्ड समोर येऊन थांबली पोटात भुकेने कहर केला होता चविष्ट अंडाकरी, चपाती व बिर्यानीवर ताव मारून रेस्टहाऊसवर परतलो

दुपारचे चार वाजले होते गरमागरम चहाचा आस्वाद घेऊन एर्नाकुलमच्या बाजारपेठेत आलो देखण्या, सुंदर बाजारपेठेत चक्कर मारताना मन आनंदित झाले मोठमोठ्या शोकेसमधल्या मॉडेल्स भरजरी साड्यांनी सजल्या होत्या सरकारी हँडीक्राफ्टच्या शोरूममध्येही लाकडी, हस्तीदंती, दगडी, धातूच्या विविध वस्तू मांडून ठेवल्या होत्या किंमती मात्र भरपूर होत्या सर्वसामान्य प्रवाशांना न परवडणाऱ्या दरामुळे मालाला उठाव नव्हता सर्वसाधारण प्रवासी चोखंदळ असल्याने एम्पोरियममध्ये वस्तू घेण्याचे टाळून साध्या दुकानातच सौदा करून वस्तू घेतो अर्थात भाव कमी-जास्त करण्यामुळे फसवणूक होण्याचीही शक्यता असते

एर्नाकुलमचे रस्ते रुंद, प्रशस्त, सरळ आहेत स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे गर्दी नाही, धावपळ नाही रुबाबात, टापटिपीत राहणारे नागरिक पाहून प्रसन्न वाटत होते पुण्या-मुंबईप्रमाणे रस्तोरस्ती सर्रास दिसणाऱ्या स्त्रिया दक्षिणेत त्रिवेंद्रमनंतर कोचीनला दिसल्या कोणी हौसेने खरेदी करीत होत्या तर कोणी जोडीदारासह फिरायला जात होत्या, तर कोणी आपल्या छबकड्यासह चक्कर मारायला बाहेर पडल्या होत्या

एवढ्यात ह्यांना सुपारी खरेदी करण्याची आठवण झाली सुपारी संपून दोन दिवस झाले होते. दुकानामागून दुकाने पालथी घातली पण सुपारीच्या प्रदेशात सुपारी मिळेना शेवटी एका पानाच्या दुकानात चौकशी केल्यावर त्याने तांबडे कवच असलेली फळे काढून दाखवली. मग त्यातील एक सुरीने कापून दोन फोडी केल्या त्या ओल्या सुपारीवरील शेंड्या साफ करून ती सुपारी दिली या तुरट ओल्या सुपाऱ्या मिळाल्या चार आण्याला दोन !

सुपारीच्या प्रदेशात सुपारीसाठी धावपळ करावी लागली. खोबरेल तेलासाठीही बरेच हिंडावे लागले

फिरत फिरत कोचीनच्या समुद्रकिनाऱ्यावर आलो. मलबार किनाऱ्यावरची ही भेट अविस्मरणीय आहे ठिकठिकाणचे दिवे प्रकाशमान झाले होते जहाजावरचे दिवे लुकलुकत होते समुद्रातील बेटे, कोचीनचे बंदर दिव्यानी उजळून निघाले होते पाण्यात ठायीठायी दिव्याचे प्रतिबिंब पडले होते त्यामुळे सर्व बेट पाण्यात जहाजाप्रमाणे तरगत आहे असा भास होत होता रात्रीच्या वेळच्या दिव्यांनी उजळून निघालेल्या कोचीनचा देखावा हा एक आनददायी अनुभव होता

कोचीनच्या भेटीतील शेवटचा कार्यक्रम होता केरळच्या महान सांस्कृतिक वारशाची झलक दाखविणाऱ्या कथकली या सगीत नृत्य नाट्याचा आस्वाद घेण्याचा! या नृत्यनाटकातील पात्राची गतीमानता काय वर्णावी? त्यांची रगभूषा, वेषभूषा जशी वाखाणण्यासारखी होती तसाच मुद्राभिनय अप्रतिम होता विशेषत' डोळ्याची हालचाल व त्यातून प्रतीत होणारी सवेदनशीलता मनाला भिडते एका क्षणाला लाजणारा तर दुसऱ्याच क्षणाला क्रुद्ध होणारा, क्षणात हसणारा तर क्षणात शोक दर्शवणारा अशा विविध भावमुद्रा पाहाताना मन चकित झाले.

नाट्यगृहाची भेट आटोपून रिक्षाने रेस्टहाऊसवर आलो. सामानाची बाधाबाध करून लॉच स्टेशनवर आलो रात्रीचे नऊ वाजले होते कोचीनभेट सपली होती आता वेध लागले होते उटीच्या भेटीचे! थोड्याच वेळात टी गार्डन एक्स्प्रेस आली उटीला जाण्यासाठी मेट्टापालेयमपर्यंतचा प्रवास या गाडीने करायचा होता. सुदैवाने बर्थचे रिझर्वेशन मिळाले होते.

अरबी समुद्रातील कोचीनराणीला निरोप देताना एका चांगल्या शहराचा एकच दिवसात निरोप घ्यावा लागला या भावनने चुटपूट लागली.

□

# धुक्यात गुरफटलेली उटी

पहाटे जेव्हा जाग आली तेव्हा चार वाजले होते गाडी मोठ्या स्टेशन-मध्ये थांबली होती 'कापी, कापी' च्या आरोळ्या ऐकू येत होत्या खिडकीतून चौकशी केली तेव्हा गाडी कोईमतूर स्टेशनमध्ये थांबली असल्याचे कळले शाळेत असताना कोईमतूर म्हणजे दक्षिणेचे मँचेस्टर असे पुस्तकात वाचलेले आठवले अंधारातही दूरवर कापड गिरण्यांची उंच उंच नळकांडी दिसत होती. कोईमतुरी साड्यांबद्दचे स्त्रियांचे प्रेम आठवत होते खिडकी लावून परत बर्थवर पडले पहाटेच्या वेळी गाढ झोप लागली

सकाळचे सहा वाजले तेव्हा हमालाने ओरडून 'स्टेशन आया' म्हणून उठवले खरेच मेट्टापालेयम स्टेशन आले होते गाडीतील बहुतेक प्रवासी उतरले होते आम्हीच गाढ निद्रेत होतो एरव्ही अतिशय सावधपणे झोपणारे हेही गाढ झोपले होते लगबगीने सामान आवरून, उतरून प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या बाजूला आलो उटीला जाणाऱ्या उत्सुक प्रवाशांची एकच गर्दी झाली होती यार्डमधून आल्यावर साडेसातला गाडी निघणार असल्याने अवकाश होता मुखमार्जन करून कढत चहाचे घोट पोटात ढकलल्याने उत्साह आला

सव्वासातच्या सुमारास चार निळसर रंगाच्या डब्यांची छोटेखानी गाडी आली जणू पेशवेपार्कमधील फुलराणीच ! साधारण अडीचशे तीनशे प्रवाशांनी गाडी भरूनसुद्धा गेली बरोबर साडेसातला गाडीने शिटी दिली उटीच्या दिशेने प्रवास सुरू झाला हळूहळू गाडी घाटमाथ्यावर चढू लागली.

गाडीला नेहमीच्या दोन चाकाखेरीज मध्ये दातऱ्यादातऱ्याचे तिसरे चाक होते दोन रुळामध्ये दातऱ्यादातऱ्यांचा तिसरा रुळही होता चढावरून अथवा उतारावरून गाडी घसरू नये म्हणून ही खास योजना होती

मेट्टा म्हणजे उच पालेयम म्हणजे खेडे मेट्टापालेयम म्हणजे उंचावरील खेडे मेट्टापालेयम ते उटी हा प्रवास म्हणजे सुंदर निसर्गाच्या सान्निध्यातील प्रवास ! निसर्गसौंदर्याचा अवीट आस्वाद प्रवासी घेत होते निलगिरी पर्वत हिरव्यागार वनराजानी आच्छादलेला होता गर्द झाडीमुळे डोंगराचा रंग जणू निलगिरी नाव यथार्थ करीत होता अधूनमधून उच उच दगडी पुलावरून गाडी जाई तेव्हा खाली नितळ पाण्याचा झुळझुळणारा प्रवाह दगडधोंड्यातून गात वहात जाताना दिसत होता थडगार वारा जणू निसर्गसगीत गात होता सूर्यदेव तर केव्हाच ढगाआड लपले होते सकाळचे दहा वाजून गेले तरी त्याचा पत्ता नव्हता डोंगराच्या उतारावर अधूनमधून लाल कौलारू घरे लक्ष वेधून घेत होती डोंगर फोडून बाधलेल्या बोगद्यांमधून जेव्हा गाडी जाऊ लागली तेव्हा उल्का उदय कितव्या नबरचा बोगदा आला हे मोजण्यात गुग झाले

समुद्रसपाटीपासून ३३०० फूट उचीवरील हिलग्रोव्ह स्टेशन साडेदहाच्या सुमारास आले तेव्हा थडीची चुणूक जाणवू लागली गरम चहामुळे उत्साह आला गाडीने पुढचा प्रवास सुरू केला उच उच निलगिरीची झाडे, मध्येच खोल दऱ्या तर मध्येच डोंगराचे सुळके ! जिकडे पाहावे तिकडे प्रसन्न हिरवा रग दिसत होता मध्येच एके ठिकाणी छोट्या धबधब्यासारखे पडणारे पाणी व त्याचे उडणारे तुषार पाहून मोहित झालो

बाराच्या सुमारास कुन्नूर गाव आले ५६०० फूट उचीवरील कुन्नूर म्हणजे उटकमडची छोटी प्रतिकृतीच ! स्टेशनवरून बाजारपेठेचा रस्ता दिसत होता, तेथील सीम्सपार्क प्रसिद्ध आहे कोईमतूरहून उटीकडे जाणारा वळणावळणाचा रस्ताही दिसत होता डोंगराच्या उतारावर चहाचे हिरवेगार मळे दिसत होते कुन्नूरपासून उटीपर्यंतचा केवळ बारा मैलाचा प्रवास राहिला होता दुपारचा दीड वाजून गेला होता कधी एकदा उटी येते असे सर्वांना झाले होते दुपारी दोनला छोट्या टॉयट्रेनने निलगिरी पर्वतावरील

एक आगळा धुद प्रवास सपवला होता पूर्वेचा घाट पश्चिमेच्या घाटाला जेथे मिळतो अशा घाटमाथ्यावर समुद्रसपाटीपासून ७५०० फूट उचीवर येऊन दाखल झालो होतो निसर्गसान्निध्यातील प्रवास सपला म्हणून वाईटही वाटत होते पण त्याचबरोबर निळगिरी राणीच्या सान्निध्यात आल्यामुळे आनदही होत होता

उटकमड ! तामीळ भाषेत 'मड' चा अर्थ गुरे चारण्याची टेकाडाची जागा ! अशा ठिकाणी खुणेसाठी एक दगड ठेवला जाई अशी एक एक दगड ठेवलेली जागा म्हणजे 'ओथकलमड' त्याचेच पुढे उटकमड नाव प्रचलित झाले जॉन सुलीवन या इग्रजाने उटीचा पाया घातला होता

उटीला पोहोचलो तो ऑक्टोबर महिन्याचा शेवटचा दिवस होता उटीचा सीझन सपून ऑफ सीझन सुरू झाला होता तसे पाहिले तर वर्षभर पर्यटकाचा ओघ चालू असणारे उटी हे भारतातील एकमेव हिलस्टेशन असावे ऋतूप्रमाणे उटीचा फक्त चेहेरामोहरा बदललेला असतो एवढेच! उन्हाळ्यात उटी आपल्या शीतल हवेने सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरवते. त्यावेळी येणाऱ्या प्रवाशाच्या आनद व उत्साहाला सीमा नसते पावसाळ्यात झिमझिम बरसणाऱ्या सरी आजूबाजूच्या टेकड्यावर हिरवागार गालीचा पसरवण्याचे काम करतात आणि हिवाळ्यात आपल्या गुलाबी थडीने पर्यटकाना ती उत्तेजित करते हिवाळ्यात काश्मीर–सिमला याप्रमाणे पाणी गोठण्याइतके तपमान उटीला पोहोचत नाही त्यामुळे हिवाळ्यातही पर्यटकाना उटीचे आकर्षण वाटते इग्रजाना तर उटी आशिया खडातील युरोप वाटायचे अशी ही हसरी उटी प्रवाशाच्या स्वागताला सज्ज होती

सीझनमध्ये असणाऱ्या गर्दीच्या मानाने कमी गर्दी असल्याने सवलतीच्या दरात चांगले लॉज मिळायला काहीच अडचण भासली नाही टागा करून मुर्गन लॉजमध्ये आलो सामान लावून जेवण आटोपून उटीच्या प्रसिद्ध बोटॅनिकल गार्डनमध्ये दुपारी चारला पोहोचलो

भव्य प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर डोंगराच्या उतरणीवरील या मनोहारी बगीच्याचे दर्शन झाले बावीस हेक्टर क्षेत्र असलेल्या या विशाल बगीच्याच्या उभारणीस १८४८ मध्ये सुरुवात झाली भारतातील

कानाकोपऱ्यात आढळणाऱ्याच केवळ नव्हे तर इटली, ऑस्ट्रेलिया इ परदेशातील विविध वृक्षाचे नमुने या बगीच्यात आढळतात

प्रथम लीलीपाँड या कमलपुष्करिणीकडे गेलो सुंदर कमलपुष्पानी बहरलेल्या या आकर्षक तळयात कुंभ घेतलेल्या सुदरीचा मोहक पुतळा आहे जेम्स रसेलचे Pleasure of Gardening या विषयीचे विचार एका बोर्डवर लिहिलेले दिसले तो म्हणतो राजा महाराजा असो वा तत्वज्ञ, राव असो वा रक सर्वांनाच बगीच्यापासून मिळणारा आनद अवर्णनीय असतो

लीलीपाँडच्या मागच्या बाजूला 'ग्लास हाऊस' आहे ग्लास हाऊस म्हणजे सदा बहरलेल्या ताज्या फुलाचा खजिनाच ! इद्रधनुष्यासारखी विविध रगाची फुले बहरलेली पाहून मन हर्षभरित झाले. फुले जितकी आकर्षक त्याहूनही त्याची रचना आकर्षक होती तेथून पाय निघता निघेना फुलवेडी उत्का तर बाहेर जाऊ पाहणाऱ्या आम्हाला सारखी मागे खेचीत होती

बगीच्यात उचच्या उच वृक्ष होते त्यातून डोकावणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांचा व वृक्षाच्या लाबलचक सावल्याचा जणू लपडावाचा खेळ चालू होता छोटया छोटया आकर्षक फूटपाथवरून रॉकगार्डनवर आलो, दगड, खडक यात बहरलेले विविध वृक्ष सौन्दर्यशाली दिसत होते

बगीच्याच्या टेकडीवर चढून आल्यावर झोपडयामध्ये वास्तव्य करणारे निलगिरी पर्वतावरील तोडा जमातीचे मूळ आदिवासी स्त्री-पुरुष प्रत्यक्ष जवळून पहायला मिळाले काही स्त्रिया बाहेर उन्हात बसल्या होत्या त्याच्या कानात लाबलांब दागिने होते केसाच्या वेण्या पुढे रुळत होत्या अगात पायघोळ, पट्ट्यापट्ट्याचे अगरखे असा त्याचा वेष होता सरकारने तेथे पक्क्या झोपडया बांधून दिल्या आहेत. काही उत्साही प्रवासी त्यांना फोटोसाठी पोज देण्याचे सुचवीत होते ते आदिवासी त्याच्या भाषेत बोलून खुणेने त्यासाठी पैशाची मागणी करीत होते जणू त्याच्यातही धदेवाईक वृत्ती शिरली होती एका आदिवासी स्त्रीने आम्हाला आग्रहाने त्याचे घर आतून पहायला बोलावले व लगेच बक्षिसीसाठी हात पुढे पसरला

बोटॅनिकल गार्डनच्या सर्वात वरच्या टप्प्यावरून निलगिरी पर्वताच्या कुशीत पहुडलेल्या सपूर्ण उटी शहराचे विहगम दृश्य दिसत होते. झाडाचे,

फुलांचे सौदर्य चाखता चाखता टप्प्यावरून उतरताना एक वेगळाच आनद मिळत होता बगीच्यात ठिकठिकाणी विविध आकर्षक आकारात झाडे दिसत होती बसण्यासाठी सुदर छत्रीधारी आसनेही काही ठिकठिकाणी तयार केलेली दिसली एकेठिकाणी हिरवळ कापून भारताचा नकाशा तयार केलेला दिसला दक्षिणेकडे आढळणाऱ्या गोपुराचे तसेच अशोकस्तभाचेही आकर्षक चित्र हिरवळ कापून तयार केलेले दिसले बॅन्डस्टॅन्डकडे चक्कर मारून बोटॅनिकल गार्डनच्या गेटमधून बाहेर पडलो खरे पण मन मात्र बगीच्याच्या रमणीय वातावरणातच रेगाळत होते

त्यानतर निघालो उटीच्या प्रसिद्ध सरोवराकडे ! तेथील निसर्गसुदर वातावरणाने हरखून गेलो डोंगरावर एका बाजूला उच उच सरळसोट निलगिरी वृक्ष व दुसऱ्या बाजूला रमणीय तळे ! हे तळे नैसर्गिकरीत्या तयार झाले आहे एका बाजूला पर्वताचा पायथा दिसत होता तर दुसरीकडे दूरपर्यंत पसरलेला जलाशय ! त्यातील पाणी कसे सथ होते ! रगीबेरगी नौकेत बसून नौकाविहाराची लज्जत चाखताना मोठा आनद वाटत होता सध्याकाळ होऊ लागली तसतशी थडीची तीव्रताही वाढू लागली सुदर निसर्गाचे प्रतिबिब स्वच्छ अशा या तळयात बारबार पाहूनही समाधान होत नव्हते उल्का-उदयनी पोनीवर बसून सैर करण्याची हौसही भागवून घेतली रगीबेरगी कपडे, उबदार स्वेटर्स घातलेल्या प्रवाशाची एकच गर्दी झाली होती सरोवरानजीक असलेले झोपाळे, सी-सॉ, घसरगुड्या याच्यावर बालकांची एकच झुबड उडाली होती. मोठे उत्साही वातावरण होते ते !

उटी सरोवराचा मोठ्या अनिच्छेनेच निरोप घेऊन उटीच्या बाजारपेठेत आलो नवीन बांधलेली सुपर मार्केटची इमारत भव्य आहे ठिकठिकाणी निलगिरी तेल, उत्कृष्ट चहा, कॉफी यांची दुकाने आढळली. हॅंडीक्राफ्टस्च्या दुकानात मात्र नेहमीप्रमाणे शुकशुकाट होता

बाजारपेठेच्या डाव्या बाजूला उच चर्च दिसत होते कलेक्टर ऑफिसच्या बाजूचे हे चर्च दीडशे वर्षांपूर्वी बांधलेले जुने आहे याच चर्चच्या आवारात उटीचा आद्य शिल्पकार जॉन् सुलीवन व त्याच्या कुटुबीयाना दफन केले आहे.

चर्च पाहून व बाजारातून फोटो, निलगिरी तेल इ ची खरेदी आटोपून जेवणासाठी निघालो हिरव्या वाटाण्याची करी, चपाती, भात यांच्यावर ताव मारून लॉजवर परतलो थंडीची तीव्रता वाढली होती पण लॉजमध्ये ब्लँकेटची सोय झाल्याने चिंता नव्हती.

उटीतील वास्तव्याचा दुसरा दिवस ! थंडीमुळे स्नानाला अर्थातच फाटा दिला होता सुदैवाने बेड टी मिळाला त्यामुळे तरतरी आल्यावर बोचणाऱ्या थंडीतही सकाळचा फेरफटका मारण्यास बाहेर पडलो रस्त्यावर आजूबाजूला दव पडले होते उटी गाव मात्र धुक्याची दुलई घेऊन निद्रेतच पहुडले होते रस्त्यावर लोकांची विशेष वर्दळ नव्हती अधूनमधून काठी टेकवीत ओव्हर कोट घालून फिरणारे उत्साही प्रवासी दिसत होते हिरव्यागार शेतातून कोबीचे तजेलदार गड्डे दिसत होते गावाच्या मध्यभागात लंबवर्तुळावर रेसकोर्स दिसत होते घाई नाही, गर्दी नाही सार कस शांत शांत ! तोच ढगाआडून सूर्यदेव बाहेर आले आणि सकाळच्या कोवळ्या किरणात उटी शहर लख्ख उजाळून निघाले उटीच्या मॉर्निंग वॉकची लज्जत काही औरच होती

फिरत फिरत स्टँडवर आलो उटीच्या भेटीतील शेवटचे प्रेक्षणीय स्थान होते दोडाबेट्टा ! निलगिरी पर्वतावरील, दक्षिण भारतातील सर्वात उच ठिकाणे ! उटीपासुन ते १० मैल दूर आहे टॅक्सीवाल्याकडे चौकशी केली. त्याने २५ रु दर सांगितला आमचे तीनच सीट असल्याने दर जास्त वाटत होता दोडाबेट्टाला जाणारे दुसरे कोणी प्रवासीही दिसेनात तेव्हा स्टँडवरील एकाने सुचवले की तुम्ही कोटिगिरी बसने वाटेत आठ मैलांवर उतरून तेथुन पायी दोन मैल चढत गेलात की दोडाबेट्टा शिखरावर पोहोचाल.

कोटिगिरी बस तयारच होती बस उटी गावाबाहेर पडली व चित्तथरारक प्रवास सुरू झाला वळणामागून वळणे घेत गाडी घाटमाथा चढत होती. काही वळणे केसात घालायच्या आकड्यासारखी ( हेअर पिन बेन्ड ) होती आठ मैलाचा प्रवास चुटकीसरशी संपला आम्हाला उतरवून बस पुढे कोटिगिरीकडे गेली

दोडाबेट्टा पहाण्यासाठी दोन मैलाचा पायी प्रवास सुरू झाला. सकाळचे साडेनऊ वाजले होते, धुक्याच्या लहरीवर लहरी उंच उंच निलगिरी वृक्षां-

मधून सरकत पुढे जात होत्या सूर्यराज मध्येच ढगाआड लपत तर मध्येच त्याची किरणे वृक्षामधून डोकावत रस्त्याच्या दोन्ही बाजूला उच निलगिरी वृक्ष आपल्या माथ्याना सौम्य हेलकावे देत उभे होते आजूबाजूला निलगिरी पर्वताची शिखरे दिसत होती निळ्या आकाशातील उटीचे हे हिरवेगार डोंगर म्हणजे निसर्गकाव्यच ! मध्येच खोल दरी दिसायची तर मध्येच उच डोंगर ! उल्का चढाच्या रस्त्यामुळे दमत होती. तर उदय पळत पळत पुढे जाऊन झाडामागे लपायचा रस्त्यावर कोणीही नव्हते त्या रम्यवेळी हे न कळत गीत गुणगुणायला लागले—

**सुहाना सफर है ये मौसम हसी**
**हमे डर है हम खो न जाये कही ।**

त्या अद्भुत निसर्गसौंदर्यात, सुदर, शांत वातावरणात विरघळून जावेसे वाटत होते धुक्याच्या तलम रेशमी लहरींपैकी आपणही एक व्हावे आणि अलगद तरगत पुढे पुढे जावे असे वाटत होते तेवढ्यात अगुलीनिर्देश करून ह्यानी शिखरावर टेकलेले ढग दाखवले ते ढग जणू त्या शिखराचे चुबन घेत होते. त्यावेळी वाटू लागले

**वो आसमा झुक रहा है जमींपर**
**ये मीलन हमने देखा यहींपर ।**

रस्त्याने अधूनमधून टॅक्सी पळत जाताना दिसत होत्या टॅक्सीत तर बहुतेकजण जातातच पण निसर्गसौंदर्याची लज्जत ज्याना चाखायची असेल त्यानी जरूर पायी चढावे व गिर्यारोहणाचा आनद प्राप्त करून घ्यावा

पाऊण तासातच दोडाबेट्टा शिखरावर पोहोचलो प्रथम वेधशाळा एका बाजूला दिसली थोडे पुढे गेल्यावर ते प्रसिद्ध शिखर आले तेथून निरनिराळ्या दिशातून दऱ्यांचे दिसणारे विहगम दृश्य पाहून आनदाने मन भरून गेले एका बाजूला दिसत होती कुनूर व्हॅली तर दुसऱ्या बाजूला कोईमतूर व्हॅली आणि तिसऱ्या बाजूला दिसत होती धुक्यात गुरफटलेली उटी ! ठिपक्याठिपक्यासारखी घरे, उटी सरोवर व डोंगर उतारावरची बोटॅनिकल गार्डनही धुक्याआडून हळूच डोकावत होती.

पावसाळ्यात पर्यटकाना आश्रयासाठी दोडाबेट्टादर फॉरेस्ट खात्याने एक पिकनिक हाऊस बाधले आहे तेथे छोटीशी बाग असून एका स्तभावर

रविंद्रनाथ टागोर व प जवाहरलाल नेहरू यांच्या ' निसर्गावर प्रेम करा ' याबाबत समर्पक काव्यपक्ती लिहिल्या आहेत

समुद्रसपाटीपासून २६३३ मीटर (८६४० फूट) उचीवरील या शिखरावरून निसर्गसौंदर्य न्याहाळणे हा एक आनददायी अनुभव होता शिखरावर गोलाकार कॅन्टीन आहे गरम चहाचा आस्वाद घेऊन फोटो घेण्याचा कार्यक्रम सपवला एका टॅक्सीवाल्याने सहा रुपयात उटीला पोहोचवण्याचे कबूल केले टॅक्सीतून परतताना आमच्यासारखे काहीजण पायी चढताना दिसत होते त्याचे आनंदी चेहेरे सर्व काही सांगून जात होते. अकरा वाजण्याच्या सुमारास लॉजवर परतलो

उटीची भेट आटोपली होती स्टँडवर पोहोचलो तेव्हा उटी-म्हैसुर-हासन बस तयार होती बस साडेअकराला निघून म्हैसूरला पाच वाजता पोहोचणार होती भेट द्यायचे पुढचे गाव म्हैसूर असल्याने म्हैसूरपर्यन्तचे तिकीट काढले ठीक साडेअकराला उटीचा भावपूर्ण निरोप घेतला.

उटीवरून निघून बस म्हैसूरच्या दिशेने निघाली उटी म्हैसूर हा प्रवास १०० मैल अतराचा होता वळणाकार घाटरस्त्यातून बस डोगरामागून डोंगर पार करीत होती एका वळणावर बोर्ड दिसला—

' Stop for a while for frog view '

खरोखर धुक्याने झाकलेल्या डोंगराचे ते दृश्य अत्यत आकर्षक होते धुके इतके दाट होते की पलीकडचे दिसायला मुश्कील ! डोगराच्या उतारावर ठिकठिकाणी चहाचे हिरवेगार मळे दिसत होते वाटायचे की बसमधून उतरून चहाची ताजी ताजी पाने खुडून ताज्या चहाचा आस्वाद घ्यावा. डोंगरउतरणीवर गाडी चालवण्याचे ड्रायव्हरचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते वेळोवेळी अचूक ब्रेक दाबून तो कौशल्याने घाट उतरत होता. भरदुपारी थंडगार वारे अगाला झोंबत होते वाटेत पायकारा व कामराज या नावाच्या दोन धरणाच्या भिंती दिसल्या

दुपारचे दोन वाजले तेव्हा बस उटीपासून ४० मैलावरील मदुमलाई नावाने ओळखल्या जाणाऱ्या घनदाट जगलातून धावत होती मदुमलाई येथे जगलातील वाघ, सिंह, चित्ते, सावर इ नैसर्गिक अवस्थेत पाहण्यासाठी वन्य पशूचे अभयारण्य (wild life sanctuary) आहे प्रवासी तेथे रात्री

मुक्कामाला थांबतात व दुसऱ्या दिवशी पहाटे शांत वातावरणात कांचा लावलेल्या गाडीतून जंगलात फेरफटका मारतात त्यावेळी नदीत डुबणारे हत्ती, स्वैरपणे विहार करणारी हरणे, सांबर तसेच वाघ-चित्ते इ. जंगली श्वापदांचे त्याच्या नैसर्गिक अवस्थेत दर्शन होते.

तामिळनाडू राज्याची हद्द संपली आणि म्हैसूर-कर्नाटक राज्याची हद्द सुरू झाली हद्द संपली तरी जंगल संपले नव्हते आता बांदीपूर जंगल सुरू झाले होते जंगलातील जनावरे दृष्टीस पडतील म्हणून सर्व प्रवासी बसच्या खिडक्यामधून उत्सुकतेने बाहेर बघत होते कंडक्टर सांगत होता की महिन्यापूर्वीच एक चित्ता रस्त्यावरून पळत गेला होता दुसरा एक प्रवासी म्हणाला की रस्त्याजवळील एका ओढ्यात सोंडेने एकमेकाच्या अंगावर पाण्याचे फवारे उडवून आंघोळ करणारे हत्तींचे जोडपे एकदा दिसले होते आम्हाला मात्र झाडावर उड्या मारणाऱ्या दोन माकडाखेरीज काही दिसले नाही तेवढ्यात बसमधील एकजण ओरडला हत्ती बघा हत्ती ! सर्वजण खिडक्य।मधून उत्सुकतेने डोकावले गळयात पितळी माळा घातलेला तो एक पाळीव हत्ती पाहून उत्साहावर पाणी पडले दुधाची तहान ताकावर भागवण्याची वेळ आली होती जंगली नाहीतरी निदान पाळीव हत्ती तरी दिसला होता

वाटेत गुंडलपेटला बस जेवणासाठी अर्धा तास थांबली घाटरस्ता संपवून बस सरळमार्गाने म्हैसूरकडे धावू लागली ठीक पांच वाजता बस म्हैसूरच्या राजवाड्याजवळील मोठ्या स्टँडवर आली ह्यानी उतरून (बेलूर-हळेबीड) पहाण्यासाठी हासनला जाणाऱ्या गाड्यांचे वेळापत्रक पाहिले सकाळी उठून आवरून परत गाडी पकडण्यापेक्षा आलेल्या उटी गाडीनेच हासनला जाऊन मुक्काम करणे सोयीचे असे ठरवून त्याप्रमाणे कंडक्टरला सांगितले त्यावर तो म्हणाला की उटीहून डायरेक्ट हासनचे तिकीट काढले असते तर प्रत्येकी एक रुपया वाचला असता निर्णय उशीरा घेतल्यामुळे चूक झाली होती पण सामानाची हलवाहलव टाळण्यासाठी हीच गाडी सोयीची होती शिवाय एक दिवसात बेलूर-हळेबीड पाहून संपवायचे होते तेव्हा हासनपर्यंत तिकीट काढले गाडीतील सामान काढलेले नव्हते व पूर्वीची जागाही होतीच

म्हैसूर-हासन ६० मैलाचा प्रवास संध्याकाळी सहा वाजता सुरू होऊन रात्री साडेआठला संपला उटी-म्हैसूर-हासन या नऊ तासाच्या दीर्घ प्रवासाने थकून गेलो होती स्टॅण्डवरील गेस्टहाऊसमध्ये सामान ठेवले व जेवण आटोपून निद्राधीन झालो

□

# होयसाळ शिल्पकलेचा आविष्कार बेलूर

हासनचे पूर्वीचे नाव 'सिंहासनपुरी' त्याचा हासन हा अपभ्रंश हासनहून सकाळी नऊच्या बसने निघून ३५ कि मी अंतराचा प्रवास तासभरातच संपवून बेलूरच्या बसस्टँडवर आलो तेथून दोन फर्लांग अंतरावरील प्रख्यात चन्नकेशवमंदिराकडे निघालो होयसाळ राजवंशातील विजयनगरच्या विष्णुवर्धन राजाच्या कारकीर्दीत हे मंदिर १११७ मध्ये बांधले गेले विजयनगर साम्राज्याच्या शेवटच्या राजाने हळेबीड येथे असलेली राजधानी हलवून बेलूरला सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणली.

बेलूरचे हे चन्नकेशव मंदिर म्हणजे होयसाळ शिल्पकलेचा मुक्त आविष्कार ! दाक्षिणात्य पद्धतीचे गोपुर असलेल्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर विस्तृत फरसबंदी प्रांगण लागते त्यात १७६ फूट लांबीचे व १५६ फूट रुंदीचे हे विशाल मंदिर आहे चार फूट उंचीच्या जोत्यावर पायऱ्या चढून आल्यावर मंदिरावर दिसणाऱ्या असंख्य नाजुक शिल्पकृतींनी अवाक् झालो मंदिराच्या चारी बाजूच्या बाहेरील भिंती खालपासून वरपर्यंत विविध शिल्पकृतींनी भरगच्च सजलेल्या आहेत अशी एक इंचही जागा सापडत नाही की जेथे शिल्पकृती आढळत नाही

सर्वात खालच्या तळाच्या पंक्तीत सहस्त्रावधी हत्ती विविध आविर्भावात कोरलेले आहेत कोणत्याही दोन हत्तींमध्ये साम्य आढळत नाही काही हत्ती

पळत आहेत तर काही शांतपणे मार्गक्रमणा करीत आहेत तर काही झुंज करण्याच्या तयारीत आहेत हत्ती हे स्थैर्याचे प्रतीक म्हणून तळाची रांग हत्तींच्या मालिकेची आहे नंतर आहे सिंहपक्ती व त्यानंतर नाजूक गोलाकार मण्यांच्या रचनेची रांग येते त्यानंतर महाभारतातील अनेक प्रसंग कोरलेली रांग आहे नंतर दिसते नाजूक सुंदरी कोरलेली पक्ती। विविध पौराणिक प्रसंग अधूनमधून कोरले आहेत पुन्हा मण्यांची पक्ती आहे शिवाय उत्कृष्ट भौमितिक आकृत्या कोरल्या आहेत. मानवी जीवनातील अनेक प्रसंग शिल्पकृतींच्या सहाय्याने साकार केले आहेत त्यात दिसतात लढाईवर निघालेले योद्धे, शिकारी, संगीतकार, नृत्यविशारद सौंदर्यशाली मदनिका-ज्या या शिल्पकलेचा जणू प्राण आहेत।

चन्नकेशव मंदिराचे वैशिष्टच आहे त्याच्या बाहेरील भिंतीवरील छताच्या खाली चारीबाजूला असलेल्या ब्रॅकेटफिगर्समध्ये। ब्रॅकेटवरील दोन फूट उंचीच्या एकूण ४२ मोहक शिल्पकृती या मंदिराच्या उच्चतम कलेचे प्रतीक आहेत

मंदिराच्या ब्रॅकेट्सवर आढळणाऱ्या या शिल्पकृती आहेत सौंदर्यशाली मदनिका अप्सरांच्या। या सौंदर्यशाली अप्सरांचा डामडौल काय वर्णावा ? मोहक चेहऱ्याच्या, हरिणाक्षी, सरळ नासिका, धनुष्याकार भृकुटी असलेल्या उन्नत उरोज, सिंहकटी, वक्राकार पुष्ट नितंब असलेल्या, विविध अलंकारांनी विभूषित, वैशिष्टचपूर्ण केशरचनेने नटलेल्या या अप्सरांना त्याच्या सौंदर्याचा जणू गर्व झाला आहे त्याचे कितीतरी आविर्भाव चित्रित केले आहेत शुकभाषिनी अप्सरेच्या हातावर तिचा आवडता पोपट आहे पती लवकर न आल्यामुळे झालेल्या विरहाची व्याकूळता या पोपटाशी संभाषण करून ती प्रगट करीत आहे अत्यंत काव्यमय अशी ही कल्पना शिल्पकारांनी अप्रतिम भावमुद्रा कोरून साकार केली आहे

एके ठिकाणी आपल्या प्रियकरावर रंग उडवून वसंतक्रीडा-रंगपंचमी साजरी करणारी अप्सरा चित्रित केली आहे तिच्या उजव्या हातात प्रियकरासाठी तांबूल आहे तर डाव्या हातात आहे पिचकारी। तिच्या दासीच्या हातात रंगाचा कुंभ दाखवला आहे या शिल्पकाराची विनोद-

बुद्धीसुद्धा जागृत आहे वृश्चिकदर्शनाने अनावृत झालेली मदनिका जशी कोरलेली आहे तशी एके ठिकाणी उत्तरीय ओढणाऱ्या माकडामुळे हैराण झालेली, माड्याना विळा घातलेली लज्जित अप्सरा त्यांनी कोरली आहे. तिच्या हातात माकडाला मारण्यासाठी वेलीची फादी आहे. शिकारीला निघालेल्या मदनिकेचा आवेश तर उल्लेखनीयच आहे. तसेच शिकारीहून परत आलेली सुदरीही कोरली आहे. तिच्या दासीच्या हातात मृत हरणाचे धूड दाखवले आहे

नृत्य आणि सगीतात रममाण झालेल्या मदनिका तर ठिकठिकाणी आढळतात भरतनाट्यामधील त्रिभगी नृत्याची 'सर्वात अवघड पोझ नृत्यांगनेच्या शिल्पकृतीत अचूक कोरली आहे. नृत्यामुळे नर्तिकेचे सारे शरीर बाकदार झाले आहे डमरु घेऊन आवेशाने नृत्य करण्याच्या आविर्भावातील अप्सरा जशी आढळते तशीच बासरी घेऊन नृत्य करणारीही आढळते वीणाधारी, मोहक, नाजूक अप्सरा जशी येथे दिसते तशीच पखाधारी, भविष्य सांगणारीही आहे शिल्पकारांची असामान्य, अलौकिक प्रतिभा, त्याचे कौशल्य यात दिसते

आरशात पाहून आपले सौन्दर्य न्याहाळणाऱ्या व कुकुमतिलक कपाळावर लावणाऱ्या सुदरीची ऐट पहायलाच हवी सौन्दर्याचा गर्व झालेल्या दुसऱ्या एका अहकारी सुदरीला तिची दासी आरसा दाखवते आहे केशरचना करणारी, केसांना वळण देणारी अप्सरा तर नितातसुन्दर आहे एके ठिकाणी स्नानानतर श्रात मुद्रेने उभी असलेली सुदरी आहे वृक्षाचे फळ तोडणारी सुदरीही अप्रतिम आहे

या अनेक अनोख्या शिल्पकृतींचे किती बारकावे वर्णन करावेत ? गानमजिरीच्या - गाणे म्हणणाऱ्या सुदरीच्या ओठाची विलगता पाहून आश्चर्य तर वाटलेच पण आतून डोकवणारी सुदर दतपक्ती पाहून अवाक् झालो. किती जिवतपणा आहे ! एका नृत्य करणाऱ्या सुदरीचा तळवा वर उचलला गेला असून जमीन व टाच यात फट आहे हे सौंदर्य डोळ्यांत किती साठवू अन् किती नको असे होऊन गेले त्या अज्ञात कलाकारांच्या असामान्य कारागिरीला मनोमन प्रणाम केला

होयसाळ शिल्पकारांचा संगीत व नृत्य हा आवडता विषय । या मंदिरात नृत्याविर्भावातील लहान मोठ्या आठ हजारावर पोझेस आढळतात कानातील विविध आभूषणाचे आठशेच्यावर प्रकार आहेत तसेच केशरचनेचे प्रकार सहाशेच्यावर आढळतात आजकाल स्त्रियामध्ये लोकप्रिय असलेला पोनीटेल हा केशभूषेचा प्रकार होयसाळच्या शिल्पकारांनी पूर्वीच साकार केला आहे बाराव्या शतकात चित्रित केलेल्या फॅशन्स आज विसाव्या शतकातही प्रिय असाव्यात यावरून फॅशन्स जुन्याच असतात पण त्याची पुनरावृत्ती होते हे मत खरे वाटते या मंदिराच्या शिल्पकारानी आपल्या अद्‌भुत हत्यारानी दगडासारख्या निर्जीव, कठोर माध्यमातूनही अप्रतिम भावमुद्रा असलेल्या शिल्पकृती जणू सजीव केल्या आहेत

हे मंदिर म्हणजे जणु अलंकाराची नाजूक मंजूषाच । या मंदिराची आखणी शिल्पकलातज्ञानी केली नसून जणू नाजूक हस्तीदंती जडजवाहिराची मंजुषा बनवणाऱ्या कारागीराने केली असावी असा भास होत होता

मंदिराच्या भिंतीवर सुरुवातीला विष्णुवर्धन राजाच्या दरबाराचा प्रसंग कोरला आहे शेजारी राणी शान्तलादेवी बसली आहे तिच्या केसाना फुलपाखराच्या वळणाची मारलेली गाठ ( Butterfly knot) सुन्दर आहे राणीच्या अंगावरील वस्त्रे, कमरपट्टा इ. ही कौशल्याने कोरले आहे राणीच्या हातात पाने आहेत तसेच बाजूला मंत्रीगण, रक्षकही दिसतात

भिंतीवर विविध देवताच्या मूर्ती आढळतात तसेच रामायण-महाभारत यातील प्रसंगांची रेलचेल आढळते पौराणिक प्रसंगात लंकेचा राजा कैलासपर्वत उचलत आहे असे एक दृश्य दिसते कैलासपर्वतावरील शिव पार्वतीच्या दरबाराचे दृश्यही प्रेक्षणीय आहे महाभारतातील तर अनेक प्रसंग कोरले आहेत मत्स्यभेद करून द्रौपदीशी विवाह करणारा, विराटाच्या गाई सोडवणारा अर्जुन साकार केला आहे विष्णूचे निरनिराळे अवतारही कोरले आहेत नरसिंह अवतारात प्रल्हादाची सुटका व हिरण्यकश्यपूचा वध दिसतो वामनावतारात विष्णूने बळीराजाचे केलेले गर्वहरण आहे वराहअवतार, महिषासुरमर्दिनी, भस्मासुरमोहिनी, रतीमदन, गजासुरमर्दन इ. कितीतरी पौराणिक प्रसंग दिसतात. अरुण सारथी असलेल्या व सात

अश्व असलेल्या रथातून जाणारे सूर्यदेवही दिसतात एकेठिकाणी कोरीव काम केलेली छोटी दगडी, नक्षीदार गॅलरी आकर्षक आहे

मंदिरात प्रवेश केल्यावर ' नवग्रहमंडप ' लागतो. या मंडपात ४८ दगडी स्तंभ आहेत. त्याच्यात कोणतेही साम्य नाही हे विशेष ! वेगवेगळ्या नक्षीकामाने नटलेले हे स्तंभ जणू सौंदर्याचा खजानाच ! हे स्तंभ गोल, चौकोनी, षट्कोनी, अष्टकोनी, बाराकोनी अशा विविध आकारात आहेत स्तंभांवर १०२ विष्णूमूर्ती आहेत काळ्या कुळकुळीत रंगाच्या या स्तंभांचे पॉलीश अप्रतिम आहे काही स्तंभ आरशासारखे चमकत होते ज्याप्रमाणे लोखंडी धातूच्या गजांना लेथ मशीनवर टर्निंग करतात त्याप्रमाणे ह्या स्तंभावर हतीच्या सहाय्याने हत्यारे गोलाकार फिरवून खाचा केल्या हे स्तंभ असे घडवले गेले या अलौकिक कारागिरीमुळे थक्क झालो

या मंदिराचा गाभारा ताऱ्याच्या आकारासारखा असून गर्भगृहासमोरील मोहिनीस्तंभ अलौकिक कारागिरीबद्दल प्रसिद्ध आहेत. नरसिंहस्तंभ हा तर पूर्वी आसाभोवती फिरे सर्व मंदिरांचे शिल्पकाम, नक्षी त्यावर कोरण्याचा प्रयत्न केला आहे यातील मंडपाच्या गोलाकार छताचा घेर १३ फूट आहे व उंचीही १३ फूट आहे गाभाऱ्यात अंधार असल्याने विजेच्या दिव्याचा झोत टाकण्याची व्यवस्था केली आहे झोत टाकल्यावर तेथे तीन फूट व्यासाचे टांगते सुंदर कमळ दिसले छतावर नाजूक लोंबत्या लोलकावर नक्षीकाम होते हा घुमट घंटेच्या आकाराच्या चार स्तंभावर आधारीत आहे

या चार स्तंभावर सुंदर तरुणीच्या चार आकृती आहेत एके ठिकाणी सुंदरीच्या हातावर पोपट बसला आहे विशेष म्हणजे या सुंदरीच्या गळ्यातील नेकलेस खालीवर सरकू शकते नृत्याच्या आविर्भावातील सुंदरीच्या हातातील बांगडी खालीवर होऊ शकते केशभूषा करणाऱ्या सुंदरीचा आविर्भाव वाखाणण्यासारखा आहे स्नान केलेल्या सुंदरीच्या केसांवर पाण्याचे ठिपके कोरलेले पाहून तर कलाकारांच्या असामान्यत्वाचा साक्षात्कार झाला एके ठिकाणी शांतलादेवीची सुंदर मूर्ती आहे

गर्भगृहाच्या दरवाजावर पूर्णाकृती द्वारपाल आहेत तसेच स्त्री-पुरुषाचा चेहेरा असलेल्या नागनागिणींच्या मूर्ती आहेत गर्भगृहात चन्नकेशव म्हणजे

सुदर-नारायण भगवान श्रीविष्णूची उभी मूर्ती आहे मूर्तीचा चेहेरा सुदर व मोहक असून त्यावर स्मितहास्य विलसते चादीच्या दागिन्यानी मूर्ती विभूषित आहे. बाजूला भूदेवी व श्रीदेवीच्या मूर्ती आहेत.

मदिराबाहेर प्रागणात कमळाकृती चबुतऱ्यावर ४४ फूट उचीचा ११ टन वजनाचा अखड दगडी स्तभ आहे हा स्तभ चुन्याने, वाळूने पक्का केलेला नसून आपल्या वजनानेच तोलला गेला (Gravity Pillar) आहे. स्तभाच्या खालील फटीतून कागद अलगद आरपार जाऊ शकतो. मदिरासमोर गरुडमूर्ती आहे या मदिराचा कळस आज अस्तित्वात नाही मदिराची बाधणी उच्च दर्जाच्या शैलीची आहे

मदिराच्या आवाराच्या बाहेर पडलो खरे पण सौदर्यशाली मदनिकाचा डामडौल नजरेसमोर तरळत होता

□

# गीत गाती पत्थर - हळेबीड

बेलूरपासून केवळ दहा मैल अंतरावर असलेले हळेबीड १२ व्या शतकापासून तीन शतके होयसाळ राजवंशाची राजधानी होते. विजयनगरच्या सम्राटानी १७ व्या शतकात या गावाला हळेबीड नाव दिले (हळे म्हणजे जुनी व बीड म्हणजे राजधानी ) व बेलूरला नवी राजधानी वसवली. हळेबीडचे मूळचे नाव ' द्वारसमुद्र '

अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफू याने या शहरावर १४ व्या शतकाच्या सुरुवातीला हल्ला करून विध्वंस केला व अमाप लूटमार केली

हळेबीडचे ' होयसालेश्वर मंदिर ' ११२१ मध्ये विजयनगरचा राजा केतुमल्ला याने पूर्ण केले हे मंदिर होयसाळ शैलीच्या मंदिरात सर्वात मोठे आहे ८० वर्षे काम चालू असूनही ते पूर्ण केव्हाच होऊ शकले नाही हे मंदिर म्हणजे नागज मल्लज आणि दासज या तीन शिल्पकारांच्या तीन पिढ्याची कामगिरी ठिकठिकाणी अपुरे काम आढळते एकेकाळी ८४ ब्रॅकेट शिल्पकृती असलेल्या या मंदिरात सध्या केवळ बाहेर तीन व आत अकरा अशा चौदाच शिल्पकृती आहेत बाकीच्याचा नाश झाला मंदिराची दोन्ही शिखरेही सध्या नाहीत तथापि सद्य स्थितीत आढळणाऱ्या मंदिरावरील अप्रतिम शिल्पकाम होयसाळ शिल्पकलेचा परमोत्कर्ष दाखवते.

हे मंदिर द्विकूट पद्धतीचे असून उंच चबुतऱ्यावर बांधलेले आहे हे जुळे मंदिर आहे विष्णुवर्धन राजाच्या सेनापतीने होयसाळ राजा व शांतलादेवी

या दोघाबद्दल आदराची भावना म्हणून होयसाळेश्वर व शांतलेश्वर अशा दोन लिंगाची स्थापना या दोन मंदिरांत केली ही दोन मंदिरे एका कॉरीडॉरने जोडली आहेत दोन लिंगांसमोर बाहेर दोन नंदीमंडप असून त्यात दोन विशाल नंदी आहेत अखंड दगडात कोरलेले हे नंदी सुमारे दहा फूट उंचीचे असून त्याचे कान, शेपटया, नाकपुड्यातील पोकळपणा, बसण्याची ऐट वाखाणण्यासारखी आहे दक्षिणेकडील नंदीच्या मागे सूर्यदेवतेची सुंदर मूर्ती आहे मूर्तीखाली सात अश्व आहेत

मंदिराच्या चबुतऱ्यावर आल्यानंतर मंदिराच्या भिंती शिल्पकृतींनी ओतप्रोत भरलेल्या पाहून डोळ्यांचे पारणे फिटले मंदिराच्या भिंतीवर ११ पंक्तीत विविध शिल्पकृती, नक्षीकाम आहे

पहिली पंक्ती हत्तींची दुसरी सिंहांची। नंतरची पंक्ती पुष्पवेलींच्या नक्षीकामाची असून, चौथ्या पंक्तीवर अश्वाची रांग कोरली आहे. पाचव्या पंक्तीत पुनश्च पुष्पवेली असून सहाव्यात रामायण, महाभारत, भगवद्‌गीता यातील प्रसंग कोरले आहेत सातव्या पंक्तीत प्राणी, पशू, देवता व पुराणातील प्रसंग आहेत आठव्या पंक्तीत हंसांची रांग आहे एक हंसी पिलांना भरवतानाचा प्रसंग सुंदर आहे नवव्या पंक्तीत नृत्याच्या अविर्भावातील सुंदरी आहेत एका दगडात दोन बाजूला दोन मूर्ती कोरल्या आहेत नवव्या पंक्तीत मोठ्या मूर्ती आहेत ब्रह्मा, विष्णू, सरस्वती यांच्या मूर्ती आहेत तसेच दररोजच्या जीवनातील अनेक प्रसंग शिल्पकारांनी साकार केले आहेत कामजीवनाचे प्रसंगही त्यातून सुटले नाहीत

सहाव्या पंक्तीत विष्णुवर्धन राजाच्या दरबाराचे दृश्य कोरले आहे. त्यात मंदिराचे बांधकाम करणारा सेनापती केतुमल्ला दिसतो पुराणातील अमृतमंथनाचे दृश्यही एकेठिकाणी कोरले आहे शिवपार्वती दरबाराच्या दृश्यात विष्णु, ब्रह्म, यम, कुबेर, गण, दिक्पाल हे त्याच्या वाहनासह दिसतात वामनावताराचे दृश्यही कोरले आहे

पूर्वेकडच्या भिंतीवर कृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग कोरलेले आहेत वसुदेव कृष्णाला घेऊन यमुना नदी पार करतानाचे दृश्य कोरताना या महान शिल्पकारांना नदीतील मासे-मगरी याचा विसर पडला नाही

मासे, मगरी रेखीवपणे कोरल्या आहेत कृष्णाला पाऊस लागू नये म्हणून फणा असलेला आदिशेष मदत करताना दिसतो कृष्णाला गोकुळात यशोदेजवळ हवाली करणारा वसुदेव दिसतो पूतनामावशीचे स्तनपान करणारा कृष्ण जसा दिसतो तसेच यशोदेने बांधून ठेवलेला नटखट कृष्णही दिसतो गोपींच्याजवळचे लोणी लुटून त्याना हैराण करणारा, मुरलीवादन करणारा, गोवर्धन गिरी उचलणारा, कृष्णाची कितीतरी रूपे साकार केली आहेत कृष्णलीलांचे असंख्य प्रसंग शिल्पात पाहात असताना मन कृष्णमय होऊन जाते

मंदिराच्या पश्चिम भिंतीवर तीन फूट उंचीच्या मूर्ती आहेत समभंग, द्विभंग, त्रिभंग मूर्तींची शिल्पकला उत्कृष्ट आहे अर्जुन-कर्ण युद्धाचा महाभारतातील प्रसंग शिल्पकारांनी टिपला आहे एकेठिकाणी अर्जुनपुत्र अभिमन्यू चक्रव्यूहात सापडला आहे हा प्रसंग कोरला आहे आणखी एकाठिकाणी दिसतात भीमावर हल्ला करणारे सात हत्ती व त्याना तोंड देणारा एकटा भीम ! यात मारून ठार झालेले दाखवले आहेत बकासुर वधही दाखवला आहे गीता कथन करताना कृष्ण व ती तन्मयतेने श्रवण करणारा अर्जुन चित्रित केला आहे

भक्त प्रल्हादाची कथाही विविध शिल्पकृतींच्या सहाय्याने साकार केली आहे शेवटी खांबातून बाहेर पडून राक्षसाला मारणारा नरसिंह कोरला आहे मूर्तींच्या रूपात भक्त प्रल्हादाची कथा पहाताना उल्का-उदय रमून गेले पुढे रामकथा कोरली आहे सुग्रीवाची लढाई चालू असताना वालीला मारण्यासाठी सात झाडांमधून आरपार बाण मारणारा श्रीराम दिसतो राम-रावण युद्धात वीररस साकार झाल्यासारखा वाटतो

एकेठिकाणी किरातार्जुनीय युद्धकथा कौशल्याने चित्रित केली आहे एकाच वराहाला दोघांचे बाण लागलेले दाखविले आहे किराताच्या छातीवर अर्जुन बसला असताना किरात वेषधारी शंकर हे युद्ध पहाणाऱ्या उमेला अर्जुनाच्या अंगाखालून पायाच्या अंगठ्याने डिवचून खूण करून सुचवितो की पहा माझ्या भक्ताचे सामर्थ्य किती आहे ! अर्जुनाचे युद्ध-कौशल्य पाहून चकित झालेल्या उमेने आश्चर्याने ओठावर बोट ठेवलेले

चित्रित करून शिल्पकाराने अप्रतिम मुद्राभिनय कौशल्याने दर्शविला आहे

मत्स्यभेद करणारा अर्जुन, वामनावतार, गजेंद्रमोक्ष, मुषकावर नृत्य करणारा गणेश, मोरावर स्वार झालेला कार्तिकेय, ब्रह्मा, शिव, पार्वती, हनुमान, मनमोहक कालभैरव, नटराज, नृत्य करणारी सरस्वती, विष्णु, लक्ष्मी अशा विविध शिल्पकृती मंदिरावर ठिकठिकाणी आढळतात.

स्त्रीसौंदर्याचा या शिल्पकारांना विसर पडणे शक्यच नव्हते वीणाधारी, आरशात पाहून कुमकुमतिलक लावणारी अशा कितीतरी सुंदर स्त्रिया येथे कोरल्या आहेत एका सुंदरीच्या केसावर खऱ्या जाळीसारखी जाळी कोरलेली दिसते ! शिल्पकाराच्या जागृत विनोदबुद्धीचे प्रतीक असलेला एक प्रसंग नवव्या पंक्तीत दिसतो. एका सुंदरीची साडी एक माकड ओढत आहे व त्याला ती सुंदरी मारत आहे माकडाला मारताना सुंदरीच्या पायातील चप्पल व उचललेला तळवा यातील फट स्पष्ट दिसते सुंदरीची केशरचना, कर्णफुले अप्रतिम आहेत

मंदिराच्या मागील प्रवेशद्वाराबाहेर एक विशाल गणेशमूर्ती आहे. मंदिराला तीन प्रवेशद्वारे आहेत त्यावर अत्यंत बारीक नक्षीकाम आहे मंदिराच्या आत दोन नवग्रहमंडप आहेत व ते एका छोट्या कॉरीडॉरने जोडले आहेत आतमध्ये उत्कृष्ट कोरलेले १०८ स्तंभ आहेत तुलनेने दक्षिणेकडील स्तंभ अधिक सुंदर आहेत. या स्तंभावर नक्षीदार खाचा आहेत. स्तंभांवर पूर्वी ब्रॅकेट शिल्पकृती होत्या पण सध्या नाहीत ह्या स्तंभावरही हत्तींच्या सहाय्याने टर्निंग केले आहे छतावर टांगती कमळे कोरली आहेत ती अत्युत्कृष्ट आहेत.

दोन गाभाऱ्याच्या दरवाजांवर वेगवेगळे नक्षीकाम आहे. द्वारपाल कोरले आहेत ते नखशिखांत अलंकृत आहे. त्याच्या मुकुटावर मानवी कवट्या कोरल्या आहेत त्यांच्या नाकाच्या छिद्रात काड्या आरपार जातात दोन गाभाऱ्यात होयसालेश्वर व शांतलेश्वर अशी दोन लिंगे आहेत

मंदिर पाहून बाहेर आलो तीन शतके राजवैभव उपभोगलेले हळेबीड उजाड भासत होते मंदिराबाहेर फक्त चार-सहा छोटी दुकाने दिसत होती. मागील बाजूला टेकडीवर काही भग्नावशेष दिसत होते त्या उजाड

पार्श्वभूमीवरही ते मंदिर मोठ्या दिमाखाने उभे होते काळ त्याच्यावर प्रहार करीत होता पण त्यातील पत्थर जणू गीत गात होते मंदिराचा निरोप घेतला तो अजरामर कलाकृती निर्माण करणाऱ्या अज्ञात, अनामिक होयसाळ शिल्पकारांच्या अमर कारागिरीने भारावूनच !

बसस्टॉप मंदिरासमोरच होता हासनला सहा वाजता पोहोचलो व तासाभराने सामान घेऊन स्टँडवर आलो. बाजाराचा दिवस ! गाड्यांना तुफान गर्दी होती जी बस येई त्यात प्रवाशांचा लोंढा घुसे त्यात भाषा कानडी एस. टी वर पाटय़ाही कानडा ! आम्ही तर हवालदिल झालो. पण आमची भाषेची अडचण ओळखून तेथील कंट्रोलरने आम्हाला फार मदत केली श्रवणबेलगोळाकडे जाणारी बस येताच जागा मिळवून दिली सामानही स्वत हमालाकरवी ड्रायव्हरजवळ ठेवले एखाद्या देवदूतासारख्या भेटलेल्या त्या कंट्रोलरचे वारंवार आभार मानीतच हासन सोडले हासनहून २५ मैलांवर चन्ननारायणपट्टण हे गाव लागते त्यानंतर ७ मैल संपल्यावर श्रवणबेलगोळा आले.

❑

# श्री गोमतेश्वराचे श्रवणबेलगोळा

सकाळची वेळ ! जैन धर्मशाळेच्या आवारात प्रवाशाची धावपळ, आवराआवर सुरू होती ऊन होण्याच्या आत भगवान गोमतेश्वराचे दर्शन घेण्यासाठी टेकडी चढून जाण्याची ज्याला त्याला घाई झाली होती आम्हीपण स्नान इ आटोपून सकाळी आठच्या सुमारास विंध्यगिरी टेकडीकडे निघालो. ५७ फूट उंचीचा प्रचड पुतळा पाहण्याची मुलानाही उत्सुकता लागली होती इतक्यात उल्का वर टेकडीकडे पाहात म्हणाली, "पप्पा तो पहा बाहुबलीचा चेहेरा दिसतो आहे " वर पाहिल तर खरच पुतळ्याचा फक्त चेहेरा दिसत होता त्यामुळे तर उत्सुकता अधिकच वाढून आमची पावले नकळत वेगाने पडू लागली १५ मिनिटातच विंध्यगिरी टेकडीच्या पायथ्याशी पोहोचलो भगवान गोमतेश्वराचे दर्शन घ्यायला आम्ही अगदी अधीर झालो होतो.

श्रवणबेळगोळा या गावाचा इतिहास तसा प्राचीन आहे इ स पूर्व तिसऱ्या शतकात चद्रगुप्त मौर्याने भेट दिली होती. हे गाव दोन टेकड्यांमध्ये वसले आहे


हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट ! जैन तीर्थंकर भगवान आदिनाथ प्रभूच्या यशस्वती व सुनदा या दोन राण्याचे भरत व बाहुबली हे दोन पुत्र ! अखड राजवैभव उपभोगल्यानतर आदिनाथप्रभूने ससारविरक्तीचा मार्ग स्वीकारला. आपल्या राज्यांचा अयोध्येकडील भाग भरतावर व दक्षिणेकडील भाग बाहुबलीवर सोपवून आदिनाथ प्रभू कैलासपर्वतावर निघून गेले



मदनिका व
मर्कटलीला
बेलूर (कर्नाटक)

विशाल शिल्प
बाहुबली उर्फ
श्री गोमतेश्वर
श्रवणबेलगोळा
( कर्नाटक )





शिल्पाने ओतपोत सजलेली मंदिराची भिंत - हळबीड (कर्नाटक)

भरत आणि बाहुबली हे दोघे भाऊ खरे-पण भिन्न स्वभावाचे ! भरत महत्त्वाकांक्षी तर बाहुबली विलासी, सुखोपभोगी । भरताने दिग्विजय प्राप्त करण्यासाठी अनेक खंडात अफाट सेना पाठवून ठिकठिकाणच्या राजाना वश केले बाहुबलीचे राज्य मात्र अजून भरताच्या साम्राज्याखाली आले नव्हते भरताने आपला मित्र बाहुबलीच्या दरबारात शिष्टाईसाठी पाठवला त्याने बाहुबलीला खूप अ ग्रह केला की ज्येष्ठ बंधू भरताच्या दरबारात हजर होण्यासाठी त्याने चलावे यावर बाहुबलीने त्याला सुनावले की भरताने गोरगरीबाना छळून, अत्याचार करून, लुटून विजय मिळवलेला आहे आपण त्याला शरण जाणार नाही रणभूमीतच या गोष्टीचा निर्णय लागेल समझोत्याचे प्रयत्न विफल झाल्यावर युद्धाच्या निर्णयावर दोघेही आले । पण युद्धात खूप मनुष्यहानी होईल म्हणून दोघानी द्वंद्वयुद्ध करण्याचे ठरवले द्वंद्वयुद्धात बाहुबली विजयी झाला विजय प्राप्त झाला खरा पण राज्यलोभामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची त्याला घृणा वाटू लागली ज्याच्या लोभामुळे प्रत्यक्ष भाऊही वैरी होतो ते राज्यवैभव त्याला कस्पटासमान वाटू लागले व विजय मिळवूनही तो सर्व ससाराचा त्याग करून तपोवनात तपश्चर्या करायला निघून गेला घनघोर जगलात त्याने दृढनिश्चयाने वर्षभर दीर्घ तप केले त्याच्याभोवतीच्या लतावेलींनी त्याला लपेटून टाकले. भोवती सर्पांची वारुळे तयार झाली शरीरावर वेल चढलेही व त्याची पाने सुकलीही पण बाहुबलीचे चित्त क्षणभरही विचलित झाले नाही वर्ष सपले इकडे भरताला पश्चात्ताप होऊन तो बाहुबलीजवळ गेला झालेल्या प्रमादाची क्षमा मागू लागला व बाहुबलीने परतावे म्हणून विनवू लागला पण ते कसे शक्य होते? तपश्चर्येनंतर बाहुबलीला आत्मसिद्धी प्राप्त होऊन केवल ज्ञान प्राप्त झाले. भरताने मोठ्या भक्तिभावाने बाहुबलीची मूळ मूर्ती बनवून तिची प्रतिष्ठापना केली

बाहुबलीची कथा आठवीतच विंध्यगिरी टेकडीच्या प्रचड शिलेवर कोरलेल्या सुमारे ६०० पायऱ्या चढून वर आलो आमच्याबरोबर महाराष्ट्रातल्या एका हायस्कूलच्या ट्रीपच्या मुलीही होत्या पायऱ्या चढून वर आलो भगवान गोमतेश्वराचे दर्शन झाले आणि नेत्र अगदी तृप्त झाले

भगवान गोमतेश्वर उर्फ बाहुबलीची ही विशाल मूर्ती ५७ फूट उचीची, नग्न असून उत्तराभिमुखी आहे गगावशातील राजा राजमल्ल याचा सेनापती वीर चामुडराय ह्याने ही मूर्ती इ स. ९८३ मध्ये तयार केली यासबधीची हकीकत अशी–वीर चामुडरायच्या मातेला-पद्मावतीला भरताने स्थापन केलेली बाहुबलीची मूळ मूर्ती पाहण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे ते प्रवासास निघाले. वाटेत विंध्यगिरी पर्वतापर्यंत ते आले तेथे पडलेल्या स्वप्नाप्रमाणे विंध्यगिरी पर्वतावर चामुडरायने ही मूर्ती अरिस्टनेमी या कारागिराकडून घडवून घेतली व मातृइच्छा पूर्ण केली

या विशाल मूर्तीचा चेहेरा नऊ फूट उचीचा असून डोक्यावर कुरळचा केसांची ६४ झुलुपे रुळत आहेत गोमतेश्वरचा चेहेरा मोठा सात्त्विक असून प्रसन्न आहे चेहेऱ्यावर शांत भाव ओसडून चालला आहे जीवन क्षणभगुर आहे हे माहीत असूनही आपल्यापुरतेच पाहणाऱ्या, सत्ता–सपत्ती यासाठी रात्रदिवस झगडणाऱ्या स्वार्थी जगाकडे जणू भगवान निर्विकारपणे पहात आहेत कारण त्यानी हे सर्व अनुभवले होते पण ते त्या भावनाच्या पलीकडे गेले चेहेऱ्यावर आत्मज्ञान प्राप्त झाल्याचा भाव साकार करण्यात शिल्पकाराने जणू आपले सारे कौशल्य पणाला लावलेले दिसते

या विशाल चेहेऱ्याचे कान साडेपाच फूट लाब व नासिका तीन फूट आहे छातीचा घेर ३२ फूट आहे तर दोन भारदस्त खाद्यांमधील अतर २६ फूट आहे हात सरळ गुडघ्याखाली पोहोचले असून बोटे सरळ पण अगठा किंचित बाहेर आहे कबरेखाली उची ३० फूट असून पायाची उंची साडे आठ फूट आहे पायाच्या अगठ्याची लांबी साडे तीन फूट आहे

पुतळ्याचा प्रत्येक अवयव प्रमाणबद्ध आहे पुतळा कमल पुष्पावर उभा आहे पायाजवळ बाजूला वारुळे कोरली आहेत त्यातून नाग डोकावताना दिसतात हे कोरलेले नाग प्रभावित होऊन ध्यानस्थ बसलेले दिसतात त्याच प्रमाणे वेला, पाने यानी बाहुबलीचे हातपाय लपेटून घेतले आहेत मूर्तीच्या बाजूला सहा फूट उचीचे दोन चौरी ढाळणारे कोरले आहेत भगवानाच्या उजव्या पायाजवळ तामीळ व कानडीत शिलालेख आहेत तर डाव्या पायाजवळ मराठी देवनागरी लिपीत कोरले आहे—

श्री चामुडरायें करवियले ।
श्री गगाराजें सुत्ताले करवियले ।

मराठीतील हा आद्य शिलालेख पाहून धन्य वाटले मजकूरातील शब्द-सुद्धा पुतळ्याला शोभेशा आकाराचे आहेत श्री हे अक्षर दीडफूट उचीचे आहे.

आमच्याबरोबर चढणाऱ्या मराठी शाळेतल्या मुली गोमतेश्वराचे दर्शन घेऊन भराभर परतल्यासुद्धा ! मुली परतल्या आणि शाळेचे शिक्षक आले वास्तविक त्या मुलीना मराठीतील आद्य शिलालेख दाखवण्याचे काम शिक्षकाचे होते पण सर्व मुली तो शिलालेख पाहिल्याविनाच परतल्या होत्या हे पाहून वाईट वाटले

श्रवणबेलगोळा हे नाव कसे पडले याविषयी तेथील जैन पुजारी सांगू लागला की, ही विशाल देखणी मूर्ती निर्माण केल्यामुळे आपल्या मुलाला—चामुडरायाला गर्व होऊ नये म्हणून माता पद्मावतीने गोमतेश्वराला चादीच्या कपातून दूधाचा अभिषेक केला ते दूध या मूर्तीपासून टेकडी-खालील कुडात गेले श्रवण म्हणजे तपस्वी, बेळीया म्हणजे चादीचा कप व गोळा हे विध्यगिरी टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या कुडाचे नाव ! वरील घटनेपासून या गावाला श्रवणबेलगोळा हे नाव पडले

हा पुतळा घडवून हजारो वर्षे होऊन गेली तरी तो आजही ताजा, टवटवीत, नुकताच घडविल्यासारखा वाटतो यातच शिल्पकारांचे कौशल्य दिसते. पुतळ्याचा राखी रगही तजेलदार वाटतो या मूर्तीवर कुठलाही पक्षी बसून घाण करीत नाही जणु त्यांना परमेश्वराच्या अस्तित्वाची साक्ष पटली उदय–उल्का जेव्हा या विशाल मूर्तीच्या चरणावर डोके ठेवून वदन करु लागले तेव्हा ते अगदीच चिमुकले भासू लागले या पुतळ्याची भव्यता एवढी आहे की तो २५ कि मी च्या परिसरात दिसू शकतो

बाहूमध्ये बळ, सामर्थ्य तर हवेच पण त्याहिपेक्षाही त्याग केल्याने मिळणारे बळ अधिक श्रेष्ठ आहे सत्ता–सपत्ती–भोग यापेक्षाही त्याग श्रेष्ठ आहे जे काही मिळवायचे ते देण्यासाठी असा सदेश देत भगवान

गोमतेश्वर आज हजारो वर्षे ऊन, पाऊस, वारा सहन करीत धीरोदात्तपणे, शांतपणे उभा आहे

भगवान गोमतेश्वराच्या या पुतळ्याला बारा वर्षांतून एकदा मस्तकाभिषेक होतो पहिला अभिषेक चामुंडरायाने केला होता १८२५ मध्ये म्हैसूर महाराजा कृष्णराज वाडियार यांनी अभिषेक केला होता त्यावेळी चढण्यासाठी पुतळ्याच्या मागच्या बाजूला खास व्यवस्था केली होती पुतळ्याच्या मस्तकावर नारळाचे पाणी, दूध, तूप, यांचा तर अभिषेक केलाच पण सोन्याची नाणी, बदाम, केळी यांनी भरलेली हजारो भांडी मस्तकावर रिकामी करण्यात आली मागे झालेल्या अभिषेकाच्या वेळी हेलिकॉप्टरमधून फुलांचा वर्षाव करण्यात आला होता त्यावेळच्या प्रसंगाची चित्रे तेथे उपलब्ध होती

भगवान गोमतेश्वराला पुन: पुन्हा आदराने वंदन करून, आजूबाजूचे निसर्गसौंदर्य न्याहाळीत विंध्यगिरी टेकडी उतरलो टेकडीच्या खालच्या टप्प्यावर पार्श्वनाथ भगवानाचे छोटे पण सुंदर मंदिर आहे आतील मूर्ती तपकिरी रंगाची असून प्रवाळाची आहे.

म्हैसूरला जाण्यासाठी बारा वाजता बस होती. म्हणून लगेच सामान वगैरे आणून स्टॉपवर आलो बस वेळेवर आली म्हैसूरकडे निघालो. मन मात्र बाहुबलीच्या विशाल शिल्पाभोवती रेंगाळत होते

❑

# दक्षिणेची शान - राजशाही म्हैसूर

श्रवणबेलगोळा ते म्हैसूर हा १०० कि मी अंतराचा प्रवास संपवून म्हैसूरच्या प्रशस्त स्टँडवर बस थांबली तेव्हा दुपारचे दोन वाजले होते प्रवासात विशेष सृष्टिसौंदर्य नसल्याने प्रवास तसा कंटाळवाणाच झाला होता बसस्टँडवरून मध्यवर्ती इंद्रभवन लॉजकडे आलो जागेअभावी लगतच्या आगरवाल लॉजमध्ये आमची रवानगी करण्यात आली हेही लॉज फारच उत्तम होते. गीझर, फोन व बाल्कनीही असलेली हवेशीर खोली मिळाल्याने मुले अगदी खूष झाली इंद्रभवनमध्ये जेवण आटोपले म्हैसूर पहायला फक्त दीड दिवस शिल्लक होता तेव्हा पर्यटनखात्याच्या म्हैसूर दर्शन या बसचे दुसऱ्या दिवसाचे तिकीट रिझर्व केले सुदैवाने तीनच तिकिटे शिल्लक होती पर्यटन बसने दुसऱ्यादिवशी म्हैसूरच्या जगमोहन पॅलेसमधील आर्टगॅलरी फक्त एक तासातच घाईघाईने पाहावी लागेल म्हणून दुपारच्या राहिलेल्या अर्ध्या दिवसात तिकडे जाण्याचे ठरवले रिक्षाने पॅलेसजवळ दहा मिनिटातच आलो

## जगमोहन पॅलेस आर्ट गॅलरी

१८६१ मध्ये बांधलेल्या या जगमोहन पॅलेसमध्ये १९१५ पर्यंत राजपरिवार राहात असे १९१५ मध्ये त्याचे रूपांतर म्युझियममध्ये करण्यात आले म्हैसूरमहाराजा श्रीजयरामराजा वाडियार यांनी या म्युझियमचे उत्कृष्ट आर्टगॅलरीत रूपांतर केले जगातील उत्कृष्ट आर्ट गॅलरीत तिची गणना होते

प्रथम तळमजल्यावर पहिल्या व दुसऱ्या दालनात म्हैसूर राजघराण्यातील व्यक्तींची भव्य तैलचित्रे आहेत. कृष्णराज वाडियार यांचे नखाने काढलेले चित्र

उत्कृष्ट आहे म्हैसूरच्या तीन महाराजाची चित्रे तर अशी आहेत की ती कोणत्याही दिशेने पाहिली तरी त्यांचे पाय व दृष्टी आपल्या बाजूला वळलेली दिसते तिसऱ्या दालनात म्हैसूरच्या दसरा दरबाराचे अतिशय भव्य चित्र आहे डोळ्यासमोर सर्व सोहळा साक्षात उभा रहातो आपली मुले ब्रिटिशाच्या स्वाधीन करणारा टिपू, श्रीरंगपट्टणची लढाई, महाराजाच्या विवाहाची मिरवणूक इ अनेक चित्रे प्रेक्षणीय आहेत

चौथ्या दालनात राजपूत व मोगलशैलीची चित्रे आहेत तांदळावर म. गांधी, म्हैसूरचे महाराज यांची काढलेली चित्रे आश्चर्यकारक आहेत ही चित्रे भिंगातून पाहावी लागतात सूक्ष्म, नाजूक कारागिरीने चकित झालो मागील दालनात म्हैसूरचा राजप्रासाद, ताजमहाल याच्या सुंदर प्रतिकृती आहेत

आर्ट गॅलरीचा पहिला मजला म्हणजे तर सुंदर चित्राचा खजिना ! देशातील विविध चित्रकाराची उत्कृष्ट चित्रे त्यात आहेत श्री हळदणकर यांचे Lady with the lamp हे चित्र तर अत्युत्कृष्ट आहे या दालनातील दिवे विझवून तेथील रक्षकाने या चित्राचे वैशिष्ट्य दाखवले चित्रातील हातातील समईच्या ज्योतीच्या प्रकाशाने तिचा उजाळला गेलेला चेहरा व बोटाच्या फटीत दिसणारा गुलाबसर प्रकाश पाहिल्यावर स्तिमित झालो हे चित्र म्हणजे अजरामर कलाकृतीच होय.

तिबेटी दालनात तिबेटी शैलीच्या चित्रांबरोबरच इतरही विविध चित्रे आहेत राजा रविवर्मा यांनी काढलेली पौराणिक प्रसंगावर आधारित अनेक सुंदर चित्रे पाहून आनंदित झालो जटायू वध, हरिश्चंद्र-तारामती, भीष्मप्रतिज्ञा, सुदक्षिणा, सैरंध्री, हंस–दमयंती दूताच्या रूपात कृष्ण, संदेश नेणारा हंस, समुद्रावर बाण मारणारा धनुर्धारी राम या चित्रातून ते ते प्रसंग जिवंत होतात कृष्णशिष्टाई चित्रातील कृष्णाच्या चेहऱ्यातील शांत-पणा, दुर्योधनाचा द्वेष व पुतण्याचे गैरवर्तन पाहून हाताने डोळे झाकलेला विदुर कौशल्याने चित्रित केला आहे. तर जटायू वध चित्रात रावणाचे क्रौर्य, सीतेची असहाय्यता, पंखहीन जटायूचा आवेश वैशिष्ट्यपूर्ण आहे त्याच्या जखमेतून भळभळ वाहणाऱ्या रक्ताचा ताजेपणा अप्रतिम आहे त्याचप्रमाणे धनुर्धारी रामाच्या चित्रातील रामाचा आवेश वाखाणण्यासारखा

आहे शकुतला-पत्रलेखन या चित्रात ' इस खतमे क्या लिखू ' असा भाव शकुतलेच्या चेहेऱ्यावर दिसतो या चित्रावर ड्यूक ऑफ बकिंगहॅम हे खूपच फिदा झाले होते Lady in moonlight हे चित्रही असेच खूप सुदर आहे पौर्णिमेच्या चद्रकिरणानी तिचा चेहेरा उजळलेला दिसतो

रगमहाल दालनात कृष्णराज वाडियार यांची काढलेली चित्रे आहेत दुसऱ्या मजल्यावरील दालनात जुन्या सगीतवाद्याचा सग्रह आहे सगीत श्रेष्ठी खान अब्दुल करीमखाँ यांचे चित्रही आहे सर्व भितीवर पेंटिग आहे वरच्या मजल्यावरून परत तळमजल्यावरील प्रवेशद्वाराच्या दालनात आलो तेथे जपानी फर्निचर, तसेच पाश्चिमात्य फर्निचरचे उत्कृष्ट नमुने आहेत बुद्धिबळाचा उत्कृष्ट पटही आहे. या दालनाचे वैशिष्टच म्हणजे फ्रेंच बनावटीचे सगीत घड्याळ ! ( Musical Clock ) ठीक पाच वाजले होते या घड्याळातील टोल पडल्यावर एक सेकद स्तब्धता झाली घड्याळाच्या वरच्या बाजूला असलेल्या काचेच्या आतील छोटचा छोटचा सैनिकानी म्युझिक परेड करून एक वेढा मारला सुदर, मजुळ ध्वनी ऐकू आला. उल्का व उदय तर हे अनोखे घड्याळ पाहून भलतेच खूष झाले. व्हिक्टोरिया राणीने म्हैसूर महाराजाना हे घड्याळ वाढदिवशी भेट म्हणून दिले होते असेच दुसरे घड्याळ हैद्राबादच्या नबाबालाही दिले होते ते सध्या सालारजग म्युझियममध्ये आहे

जगमोहन पॅलेसची भेट आटोपून सयाजी रोडवरील कर्नाटक स्टेट्स आर्टस् एम्पोरियममध्ये आलो. कावेरी नावाने ते ओळखले जाते हस्तीदती, चदनी, रोझवुड इ च्या वस्तू, मूर्ती, ब्राँझ, पितळी मूर्ती यांनी हे एम्पोरियम सजले आहे. चदनी, रोझवुडच्या पेटचा खरेदी केल्या उल्का-उदय यांनीही आपल्या मित्रमैत्रिणीसाठी विविध वस्तू खरेदी केल्या.

खरेदी आटोपून लॉजवर आलो तेव्हा रात्र झाली होती. खिडकीतून पाहिले तर दूरवर दिव्यांनी उजळून निघालेली एक टेकडी दिसली हीच ती म्हैसूरची प्रसिद्ध चामुडी हिल होती मनोमन देवीला प्रणाम करून निद्राधीन झालो

म्हैसूरच्या वास्तव्यातील दुसरा दिवस ! पर्यटनखात्याच्या टूरिस्ट बसने सकाळी आठलाच निघालो सुरुवातीलाच जगमोहन पॅलेसला भेट होती आम्ही तो आदल्या दिवशीच नीट पाहिला होता तरी एक तासात परत पाहिला बस ठीक नऊ वाजता निघणार होती एक मिनीट जरी उशीर झाला तरी बस कोणासाठी थांबणार नाही अशी तंबी मिळाल्याने धास्तीने सर्व प्रवासी नऊच्या आधीच घाईघाईत येऊन बसमध्ये बसले त्यामुळे म्युझिकल क्लॉक या पॅलेसमध्ये आहे हेही कुणाला कळले नाही आम्ही मात्र नऊ वाजताची संगीत परेड पाहून आलो बस निघालीच होती इतर प्रवाशांना हे कळल्यावर सर्वजण बसमधील गाईडवर चिडले कारण त्याने लवकर येण्याच्या स्ट्रिक्ट सूचना दिल्या होत्या सर्व प्रवासी हळहळले पण उपयोग नव्हता बसमध्ये बहुसंख्य महाराष्ट्रीयनच असल्याने गप्पाटप्पा जोरात सुरू झाल्या

बस चामुंडी हिलकडे धावू लागली चामुंडी ही म्हैसूरच्या राजघराण्याची कुलस्वामिनी ! म्हैसूरपासून बारा कि मी. अंतरावरील ह्या टेकडीचा वळणाकार सुंदर रस्ता पार करीत बस आस्ते आस्ते टेकडीवर चढू लागली म्हैसूर शहराच्या आखीव, सुंदर दृश्याने मन प्रभावित होत होते टेकडी चढण्यास जसा मोटारीचा रस्ता आहे तशी १०००पायऱ्या असलेली पाऊलवाटही आहे

टेकडीवर पोहोचल्यावर प्रथम महिषासुर राक्षसाचा मोठा पुतळा आहे महिषासुर नावावरूनच म्हैसूर नाव पडले असावे मंदिराच्या प्रवेशद्वारावर दाक्षिणात्य पद्धतीच्या गोपुराचे प्रथम दर्शन झाले त्यावर भरगच्च नक्षीकाम आहे म्हैसूर राजघराण्याची कुलस्वामिनी असलेल्या चामुंडेश्वरी देवीचे दर्शन घेतले देवीची रत्नजडित मूर्ती सुंदर भासत होती

या टेकडीवरून म्हैसूर शहराचा रेखीवपणा नजरेत भरत होता तसेच प्रचंड राजवाडाही वरून छोटा वाटत होता बसमधून परतताना वाटेत एका मोठ्या नदीचे दर्शन झाले बसमधील प्रवासी केवढा हा नंदी! असे उद्‌गार काढीत होते पण तंजावर, हळेबीड येथील त्याहूनही मोठे व रेखीव नंदी पाहिलेले असल्याने आम्हाला मात्र त्या नंदीबद्दल आश्चर्य वाटले नाही टेकडीवरील पूर्वीच्या राजवाड्याचे आता ‘ राजेंद्रनिवास इम्पेरियल ’ या मोठ्या हॉटेलमध्ये रूपांतर केले आहे

परतताना वाटेत गाईडने दुरून ललितमहाल पॅलेस दाखवला पांढराशुभ्र लांबच्या लांब, मध्ये घुमटाकार कळस असलेला हा महाल[1] ब्रिटिश व्हॉईस-रॉयच्या वास्तव्यासाठी म्हैसूर महाराजानी तो बांधला होता सुमारे आठ वर्षांपूर्वी हा राजवाडा पाहिला होता तेव्हा पाहिलेले त्यातील स्नानगृहातील आतले मोठे मोठे संगमरवरी टबबाथ आठवत होते आता या पॅलेसचे भारतसरकारच्या पर्यटन खात्याने पचतारांकित हॉटेलमध्ये रूपांतर केले आहे

त्यानंतर आमचे भेट देण्याचे ठिकाण होते म्हैसूर–बंगलोर रस्त्यावरील सेंट फिलोमेना चर्च! १९३१ साली बांधलेल्या या चर्चचे गोथिक पद्धतीचे आगळे शिल्प लक्ष वेधून घेते या चर्चची दोन उच शिखरे १६५ फूट उंच असून चर्च १६८ फूट लांबीचे आहे या चर्चची पायाभरणी म्हैसूरच्या महाराजानी केली होती तळघरात मेरी व येशूख्रिस्त यांचे चिरनिद्रित अवस्थेतील पुतळे आहेत. येशूच्या पुतळ्यावर त्याच्या अंगावर खिळे ठोकल्याने पडलेले रक्ताचे डागही दाखवले आहेत

चर्च पाहून म्हैसूरचे प्रख्यात प्राणीसंग्रहालय पहायला आलो झू म्हटल्यावर उल्का–उदय उड्या मारीतच बसमधून उतरले. या प्राणीसंग्रहालयात १५०० च्या वर देशी-विदेशी प्राणी आहेत पांढरे कावळे पाहून मजा वाटली आफ्रिका ऑस्ट्रेलियातील सुंदर पक्षी तेथे आहेत वाघ सिंह यांचे छावे, पाणकुत्रे ( water dog ), विविध तऱ्हेची माकडे तेथे आहेत माणसाळलेला चिंपांझी तर लहान मुलासारखा खेळतो तेथील माळ्याने त्याच्याबरोबर विविध खेळ करून दाखवले.

## सोमनाथपूर मंदिर

प्राणीसंग्रहालय पाहिल्यावर भोजनाचा कार्यक्रम आटोपला बस आता सोमनाथपूरच्या दिशेने धावू लागली म्हैसूरहून ३६ कि मी अंतरावरील सोमनाथपूरला विष्णूचे केशवमंदिर प्रेक्षणीय आहे होयसाळ शिल्पकलेचा आणखी एक उत्कृष्ट नमुना पाहायचा होता हे मंदिर १२६८ मध्ये सोमनाथ उर्फ सोम या होयसाळ वंशातील राजपुरुषाने बांधले त्यावेळी नरसिंह होयसाळ (१२५४-९१) हा राज्य करीत होता

हे मदिर तीन फूट उचीच्या दगडी चबुतऱ्यावर आहे तीन उपमदिरे मिळून हे मदिर निर्माण करण्यात आले आहे त्यामुळे मंदिराला तीन शिखरे व तीन प्रेक्षणीय छत आहेत मदिराला तीन गर्भगृहे आहेत मदिरात काळोख आहे पण आता लाईटची व्यवस्था केली आहे मदिरात वेणूगोपाल, केशव व जनार्दन या तीन मूर्ती आहेत मदिरात पूजाअर्चा होत नाही, कारण मलीक काफूरने मदिरातील चन्नकेशवच्या मूळ मूर्तीचा विध्वस केला व मदिर लुटले सध्या तेथे चन्नकेशवाची सामान्य मूर्ती आहे वेणूगोपाल मूर्तीच्या ज्या दोन हातानी वेणू धरला होता ते हात तोडलेले पाहून विषाद वाटला तशी ही मूर्ती अत्यत देखणी आहे

मदिराच्या छतावर ६४ टागती दगडी कमळे आहेत हा शिल्पकामाचा आगळाच चमत्कार वाटला तसेच छतावर दशावतार अष्टदिक्पाल, केळीची फुले इ कोरली आहेत

मदिराच्या बाहेरच्या भितीवर पहिली राग हत्तीची आहे तर दुसरी अश्वाची । प्रत्येक हत्ती व अ अश्व वेगळा आहे तिसरी रांग सुदर नक्षी-कामाने भरगच्च आहे चौथ्या रांगेत रामायण-महाभारतातील प्रसग कोरलेले असून प्रसगाची समाप्ती मिटलेले पुस्तक कोरून केली आहे राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे चार भाऊ रांगताना कोरलेले पाहून मौज वाटली मारीच राक्षसाची गोष्ट, रावण सीतेला पळवतो, पूतनावध, कालियामर्दन, शभर कौरव, पाच पाडव, वनवासातील पाडव, भीम–बकासुर इ प्रसग साकार केले आहेत पाचवी रांग देवताची असून सहावी शार्दूलाची व सातवीही देवदेवताची आहे सातव्या रागेत काही कामचित्रे कोरली आहेत मदिराच्या आवारात ६४ उपमदिरे आहेत

अत्यत अल्पकाळात पूर्ण केलेले हे मदिर प्रगत होयसाळ शिल्पकलेची प्रचीती आणून देत होते

यानतर बसने आम्हाला नेऊन सोडले पक्ष्याचे आश्रयस्थान असलेल्या 'रंगनाथिट्टू' मध्ये। श्रीरगपट्टणच्या अलीकडे तीन मैलांवर ही पक्ष्याची वस्ती आहे. कावेरी नदीच्या नैसर्गिक बेटावर हे नितातसुदर स्थळ आहे. भारता-तीलच नव्हे तर पाश्चात्य देशातील पक्षीही येथे वास्तव्यासाठी येतात

मे महिन्याच्या अखेरीस पक्षी घरटी बांधतात. जून महिन्याच्या अखेरीपर्यंत घरट्यात पिले तयार होतात पक्ष्यांना हवे असलेले पानांचे, किड्यांचे खाद्य या काळात भरपूर उपलब्ध असल्याने हजारो पक्षी तेथे वास्तव्यासाठी येतात नोव्हेंबरच्या अखेरीस पक्षी आपल्या पिलासह उडून जातात पक्ष्यांची संख्या त्यांचे प्रकार हे ऋतुमानाप्रमाणे बदलते असतात ओपनबिल, स्टॉर्क. व्हाईट इबीज, डार्टर, स्पून बिल्स, पाँड, हेरॉन इ येथील प्रसिद्ध पक्षी । नदीच्या पात्रातून नावेतून चक्कर मारता मारता हे विविध, सुंदर पक्षी नैसर्गिक अवस्थेत बघता येतात सीझनमध्ये हजारो पाश्चात्य, भारतीय पक्षीप्रेमी या ठिकाणास भेट देतात गर्दीपासून अलिप्त, शांत अशा या ठिकाणी नावेतून मारलेली चक्कर अविस्मरणीय आहे

## टिपूचे श्रीरंगपट्टण

त्यानंतर म्हैसूरहून १५ कि मी अंतरावरील श्रीरंगपट्टणकडे बस धावू लागली येथे कावेरी नदीच्या दोन शाखा होतात व तीन मैलावर पुनः मिळतात श्रीरंगपट्टण हे या पात्रातले बेट !

श्रीरंगपट्टणचा तसा हजार अकराशे वर्षांपूर्वीचा इतिहास उपलब्ध आहे. या बेटाच्या पश्चिमेला गौतमऋषींनी तपश्चर्या केली होती श्रीरंगनाथ-देवाच्या वास्तव्यामुळे श्रीरंगपट्टण हे नाव पडले होयसाळ राजा विष्णुवर्धन याचा भाऊ उदयादित्य याने स्थापन केलेल्या या शहराचे मूळ नाव श्रीरंगपुरी होते होयसाळ, विजयनगर, म्हैसूर व इंग्रज यानी या शहरावर राज्य केले इ स १७९९ मध्ये श्रीरंगपट्टण इंग्रजांनी जिंकले

श्रीरंगपट्टण म्हटले की आठवतो प्रजेला अपत्यवत मानणारा, अधिकाऱ्यांशी उत्कृष्ट वर्तन करणारा व इंग्रजांशी लढता लढता देह ठेवणारा शूर टिपू सुलतान !

हैदर व फातिमाबेगम यांचा हा पुत्र । टिपू मस्तान अवलिया या संताच्या कृपेने १७५० मध्ये फातिमाबेगमने या पुत्राला जन्म दिला संताबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मुलाचे नाव टिपू ठेवण्यात आले हैदर स्वतः निरक्षर होता पण त्याने आपल्या पुत्राला उत्कृष्ट शिक्षण दिले १५ व्या

हे मंदिर तीन फूट उंचीच्या दगडी चबुतऱ्यावर आहे तीन उपमंदिरे मिळून हे मंदिर निर्माण करण्यात आले आहे त्यामुळे मंदिराला तीन शिखरे व तीन प्रेक्षणीय छत आहेत मंदिराला तीन गर्भगृहे आहेत मंदिरात काळोख आहे पण आता लाईटची व्यवस्था केली आहे मंदिरात वेणूगोपाल, केशव व जनार्दन या तीन मूर्ती आहेत मंदिरात पूजाअर्चा होत नाही, कारण मलीक काफूरने मंदिरातील चन्नकेशवच्या मूळ मूर्तीचा विध्वंस केला व मंदिर लुटले सध्या तेथे चन्नकेशवाची सामान्य मूर्ती आहे वेणूगोपाल मूर्तीच्या ज्या दोन हातानी वेणू धरला होता ते हात तोडलेले पाहून विषाद वाटला तशी ही मूर्ती अत्यंत देखणी आहे

मंदिराच्या छतावर ६४ टांगती दगडी कमळे आहेत हा शिल्पकामाचा आगळाच चमत्कार वाटला तसेच छतावर दशावतार अष्टदिक्पाल, केळीची फुले इ कोरली आहेत

मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर पहिली रांग हत्तींची आहे तर दुसरी अश्वाची ! प्रत्येक हत्ती व अ अश्व वेगळा आहे तिसरी रांग सुंदर नक्षी-कामाने भरगच्च आहे चौथ्या रांगेत रामायण-महाभारतातील प्रसंग कोरलेले असून प्रसंगाची समाप्ती मिटलेले पुस्तक कोरून केली आहे राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे चार भाऊ रांगताना कोरलेले पाहून मौज वाटली मारीच राक्षसाची गोष्ट, रावण सीतेला पळवतो, पूतनावध, कालियामर्दन, शंभर कौरव, पाच पांडव, वनवासातील पांडव, भीम–बकासुर इ प्रसंग साकार केले आहेत पाचवी रांग देवतांची असून सहावी शार्दूलाची व सातवीही देवदेवतांची आहे. सातव्या रांगेत काही कामचित्रे कोरली आहेत मंदिराच्या आवारात ६४ उपमंदिरे आहेत

अत्यंत अल्पकाळात पूर्ण केलेले हे मंदिर प्रगत होयसाळ शिल्पकलेची प्रचीती आणून देत होते

यानंतर बसने आम्हाला नेऊन सोडले पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेल्या 'रंगनाथिट्टू' मध्ये ! श्रीरंगपट्टणच्या अलीकडे तीन मैलांवर ही पक्ष्यांची वस्ती आहे. कावेरी नदीच्या नैसर्गिक बेटावर हे नितांतसुंदर स्थळ आहे. भारता-तीलच नव्हे तर पाश्चात्य देशातील पक्षीही येथे वास्तव्यासाठी येतात

वर्षापासूनच तो आपल्या वडिलांबरोबर लढाईला जात असे लढाईचे शिक्षण मिळावे, इंग्रजांचे युद्धतंत्र कळावे, हा त्यामागे हेतु होता प्रत्यक्ष लढाईवर जाण्यामुळे टिपू लवकरच एक निष्णात योद्धा बनला १७८२ ला हैदर वयाच्या ६० व्या वर्षी श्रीरंगपट्टण येथे मरण पावला पण राज्यात बडाळी माजू नये म्हणून ही बातमी गुप्तपणे टिपूला कळविण्यात आली टिपूने लालबाग येथे पित्याचे दफन केले.

बस लालबाग येथील गुंबज या टिपू व त्याचे माता पिता यांच्या कबरीच्या आवाराबाहेर थांबली टिपूने आपल्या मात्यापित्यांची ही मोठी कबर १७८४ मध्ये बांधली कावेरी नदीच्या दोन शाखांचा संगम जेथे होतो त्याजवळ ही कबर आहे ही कबर ज्या जागेवर बांधली तेथे पूर्वी लालबाग नावाचा बगीचा होता तेथील प्रशस्त आवारात गुलाबपुष्पे व आंब्याची झाडे इ ची रेलचेल होती हैदरअलीला ही जागा फार प्रिय होती म्हणून टिपूने पित्याचे व मातेचेही येथे दफन केले ४ मे १७९९ ला ब्रिटिशांशी झालेल्या घनघोर युद्धात टिपूला वीरमरण आले ब्रिटीशांनी त्याचे मृत शरीर युद्धभूमीवरून मोठ्या मानसन्मानाने, मिरवणुकीने आणून त्याच्या मात्यापित्याशेजारीच त्याचे दफन केले

कबर पाहण्यासाठी प्रथम तिकीट काढले प्रशस्त हिरवळीमधून आत गेल्यावर एक चौरस इमारत लागते प्रवेशद्वारावर उर्दूत लिहिले आहे आतमध्ये टिपू व त्याच्या मात्यापित्यांच्या कबरी आहेत हैदरअली व फातिमा बेगम याच्या कबरीवर तांबडे आच्छादन आहे आतील भिंतीवर वाघासारखी चित्रे आहेत कारण टिपू हा 'म्हैसूर टायगर' म्हणून ओळखला जातो.

इमारतीच्या बाहेरच्या बाजूला टिपूची मुलगी, पुतणी, बहीण व जावई यांच्याही कबरी आहेत मुख्य कबरीला हस्तीदंती नक्षीकाम केलेले तीन दरवाजे तीन बाजूला आहेत. जाळीदार नाजूक खिडक्या सुंदर आहेत एका बाजूला काळ्या संगमरवराची चकचकीत जाळीची खिडकी आहे. कबरीच्या भोवती ३६ काळे संगमरवरी, चकचकीत स्तंभ असून ते अतिशय गुळगुळीत आहेत. हा दगड खास पर्शियाहून आणण्यात आला या स्तंभाचे पॉलीश आरशासारखे चकचकीत आहे. दर दोन आठवड्यांनी विशिष्ट प्रकारच्या

तेलाने पॉलीश करून त्याची निगा राखली जाते अशी माहिती मिळाली या कबरीवर मुसलमान शैलीचा घुमट आहे

सभोवतीचे प्रशस्त आवार, हिरवळ यामुळे वातावरण प्रसन्न होते. इंग्रजांशी झुंज देणाऱ्या शूर टिपूला मनोमन प्रणाम करून या कबरीचा निरोप घेतला

त्यानंतर बसने आणून पोहोचवले दर्यादौलत या टिपूच्या खास उन्हाळ्यातील वास्तव्यासाठी बांधलेल्या महालाकडे। कावेरी नदीच्या तीरावरचा, सुंदर बगीचा सभोवती असलेला हा महाल टिपूने १७८४ मध्ये इंग्रजांवर म्हैसूरच्या दुसऱ्या लढाईत मिळवलेल्या विजयाप्रीत्यर्थ बांधला दर्यादौलत म्हणजे सागरातील संपत्ती।

हा महाल लाकडाचा बांधलेला आहे खांब, कमानी, गॅलरी, सर्व बांधकाम लाकडाचे आहे महालाचा तळापासून वरपर्यंत, सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रत्येक इंच भारी रंगकामाने सजलेला आहे पहिल्या मजल्यावर टिपू दरबार भरवीत असे आता तेथे पुराणवस्तुसंशोधन खात्याचे म्युझियम आहे टिपूच्या मृत्यूनंतर ऑर्थर वेलस्ली याने तेथे बराच काळ वास्तव्य केले १८८३ मध्ये चामराज वाडियार यांनी या महालाला नवे स्वरूप दिले

महालाच्या पश्चिम भिंतीवर युद्धविषयक भव्य चित्रे आहेत इंग्रजांबरोबर युद्ध सुरू होण्यापूर्वी टिपू व हैदर युद्धभूमीकडे कूच करतानाचे भव्य चित्र लक्ष वेधून घेते टिपू सुलतान पांढऱ्या शुभ्र घोड्यावर बसला आहे, त्याच्यामागे त्याचे वजीर, मंत्री घोड्यावर आहेत फ्रेंच सेनापथकही पुढे कूच करीत आहे. वरच्या बाजूला हैदरअली त्याच्या दिवाणाबरोबर जाताना दाखवला आहे हैदरअली हत्तीवर बसला आहे खरोखर हे भव्य चित्र साक्षात युद्धप्रसंग डोळ्यासमोर उभा करते

भिंतीच्या दुसऱ्या बाजूला म्हैसूरच्या दुसऱ्या युद्धाचे भव्य चित्र आहे. टिपू व इंग्रज यांच्यात हे युद्ध कांचीवरमजवळ झाले या युद्धात टिपूचा विजय झाला कर्नल बेली पराभूत झाला व त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली. या चित्रात इंग्रजांच्या सैन्याला टिपूच्या सैन्याने वेढा दिलेला दिसतो.

फ्रेंच सैन्याच्या मदतीने टिपूने इग्रजाचा पराभव केला व अनेक इग्रज सैनिकाना श्रीरगपट्टणच्या किल्ल्यात बदिस्त करून ठेवले चित्राच्या वरच्या बाजूला घोड्यावर बसलेला हैद्राबादचा निजाम आहे वास्तविक तो इग्रजांना मदत करण्यास आला होता पण इग्रजांच्या पराभवाची बातमी ऐकून तो आपल्या राजधानीकडे पळ काढताना दिसतो पूर्वेकडच्या भितीवर टिपूला इग्रजांविरुद्धच्या लढ्यात मदत करणाऱ्या दक्षिणेकडच्या राजाची चित्रे आहेत श्री कृष्णराज वाडियार (१९२५-२६) याच्या काळात सर्व चित्रे, नक्षीकाम याना पुन नव्याने रग देण्यात आला.

गुबज व दर्यादौलत ही स्थळे पाहिल्यावर श्रीरगपट्टणच्या ऐतिहासिक किल्ल्यात प्रवेश केला तेव्हा टिपूचा शौर्यशाली इतिहास आठवून रोमांचित झालो

सुरुवातीला दोन उच मिनार असलेली जुम्मा मशीद दिसते ही मशीद टिपूने बाधली टिपू प्रत्येक शुक्रवारी तेथे प्रार्थनेसाठी येत असे व हातात चादीची काठी घेऊन प्रार्थनेसाठी जमलेल्या जमावापुढे भाषण करीत असे. ही चादीची काठी आजही जतन करून ठेवली आहे. या मशिदीच्या जागी पूर्वी हिंदूचे हनुमान मदिर होते मशिदीच्या उच मिनारावरून श्रीरगपट्टणचे विहगम दृश्य दिसते मशिदीच्या आवाराचे स्तभ हिंदू शिल्पशैलीचे वाटतात. या मशिदीत टिपूने खालील अर्थाचे वाक्य कोरले आहे

'आकाशाला ज्याप्रमाणे चद्र महत्त्वाचा त्याप्रमाणे श्रीरगपट्टण राजधानीला ही मशीद महत्त्वाची आहे'

किल्ल्यातील ब्रिटिशांना क्लेशदायी वाटणारी वास्तू म्हणजे कर्नल बेलीची कोठडी ! या तळघरात टिपूने ब्रिटिश सैन्यातील काही अधिकारी म्हैसूर युद्धानतर चार वर्षे कैदेत ठेवले होते.

किल्ल्यातील श्रीरगनाथस्वामीचे मदिर पाहण्यास भव्य गोपुरातून जावे लागते पूर्वी गौतमऋषी येथे रगनाथस्वामीची प्रार्थना करीत असत मूळ मदिर नवव्या शतकात गगाराजांनी बांधले बाराव्या शतकात या मदिराला रामानुजम यांनी वैष्णवपथीय मदिराचे रूप दिले मदिरदर्शनासाठी तिकीट

होने ते काढण्यास रांगेत उभे राहिलो शेजारचा महाराष्ट्रीयन प्रवासी बाग्रकोला म्हणाला, काय बुवा, थडगे पहायलाही तिकीट आणि मंदिर पाहायलाही तिकीट !'

गाभाऱ्यात भगवान विष्णूची शेषशायी मूर्ती आहे मूर्तीच्या मस्तकावर पाच फणे असलेला आदिशेष आहे तर पायाजवळ कावेरीदेवी व गौतममहर्षी याच्या मूर्ती आहेत या मंदिरातील देवदेवतांसाठी हैदरअली, टिपू, म्हैसूर महाराजा यानी बहुमोल नजराणे भेट दिले होते देवीच्या नाकातील रत्न पूर्वी लिंबाच्या आकाराचे होते टिपूला जेव्हा इंग्रजाना तहातील भरपाईसाठी पैसे कमी पडले त्यावेळी या मंदिरातील काही बहुमोल दागदागिन्याचा उपयोग करण्यात आला

श्रीरंगपट्टणच्या किल्ल्याचा फेरफटका संपत आला असता बस एका दगडी शिळेजवळ थांबली त्यावर खालील वाक्य कोरले आहे

THE BODY OF TIPPU SULTAN WAS FOUND HERE

या अक्षरावर चांदतारा कोरला आहे यावेळी लढता लढता टिपू मरण पावल्यावर ब्रिटीश कर्नलने काढलेले उद्गार आठवले

'He fought like Tiger'

खरे शत्रू इंग्रज आहेत हे ओळखून त्याच्याविरुद्ध एकाकी लढणाऱ्या टिपूच्या पराक्रमाच्या स्मृती मनात घोळवत श्रीरंगपट्टण किल्ल्याचा निरोप घेतला टिपूला मराठे, निजाम यानी योग्य वेळी साथ दिली असती तर इंग्रजाचे पाय भारतात रोवले गेले नसते असा विचार मनात येऊन गेला

## मोहून टाकणारा वृंदावन बगीचा

अंधार पडायला सुरुवात झाली म्हैसूर दर्शनातील शेवटचे ठिकाण होते वृंदावन बगीचा ! बस कृष्णराज सागर धरणाच्या दिशेने धावू लागली होती.

कावेरी नदीवर या ठिकाणी धरण बांधण्याची मूळ कल्पना टिपू सुलतानची ! त्याप्रमाणे त्याने फर्मान काढून १७९४ मध्ये धरणाचे थोडेफार बांधकाम केले. जागतिक कीर्तीचे इंजिनीयर सर विश्वेश्वरय्या याच्या

कारकीर्दीत १९३२ साली हे धरण पूर्ण झाले धरणासाठी अडीच कोटी रुपये खर्च झाले. या दगडी धरणाची लांबी सुमारे तीन किलोमीटर असून उंची चाळीस मीटर आहे धरणाच्या भिंतीमागे १२८ चौ कि मी क्षेत्राचा विशाल जलाशय आहे या धरणाने म्हैसूर संस्थानच्या प्रगतीचा पाया रोवला

धरणाच्या भिंतीवरील प्रवेशद्वारावर आकर्षक कमान आहे त्यातून बस आत शिरल्यावर जलाशयाचे सुंदर दृश्य दिसू लागले धरणाच्या भिंतीवरून वळल्यावर बस खाली पायथ्याजवळील रस्त्याजवळ आली आणि वृंदावन बगीच्याच्या अलौकिक दृश्याने आनंदित झालो

या धरणाच्या पायथ्याशी बगीचा उभारण्याची कल्पना म्हैसूरचे दिवाण मिर्झा इस्माईल यांची टप्प्याटप्प्यांची ही बाग रंगीबेरंगी फुलांनी जशी बहरलेली आहे तशीच अनेक कारंज्यांची खैरात तेथे आहे एवढ्यात सात वाजले व एकदम शेकडो रंगीबेरंगी दिवे प्रकाशमान झाले पृथ्वीवर जणू स्वर्ग अवतरल्याचा भास झाला त्या अनुपम दृश्यामुळे मुलांच्या हर्षाला सीमा राहिली नाही

बगीच्याच्या सर्वात वरच्या टप्प्यावर कृष्णराजसागर हे आलिशान हॉटेल आहे त्यानंतर बगीच्याचे दृश्य पाहण्यासाठी पॅव्हेलियन आहे तेथे उभे राहून सरळ रेखीव टप्प्यातील बगीच्याचे दृश्य देहभान हरपून टाकते पहिल्या टप्प्यातून पाणी धबधब्यासारखे पडते लाल, हिरवे प्रकाशझोत सोडल्याने नेत्राचे पारणे फिटत होते राधाकृष्णाची मोहक मूर्तीही तेथे होती

टप्प्याटप्प्याने उतरताना दिसत होती प्रकाशझोत टाकल्याने उजळून निघालेली सुंदर फुले, रंगीबेरंगी दिव्यामुळे रंगीबेरंगी पाण्याचे फवारे उंच उडवणारी कारंजी, आकर्षकरीत्या कापलेली झाडे, सुंदर हिरवळ! रंगाच्या दुनियेच्या सौंदर्याचा आस्वाद घेत घेत धरणाच्या पायथ्याजवळ भिंतीच्या कडेकडेने जाणाऱ्या छोट्या रस्त्याजवळ आलो त्या विशाल दगडी भिंतीच्या पलीकडे कावेरीमातेला अडवून प्रचंड जलाशय निर्माण



Lady with the lamp

चित्रकार-श्री. हळदणकर, मुंबई

जगमोहन आर्ट गॅलरी, म्हैसूर



X-mas Tree लालबाग, बंगलोर

विवेकानंद शिला स्मारक व सोळाखांबी मंडपाच्या पार्श्वभूमीवर
मागे-सौ मेधा, श्री चंद्रकांत उर्फ यशवंत. पुढे-उल्का, उदय



केला आहे ही कल्पनाच रोमांचित करीत होती भिंतीच्या कडेकडेने बगीच्याच्या दुसऱ्या भागात पोहोचलो बगीच्याचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग असून मध्ये धरणातून सोडलेले पाणी नदीच्या पात्रातून वहाते एक कमी उंचीची भिंत घालून तेथेही पाणी अडवले आहे व त्यात बोटींगची सोय केली आहे

बगीच्याच्या दुसऱ्या भागातही टप्पे असून सर्वांत वरच्या टप्प्यावरील पॅव्हेलियनमध्ये पोहोचलो तेथून थेट दूरवरचे बगीच्याचे अलौकिक दृश्य दिसत होते खूप उंच उडणारे कारंजे मुलांना आनंदित करीत होते

मुलांचा बोटीत बसायचा लकडा सुरू झाला मोटर-बोटचे तिकीट काढून फेरफटका मारताना मौज वाटली बोटीतून उतरून परत मोठ्या बगीच्यात आलो. शेकडो प्रवाशांनी बाग फुलली होती

या बगीच्यातील कारंजाच्या पार्श्वभूमीवर शूटींग केलेल्या ' झनक झनक पायल बाजे ' सिनेमातील गाण्याचे दृश्य नजरे समोर तरळू लागले

एवढ्यात बसचा कर्कश हॉर्न कानावर आला आणि भानावर आलो म्हैसूरला परतायचे होते मोठ्या अनिच्छेने वृंदावन बगीच्याचा निरोप घेतला व बसमध्ये बसलो रात्रीचे नऊ वाजले तेव्हा बसने म्हैसूरच्या लॉजजवळ आणून सोडले नेत्रासमोर तरीही तरळत होती सुंदर फुले, आकर्षक कारंजी आणि रंगाची अपूर्व उधळण !

□

# बंगलोर-गार्डन सिटी ऑफ इंडिया

चामुंडी एक्स्प्रेसने सकाळी सातला म्हैसूर स्टेशन सोडले दहाच्या सुमारास कर्नाटकच्या राजधानीत–बंगलोरमध्ये–गाडीने प्रवेश केला

मॅजेस्टिक सर्कल हा बंगलोर शहराचा मध्यवर्ती भाग ! उत्तम बाजारपेठ, मोठमोठ्या बँका, सिनेमागृहे, कचेऱ्या इ च्या भव्य इमारती जशा तेथे आहेत तशीच अनेक लॉजेस त्याच भागात आहेत स्टेशनहून केवळ अर्धा कि. मी अंतरावर असलेल्या सर्कलमधील लॉजमध्ये रिक्षाने पोहोचलो सकाळचे जेवण आटोपून प्रथम बँकेतून राहिलेले ट्रॅव्हलर चेक वटवून घेतले नंतर दुपारी तीन वाजेपर्यंत विश्राती घेऊन बंगलोर दर्शनासाठी मोठ्या उत्साहाने बाहेर पडलो. वास्तविक प्रवासाचा हा शेवटचा दिवस होता तरी उत्साह कमी झाला नव्हता

विजयनगर साम्राज्याचा सेनापती केंपगोडा हा या नगरीचा आद्य शिल्पकार ! केवळ चार शतकापूर्वी १५३७ मध्ये त्याने येथे प्रथम चुनामाती यापासून किल्ला बांधला व हे शहर वसवले काही दिवस विजापूर सुलतानचे या शहरावर अधिपत्य होते. त्यानंतर मराठा साम्राज्याखाली हे शहर होते. म्हैसूरचे वाडियार, हैदरअल्ली व टिपू यांची राजवट पाहिल्यावर १७९१ मध्ये इंग्रजांची राजवट या शहरावर सुरू झाली कृष्णराज वाडियार या राजघराण्यावर त्यांनी येथील राज्यकारभार सोपवला

रिक्षा करून बंगलोर दर्शनाला निघाल्यावर प्रशस्त रस्ते, बाजूला हिरवेगार वृक्ष, सुंदर इमारती, विशाल चौक यामुळे प्रथमदर्शनीच बंगलोर शहरावर आषक झालो. प्रथम रिक्षाने पोहोचवले कबन पार्कजवळ !

सर मार्क कबन या ब्रिटिश कमिशनरच्या नावाने बंगलोरचा हा प्रख्यात ३०० एकर क्षेत्राचा भाग ओळखला जातो सुंदर, रेखीव, स्वच्छ रस्ते, गर्द वृक्षराजी, मोहक हिरवळ, बहरलेली फुले, उंच उंच उडणारी कारंजी यानी कबनपार्क सजला आहे कबनपार्क पाहून बंगलोरला Garden city of India का म्हणतात ते पटले

बंगलोरच्या सरकारी म्युझियमची इमारत कबनपार्कमध्येच आहे या भव्य म्युझियमची स्थापना १०० वर्षांपूर्वी झाली हे म्युझियम दुमजली आहे. प्रथम वरच्या मजल्यापासून सुरुवात केली वरच्या एका दालनात वन्य पशु-पक्षी पेंढा भरून ठेवले आहेत त्यानंतरच्या एका वैशिष्टयपूर्ण दालनात लाकडाचे विविध नमुने आहेत विविध लाकडाच्या तक्त्यात कोरलेला सूर्योदयाचा देखावा प्रेक्षणीय होता दुसऱ्या दालनात समुद्रात आढळणाऱ्या विविध शंख, शिंपले, प्रवाळ इ चा संग्रह केलेला आहे

तळमजल्यावर श्रीरंगपट्टण किल्ल्याचे मॉडेल आहे ते पाहून तत्कालीन दृश्य नजरेसमोर उभे राहिले रोझवुडचे, तसेच हस्तीदंती काम केलेले ड्रेसिंग टेबल सुंदर आहे संगीतवाद्याच्या संग्रहात मोराच्या आकाराची वीणा आकर्षक आहे चंदनी लाकडात कोरलेले शिवतांडवनृत्य ही एक खास चीज आहे त्या दृश्यात शिव-पार्वती नृत्य करताना व गणेशही डमरू वाजवून नृत्य करताना दिसतो मुनी, शंख, तुतारी वाजवताना दिसतात. पायथ्याशी सिंह, सर्प असून झाडावर पशुपक्षी आहेत. हा नृत्य देखावा अगदी जिवंत वाटतो

एका दालनात होयसाळाकालीन ( इ स १००० ते १३ वे शतक ) उत्कृष्ट शिल्पकृतीचे नमुने आढळतात एका दालनात जुन्या शस्त्रास्त्राचा संग्रह आहे

या म्युझियमच्या मागे वेंकटप्पा आर्ट गॅलरी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नव्या इमारतीत आर्ट गॅलरी आहे के. वेंकटप्पा या प्रख्यात

चित्रकाराचा जन्म म्हैसूरला १८८७ मध्ये झाला ललितकला ॲकॅडमीचे ते सदस्य होते. १९६५ मध्ये त्याचा मृत्यू बगलोरमध्ये झाला त्याच्या अनेक सुदर निसर्गचित्राचा सग्रह् तेथे आहे. त्यातील उटीची व कोडाईकॅनॉलची निसर्ग चित्रे तर अप्रतिम आहेत उटीचा सूर्योदय, उटीचे तलावातील प्रतिबिब ही चित्रे सुदर आहेत सासरी निघालेली शकुतला, एकलव्य या चित्रातील व्यक्तींच्या चेहेऱ्यावरचे भाव लक्षणीय आहेत शिवतांडवनृत्य या चित्रात नृत्याचा उन्मेष हुबेहूब चित्रित केला आहे

के वेंकटप्पा यांनी ज्यांच्या सहाय्याने चित्रे काढली ते विविध ब्रश, रग, ते वापरीत असलेली काठी, त्यांचा चष्मा त्यांची वीणा इ वस्तू जतन करून ठेवल्या आहेत त्यांचा पुतळाही तेथे आहे.

या आर्ट गॅलरीच्या वरच्या मजल्यावरील दालन मेजर सी पी राजाराम याच्या नावाने ओळखले जाते त्याचा जन्म १९२७ मध्ये झाला व मृत्यू १९६१ साली लडाख येथे झाला मेजर राजाराम यांचे निसर्गातील विविध आकारात आढळणाऱ्या लाकडावर निरतिशय प्रेम ! विविध आकारात आढळणाऱ्या लाकडांच्या नमुन्यात दररोजच्या जीवनातील प्रसग, नाट्य, सघर्षभावना, यांचे जणू दर्शन व्हायचे एक लाकडाचा छोटा ओडका–त्यात राजाराम याना प्रेमिक चुबन घेतात असा भास झाला त्यातून निर्माण केले The Kiss हे सुदर लाकडी चित्र ! एका लाकडाच्या तुकड्यात त्यांना वात्सल्य-प्रेमाचे दर्शन घडले त्याला त्यांनी नाव दिले Mother and Child ! आणखी एका लाकडात त्यांना दिसली स्वप्नाळू स्त्री ! त्याला नाव दिले. Woman and Dream खरोखर निर्जीव लाकडी तुकड्यात राजाराम याना जीवन काव्यच गवसले आहे

या दालनात इतरही कलाकाराची विविध चित्रे आहेत त्यातले लोणी खाणारा कृष्ण, शबरी, वसतऋतु, प. नेहरू, चामुडी हिलवरून रात्रीचे म्हैसूर इ चित्रे उल्लेखनीय आहेत

## वैशिष्ट्यपूर्ण म्युझियम

बगलोरच्या गव्हर्नमेंट म्युझियमच्या शेजारी विश्वेश्वरय्या इडस्ट्रियल ॲड टेक्नॉलॉजिकल म्युझियमची इमारत आहे विश्वविख्यात इजिनियर

श्री विश्वेश्वरय्या यांच्या १९६० मधील जन्मशताब्दी सोहळ्यामध्ये हे म्युझियम स्थापन करण्याचे ठरवले गेले १९६५ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हस्ते या वैशिष्ट्यपूर्ण म्युझियमचे उद्‌घाटन झाले.

तळमजल्यावर Motive Power Gallery आहे वारा, पाणी, वाफ यापासून औष्णिक विद्युत् कशी निर्माण होते याची मॉडेल्स तेथे आहेत डावीकडील दालनात पेट्रोल, डिझेल यांच्यावर चालणारी इंजिने एअरक्राफ्ट इंजिने व विमानाचे मॉडेल आहे

पहिल्या मजल्यावर Electronic Gallery आहे त्यात विविध विद्युत् उपकरणे आहेत चुंबकीय तत्त्वाचा उपयोग कसा केला जातो, विद्युत् शक्ती कशी मोजतात, टेलिफोनचे काम कसे चालते याचे प्रात्यक्षिकच तेथे पहायला मिळते तेथील बटणे दाबून त्या त्या उपकरणांची प्रत्यक्ष कार्यपद्धती बघता येते उल्का-उदय बटणे दाबून त्याप्रमाणे चालू होणारी यंत्रे पहाण्यात गुंग होऊन गेले टेलिव्हिजनचे काम कसे चालते हेही पहायला मिळाले उल्का-उदय टी. व्ही च्या पडद्यावर गाणे म्हणताना पाहून मौज वाटली

दुसऱ्या मजल्यावर Timber and Paper Gallery आहे लाकडाचे विविध नमुने, लाकडापासून केलेल्या रंग, वस्त्र, लोकर, सिल्क इ विविध वस्तूंचे नमुने तेथे आहेत लाकडाला वाळवी लागून त्याचा कसा नाश होतो त्याची चित्रे आहेत प्लायवुड कसे तयार करतात याची माहिती आहे लाकूडकामासाठी लागणाऱ्या हत्याराचे प्रात्यक्षिक तेथे दाखवले जाते. ‘Oh People! destroy me not but utilize me best, find proper,’ हा संदेश ही गॅलरी देते

तिसऱ्या मजल्यावर Popular Science Gallery आहे त्यात जंतर-मंतर या जुन्या वेधशाळेचे मॉडेल आहे. प्राचीन काळातील वेळ मोजण्याची वाळूच्या घड्याळासारखी उपकरणे तेथे आहेत डोळा कसा काम करतो ही माहिती आहे गॅमा, एक्सरे, अल्ट्राव्हायोलेट या विविध किरणांची माहिती मिळते कॉम्प्युटरचे कामकाज, सिनेमाच्या फिल्म कशा तयार करतात, मायक्रोफोनचे नमुने इ. खूप उपयुक्त माहिती तेथे आहे

खरोखर अगदी वेगळे, वैशिष्टयपूर्ण असे हे म्युझियम पाहून खूप समाधान वाटले मुलेही खूष झाली या म्युझियमला त्याच्या स्थापनेपासून ५५ लाख लोकानी भेट दिली यावरून त्याची लोकप्रियता व श्रेष्ठता ध्यानात येईल

## आधुनिक वास्तुशिल्प–विधानसौध

कबन पार्कची भेट विधानसौध या विधीमंडळाच्या नव्या वास्तूच्या भेटीने सपणार होती हायकोर्टाच्या समोर असणारी ही चार मजली सुदर आधुनिक वास्तू द्राविडीयन शिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे २५ कोटी रु खर्चून ग्रानाईट दगडात बाधलेल्या या इमारतीच्या चबुतऱ्याचे क्षेत्र सुमारे पाच लाख चौरसफूट एवढे विशाल आहे विधानसौधची दक्षिणोत्तर लाबी ७०० फूट व पूर्व–पश्चिम रुदी ३५० फूट आहे. विधानसौधच्या मागील बाजूला तेथील मार्शल यांचे कार्यालय आहे त्याच्याकडून ही इमारत आतून पहाण्यासाठी परवानगी मिळवली पोर्चसमोरील लांबच्यालाब ४५ पायऱ्या चढून वर आलो विधानसौध बघण्यास देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लोकाची रीघ लागली होती लोकानी शेंगा, सत्री खाऊन त्याची टरफले, साली तेथेच टाकून केलेली अतोनात घाण पाहून मात्र मनस्वी चीड आली या सुदर इमारतीच्या प्रवेशद्वाराशी कमालीची अस्वच्छता होती मनात विचार आला की शेंगावाले, फळविके यांना येथे विक्रीसाठी येण्यास बदी करायला हवी

प्रवेशद्वाराबाहेरच्या चबुतऱ्यावर उच उच आकर्षक १४ नक्षीदार स्तभ लक्ष वेधून घेतात इमारतीच्या चार कोपऱ्यात चार कळस आहेत मध्ये मोठा मोगल धर्तीचा घुमट असून त्यावर अशोकस्तभाच्या आकारात कळस आहे घुमटाखाली आत आठ खाबावर आधारित गोलाकार बाल्कनी असून छतावर रगीबेरगी नक्षीकाम आहे इमारतीत प्रवेश केल्यावर वरचे मजले कमळाच्या पाकळयाप्रमाणे उमलताना दिसतात

आतील कार्यालयांची वेळ सपल्यावर साडेसहा वाजता सर्वांना आत प्रवेश मिळाला दुसऱ्या मजल्यावर मत्र्यांचे कार्यालय आहे तसेच सेक्रेटरीएट आहे असेंब्ली हॉल खूप भव्य आहे भितीवर आजी–माजी राष्ट्रपतीचे

फोटो आहेत सभापतीचे आसन कलापूर्ण आहे त्यावरील गोलाकार छतावर राष्ट्रचिन्ह आहे बाजूला मुख्यमंत्री व इतर मंत्र्यासाठी आसने आहेत. आमदारासाठी ३५० सीट्स असून प्रत्येक दोघात एक फोन आहे फर्निचर उत्तम आहे वरील मजल्यावर व्हिजीटर्स गॅलरी असून तेथे ७०० सीट्स आहेत तसेच प्रेस गॅलरी स्पीकर गॅलरी पण आहे विधान सौधचा चंदनी दरवाजा कलापूर्ण आहे

लोकसभेचे अधिवेशन जर दक्षिणेत भरवण्याची पाळी आली तर खासदारांना पुरेसे सभागृह असावे या हेतुने दिल्लीतील पार्लमेंटहाऊसप्रमाणे हा भव्य असेंब्ली हॉल बांधण्यात आला ह्या आधुनिक इमारतीने बंगलोर शहराच्या आकर्षकतेत भरच घातली आहे आजूबाजूचा परिसरही सुंदर, शांत व झाडांनी सुशोभित केलेला आहे स्वातंत्र्योत्तर काळात बांधलेली ही वास्तु भव्य व दर्शनीय आहे

दुसऱ्या दिवसाची सुरुवात प्रसिद्ध नंदीमंदिराच्या (Bull Temple) भेटीने सुरु झाली बुलटेंपलरोडने टेकडीच्या पायथ्याशी बसवनगुडी म्हणजे नंदीची टेकडी येथे आलो टेकडीखाली गणेशमंदिर आहे गणेशमूर्ती विशाल, काळ्या दगडात कोरलेली आहे विशेष म्हणजे मूर्तीची रुंदी जास्त आहे पायऱ्या चढून टेकडीवर गेल्यावर प्रथम एक दगडी स्तंभ दिसतो नंतर एक मंदिर लागते तेथील मंडपात काळ्या दगडाचा विशाल नंदी आहे आतापर्यंत खूप नंदी पाहिले होते त्याच्यामानाने हा नंदी तेवढा रेखीव वाटला नाही

जवळच शिवमंदिर आहे. या मंदिराच्या आवारात अखंड दगडातील एक त्रिशूल, दोन छत्र व एक डमरु आहे प्रत्येकाची उंची १५ फूट इतकी भव्य आहे

आजूबाजूचे रमणीय दृश्य पहात टेकडी उतरलो व टिपूच्या राजवाड्याकडे निघालो

टिपूचा राजवाडा दुमजली असून त्याला लाकडी खांब आहेत. हैदरअलीने या राजवाड्याचे बांधकाम १७८१ मध्ये सुरु केले. व टिपूने १७९१ मध्ये

पूर्ण केले राजवाड्याच्या भिंतीवर व छतावर पेंटिंग आहे हा राजवाडा श्रीरंगपट्टण येथील दर्यादौलत महालाच्या धर्तीप्रमाणे आहे त्यात साठ टक्के लाकूड वापरले आहे राजवाड्यात दोन हॉल असून त्याना मध्ये जोडणारा पॅसेज आहे चार जिने आहेत शेजारी श्रीनिवासमंदिर आहे टिपू नेहमी हिंदू मंदिराजवळ राजवाडा बाधीत असे असे तेथील गाईड म्हणाला

बंगलोर भेटीबरोबर दक्षिणभारत भेटही लालबागच्या दर्शनाने संपणार होती २४० एकर क्षेत्र असलेल्या या बागेची सुरुवात १७६० मध्ये हैदरअलीने शाही उपयोगासाठी केली नंतर शंभर वर्षांनी इंग्रजांच्या काळात त्याचे बोटॅनिकल गार्डनमध्ये रूपांतर करण्यात आले आतील प्रख्यात ग्लास हाऊस (काच घर) व मुख्य दरवाजा इंग्रज अधिकारी कॅम्पेन याने बांधला दिवाण मिर्झा इस्माईल, कृष्णराज वाडियार यांनी बगीचाचा विस्तार केला, बगीच्यात विस्तृत हिरवळ, उंच झाडे असून सुंदर फुलांनी तो बहरलेला होता रोझगार्डनमध्ये तर विविध रंगी गुलाब होते तेथील चौकोनी हौदात सुंदर कारंजी आहेत.

म्हैसूरच्या चामराज वाडियार महाराजाचा घोड्यावर बसलेला पुतळा बागेत आहे. घोड्याच्या अंगावरील शाल हुबेहूब कोरली आहे शेजारी छोटे अक्वेरियम आहे. तेथे काळे, केसरी, नक्षीदार, सोनेरी मासे, कॅटफिश, एंजलफिश इ. मासे आहेत

प्रशस्त हिरवळ, मोठमोठी झाडे पार करून लालबागमधील प्रख्यात 'ग्लास हाऊस' मध्ये आलो खास प्रदर्शनासाठी बांधलेल्या ह्या हॉलची पायाभरणी बंगलोर भेटीच्या वेळी १८८९ मध्ये इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सने केली बांधले तव्हा या काचघराला काचा होत्या तेवढ्या आज नाहीत अशी माहिती मिळाली काँग्रेस पक्षाचे १९६९ चे ऐतिहासिक अधिवेशन येथेच भरले आणि पक्ष दुभंगला । लंडनमधील क्रिस्टल हॉलच्या धर्तीवर ग्लास हाऊस बांधले असून त्याचे क्षेत्र १८००० चौ फूट आहे. अधिक चिन्हाच्या वैशिष्ट्यपूर्ण आकारातील या इमारतीला उंच लोखंडी स्तंभ आहेत. मध्ये छोटा हौद आहे गोलाकार छताला, तसेच बाजूला

काचा लावलेल्या आहेत या ग्लासहाऊसने अनेक प्रदर्शनाना शोभा प्राप्त करून दिली

समोर दोन उचच्या उच डौलदार खिसमस ट्री आहेत त्याची शोभा काही औरच आहे उल्का–उदयाचा फोटो या झाडाच्या पार्श्वभूमीवर काढला व लालबागचा निरोप घेतला.

रिक्षाने लॉजकडे परत निघालो वाटेत बाजार पेठेत बंगलोर सिल्क साडीची खरेदी केली लॉजवरून सामान घेऊन बंगलोर स्टेशनवर सध्याकाळी सातला आलो. रात्री आठला कर्नाटक एक्स्प्रेसने बंगलोरचा निरोप घ्यायचा होता.

गाडीला तुफान गर्दी होती. पण हमालाच्या कृपेमुळे एक बर्थ व बसायला जागा मिळाली रात्रीचे आठ वाजले गाडीने शिटी दिली. कर्नाटक एक्स्प्रेस मिरजेकडे धावू लागली

❑

# परतीचा प्रवास

३५ दिवसाच्या प्रवासाची शेवटची रात्र! दीर्घ प्रवासाच्या सुखद आठवणींनी मन भारावून गेले होते.

भारतदेश किती विशाल आहे, विविधतेने नटला आहे याची साक्ष पावलो-पावली पटली होती. प्रवासात गंगा, कृष्णा, गोदावरी, महानदी, कावेरी इ. नद्यांची खोरी जशी पाहिली तशी निलगिरी पर्वताची मनोहारी शिखरेही पाहिली. कलकत्त्याच्या विशाल वटवृक्षाखाली जसे विसावलो होतो तसेच उटी, वृंदावन (म्हैसूर) बंगलोर येथील बगीच्याच्या सौंदर्याने तृप्त झालो होतो. पूर्वेकडे भुवनेश्वर हे मंदिरांचे शहर जसे पाहिले तसे दक्षिणेकडील कुंभकोणम, कांची! मदुराई, बेलूर, हळेबीड येथे नारीसौंदर्याचा अपूर्व साक्षात्कार झाला.

रामायण, महाभारत हीच भारताची खरी संस्कृती आहे हेही पटले. राम सीता, लक्ष्मण, हनुमान ही रामायणाची दैवते तर पंचपांडव श्रीकृष्ण व द्रौपदी ही महाभारतातली! पाटणा, गया, कोनार्कपासून ते कन्याकुमारी पर्यंत ठायी ठायी त्यांची साथ मिळत होती. महाबलीपूरमला दगडावर कोर-लेली अर्जुनाची तपस्या, दगडात कोरलेले पाच पांडवांचे रथ पाहून स्तिमित झालो. लोणी खाणारा गोवर्धनगिरी उचलणारा नटखट श्रीकृष्णही वारंवार भेटत होता. भगवान शंकरांचे अस्तित्व तर साऱ्या भारतवर्षात जाणवते. कन्याकुमारीला सतीचे समुद्रातील खडकावर उमटलेले पाऊल पाहून तर आश्चर्याने थक्क झालो. भाषा, पंथ, जाती, स्वभाव भिन्न असणारे भारतीय

या दैवतांसमोर मात्र भेदभाव विसरून,नतमस्तक होताना पाहून या दैवतांनी भारतीयांना एका सूत्रात बांधण्याचे एकात्मतेचे महान सांस्कृतिक कार्य केले आहे याची साक्ष पटली

कोनार्कचे सूर्यमंदिर पहायचे हे माझे स्वप्न होते ते प्रत्यक्ष पहाताना अद्भूतरम्य भावगर्भ विश्वात माझी मीच स्वप्नगूढ मन:स्थितीत हरवून गेले होते

कोनार्कच्या भेटीत मोहिनी टाकलेला सूर्यदेव कन्याकुमारीपर्यंत जणू पाठलाग करीत होता विशाल सागरात अस्तगत होणारे त्याचे बिंब जगरहाटीचे चक्र अखंडपणे फिरवीत होते

भारताच्या महान हिंदू सांस्कृतिक वारशाची प्रचीती तर ठिकठिकाणी आली स्वामी विवेकानंदांना कलकत्त्याच्या बेलूरमठ्ात त्यांच्या समाधीस्थानी श्रद्धांजली वाहिली रविंद्रनाथ टागोरांचे निवासस्थान, कर्मभूमी पहायला मिळाली कन्याकुमारीला जेथे स्वामी विवेकानंदाना साक्षात्कार झाला त्या समुद्रकिनारी नतमस्तक होताना धन्य वाटले गौतम बुद्ध, भगवान महावीर, भगवान गोमतेश्वर यांच्या भव्य पुतळ्यांचे दर्शन घडले।

मन अगदी तृप्त झाले होते प्रवासाने शरीर थकले होते. पण मन उत्साहीत व टवटवीत झाले होते. प्रवास संपला म्हणून चिमुकले उल्का-उदयही नाराज झाले

सकाळी सहालाच गाडी हुबळी स्टेशनवर आली तेथे चहापाणी आटोपले. आता गाडी मिरजेच्या दिशेने धावू लागली सकाळी अकरा वाजता बेळगाव स्टेशनच्या आवारात गाडी आली गाडीतून दिसणाऱ्या दुकानांचे मराठी बोर्ड पाहून कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमारेषेवर पोहोचल्याचा आनंद झाला. स्टेशनवर रविवारचा सकाळ पाहून तर मुलांनी तो वाचण्यासाठी भांडा-भांडीच सुरू केली गाडी मिरज स्टेशनमध्ये शिरली तेव्हा दुपारचे दोन वाजले होते पाचच मिनीटात महाराष्ट्र एक्स्प्रेस आली चांगली ऐसपैस जागा मिळाली सामान व्यवस्थित लावले आणि मग दहीभात, पुरीभाजी यांच्या घेतलेल्या पॅकेट्सवर ताव मारला

गाडी सुरू झाल्यावर शेजारच्या गृहस्थाने कुठे जायचे अशी चौकशी केली त्याला आम्ही नगरला जायचे असे म्हटल्यावर तो चमकलाच. कारण तो पंढरपूरहून आला होता व त्याला जायचे होते कोल्हापूरला! मिरजेला महाराष्ट्र एक्स्प्रेसचे क्रॉसिंग असल्याने तो कोल्हापूरकडे जाणाऱ्या गाडीऐवजी चुकून नागपूरकडे जाणाऱ्या महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये बसला होता त्याच्याबरोबर मुलेबाळे, खूपसे सामान होते सांगली स्टेशन आल्यावर तो खाली उतरला प्रवासात असा घोटाळा केव्हा केव्हा होतोच

संध्याकाळी सहाला सातारा स्टेशन आले पावसाचा थोडा शिडकावा झाल्याने वातावरण शीतल झाले होते रात्री साडेनऊला पुणे स्टेशनवर एकच गर्दी झाली पाणी आणण्यासाठी बाहेर पडणे मुश्कील झाले कोणी ओळखीचे दिसते का म्हणून पाहिले पण कोणी दिसले नाही इंजिनने दिशा बदलली गाडी दौंडकडे निघाली दौंडला गाडी आली तेव्हा रात्रीचे साडेअकरा वाजले होते गाडी तेथे जवळजवळ अर्धा तास थांबली. झोप येत होती पण झोप लागेल व नगर येईल या धास्तीने जागेच होतो. झोप घालविण्यासाठी कॉफी घेतली.

रात्री दोन वाजता महाराष्ट्र एक्स्प्रेस नगर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर थांबली कोनार्क ते कन्याकुमारीपर्यंतच्या दीर्घ प्रवासाची सांगता झाली होती

REFBK-0021926